
वेध अंतर्मनाचा
वेध परिवारातील सदस्यांचे अनुभव कथन

# वेध अंतर्मनाचा

वेध परिवारातील सदस्यांचे अनुभवकथन

**संपादन :– सोमनाथ वाळके**

**प्रकाशक :– वेध महाराष्ट्र**

**मुखपृष्ठ:– स्वाती गवई**

**मलपृष्ठ :– दत्तात्रय वारे**

**अक्षरजुळणी व ग्राफिक्स :– सोमनाथ वाळके**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिकेचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | मा.श्री.नंदकुमार | ४ |
| २ | एक बीट घडताना | रमेश मुक्ता–विठ्ठल ठाकूर | ६ |
| ३ | आमचे मेघ सुंदरम | प्रविणकुमार काळम पाटील | १६ |
| ४ | जरासा झूम लु मै | शंकर गाडेकर | ३९ |
| ५ | तालुका प्रगत करताना | डॉ.गणपती कमळकर | ४६ |
| ६ | तालुका प्रगत करताना | धनपाल फटिंग | ५१ |
| ७ | सुभाषित | गोदावरी राठोड | ५५ |
| ८ | कडक भाकरी | स्वाती स्वामी | ५९ |
| ९ | माझा जीवन प्रवास | भाऊसाहेब काकडे | ६३ |
| १० | असा माझा प्रवास | नीता सोनवणे | ६५ |
| ११ | माझे शिकणे आणि शिकवणे | तात्यासाहेब मेघारे | ६८ |
| १२ | एक गुरुजी घडताना | दादासाहेब नवपुते | ७५ |
| १३ | शेतीतून शिकणं फुलवताना | बाबू मोरे | ८४ |
| १४ | माझा अद्भुत शिक्षण प्रवास | नितीन गबाले | ९२ |
| १५ | बालरक्षक चळवळीची मुहूर्तमेढ | जगदीश कुडे | १०९ |
| १६ | बालरक्षक चळवळीची कडी | पेंटू मैसनवाड | ११६ |
| १७ | माझा संघर्षमय शैक्षणिक प्रवास | सविता ढाकणे | ११९ |
| १८ | शब्दांचे बाग फुलवताना | मीनाक्षी राऊत | १२७ |
| १९ | अशी धडपडली सुनिता | सुनिता लहाने | १३३ |
| २० | PSM ते वेध व्हाया DIET गडचिरोली | सुचरिता काळे | १४३ |
| २१ | प्रवास गुणवत्तेचा | सुवर्णा सुतार | १४७ |
| २२ | अनियमित मुलांची १००%उपस्थिती | किरण गायकवाड | १५७ |
| २३ | माझं शिकणं | वैशाली साबदे | १६० |
| २४ | माझ्यातील शिक्षकाची घडण | सौदागर कांबळे | १६५ |
| २५ | अंधाराकडून प्रकाशाकडे | रोहिणी विद्यासागर | १६९ |
| २६ | बार बार हां | अलका झरवाल | १७९ |
| २७ | माझे जीवन गाणे | रोहिणी गायकवाड | १८८ |
| २८ | ॲक्सिडेंटल टीचर | अनिल पाटील | १९१ |

# प्रस्तावना

नंदकुमार (भा.प्र.से.)



**'वेध'** परिवारातील सदस्यांनी  स्वानुभवावर लिहिलेल्या लेखांचे 'वेध अंतर्मनाचा' या पीडीएफ पुस्तकाची पहिली आवृत्ती आपल्या हातात देताना आनंद होत आहे. 'वेध' परिवार सबंध देशातील मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्कृष्ट शिक्षण देण्यासाठी कार्य करीत आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण घेतलेली मुले म्हणजे जगभरात स्वीकार्यता असलेली मुले, फ्युचर रेडी मुले आणि PISA सारख्या परिक्षेत जगभरातील देशांमधे देशाला प्रथम 20 क्रमांकावर आणणारी मुले. अशी मुले जी जागतिक नागरिक असतील. कोणत्याही देशात कार्य आणि उद्योग धंदा करताना त्यांना अडचण येणार नाही.

अशी मुले तयार करणारे शिक्षक कसे असतील? तर ते पण स्वतः नवनवीन बाबी शिकणारे व त्या अंमलात आणणारे असतील. असे शिक्षक ओळखायचे कसे? जी व्यक्ति स्वतःच्या शिकण्यावर लक्ष ठेवते ती व्यक्ती सतत शिकत राहणार अशी माझी समजूत आहे. स्वानुभव लिहून काढल्यास कोणत्या प्रसंगातून, कोणत्या व्यक्तीकडून काय शिकायला मिळाले हे स्वतःला लक्षात येते. स्वानुभव लिहिणाऱ्या व्यक्ती आयुष्यात अधिक शिकण्यासाठी प्रसंग आणि व्यक्तींची निवड करु शकतात किंवा मुद्दाम तसे काही प्रसंग आणि भेटी घडवू शकतात.

एकविसावे  शतक माहिती मिळवण्याचे नसून भडीमार होत असलेल्या माहितीची योग्य मांडणी आणि गतीने विश्लेषण करून समस्यांचे निराकरण करण्याचे आहे. आज संगणकीय विचारसरणीचा काळ आहे. जगात घडणाऱ्या प्रत्येक घटनेस प्रोसेसिंग करता येणारा डाटा म्हणून बघण्याचा हा काळ आहे. या काळात आपापल्या आयुष्यातील कोणत्या घटनांनी आपल्याला घडवले आहे तर कोणत्या घटनांनी बिघडवले आहे हे ओळखू शकणारे लोक एका अर्थाने एकविसाव्या शतकातील माणसे. अशीच माणसे भविष्य वेधी मुले तयार करु शकतात. या उद्देशाने मी स्वानुभव लेखनाकडे बघतो.

त्याच प्रमाणे लेखन हा संवाद कौशल्यातील एक महत्त्वपूर्ण घटक आहे. संवादातील संभाषण आणि लेखनाची तुलना केल्यास बोलताना आपण बऱ्याच शब्द आणि वाक्यांचा उपयोग करून एखादा मुद्दा मांडत असतो तर लिहिताना तोच मुद्दा कमी शब्दात आणि वाक्यांत मांडावा लागतो कारण की अधिक लांबीचे लिहिलेला मजकूर वाचक वर्गाकडून न वाचता सोडून देण्याची भिती असते. कमी शब्दात लिहिण्यासाठी मेंदूला वेगळी कसरत करावी लागते. शिक्षकांच्या मेंदूला अशी कसरत करण्याची सवय असल्यावर ते मुलांच्या मेंदूलाही ही शिस्त शिकवतील अशी आशा आहे.

हे पीडीएफ पुस्तक तयार होत असतानाच भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 स्वीकारले आहे.या प्रस्तावनेत उल्लेखले गेलेले जागतिक स्तराचे शिक्षण, संगणकीय विचारसरणी आणि एकविसाव्या शतकातील कौशल्ये यांचा उल्लेख नवीन धोरणामध्ये आहे हे पाहून आनंद होतो की राष्ट्रीय पातळीवरील विचार समोर येण्यापुर्वीच वेध ग्रुप त्याच्या अंमलबजावणीची पाऊले टाकत आहे.

एकूणच, स्वानुभव लिहिणारे शिक्षक एकवीसाव्या शतकातील शिक्षक म्हणून स्वतःची तयारी करून घेत आहेत. त्यामुळेच या आवृत्तीत ज्यांचे लेख आलेले आहेत ते सर्व अभिनंदनास पात्र आहेत. त्यांच्याकडून भविष्यातील मुले घडतील या शुभेच्छेसह....उरलेले वेधकरींचे लेख पुढील आवृत्तीत सामील होतील अशी मी आशा बाळगतो.

नंदकुमार

(भा.प्र.से.)

# एक बीट घडताना...!

रमेश मुक्ता-विठ्ठल ठाकूर



माझे वडील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक होते. विशेष म्हणजे मी सातवीत असताना मला वर्गशिक्षक होते. त्यामुळे शिक्षक होण्यात अभिमानच होता.सुरुवातीची तेरा वर्ष शिक्षक म्हणून नोकरी केली. पण मनात थोडी मोठी स्वप्न रुंजी घालत होते.स्पर्धा परीक्षा दिली आणि शिक्षण विस्तार अधिकारी या पदासाठी औरंगाबाद जिल्ह्यात निवड झाली.

## पार्श्वभूमी

**माझे वडील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक होते. विशेष म्हणजे मी सातवीत असताना मला वर्गशिक्षक होते. त्यामुळे शिक्षक होण्यात अभिमानच होता.**

**सुरुवातीची तेरा वर्ष शिक्षक म्हणून नोकरी केली. पण मनात थोडी मोठी स्वप्न रूंजी घालत होते.स्पर्धा परीक्षा दिली आणि शिक्षण विस्तार अधिकारी या पदासाठी औरंगाबाद जिल्ह्यात निवड झाली. सुरुवातीला सोयगाव पंचायत समितीत शिक्षण विस्तार अधिकारी, काही काळ प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून काम पाहिले. तिथे काम करत असताना अनेक अडचणी आल्या. आयुष्यात बरीच उलथापालथ झाली. 2012 साली बदलीने औरंगाबाद पंचायत समिती येथे रुजू झालो. तत्कालीन शिक्षणाधिकारी मा. एम.के.देशमुख साहेब यांनी माझ्या कार्यक्षमतेवर विश्वास दाखवून जिल्ह्याचा आर टी ई कक्ष माझ्याकडे सुपूर्द केला. त्यासाठी सर्व शिक्षा अभियानाच्या इमारतीत एक स्वतंत्र ऑफिस, दिमतीला चार क्लार्क,दोन शिपाई असा लवाजमा. कुठलीच कमी नव्हती.पद,मान–पान,प्रतिष्ठा सर्व काही मिळत होतं. कामही प्रचंड होतं. फाईलींच्या गराड्यात बसून मिळत असलेला मान....मान वर करून घ्यायला देखील मला उसंत नव्हती. प्रतिष्ठित शाळेचे मोठ मोठे संस्थाचालक.... सीबीएसई व आयसीएसई शाळेचे प्रिन्सिपल...ज्यांची पाच मिनिटं दुसऱ्या लोकांनां मिळणं कठीण असायचे.... ते माझ्याकडे मात्र माझी अपॉइंटमेंट घेऊन मला भेटण्यासाठी ऑफिस बाहेर तास–तास भर ताटकळत उभे राहायचे. त्यांच्या मोठमोठ्या गाड्यांमधून फिरवायचे. सगळं अगदी व्यवस्थित सुरू होतं. अगदी मजेत....!!**

**पण आयुष्य मधेच कधी वळण घेईल,हे सांगता येत नाही.एखादी घटना,गोष्ट निमित्य होऊन जाते आयुष्यातील टर्निंग पॉइंट बनून.....आणि ह्या टर्निंग पॉईंटवर तुमचे विचार ही टर्न होतात.**

30 एप्रिल 2015.... तत्कालीन शिक्षण सचिव मा. नंदकुमार साहेब यांनी सातारा येथे राज्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी व सर्व शिक्षण विस्तार अधिकारी यांची दोन–दोन दिवसांची कार्यप्रेरणा कार्यशाळा आयोजित केली होती. त्या कार्यशाळेला मला उपस्थित राहावे लागणार होते. कायम फाईलींच्या गराड्यात हरवलेलो

मी,थोडा निवांतपणा शोधण्यासाठी म्हणून व रुटीन कामातून थोडा चेंज म्हणून,जस्ट ऍज अ ट्रिप, मी माझ्या काही शिक्षण विस्ताराधिकारी मित्रांसोबत त्या कार्यप्रेरणा कार्यशाळेला हजर झालो.पण त्यातून कार्यप्रेरणा वगैरे घ्यायची असा काही विचार त्यावेळी डोक्यात घेऊन गेलो नव्हतो.... केवळ आदेश आहे,त्यामुळे एक औपचारिकता म्हणून मी उपस्थित राहणार होतो. कारण इकडे साहेबी थाटात मी रममाण झालेलो होतो..... आणि मला आता तोच माझा कम्फर्ट झोन वाटायला लागला होता.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीची सुरुवातच "धिरे धिरे यहा का मौसम बदलने लगा है.....!" या गाण्याने झाली.गाणं ऐकायला छान वाटलं.अर्थ ही सुंदर होता.चाल ही मस्त होती.त्यानंतर मा. गटशिक्षणाधिकारी नामदेव माळी साहेब व कुमठे बीट विस्तार अधिकारी मा.प्रतिभाताई भराडे यांनी बोलायला सुरुवात केली.त्यांचे शब्द व अनुभव दिवसभर कानावर पडत होते....पण सोबतच मनात जागा घेत होते. काहीतरी वेगळेपण आणि एक चांगला उद्देश मला त्यांच्या बोलण्यात जाणवत होता.माझ्या आतील कम्फर्ट झोनला काही प्रमाणात हादरे बसायला सुरुवात झाली होती. व्यक्तिमत्त्वातील साहेबी लेप ही थोडा वितळायला सुरुवात झाली होती.

दुसऱ्या दिवशी आम्ही कुमठे बिट मधील शेळकेवाडीची शाळा बघायला गेलो.शाळा पाहिल्यावर...परंपरागत शाळेंच्या औपचारिकपणाला तिथं पूर्णतः बगल दिलेली होती.मूलं साहित्य घेऊन स्वतःच शिकत होती. मुलांना पूर्ण स्वातंत्र्य दिलं गेलं होतं. वर्ग साहित्यांनी खचा–खच भरलेले होते.कुठेतरी पुस्तकात वाचलेली ज्ञानरचनावादाची संकल्पना,आज जिवंत होऊन पुस्तकाबाहेर येऊन समोर साकारताना दिसत होती.

माझ्यासाठी हे सगळं नवीन होतं.त्यादिवशीचा अनुभव हा अभूतपूर्व असाच होता.

हे सगळं पाहून परतीच्या प्रवासाला लागलो......परत "धिरे धिरे यहा का मौसम बदलने लगा है....!" हे गाणं वाजायला सुरुवात झाली. गाडीत आणि सोबत मनातही....!!

परतीच्या संपूर्ण प्रवासात मी डोळ्याने खिडकीबाहेर पाहत होतो.....डोळ्यात समोर दिसत असलेल्या गोष्टींच्या प्रतिमा उमटत होत्या खऱ्या.....परंतु मनात मात्र वेगळ्याच आणि नवीन विचारांना अंकुर फुटायला सुरुवात झाली होती.दोन दिवस अस्वस्थतेत गेले.मनात विचारांचं द्वंद्व सुरू झालं होतं.माझाच माझ्याशी संघर्ष सुरू झाला होता. काय करावं...? आहे ते ऐश्वर्य उपभोगत राहायचं,की आपणही आता ज्यासाठी शासनाने आपली खरी नेमणूक केली आहे,त्या कामासाठी स्वतःला वाहून द्यायचं..? स्वतःच्या हातात आज जे काही

होतं ते स्वत:हून त्यागनं ही एवढं सोपं नव्हतं.कारण साहेबीपणाची सवय झाली होती. माझाच माझ्याशी संवाद सुरू होता.एक मन बोलत होतं की, जे तुझ्याकडे सध्या आहे ,ते दुसऱ्या कोणालाही सहज मिळत नाही. पद,मानपान,प्रतिष्ठा सर्व गोष्टी तुझ्या पायाशी लोळण घालताय. कशाला स्वत:हून हे सगळं सोडतो....? दुसरं मन सांगत होतं की,शासनाने ज्यासाठी तुझी या पदावर नियुक्ती केली आहे,ते पद तुला या गोष्टी करण्याची अनुमती देत नाही.तुझ्या बीट मधील पाच हजार लेकरांचे शिक्षण सुकर करण्यासाठी.....त्यांचे शिकणे सोपे करण्यासाठी आणि त्यांच्या शिकण्यातील अडथळे दूर करण्यासाठी तुझी नेमणूक झाली आहे.या दोन विचारांच्या संघर्षातून, मी शेवटी एका विचारावर येऊन ठाम झालो. आता पुरे...!! पुढचं सगळं आयुष्य फक्त आणि फक्त लेकरांच्या शिक्षणासाठी खर्ची घालायचं...!!

तात्काळ दुसऱ्या दिवशी म्हणजे माझे तत्कालीन शिक्षणाधिकारी मा. नितीन उपासनी साहेब यांची भेट घेतली आणि त्यांना माझ्या मनातील विचार बोलून दाखवला. मला माझ्या बिटमधे काम करायचं आहे. जास्तीत जास्त वेळ माझ्या बिटमध्ये द्यायचा आहे, हे सांगून मी दोन अडीच वर्षाचा सर्व थाट...मानपान आणि साहेबी मुखवटा तिथेच सोडून आलो....माझ्या मूळ कर्तव्यावर हजर होण्यासाठी.....लेकरांना शिकतं करण्यासाठी.....शिक्षकांना सहकार्य करण्यासाठी....!!!

## चाचपडत पण आत्मविश्वासाने सुरुवात...

मधल्या काळात बीटची सर्व माहिती करून घेतली. तीन केंद्र...45 जिल्हा परिषदेच्या शाळा.

शिवाय जमेची बाजू म्हणजे बिटमधील चार शाळा ISO प्रमाणपत्र मिळविण्याच्या वाटेवर होत्या.

आजही आठवतो मला तो दिवस....13 जून 2015 ! तिन्ही केंद्रांच्या केंद्रप्रमुखांना विश्वासात व सोबत घेऊन बीटच्या सर्व शिक्षकांची एक कार्यशाळा कचनेर येथे आयोजित केली. जे गाणं डोक्यात आणि मनात कायम वाजत राहायचं, त्या धिरे धिरे यहा का मौसम बदलने लगा है या गाण्यानेच केंद्रप्रमुख विठ्ठल बेद्रे सरांनी त्या कार्यशाळेची सुरुवात केली. खरंतर माझंही त्यावेळी ज्ञानरचनावादाचं ज्ञान फ़ारच तोकडं होतं. त्याबाबत मलाही फारसं काही माहित नव्हतं. पण एक मात्र मनाला पक्कं माहीत होतं की,आपल्याला नेमकं काय करायचं आहे. कसं करायचं हे निश्चित दिसत नव्हतं. कुमठे बिट वरून जेवढे पाहून आलो होतो... तेवढंच मला माहित होतं,जे काम करण्यासाठी अजिबातच पुरेसं नव्हतं. पण एकदा सुरुवात झाली आणि मार्गावरुन चालायला लागलो की रस्ते आपोआप सापडतील हा आत्मविश्वास मात्र मनात नक्कीच होता. त्या दिवशीच्या कार्यशाळेमधेच गारखेडा बिटच्या आजवरच्या कामाची ठिणगी पडली आणि शिक्षकही प्रेरित झाले. थोडक्यात बिटमधील कामाची मुहूर्तमेढ तिथेच रोवली गेली. आपल्या सगळ्यांना मिळून काय काम करायचं आहे,याची कल्पना मी त्या कार्यक्रमांमध्ये माझ्या सर्व शिक्षकांना दिली आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे सगळ्या शिक्षकांनी देखील

आपण सगळे सोबत आहोत हा शब्द मला दिला. अर्थात आता हे साहेब काही दिवस नवीन काही तरी करणार असं म्हणून हसणारे होतेच !

काम जस जसं पुढे सरकत होतं तसतशा अडचणी यायला सुरुवात झाली, ज्या गृहीत धरलेल्याच होत्या. शिक्षकांच्या मनातील प्रश्नही कामाला सुरुवात केल्यावर वाढत चालले होते. पण आता माघार नव्हतीच आणि परतीचे दोर तर मी स्वतः केव्हाच कापून टाकले होते.

पण अडचणींचे उत्तरे शोधताना जाणवायला लागले की, ज्ञानरचनावाद यासंदर्भात आपल्याला खोलवर ज्ञान मिळवणे फार गरजेचे आहे. प्रतिभाताईशी सतत बोलणे सुरू असायचे. तेव्हा त्यांनी काही पुस्तके वाचायला सुचवले. दिवास्वप्न, प्रिय बाई, तोत्तोचान अशी पुस्तके मी वाचायला सुरुवात केली. त्यातीलच एक भराडे ताईंचं "कवाडे उघडताच" व माळी साहेबांचे शाळाभेट हे पुस्तक मनाला स्पर्शून गेलं. कवाडे उघडतात पुस्तकाच्या 50 प्रती विकत घेतल्या. आणि माझ्या बीट मधील सर्व 45 शाळेत 1 जुलै 2015 पासून प्रत्यक्ष स्वतः जाऊन ते पुस्तक शिक्षकांच्या हातात देण्याचा संकल्प मी मनोमन केला. हे करण्याचे कारण एक विशेष उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मी केलं होतं, ते म्हणजे या पुस्तक देण्याच्या निमित्ताने माझ्या पंचेचाळीस शाळांना भेटी होतील आणि मला प्रत्यक्ष शिक्षकांशी संवाद साधता येईल. शाळेची भौतिक परिस्थिती व गुणवत्ता आणि नेमकं आपल्याला जे काम करायचे आहे ते काम सुरू करण्याआधी सद्य परिस्थिती काय आहे याचा मागोवा घेता येईल.म्हणून पूर्ण 45 शाळेमध्ये स्वतः जाऊन ते पुस्तक शिक्षकांच्या हातात सुपूर्द केलं.काही शाळेंच्या भौतिक परिस्थितीत सुधारणा करणे गरजेचे असल्याचे माझ्या लक्षात आले होते.त्यासाठी काय करता येईल,हा विचार माझ्या डोक्यात सुरूच होता.तुमच्या कामाचा हेतू शुद्ध आणि प्रामाणिक असला की,आपोपाप तुमच्या कामाला पुढे नेण्यासाठी काही अदृश्य हात तुमच्या मदतीला येतात.सेवक ट्रस्ट एंड्युरन्स व जानकी देवी बजाज फौंडेशन हे त्यावेळी आमच्या मदतीला आमच्या कामी आलेले हात...!!

एव्हाना माझ्या लक्षात आलं होतं की, झाडाची वाढ जर व्यवस्थित व्हायची असेल, तर पाणी व इतर सर्व घटक त्याच्या मुळापर्यंत जाणे गरजेचे असते.तसेच जर माझा प्रत्येक शिक्षक प्रगल्भ व्हायचा असेल तर, ज्ञानरचनावादाच्या मुळापर्यंत जाऊन त्याची पाळेमुळे समजून घेतल्याशिवाय पर्याय नाही.आणि म्हणून एका खासगी संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक शिक्षकांनी स्वतःचे पैसे खर्च करून पेड ट्रेनिंग घ्यायला सुरुवात केली. सर्वांनी स्वखर्चाने ज्ञानरचनावादावर आधारित मराठी आणि गणित विषयाचे प्रशिक्षणे स्वतःहून घेतले. पर्यवेक्षीय अधिकारी म्हणून मलाही प्रगल्भ होणे गरजेचं होतं. कारण 22 जून 2015 रोजी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयाने पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांची तपासणीसाची भूमिका हद्दपार करून सुलभकाची भूमिका रुजवायला सुरुवात केली होती. शिक्षकांना येणाऱ्या अडचणी सोडवायच्या असतील तर मलाही ती प्रत्येक गोष्ट शिकून घेण्याची गरज होती. म्हणून आयोजित केलेल्या प्रशिक्षणाला पूर्ण वेळ मी स्वतः बसून सगळे संबोध समजून घेऊ लागलो. आता प्रत्येकाची ज्ञानाची भूक वाढत चालली होती आणि प्रत्येक जण स्वतः पैसे खर्च करून

प्रशिक्षण घ्यायला तयार होत होता. आणि मला वाटतं की शिक्षकांनी स्वत: पैसे खर्च करून प्रशिक्षण घेणं ही गोष्ट माझ्या पाहण्यात तरी पहिल्यांदाच घडत होती.

एकीकडे सगळे शिक्षक माझ्या प्रत्येक आवाहनाला प्रतिसाद देत होते,तर दुसरीकडे अप्रत्यक्षपणे माझी जबाबदारी आणखी वाढत चालली होती. शिक्षकांनी प्रशिक्षणासाठी पैसे खर्च करणे मला आतून पटत नव्हते. मग मीच पुणे, मुंबई या ठिकाणी जाऊन शिक्षणाच्या विषयावरील प्रशिक्षणे स्वखर्चाने घ्यायला लागलो. प्रशिक्षण घेणे आणि आल्यानंतर माझ्या सर्व शिक्षकांना घेऊन त्यांना प्रगल्भ करणे हा तेव्हापासून सुरू झालेला शिरस्ता आजही कायम आहे. यात SCERT ने मा. सुबिर शुक्ला याच्या घेतलेल्या कार्यशाळा खूप उपयोगी ठरल्या.

## आणि साहेब गळून पडला...

काम सुरु होते पण तरी काही तरी सुटत होते... अपूर्णता जाणवत होती. शिक्षकांशी संवाद होता पण अंतरही होते. आणि एक प्रसंग अचानकच घडला. मा. नंदकुमार साहेबांचा औरंगाबाद दौरा होता. साहेब एका शाळेला भेट देणार होते. आम्ही आमच्या सोयीने शाळा निवडली, तयारी केली. गाड्या निघाल्या आणि साहेबांनी त्यांच्याकडील माहीती वरून दुसरीच शाळा ऐनवेळी सांगितली. शाळा अशी की तेथे चारचाकी गाडी जात नाही. धावपळ करून, पायी चालत आम्ही शाळेत पोहचलो. आम्ही विस्तार अधिकारी साहेब, पुढे पळत जाऊन सरळ वर्गात गेलो. गुरुजींला सूचना द्यायला सुरुवात केली. पाठीमागून आदरणीय नंदकुमार साहेब आले. त्यांनी वर्गात जाण्यापूर्वी निरीक्षण केले, गुरुजी व विद्यार्थी यांची पादत्राणे वर्गाच्या बाहेर काढली होती. साहेबांनी स्वत:चे बूट वर्गाबाहेर काढले व मग वर्गात गेले आणि मी बुटासहित आत होतो. हा प्रसंग खूप शिकवून गेला. सरांचे मुलांशी बोलणे, फरशीवर बसणे कायमचे हृदयात कोरले गेलंय. ते पाहून माझ्यातील।साहेबपणा त्यादिवशी निखळून पडलाच,पण खुर्चीवरून फरशीवर येण्याचा पाठ नकळत आम्ही साहेबांकडून शिकलो..... जो आजपर्यंत मी आचरणात आणत आहे.शिक्षकांशी मैत्रीपूर्ण व सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांचा विश्वास जिंकणं आणि तो मिळवणं यासाठी जे काही करता येईल ते मी करत होतो. शिक्षकांचे मॉनिटरिंग नाही,तर त्यांना सपोर्टींग असण्याकडे माझा कल होता. शिक्षकांचा विश्वास जिंकण्यात आणि त्यांना एकमेकांशी जोडण्यात मी बराच यशस्वी होत चाललो होतो.

केन्द्रस्तरावर मुख्याध्यापकांच्या बैठका,तसेच शिक्षकांची प्रशिक्षणे न घेता,आम्ही ते बिटस्तरावर आयोजित करायला लागलो.महिन्यातून एकदा सर्व मुख्याध्यापकांची सहविचार सभा घ्यायला लागलो.

परिणामी काही महिन्यांनी केंद्रा–केंद्रातील सीमा रेषा पुसट होत जाऊन बीट म्हणजे एक कुटुंब ही भावना प्रत्येक शिक्षकात रुजायला सुरुवात झाली होती.

महिन्यातून एखादया तरी शाळेच्या शाळेयव्यवस्थापन समितीच्या बैठकांना हजर राहण्याचा विचार मी माझ्या तिन्ही केंद्रप्रमुखांना बोलावून दाखविला.त्यांनीही लगेच त्याला सहमती दर्शवली.उद्देश हाच होता की, गावाला व गावकऱ्यांना जोडले जावे व त्यांचा विश्वास जिंकून, त्यांचे जास्तीत जास्त

सहकार्य शाळेसाठी मिळवायचे.त्यात आम्ही बऱ्याच अंशी यश मिळवत होतो.माझे सहकारी केंद्रप्रमुख खांडेभराड नाना, बेद्रे सर आणि गोर्डे नाना यांच्या सहकार्याशिवाय हे घडणं अशक्य होतं. मी या तिघांच्या कायम ऋणात राहू इच्छितो.

## चलो कुमठे....




डिसेंबर 2015.....बिट मधील सगळ्या मुख्याध्यापकांना सोबत घेउन कुमठे बीट भेटीचं नियोजन आम्ही केलं. बीटच्या ग्रुपवर तसं सगळ्यांना आवाहन केलं. अपेक्षेप्रमाणे पुरुष मंडळींकडून चांगला प्रतिसाद मिळाला. परंतु महिला मुख्याध्यापिका कडून अजिबातच प्रतिसाद मिळाला नाही......तसं होण्याची शंका माझ्या मनात आधीच येऊन गेली होती. कुठेतरी जाणवत होते की, महिलांना यायची इच्छा आहे, पण पहिल्यांदाच असं काहीतरी घडत होतं की, शाळेला भेट दयायच्या निमित्याने घरापासून एवढ्या दूर जावे लागणार होते. त्यामुळे महिला कुठेतरी थबकताना मला दिसल्या. तेव्हा बीट मधील जेष्ठ व आदर्श मुख्याध्यापिका जोशी मॅडम यांना विनंती केली की, तुम्ही ग्रुपवर माझ्या प्रतिसादाला "हो" म्हणा, मग तुमच्यामुळे तरी काही महिला येण्याची तयारी दाखवतील. पण ह्या प्रयोगा नंतरही हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी मी ग्रुप वर असे जाहीर केले की, आपल्या सोबत मुकुल मंदिर शाळेतील शिक्षिका येणार आहेत. मग कुजबुज सुरु झाली. कोण आहेत त्या ? मग कळलं की त्या माझ्या पत्नी आहेत. थोडं असं विनोदी शैलीत जाहीर केल्यामुळे महिला एकदम खुलल्या आणि उत्तम प्रतिसाद मिळाला. एक बस घेऊनच आम्ही कुमठेला पोहचलो. आजपर्यंत कुमठे व तेथील शाळेंबद्दल मी अनेक वेळा त्यांना सांगितलं होतं. मला कळलेला ज्ञानरचनावाद ही त्यांच्यापर्यंत मी पोहचवला होता. पण प्रत्यक्ष जेव्हा त्यांनी तेथील सगळया गोष्टी पाहिल्या,तेव्हा त्यांचा स्वत:वरचा आणि माझ्यावरचा विश्वास आणखी वाढला.

परतीच्या प्रवासातही गाडीत फक्त आणि फक्त कुमठे आणि तेथील शाळा यांचीच चर्चा जास्त चालू होती. त्यांच्या डोळ्यातील आनंद आणि आत्मविश्वास पाहून कुमठे दौरा यशस्वी ठरला,हे कोणी वेगळ्याने येऊन सांगण्याची गरज उरली नव्हती.

कुमठे दौऱ्यानंतर एक वेगळीच ऊर्जा आणि उत्साह सर्व शिक्षकांमध्ये संचारला. तिथून आल्यानंतर माझ्या आवाहनाची वाट न बघता शिक्षकांनी स्वत:च्या खिशातून हजारो रुपये खर्चून शाळांमध्ये रंगरंगोटी सुरू केली. भिंती रंगविल्या. फरश्यावर वेगवेगळी रेखाटने केली. बिट मधील शाळांचे सर्व वर्ग नववधू सारखे सजून गेले. त्यानंतर बीटस्तरीय शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा आम्ही आयोजित केली. या कार्यशाळेमध्ये बीट स्तरावर सर्व शिक्षकांनी मिळून प्रचंड मोठ्या प्रमाणात साहित्य तयार केले. याचा उपयोग मुलांना, मुलांच्या शिक्षणासाठी सर्वांना करता आला.



कुमठे दौरा माझ्यासहित सगळ्यांना खूप काही शिकवून गेला. ज्ञानरचनावादाचे अंकुर आता गारखेडा बिट मध्ये ही खऱ्या अर्थाने फुटायला सुरुवात झाली होती.दुसरीकडे , सेवक ट्रस्ट एंड्युरन्स च्या CSR फंडातून,बिट मधील 12 शाळा अत्याधुनिक सुविधांनी सज्ज झाल्या होत्या.जानकीदेवी बजाज फाउंडेशनच्या माध्यमातून प्रत्येक शाळेत TV संच बसवण्यात आले होते.

खासगी शाळेंच्या ही पुढे जाऊन या शाळा आता सर्व सुविधांनी युक्त झाल्या होत्या.परिणामी शाळांचा पट वाढायला सुरवात झाली होती.

## गुणवत्तेचा फुलोरा...

आदरणीय नंदकुमार साहेबांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या प्रगतीच्या चळवळीने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघत होता.आता गारखेडा बीट ही गुणवत्तेच्या क्षितिजावर चमकायला सुरुवात झाली होती. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून आता शिक्षक गारखेडा बीटचे काम पाहण्यासाठी यायला सुरुवात झाली होती.

आदरणीय नंदकुमार साहेबांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या शिक्षणाच्या वारीत आम्ही 2016 ला सामील झालो. 2017 च्या वारीत गारखेडा बिट मधील सांजखेडा शाळेच्या इंग्रजी बोलणाऱ्या मुलांनी व गारखेडा नं एक च्या चित्तथरारक मल्लखांबाने वारीतील सर्व वारकऱ्यांची मने जिंकून घेतली होती.

आता बिट मध्ये काही दैनंदिन उपक्रमांना आम्ही सुरुवात केली होती. त्यातील मराठीची श्रीमंती, शैक्षणिक रांगोळी, बालसभा, सहविचार सभा , मुलाखत या उपक्रमांची वर्तमानपत्रांनी दखल घ्यायला सुरुवात केली होती.बिटचा आणखी एक उपक्रम म्हणजे शेजारी शाळांना भेटी देणे.या उपक्रमांतर्गत एखादा विशेष उपक्रम राबविणाऱ्या शाळांना शेजारील शाळा मुलांसहित भेट देतात. तो उपक्रम समजावून घेऊन आपल्या शाळेत ही तो राबविण्याबाबत प्रयत्न केल्या जातात.

या उपक्रमाला ही चांगला प्रतिसाद मिळायला सुरुवात झाली होती.

सन 2017–2018 च्या शेवटी गारखेडा बिट ने बिटस्तरीय क्रीडा स्पर्धा घेतल्या. मुलांमधील सुप्त गुणांना वाव देण्या व्यतिरिक्त, शिक्षकांना एकमेकांशी जोडणे हा देखील हेतू ही स्पर्धा आयोजित करताना डोळ्यासमोर होता. औरंगाबाद जिल्ह्यात अशा स्वरूपाच्या स्पर्धा आयोजित करण्याची ही पहिलीच वेळ होती. याच उपक्रमाचे अनुकरण करत तत्कालीन गटशिक्षणाधिकारी राजेश साळुंके साहेबांच्या सहकार्याने या स्पर्धा तालुका पातळीवरही संपन्न झाल्या. त्या तालुका स्पर्धेतही गारखेडा बिट ने सर्वाधिक बक्षिसे पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.गारखेडा बिट आता नावाप्रमाणे नं एक व्हायला सुरुवात झाली होती.

बीटच्या यशात माझ्या तिन्ही सहकारी केंद्रप्रमुख आणि प्रत्येक मुख्याध्यापक– शिक्षकाचा वाटा होता. माझ्या प्रत्येक शिक्षकाचा मला अभिमान वाटत होता. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी म्हणून आम्ही अध्ययनस्तर मधे शंभर टक्के गुणवत्ता दाखवणाऱ्या सगळ्या शाळांचा कार्यगौरव सोहळा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर राजे अर्दड यांच्या उपस्थितीत औरंगाबाद शहरातील एक नामांकित सभागृहात संपन्न केला. बिटमधील सर्व शाळांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

तो दिवस माझ्या या प्रवासातील अविस्मरणीय दिवस ठरला.

## गड ,बुरुज ढासळताना...

सगळं काही व्यवस्थित सुरू होतं. त्यातच अचानक सन २०१७ चा सर्वसाधारण बदल्यांचा शासन निर्णय आला आणि २०१८ ला बीट मधील 199 पैकी 132 लोकांच्या बदल्या झाल्या. दोन वर्षात उभा राहिलेला बिटचा डामडौल बदल्यांच्या वादळाने पूर्णतः कोसळला. नवीन शिक्षक जॉईन झाले. पुन्हा पहिले पाढे पंचावन्न, यानुसार परत सगळ्या लोकांना तयार करण्याचं मोठं आव्हान आमच्यासमोर उभे राहिलं. गारखेडा बीटमधून बदली होऊन दुसऱ्या तालुक्यात रुजू झालेल्या शिक्षकांनी आपल्या कामाच्या माध्यमातून गारखेडा बिट चा ठसा तिथंही उमटवला. याचे मात्र फार मोठे समाधान लाभले.

नवीन शिक्षकही गारखेडा बीट आणि त्याच्या कामाच्या पद्धती बद्दल बरंच ऐकून होते. त्यामुळे त्यांना गारखेडा बीटमध्ये अॅडजस्ट व्हायला जास्त वेळ लागला नाही आणि मलाही त्यांना तयार करण्यासाठी फारसे

कष्ट पडले नाही. कमी कालावधीतच सर्व शिक्षक गारखेडा बीटच्या कामाविषयी एकरूप झाले आणि पुन्हा नव्या जोमाने गारखेडा बिटच्या दुसऱ्या इनिंगला सुरुवात झाली.

या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच रूम टू रीड या मुलांच्या वाचनासाठी काम करणाऱ्या संस्थेने बिट ला फारच मोठी भेट दिली. बिट मधील निकषपात्र शाळांमधे फर्निचरने सुसज्ज ग्रंथालये संस्थेच्या सौजन्याने उभी राहीली.मुलांच्या स्तरानुसार हजारो पुस्तके मुलांच्या वाचनासाठी ग्रंथालयामधे उपलब्ध झाली.मुलं मजेत पुस्तके वाचू लागली.

गुणवत्ता सुधारणेला हातभार लावणारी ही ग्रंथालये मुलांच्या आवडीची व मनोरंजनाची ठिकाणे बनले.

## आंतरराष्ट्रीय शिक्षण वारे...

बीटच्या कामाचा गाडा पूर्ववत यायला सुरुवात झाली होती. त्यातच वाबळेवाडी आणि वारे गुरुजी हे दोन शब्द कानावर पडायला सुरुवात झाली.

29 जून 2019 ....कुमठे सारखेच पुन्हा एकदा गारखेडा बीट वाबळेवाडीला भेट देण्यासाठी निघाले. यावेळी सोबत होते आमचे मार्गदर्शक आदरणीय सुरजप्रसाद जयस्वाल साहेब. तिथं पोहोचण्याआधीच सर्व शिक्षकांना सूचना देण्यात आल्या होत्या की,फक्त काचेची शाळा पाहू नका, तर त्या शाळेत जे काही चालतं याची संपूर्ण माहिती मिळवण्याचा प्रयत्न करा. प्रत्येक शिक्षकाने वैयक्तिक निरीक्षण केलेल्या गोष्टींच्या नोट्स काढल्या. परतीच्या प्रवासात सगळ्यांनी ज्या ज्या गोष्टी पाहिल्या त्याच्याबद्दल लिहायचं सगळ्या शिक्षकांना आवर्जून सांगितलं. शिक्षकांनीही भरभरून लिहिलं आणि खऱ्या अर्थाने वाबळेवाडी सर्वदूर पोहचायला सुरुवात झाली.

साताऱ्याच्या कार्यप्रेरणा कार्यशाळेतून परतल्यानंतर, जी अस्वस्थता माझ्या मनात दाटून आली होती, तीच अस्वस्थता पुन्हा एकदा वाबळेवाडी ने माझ्या मनात निर्माण केली होती. खरं सांगायचं तर दोन रात्री झोपच आली नाही. दादासाहेब नवपुते आणि आणि मी तासंतास बोलत होतो. तिसऱ्या दिवशी दादाला सोबत घेवून सरळ मा. शिक्षणाधिकारी सुरजप्रसाद जयस्वाल साहेबांना त्यांच्या घरी जाऊन भेटलो. साहेबांना सांगितलं की, आम्हाला वाबळेवाडी सारखी एक शाळा तयार करायची आहे. शाळेचे नाव आहे गाडीवाट, कचनेर केंद्रातील. साहेबांनीही क्षणाचाही विलंब न करता मला परवानगी दिली आणि प्रोत्साहनही दिले. एवढेच नव्हे तर या कामाचे सुरुवात मा. जयस्वाल साहेबांनी स्वत: गाडीवाटला येऊन पालकांशी एक तास संवाद साधून करून दिली. साहेबांच्या मार्गदर्शनाने गाडीवाटकर एवढे प्रभावित झाले की, 15 ऑगस्ट 2019 ला गाडीवाटच्या सर्व पालकांनी मिळून एक तासात साडेसात लाख रुपयांचा निधी जमा केला. संपूर्ण औरंगाबाद जिल्ह्यासाठी हा एक इतिहास होता.नंतर जयस्वाल साहेबांनी पेटवलेला आंतरराष्ट्रीय शाळा निर्मितीचा हा वणवा फक्त गाडीवाट पुरता मर्यादित न राहता जिल्ह्यातील तब्बल चौदा ते पंधरा शाळांमध्ये जाऊन पोहोचला.त्यासाठी साहेबांनी

अनेक गावांत रात्रीचे दौरे केले. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय पवनीत कौर मॅडम यांचेही त्या कामाला मोठे सहकार्य लाभले. बीट मधील घारेगाव पिंपरी व गाडीवाट या दोन शाळेत आंतरराष्ट्रीयचा बोर्ड येत्या सहा महिन्यात झळकविण्याचा संकल्प आम्ही केला. गावकऱ्यांनी भरभरून जमा केलेला लाखो रुपयांचा निधी पाहून, शासनाने देखील कोट्यवधींचा निधी शाळांच्या नावे मान्य केला.सर्व शाळा जरी आंतरराष्ट्रीय करता येणे शक्य नसले, तरी आंतराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मात्र शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांला मिळालं पाहिजे , हा विचार डोक्यात घेऊन पुन्हा आंतरराष्ट्रीय शिक्षण विचाराच्या शाळा निर्मितीच्या कार्यशाळा घेऊन शिक्षकांना प्रगल्भ करण्याची प्रक्रिया बीट मधे सुरू केली. याकामी वेध परिवारातील मान्यवरांचे मोलाचे सहकार्य आम्हाला लाभले.

या सर्व प्रवासात अनेक अडचणी आल्या. कधी प्रेरणा मिळाली,तर केव्हा केव्हा खच्चीकरणाचाही प्रयत्न झाला..टीकाही ऐकावी लागली.पण माझं ध्येय आणि विचार हा सुस्पष्ट होता.त्यामुळे टीकाकारांच्या टीका मी सकारात्मक घेऊन आणखी जोमाने कामाला लागायचो.

काम न करणाऱ्यांना मी कधीही बळजबरीने कामाला लावले नाही.उलट रॉजर्सच्या तत्वानुसार मी त्यांच्याकडे दुर्लक्षच केले. परिणामी सुरवातीला कामा पासून दूर पळणारे देखील काही काळानंतर कामाच्या प्रवाहात सहभागी झाले आज कोरोनाच्या काळातही शाळा बंद पण शिक्षण सुरू,हा विचार घेऊन आणि वारे सरांच्या वाबळेवाडीहून प्रेरणा मिळवत, प्रत्येक गावात विषयमित्र व पालक मित्र यांचे सहकार्य घेऊन मुलांचे राहण्याच्या ठिकाणावरून भौगोलिक गट तयार केले आहेत.पालकांचे ही व्हाट्सअप्प गट तयार करून ऑनलाईन व ऑफ लाईन शिक्षणाचा मिलाफ करत मुलांचे शिकणे सुरु ठेवण्याचा प्रयत्न गारखेडा बिट आजघडीला करत आहे.

या सर्व प्रवासात मी जे यश मिळालं त्याचे खरे हक्कदार माझे तिन्ही सहकारी केंद्रप्रमुख आणि माझ्या बिटमधील सर्व शिक्षक आहेत.

मी फक्त एक निमित्यमात्र....!!!

रमेश मुक्ता–विठ्ठल ठाकूर

शि.वि.अ.(गारखेडा बिट)

ता. जि. औरंगबाद.

# आमचे मेघ सुंदरम:

प्रविणकुमार काळम पाटील



"आपण कसे शिकलो?, कसे शिकत आहोत? , हे ज्यांना कळते, तेच इतरांना शिकण्याचे मार्ग सुचवू  शकतात. " ह्या मा नंदकुमार साहेबांच्या विधानाने सर्व वेधकऱ्यांना लिहिण्यास बळ व दिशा दिली. प्रत्येक " विचारावर विचार करण्याचे कौशल्ये " शिकवल्यामुळे माझे सहकारी खूपच प्रभावीपणे आपल्या विचारांना शब्दांची वाट करुन देवू लागले.

"आपण कसे शिकलो?, कसे शिकत आहोत? , हे ज्यांना कळते, तेच लोक इतरांना शिकण्याचे मार्ग सुचवू  शकतात. "माननीय नंदकुमार साहेबांच्या या विधानाने सर्व वेधकऱ्यांना लिहिण्यास बळ व दिशा दिली. *प्रत्येक विचारावर, विचार  करण्याचे कौशल्ये" त्यांनीच शिकवले असल्यामुळे माझे सहकारी खूपच प्रभावीपणे आपल्या विचारांना शब्दांची वाट करून देवू लागले. का? व कसे ? लिहावे या बाबत आमचे मार्गदर्शक सांगलीचे उपशिक्षणाधिकारी माननीय नामदेव माळी साहेब, व आमचे सहकारी ,शेंडी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी , विद्या वाचस्पती  प्रिय स्नेही डॉ शंकर गाडेकर साहेब व स्वत: आदरणीय नंदकुमार साहेब यांनी आपल्या अनुभवाचे भांडार आमच्या समोर रिते केले. या सर्व शिदोरीच्या मदतीने आमच्या गेवराई बीट क्रमांक २ च्या शिक्षकांच्या कार्याचा प्रवास मांडत आहोत.

गेवराईला शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून  काम करणे माझ्यासाठी सर्वच अर्थाने फार सोईचे होते. ईथे त्यावेळी सर्व सहा विस्तार अधिकाऱ्यांची  पदे रिकामीच होती. मला गेवराईला नियुक्ती मिळावी असा मी जिल्हा परिषदेकडे अर्ज केला. परंतु मला गावापासून १०० किमी अंतरावर असणाऱ्या पाटोदा या ठिकाणी नियुक्ती मिळाली. हे मला आश्चर्य वाटण्या सारखे होते. माझी गैरसोय होणार होती हे उघडच दिसत होते  . सुरुवातीलाच मला हा  अनपेक्षित अनुभव आला  होता. पण मी दिल्या घरी लगेच संसाराला लागलो. 'गेवराईचे सर्व पद रिक्त ठेवून आणि पाटोद्याल्या दोन शिक्षण विस्तार अधिकारी कार्यरत असतांना, मला गेवराई न देता पाटोदा का दिले असेल? '  हा प्रश्न मला अस्वस्थ करत होता. जाणिवपुर्वक तर हे सर्व केले नसेल ना? या प्रश्नाने मला बेचैन  केले होते. परंतु वस्तुस्थिती समजल्यावर, मी किती चुकीचा विचार करत होतो, हे माझ्या लक्षात आले. "मा. C.E. O साहेब फार तत्वाचे आहेत, आजवर त्यांनी कोणासही होम तालुका दिला नाही. त्यामुळे तुला पाटोदा मिळाला. " ही माहिती मला मिळाली. अन्  आमच्या नव्या शिकण्याला सुरुवात झाली.

मला तत्वाचा सन्मान करायला मनापासून आवडते. मा. C. E. O साहेबांचे मनोमन आभार मानले. माझ्या शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पहिल्या दौऱ्यावर शाळाभेटी साठी माझे मार्गदर्शक ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, अतिशय नम्र व शांत स्वभावाचे आदरणीय मधुकर तोडकर साहेब यांच्या सोबत निघालो. ज्या शाळेत मी माझे शालेय शिक्षण घेतले, त्याच जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाटोदा या शाळेपासून मी दौऱ्याचा श्रीगणेशा करायचे ठरवले. त्या शाळेच्या प्रत्येक कणांचे ऋण व्यक्त करणे व आशीर्वाद घेणे हे दोन हेतू मनी




बाळगले होते . अगदी गट शिक्षण कार्यालया पासून हकेच्या अंतरावर असलेल्या माझ्या शाळेला आम्ही पायीच निघालो. शाळा नजरेच्या टप्प्यात आली. शाळा वार्धक्याकडे झुकली आहे हे पाहुन मन हळवं झालं. प्रवेशद्वारा मधून आत जाताच मला माझी परिपाठाची जागा बोलावू लागली. मी दोन मिनिट त्या जागेवर जाऊन उभा राहिलो. डोळे मिटले. माझे . त्यावेळचे " ते " मित्र, शिक्षक आणि संपूर्ण दृश्य माझ्या समोर उभे राहिले. `मी स्टेजवर इतर मित्रांसोबत उभा आहे अन् आमची पाठ मैदानावरील सर्व विद्यार्थ्यांकडे आहे. आम्ही कवायतीचे हात करत आहोत. ढोल , शिट्टी वाजत आहे. आम्हा स्टेजवरील लिडरचे, मैदानावरील ईतर सर्व विद्यार्थी अनुकरण करत होते. सर्व काही ताला सुरात सुरु असतानाच मधेच बेताल धप धप असा आवाज झाला...`

`त्या ` आवाजाच्या व प्रसंगाच्या आठवणीने मी डोळे उघडले, आणि मला त्यावेळचे प्रसंग आठवल्याने मी स्वत:शीच हसू लागलो. पण क्षणातच भानावर आलो. माझ्या सोबत असलेल्या तोडकर साहेबांना माझ्या गालातल्या गालात हसण्याचे आश्चर्य वाटले, त्यांनी विचारले,"काय झाले साहेब ?का हसताय ?", " काही नाही साहेब, प्रसंग आठवला . आदल्या दिवशी मी शाळेत गैरहजर होतो आणि त्या दिवशी कवायतीमध्ये एका हाताच्या क्रमामधे गव्हाणे सरांनी थोडा बदल केला होता. तो मला माहित नव्हता. त्यामुळे मी पुर्वीचाच कवायत प्रकार करत होतो. माझ्या मागे माझे पाहुन अनुकरण करणाऱ्या मुलांना ते रुचत नव्हत. त्यांना माझा गोंधळ वाटत होता. त्यामुळे ते सर्वजण मला हसत होते. माझे भान जाग्यावर नाही याचा गव्हाणे सरांना राग आला आणि दोन धपके धप् धप् माझ्या पाठीवर लगावले.

या क्षणाला मात्र मी पुरा संवेदनाहिन झालो होतो. अचानक पडलेल्या त्या दोन धपक्याने माझी सुरक्षितता कुठल्या कुठे गायब झाली ते कळले नाही. एका क्षणापुर्वी निरामय मनाने, आनंदाने, बरोबर चाललेले माझे काम या धपक्याने खंडीत झाले.मला माझे काय चुकले असावे याचा अंदाज येत नव्हता . चूकपण दिसत नव्हती...

म्हणून सरांना म्हणालो, सर आपण असेच करत होतो. तुम्हीपण असेच सांगितले होते. " हे ऐकून सरांनी दुसऱ्या क्षणी माझ्या गालावर एक चापट मारली.

या प्रकाराने मी पुरता गांगरून गेलो होतो, खचलो होतो. माझ्या डोळ्यातील अश्रुंनी सर्व मर्यादा ओलांडल्या होत्या , ... बाजुला कोपऱ्यात खजिल होऊन मान खाली घालून उभा होतो. माझे उष्णआश्रु थांबत नव्हते...ते टप टप माझ्या पायांकडे धाव घेत होते , बहूदा माझ्याशी केलेल्या प्रतारणेची नतमस्तक होऊन क्षमायाचना करत होते . मी विचार शून्य झालो होतो. डोळ्यातले व नाकातले पाणी पुसत होतो .

कारण असा प्रसंग माझं मन, मस्तिष्क आणि शरीर पहिल्यांदा अनुभवत होतं.

लागलीच आम्हाला गणित शिकवणारे बन्सीधरराव शिंदे सर माझ्या जवळ आले. त्यांनी माझे सांत्वन केले. मला जवळ घेतले.परिपाठ संपत असताना दोन मुलांना बोलून घेत त्यांनी खात्री केली. तेंव्हा कळले की मी काल गैरहजर असताना, कवायत प्रकार क्रमामध्ये थोडा बदल केला आहे. तेव्हा मला माझी चूक उमगली. गव्हाणे सरांकडे गेलो आणि सरांना म्हणालो, `` सर माझी चूक मला कळली. मी काल नव्हतो, त्यामुळे बदल कळला नाही. यापुढे माझ्याकडून अशी चूक होणार नाही. मला माफ करा. " हे ऐकताच सरांनी मला जवळ ओढले आणि डोक्यावरून हात फिरवला. या क्षणालाही माझ्या अश्रूंनी माझी साथ सोडली होती...

(या प्रसंगाने मला "समजुन घेणे " हा धडा मला मिळाला असावा, असे मला वाटते. )

तोडकर साहेबही हसले, म्हणाले , आज या दोनपैकी एका सरांची तुमची भेट लवकरच होईल असे वाटते . मला माझी शालेयबाग, मी लावलेलं झाड, माझा वर्ग, आमची डबे खाण्याची जागा, डस्टर बनवायची खोली या सर्व आठवणी दाटून आल्या. पिण्याच्या पाण्याच्या हौदाने मात्र नवी जागा शोधली होती. हे सर्व पहात पहात थेट मुख्याध्यापकाच्या कार्यालयाच्या दारात पोहोचलो. दरवाजा उघड़ाच होता मात्र वरच्या बाजुला असलेला अर्धा दरवाजा ( फाटक ) लावलेला असल्यामुळे आत मुख्याध्यापकांचा चेहरा मात्र दिसत नव्हता. छोटा दरवाजा उघडत आम्ही आत पाऊल टाकताच मुख्याध्यापकाच्या खुर्चीत बसलेले मला गणित शिकवणारे आ. शिंदे सर दिसले. दुस-याच क्षणी मी सरांच्या चरणी नतमस्तक झालो. गुरुचरणी अश्रूंचा अभिषेक आपोआप सुरू झाला. कारण थोड्यावेळापुर्वीच मैदानावरील सरांविषयीच्या आठवणी ताज्या झाल्या होत्या. मला कोण आनंद झाला होता. आता ते वर्णन करता येत नाही.

" सर, मी तुमचा प्रविण. " सरांनी पाठीवर हात फिरवत शाबासकी दिली. पुन्हा त्याच आपुलकीने जवळ घेतले. सर्वजण क्षणभर स्तब्ध होतो. सरांनी पाठीवर हात फिरवल्याने, त्या स्पर्शाने जणू " त्या स्पर्शाची " आठवणच करून दिली होती. मी पूर्ण द्रवलो होतो. सरांनी सावरत ख्याली खुशाली विचारली. माझ्या विषयीचा अभिमान त्यांच्या डोळ्यात आणि कृतीत मला स्पष्ट दिसत होता. मध्यांतराच्या दीर्घ सुटीमध्ये सर्व स्टाफला बोलावत माझा सर्वांना परिचय दिला. माझ्या विषयी भरभरून बोलले. मानवी मनोऱ्यातील फुलात उभे राहुन मी केलेला सभापतींचा सत्कार, बोर्डातून, तालुक्यातून ,मी मिळवलेले यश, माझ्या लहान भावडांना माझं सांभाळणं, खो खो च्या टिममध्ये जिल्ह्याला खेळणे, माझे घर शाळेच्या जवळ असल्यामुळे सुटीत शाळेतील झाडांना घरून पाणी आणून घालणे, शाळेतील सर्व मुलांनी ईबीसी फॉर्म भरून फीमध्ये सवलत मागीतली असूनही माझ्या फॉर्मवर वडिलांनी उत्पन्न १८००० पेक्षा जास्त असल्यामुळे सही करण्यास नकार दिल्यावर मी फीसाठीचे साडेपाच रुपये आणून देणे असे खूप प्रसंग सरांमुळे मला पुन्हा आज नव्याने अनुभवास आले.



छत्तीस वर्षांपूर्वी घडलेल्या आठवणी आज ताज्या वाटू लागल्या. माझ्या नव्या जबाबदारीला सरांनी खूप आत्मीयतेने शुभेच्छा दिल्या. मी मोठ्या समाधानाने आणि आत्मविश्वासाने संपुर्ण वास्तुकडे पाहिले, पायऱ्यावर नतमस्तक झालो आणि पुढच्या प्रवासाला सुरूवात केली.

मा. CEO साहेबानी मला गेवराई दिले असते तर मी, शिकलेल्या शाळेतच माझ्या दौऱ्याची पहिली भेट, माझ्या मुख्यध्यापक सरांनी केलेले स्वागत, दिलेले आशीर्वाद, मी पुन्हा अनुभवलेले ते पुर्वीचे प्रसंग ,यांना मी

मुकलो असतो. आदरणीय बनगीरवारसाहेब आपणास मनापासून धन्यवाद. त्यावेळी पाटोद्याला बी एल थोरात साहेब BEO म्हणून कार्यरत होते. MPSC द्वारे निवड झालेले, साधी राहणी, प्रचंड अभ्यास, दासबोध तर मुखोद्गत होता त्यांचा. त्यांनी मला खूप सांभाळले. माझी सोय व्हावी म्हणून ते मला बीडची कामे, बैठका, टपाल इ. कामे सांगत. कारण बीड माझ्या मुक्कामाच्या मार्गात येत असे. तिथे मी कार्यालय समजून घेण्याचा प्रयत्न केला. पी एस शिंदे ,भावी पवार, जयराम बांगर,टेकाळे साहेब सुळे सर , इनामदार साहेब आदी माणसं जीवनात आली ते काहीतरी शिकवण्यासाठी व मदतीसाठीच.

पाटोद्यात थोड्याफार शाळाभेटी केल्या पण या दरम्यान खूप सुखद अनुभव आले. …… हे नवीन विस्तार अधिकारी, काळम पाटील आपल्या तालुक्याला आले आहेत. अशी माझी ओळख जेंव्हा जेंव्हा करून दिली जात असे, तेव्हा समोरून प्रतिसाद यायचा की, " ते जनावरांचे काळम डॉक्टर होते, ते कोण आपले ? "



"मी त्यांचाच मुलगा आहे. " असे नम्रपणे सांगितल्यावर मात्र त्यांच्या निष्पृह सेवेबद्दल, त्यांनी जपलेल्या माणूस पणाबद्दल, आदराचे बोल ऐकूण कान तृप्त व्हायचे. अन् माझी जबाबदारी वाढायची. आपल्या अण्णाने कमवलेला विश्वास, प्रेम, आदर हे सतत स्मरणात ठेवायचे. आपल्या वर्तनाने यामध्ये तसूभरही कमी होता कामा नये ,याची मी खबरदारी घेऊ लागलो.

"अशा प्रत्येक भेटीतून पुढे कसं वागायच याचे स्पष्ट चित्र समोर दिसू लागले होते. "

डॉक्टरांच्या हाताला १०० % यश आहे. जनावर कधीच वाया जाणार नाही. नजर पडताक्षणी त्या मुक्या जनावराला काय झाले असेल हे ओळखणारे हे आवलिया डॉक्टर, रात्री, अपरात्री प्रसंगी बैलगाडी , सायकल , तर कधी पायी मिळेल त्या वाहनाने चिखल माती तुडवत दुखऱ्या जनावराच्या वेदना दूर करण्यासाठी पायपीट करणारा डॉक्टर , कधी कशाची अपेक्षा नाही , त्यांच्या मुळेच आमच्या घरात लक्ष्मी आली , पाटोदा तालुका त्यांच्या कामामुळेच दुधसंकलनात अग्रेसर आहे, अनेक शेतकऱ्यांच्या घरातील वाद त्यांच्यामुळे मिटले,

आण्णा  विषयी अस सर्व ऐकत असताना जगात मी किती श्रीमंत आहे या जाणीवेने उर भरून यायचा . अडचणीत असणाऱ्या  शेतकऱ्यांनाही आन्ना तेवढेच आपले वाटायचे. नगर , बीड, जालना उस्मानाबाद  औरंगाबाद जिल्ह्यातील पशुपालक फारच गंभीर परिस्थी मध्ये अण्णाची आठवण करतात, फोनवर सल्ला घेतात, वेळप्रसंगी आण्णास आजही उपचारासाठी घेऊन जातात.

2004 साली आण्णा सेवानिवृत्त झाले सर्व काही ठीक सुरू असतानाच अचानक 2009 मध्ये  त्यांचे बायपास करावे लागले. भारताचे माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांचे तिसरे बायपास करण्यासाठी जे डॉक्टर होते,  ते तेंडूलकर डॉक्टर अन्नासाठी विनासायास उपलब्ध झाले. मला वाटतं या लोकांच्या व मुक्या प्राण्यांच्या आशीर्वादामुळे तसेच  त्यांच्या समर्पित भावनेने केलेल्या सेवे मुळेच हे शक्य झाले असावे. अण्णा अटॅकच्या त्रासात असताना मी त्यांना दवाखान्यात घेऊन निघालो होतो रस्ता खूप खराब होता त्यांना जास्त वेदना होत होत्या तेवढ्यात मला अचानक माझ्या सोबत महाविद्यालयांमध्ये शिकायला असलेल्या आणि आत्ता मेडिकल ऑफिसर असलेल्या एका  डॉक्टर मित्राचा फोन आला मी प्रसंग सांगताच पुढची सर्व व्यवस्था त्याने केली. नेमके माझ्या गरजेच्या वेळेला अचानकपणे त्या डॉक्टरांनी मला फोन का करावा या प्रश्नाचे उत्तर माझ्या मनात मी सारखा शोधत असतो .पुढे 15 ऑगस्ट 2009 ला सकाळच्या सातच्या विमानाने अण्णा आणि बाईला मुंबईसाठी बसवून दिले दोघांचाही पहिला विमान प्रवास ,त्यात अण्णा पेशंट, मुंबईला ऑपरेशन साठी निघालेले, त्रास सुरूच होता. मी 14 ऑगस्ट ला रात्रीच ट्रॅव्हल्स ने मुंबई गाठली होती. सकाळी विमानतळावर अण्णा आणि बाईला घ्यायला मी पोचलो होतो. विमान प्रवासामध्ये मकरंद अनासपुरे आणि त्यांच्या टीमने अण्णा बाईची चौकशी केली. बाईला अन्नासाठी मदतीची गरज आहे हे त्यांच्या लक्षात आले .मुंबईत विमान थांबल्यानंतर अन्नाला चालवत नव्हतं. मकरंद अनासपुरे यांनी स्वतः व्हीलचीअर मागून घेऊन ती ढकलत अण्णां व बाईला विमानतळाच्या बाहेर पोहोचवलं .मी आज विचार करतो की , अण्णा आणि बाईला अगदी अडचणीच्या प्रसंगात मदतीसाठी मकरंद अनासपुरे यांना कोणी पाठवले असेल? अशा प्रश्नांची उत्तरे ज्याने त्याने आपआपल्या पद्धतीने शोधायची असतात , हे आम्ही आजवर शिकलो होतो . या सर्व काळात आमचा विजू भाऊ पहाडासारखा आमच्या मागे खंबीर पणे उभा होता . " अरे तुमच्यात कांही स्फूर्ती आहे की नाही ? " या त्याच्या वाक्याने प्रत्येकाला अंग झाडून कामाला लागलेले मी पाहिले आहे .

आम्ही चार भावंडं .आमची ' प्र 'ची बाराखडी प्रवीण, प्रदीप ,प्रशांत आणि प्रतिभा. दुर्दैवानं प्रशांत आज आमच्यासोबत नाही. प्रतिभाच्या साखरपुड्याचा प्रसंग मला तीव्रतेने आठवतो आहे .घरात  पाहुणे जमले आहेत थोड्यावेळाने मुलाकडची मंडळी येणार आहे. तेवढ्यात अण्णांनी मला मोटर सायकलची चावी मागितली. मला थोडी शंका आली .अण्णाला कुठे जायचे असावे याचा अंदाज मला आल्याने मी घराबाहेर आलो. दारात रस्त्यावर एक व्यक्ती उभी होती. शेतकरी होती ती व्यक्ती .मी विचारणा केली .ते गुळज या गावचे होते .काय काम आहे असे विचारले असता, ते म्हणाले, "गाय खूप सिरीयस आहे डॉक्टरसाहेब आल्याशिवाय

ती वाचायची नाही. " मला तर त्यांच्याशी काय बोलावे ते सुचत नव्हते , परिस्थितीने मला सैरभैर केले होते . परंतु मी धीर करून घरचा प्रसंग त्यांना सांगितला आणि साखरपुडा झाल्यावर घेऊन जा ", असे त्यांना म्हणालो. यावर ते म्हणाले . "सर 70 हजार रुपयाची गाय आहे हो .लय सिरीयस आहे . "

मी त्यांना समजावत होतो. अहो ,त्यांच्या एकुलत्या एक मुलीचा साखरपुडा आहे, थोड्या वेळात पाहुणे येतील, तेवढ्यात अण्णा घरातून बॅग घेऊन बाहेर आले आणि त्या व्यक्ती सोबत जायला निघाले .मी तर पाहतच होतो. मी भावनीक झालो होतो . मला त्यांचा निर्णय आवडला नव्हता .मी अण्णाला म्हणालो अण्णा पाहुणे येतील , सर्वांनी विचारलं तर मी काय सांगू ? यावेळी अण्णांनी दिलेले उत्तर मला आयुष्यभराची शिकवण देणार होतं .ते म्हणाले, " तुझे मामा ,तुझे काका ,तुम्ही सर्व आहात तिथे. होईल सर्व व्यवस्थित. पण त्या गाई साठी दुसरा जनावरांचा डॉक्टर नाही, मला त्या मुक्या प्राण्यासाठी गेलं पाहिजे .मी लवकर वापस येईल . " आणि खरच सर्व काही व्यवस्थित झाले ,अण्णा वेळेत वापस आले . साखरपुडा छान झाला . गायीचे प्राण वाचले आणि बहीणही आज सुखामध्ये नांदते आहे. स्वतःच्या एकुलत्या एक मुलीच्या साखरपुड्याच्या प्रसंगातही ज्यांना आपला सेवा भाव व कर्तव्य श्रेष्ठ वाटते त्या अण्णांकडून समर्पित सेवेचा वसा कदाचित शिकलो असूत असे वाटते.

पुढे मी गेवराई येथे थोडयाच दिवसात बदलीने हजर झालो. माझा उत्साह वाढला होता . आमच्या ४५ शाळा ,220 शिक्षक ,सुमारे साडेचार हजार विद्यार्थी, एवढं आमचं कुटुंब ! सात तांडे ,पाच वस्त्या ,चार नवीन वसाहती, शंभर टक्के मागासवर्गीय गाव अशी पाटी लावलेले , विठ्ठल नगर या गावासह 29 गावाचा विस्तार ! नगर, जालना ,औरंगाबाद या तीन जिल्ह्यांच्या सीमेवर पसरलेले बीट . *"गेवराई घळाटा आणि धोंडराईला बारा वाटा "* असे संबोधल्या जाणाऱ्या अथवा हिणवल्या जाणाऱ्या दोन्ही गावाचा समावेश आमच्या बीट मध्ये झालेला आहे .दुष्काळाच्या झळा सहन करणाऱ्या तथा अनेक बिरुदावलीने कुप्रसिद्ध ठरविलेल्या बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात गेली सोळा वर्षापासून विस्तार अधिकारी म्हणून शिकण्याची संधी मिळते आहे. कुटूंबात सर्व भावंडात मीच मोठा , तर सर्व मावस भावंडामध्येही मीच मोठा आहे . लहानपणी मामाच्या गावी आम्ही सुट्टीत यायचो , खूप खेळावचो . त्यावेळी आई नेहमी मला सांगायची , " तु सगळ्यात मोठा आहेस , त्यांच्याकड लक्ष दे, त्यांना भांडू देवू नकोस , त्यांच्या सोबत नीट रहा. " गेवराई क्रमांक दोन या नव्या कुटूंबात माझे समवयस्क , माझ्यापेक्षा लहान व ज्येष्ट भावंड मला भेटली . भावंडाबाबतची आईने मला लहानपणी केलेली सूचना मी कायम स्मरणात ठेवली . खरं तर ईथे ही सर्व भावंड मलाच सांभाळत आहेत.

जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव केंद्राच्या त्यावेळेच्या केंद्रप्रमुख श्रीमती मंगल शिरसाट मॅडम, या उच्चविद्याविभूषित होत्या. केंद्रप्रमुख म्हणून सक्षम पणे काम करायच्या. प्रत्येकाची वैयक्तिक माहिती ठेवायच्या . शिक्षकांच्या कौटुंबिक प्रसंगात आवर्जून सहभागी व्हायचे, बाहेरगावी कुठे गेल्या तर शाळांसाठी आवर्जून भेटवस्तू आणायच्या . सर्व काही विश्वासाने प्रेमाने चालू असल्याचे पाहिले. मात्र चुकल्यावर

अधिकारवाणीने ठामपणे सांगायच्या. *त्यांच्या मनात मी कधी कोणाविषयी आकस पाहिला नाही .पतीने कायमची साथ सोडल्यानंतरही संपूर्ण कुटुंब सांभाळत स्वत: m.ed सारख्या पदव्या मिळवल्या सतत नवतंत्रज्ञान शिकत राहिल्या.* त्या बदलीने दुसऱ्या तालुक्यात गेल्यानंतरही संपर्क आणि संवाद चालू होता. दोन वर्षांपूर्वी शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून त्याचे प्रमोशन झाले आणि कालच्या महिन्यात त्या सेवानिवृत्तही झाल्या. काही कालावधीसाठी या केंद्राला दाभाडे दादा हे केंद्रप्रमुख म्हणून लाभले .स्पष्टपणा हा त्यांचा मोठा गुण असे आम्ही मानतो. त्यांनी कायम मला साथ दिली व आम्हाला मुलाप्रमाणे जपलेही. दोन वर्षांपूर्वी त्यांच्या सेवानिवृत्तीला भर पावसात त्यांच्या गावी एक हजार हितचिंतक उपस्थित होते होते . माझ्या दुसऱ्या धोंडराई केंद्राचे केंद्रप्रमुख डी यु कांडेकर ,यांना आम्ही सर्व d.u. बॉस म्हणत असू. नियमित शाळा भेट, शिक्षकांना मार्गदर्शन, अडचणीत मदत, प्रशासनाला शंभर टक्के प्रतिसाद, अशा विविध कारणांसाठी डी यु बॉस आमच्या आठवणीत आहेत. गेल्या नऊ वर्षांपूर्वी ते सेवानिवृत्त झाले. त्यांच्या जागी श्रीमती घुले मॅडम आल्या .स्काऊट मध्ये त्यांनी मोठे काम केले आहे. त्यामुळे बीटमध्ये स्काऊट गाईड चळवळीला गती मिळाली. विद्यार्थ्यांना राज्यपाल, राष्ट्रपती पुरस्कार मिळू लागले. मॅडमनी सुद्धा जापान, अमेरिका येथे जागतिक मेळाव्यासाठी दौरे केले आहेत. आज आमच्या बीटमध्ये त्या एकमेव पदाच्या केंद्रप्रमुख आहेत. आमचे तिसरे केंद्र गुळज, आजही अनाथ आहे .गेल्या वीस वर्षांपासून या केंद्राला पदाचे केंद्रप्रमुख नाहीत. परंतु एटी मामा, विठ्ठल सेमे सर ,यांनी या केंद्राचा अतिरिक्त पदभार घेऊन वेळोवेळी मदत केली. आणखी महत्त्वाचे म्हणजे संभाजी देशमुख, अशोक निकाळजे, राजाभाऊ बनसोडे ,दिवंगत आप्पासाहेब राऊत, या शिक्षक मित्रांनी प्रभारी केंद्रप्रमुख म्हणून सक्षम पणे काम केले व आम्हाला उत्तम साथ दिली .मी जिथे जाईल तिथे माझ्या अगोदर अन्नाचे काम व त्यांची ओळख पोहोचलेली असायची. गेवराई मध्येही अण्णांनी आपली सेवा दिलेली आहे. घरून निघताना अण्णा व बाई यांचे आशीर्वाद घेऊनच बाहेर पडायचे या लहानपणापासूनच झालेल्या संस्कारामुळे आपल्या हातून आज काहीतरी चांगले होईल असा विश्वास आणि आत्मबळ मिळालेले असायचे . गेवराईला बदलून आल्यानंतर इथे एका अत्यंत सूहृदयी माणसासोबत काम करायची संधी मिळाली. डॉक्टर बी बी चव्हाण ! सध्या ते औरंगाबाद येथे शिक्षणाधिकारी आहेत. अत्यंत सुसंस्कृत ,उत्तम संवाद कौशल्य, मांडण्याची प्रभावी पद्धत ,वक्तृत्वाची देणगी ,संगीताची जाण, आणि मैत्रीच्या दुनियातला राजा माणूस !अशा हरहुन्नरी आणि परिपूर्ण सहकाऱ्यांकडून खूप शिकायला मिळाले .ते माझ्यासाठी एक स्वायत्त विद्यापीठ होते ! अनुभवी, अभ्यासू , प्रामाणिक नम्र अशी ज्यांची ओळख आहे , असे पितृतुल्य आदरणीय दिवंगत घुमरे सर हे केंद्र प्रमुख म्हणून सर्वांसाठीच आदराचे स्थान होते .त्यांच्यासोबत शाळा भेटीला जाणे म्हणजे नवनवीन धडे गिरवणे, असंच आमच्यासाठी असायचे. मला अगदी लहान वर्गांना ,पहिली–दुसरीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधायला जमायचे नाही. मी वरच्या वर्गात रमत होतो. माझी ही अडचण दूर करण्याचे थोडं काम घुमरे सरांनी केलं होतं .मी किमान पहिली दुसरीच्या वर्गात तरी जायला सुरुवात केली होती . आज दुर्दैवाने घुमरे सर हयात नाहीत. सांगळे नाना , एम के काळे या सवानिवृत्त केंद्रप्रमुखा कडून वक्तशिरपणा, नम्रपणा आम्ही शिकलो असूत .

त्यावेळी शिक्षण परिषद किंवा केंद्र संमेलन खूप छान होत असायचे .सर्व शिक्षक उपस्थित असायचे तेही गणवेशात .सर्व शिक्षकांशी संवाद साधायला मिळायचे तसेच शिक्षकच विषयांची मांडणी करायचे, त्यामुळे खूप काही नवे ऐकायला मिळत असल्यामुळे आम्ही शिकण्याची ही संधी कधीच सोडत नसूत .आजही केंद्र संमेलनाला पूर्णवेळ थांबणे ही सवयच लागली आहे. आता तर आम्हाला वेळ कमी पडायचा म्हणून आम्ही पूर्णवेळ शिक्षण परिषद घेतो , शाळा बंद पडू नयेत यासाठी अर्धे शिक्षक आज आणि अर्धे शिक्षक उद्या शिक्षण परिषदेला बोलवायचे शिवाय दोन केंद्र एकत्रही करायचो. यामुळे एकतर शाळा पूर्णवेळ सुरू राहायच्या ,त्यामुळे शाळेचे हे नुकसान टाळता येत होते व पूर्ण दिवस शिक्षण परिषदांमधून विषयाला न्याय पण मिळत असे. एक वर्ष तर आम्ही बीटमधील प्रत्येक शिक्षक शिक्षण परिषदेत विषयाची मांडणी करेल ,असे नियोजन केले होते. प्रत्येकालाच शिक्षण परिषदेमध्ये बोलावे लागणार आहे, हे स्पष्ट झाले होते .अनेकांसाठी शिक्षण परिषदेत मार्गदर्शक म्हणून बोलणे हा पहिलाच अनुभव होता .प्रत्येकाला या मधून जावे लागणार होते .त्यामुळे ते सर्व लक्षपूर्वक ऐकू लागले आणि परस्परांना मदत ही करू लागले .आम्ही मार्गदर्शन करणाऱ्या प्रत्येकाला वर्षभरात शिक्षण परिषदेत सुलभक म्हणून मदत केल्याबद्दल बीटच्या वतीने प्रमाणपत्रही देत असत. आज आमच्या बीट मधील प्रत्येकाजवळ असे प्रमाणपत्र पाहायला मिळेल. यामुळे त्या सर्व शिक्षकांना संधी, आत्मविश्वास व विविध सुलभकांचे अनुभव ऐकणे असे फायदे मिळाले .पण मला सर्वात मोठा फायदा हा मिळाला की माझे प्रत्येक शिक्षक आत्मविश्वासाने व्यक्त होऊ लागले व *विशेष म्हणजे त्या प्रत्येकातील अफाट क्षमताची जाणीव आम्हाला होऊ लागली. माझे शिक्षक म्हणजे माझ्यासाठी शिकण्याचे विविध विद्यापीठ ठरू लागले.* मग ते भाषेचे विद्यापीठ, गणिताचे विद्यापीठ ,खेळाचे, उपक्रमाचे विद्यापीठ, संस्काराचे विद्यापीठ , लोकसंपर्कचे विद्यापीठ ! अशा अनेक शिक्षकांमुळे मला खूप काही शिकायला मिळत आहे याची विनम्र जाणीव आहे .एका शिक्षण परिषदेत श्रीमती क्षीरसागर मॅडम ज्या गेल्या वर्षी सेवानिवृत्त झाल्या, त्यांचा केंद्र संमेलनामध्ये मार्गदर्शन करन्याचा नंबर होता . त्यांचे बोलून झाल्यानंतर मी त्यांचे अभिनंदन केले. व केंद्रप्रमुख दाभाडे दादा आणि ए टी चव्हाण मामा यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र दिले. पण काय, त्या अक्षरश रडू लागल्या. त्यांचे अश्रू पाहून मी थोडा गांगरलो .काय झाले समजले नाही. सर्वच स्तब्ध होतो .श्रीमती जमधडे मॅडम या त्यांच्या सहकारी शिक्षिकेने त्यांना बोलते केले आणि मॅडम विनम्रपणे वाकून नमस्कार करू



लागल्या. एवढ्या ज्येष्ठ मॅडमचा हा नम्रपणा पाहून मी खूप संकोचलो. " हे काय करता मॅडम " म्हणत मीच त्यांचे चरण स्पर्श केले. तेव्हा त्या म्हणाल्या, साहेब ,माझी ३३ वर्षाची नोकरी झाली पण आज पर्यंत मला पुढे येऊन बोलण्याची कधी संधी मिळाली नव्हती. आज मला पहिल्यांदा संधी मिळाली. सुरुवातीला थोडी भीती वाटली पण तुम्ही सर्वांनी खूप छान साथ दिली, हे मी कधीही विसरू शकणार नाही. आता मला रिटायर व्हायला काही दुःख वाटणार नाही." आमचं काम असं सुरुवातीपासून मजेत सुरू होतं .शिक्षक, पालक, विद्यार्थी मी सर्व आमच्या परिघात आनंदी होतो , जो परिघ मात्र दुर्देवाने आम्हीच आखला होता .. .आपण उत्साही, चैतन्यशील व सक्रीय राहिलो तर बीट उत्साही ,सक्रिय राहते असा अनुभव अनेक प्रसंगातून आला होता. शाळेत जिवंतपणा टिकून ठेवण्यासाठी उपक्रम महत्वाचे ठरतात ,असे काही त्यावेळी वरिष्ठांकडून ऐकले होते .शिवाय जिल्ह्याच्या बैठकीत असे



काही उपक्रम सांगितले जायचे .मला आठवते , त्यावेळी विक्रम पोकळे हे शिक्षणाधिकारी साहेब होते, त्यांनी दिनांक तो पाढा ,उपस्थिती ध्वज , स्काऊट गाईड अशा उपक्रमांसाठी चांगला पाठपुरावा केला होता . अशा उपक्रमांना सुरुवात करावी असे मनात सारखे येत होते. मला शिक्षकांचा विश्वास होता, पण खरा प्रश्न होता , ते माझ्या वर किती विश्वास ठेवतील याचा ! पण या प्रश्नाच्या सकारात्मक प्रतिसादासाठी मलाच स्वतःवर काम करावे लागणार होते. सुरुवातीची दोन–तीन वर्षे गेली. मला माझी विश्वासार्हता वाढवायची होती. कितीही नाही म्हटलं तरी शिक्षक आणि शिक्षण विस्तार अधिकारी यातील असलेले दडपण आणि अंतर संपवायचे होते. दरम्यान शिक्षकांच्या कामाचे जाहीर कौतुक करणे ,त्यांना भेटवस्तू म्हणून फुल पेन प्रमाणपत्र देणे या बाबी सुरू होत्या. त्यांच्या कौटुंबिक, वैयक्तिक कार्यक्रमात सहभागी होणे सुरू होते , कोणाविषयीही व कोणाजवळही कधीच वाईट बोलायचे नाही हा नियम बनवून घेतला .माझे बोलणे ,वागणे आणि काम करणे यामध्ये एक वाक्यता राहील याची मी जाणीवपूर्वक काळजी घेत असे. आपण फक्त दोन डोळ्याने पाहतो, पण आम्हाला पाहणारे हजारो डोळे आहेत यापेक्षा मनाची जाणीव सदैव असायची . सर्वात महत्त्वाचे माझा मन:चक्षू सतत जागा असायचा .काही तरुण शिक्षक, बॅचलर ,एकटे रूम करून राहत होते. त्यांच्याकडे वेळ व ऊर्जा भरपूर होती ,ती मला माझ्या उपक्रमासाठी मिळायला हवी असे वाटत होते. त्या निर्मळ मनाच्या नवतरुणांसोबत मी संवाद वाढवला . ते माझे चांगले मित्र झाले . जुने स्थानिक शिक्षकही परिसरातील व परिचयाचे असल्यामुळे

विश्वास टाकू लागले होते. सुरुवातीला प्रशिक्षण , संपर्क सत्र , बैठका, यामधून पर्यवेक्षीय यंत्रणा व शिक्षक आमच्यावर विश्वास टाकत आहेत , आवाहनालाही प्रतिसाद मिळत आहे हे लक्षात येऊ लागले . हा अनुभव आम्हाला खूप शिकवत होता. म्हणजेच ती मंडळी शब्दाचा सन्मान राखू लागले आहेत म्हणून माझी जबाबदारी खूप पटीने वाढली होती. माझ्यापेक्षा दोनशे पटीने अधिक सन्मान आमच्या शिक्षकांचा जपला पाहिजे ही जबाबदारी निष्ठेने पार पाडू लागलो होतो . *इथे कधीही टोकाची भूमिका घ्यायची नाही,* हा एक नवा नियम मी माझ्यासाठी केला होता. कार्यालयातील कार्यात मला फार आवड नव्हती व तिथे कामाची फार " संधीहि शोधली नाही" . श्री जगदाळे साहेब हे गेवराईला मला पहिले गटशिक्षणाधिकारी म्हणून लाभले. गणितात त्यांचा हातखंडा होता .स्पर्धा परीक्षा मधून त्यांची निवड झालेली होती ..कोणत्याही बैठकीला ते कधीही प्रतिनिधी पाठवत नसत. कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या ते सदैव पाठीशी राहत असत. दररोज परीपाठाला कुठल्या न कुठल्या शाळेत ते उपस्थित राहत असत. त्यांच्या शाळा भेटीचा शिक्षकांमध्ये फार दरारा होता. 04:29 झाले तरी ते येतील अशी शंका त्यांच्या मनात असायची. त्यांच्यासोबत खूप थोडे दिवस काम करायला मिळाले . त्यानंतरचे पोकळे साहेबांसोबत ही फारच कमी दिवस काम करता आले. दरम्यान शाळेत असतानाच ज्यांच्या वडिलांचे छत्र हरवलेले व पुढे मोठ्या बंधूने व आईने त्यांच्या शिक्षणाचे स्वप्न पूर्ण केलेले , माझ्या एका सच्चा दिलदार मिलींद या शिक्षण विस्ताराधिकारी मित्राचे कार्यालयात आगमन झाले. ते फार चैतन्यमय आहे. अक्षरात व कामातील निटनेटकेपणा ,गंभीर प्रसंगातील स्थितप्रज्ञता, नकार गळी उतरवण्याचे खूप चांगले कसंब ,खूष मिजास स्वभाव, विश्वासूपण या गोष्टी मला खूप भावतात .या मिलिंद सोबतच माझे गुरुबंधू श्री राठोड साहेब, आमचे ज्येष्ठ श्री तालेब साहेब ,वर्मा साहेब ,हजारे साहेब ,खाडे मॅडम ,बांगर साहेब, ढगे साहेब , गोपाळघरे साहेब, एजाज साहेब यांनी आम्हाला खुपच मदत केली. कार्यालयीन कामात हे मला मदत करायचे म्हणूनच मला शाळेवरील आनंद घ्यायची संधी मिळायची. बऱ्याचदा आम्ही एकत्र नियोजन करायचो आणि त्याची अंमलबजावणीही करायचो .श्री जगन्नाथ गरकळ यांना सर्व भाऊ म्हणून ओळखतात .असे स्थानिक चे पण जालना जिल्ह्यामध्ये माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत असलेले , प्रमोशने गेवराईला गटशिक्षणाधिकारी म्हणून दाखल झाले .त्यांनी कार्यालयातील वातावरण खूपच हेल्दी ठेवले होते. ते स्वतः रात्र रात्र आमच्या सोबत काम पूर्ण करण्यासाठी बसायचे . काम करायला प्रोत्साहन द्यायचे, आणि काम पूर्ण करून घ्यायचे . सर्व काही ठरवून व नियोजन करून, सर्वांना विश्वासात घेऊन काम करण्याला ते प्राधान्य देत असत .त्यांनी संपूर्ण जबाबदारी विश्वासाने आम्हा विस्तार अधिकाऱ्यावर सोपवली होती .आमच्या प्रत्येक सूचनेला ते सकारात्मक प्रतिसाद देत असत . आम्हा प्रत्येकाला आम्हीच गटशिक्षणाधिकारी आहोत असे वाटावे एवढे स्वातंत्र्य त्यांनी दिले होते .विशेष म्हणजे मला लहानपणी कडेवर घेऊन त्यांनी सांभाळले होते ,अशी आठवण बाई आणि अण्णा मला सांगतात . मी ती आठवण पूर्ण लक्षात ठेवली होती. सर सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झाले .आजही आम्ही आदराने भेटतो बोलतो .काही काळ श्री लक्ष्मण गाडे हे स्थानिक भूमिपुत्र गटशिक्षणाधिकारी म्हणून लाभले होते. सर्वाधिक शाळा भेटी करणारे बीईओ म्हणून मी त्यांचा नम्रपणे उल्लेख करेन . तर नागनाथ शिंदे साहेब हे

आमचेच, आमचे म्हणजे शिक्षण विस्तार अधिकारी मधून स्पर्धा परीक्षा देऊन गटशिक्षणाधिकारी म्हणून गेवराई ला हजर झालेले ,खूप हुशार अमोघ वाणी ,कुशल प्रशासक, कामाचा प्रचंड उरक , त्यांनी खूप स्वातंत्र्य दिले.अशा कारणासाठी ते मला सदैव आठवतात .तर माझे सहकारी तुरुकमारेसाहेब, राठोड साहेब यांनी प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून उत्तम कामगिरी केली. सर्वांना सोबत घेऊन जाणे, यासाठी ते खूप दक्ष असत. आपल्यातलेच असल्यामुळे शिक्षकांना ते खूप हवे हवे वाटतात . नंतरच्या श्री आनंद मसरे साहेबांनीही सर्वांना स्वातंत्र्य देत तालुक्याचा गाडा पुढे जाण्यासाठी मदत केली . अशा प्रत्येक अधिकारी व सहकाऱ्या कडून शिकण्याच्या अनेक बाबी सतत खुणावत आहेत . शक्य ते सर्व वेचायचे हे ठरलेले आहे ,म्हणूनच अशा अधिकारी व सहकारी यांच्या असंख्य गुणांसाठी मी जणू त्यांच्याकडे टीवीशन लावलेली असायची. *प्रत्येक तत्त्व , गोष्ट , स्वतः अनुभव घेऊन शिकण्यासोबतच इतरांच्या अनुभवातून व सहवासातून अनेक पैलू शिकता येतात,* यावर विश्वास ठेवला होता. म्हणूनच *चांगल्या, ईस्ट, आणि निकोप विचार व कार्याचा पुरस्कार करण्यात सदैव आनंदच मिळतो आहे……

अनेक चांगले विचार कल्पनेच्या प्रसव अवस्थेतच मृत्यू पावत असताना , आमच्या वरिष्ठांनी व सहकाऱ्यांनी दिलेल्या स्वातंत्र्यामुळे व दाखवलेल्या विश्वासामुळे आम्हाला आवडीचे काम करायला मिळत आहे . नवनवीन उपक्रमांची स्वप्न त्यामुळेच आम्ही पाहत असूत . शिक्षकांचा मिळणारा प्रतिसाद ,आमचा उत्साह वाढवत होता.आमच्या बीटच्या बाहेर असलेल्या तालुक्यातील इतर शाळेतील शिक्षकां सोबत सुद्धा संवाद सुरू ठेवला होता. शिकण्याचे प्रत्येक ठिकाण व मदतीच्या जागा शोधणे सुरू होते . यामधूनच शेकडो शिक्षक जोडले गेले. त्यांच्यामध्ये प्रचंड क्षमता आणि ऊर्जा आहे ,प्रत्येकाचे एक वेगळेपणही आहे . तसेच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष पैलूही आहे. काहीवेळा आम्ही अनोपचारिक भेटायचो . एकदा असेच दुपारच्या वेळी निरोप पाठवून तालुक्यातील निवडक शिक्षकांना एका शेतात झाडाखाली सहविचारासाठी बोलावले होते . ही २००७ ची घटना आहे .तेथे बैठकीची सर्व तयारी करून ठेवली होती. पहिल्यांदाच अशी काही अनौपचारिक बैठक झाली होती.मी का बोलावले असेल याचा त्यांना कदाचित अंदाज आला नसावा . मी काहीतरी बोलणार असेल किंवा नवीन सांगणार असेल असे त्यांना वाटले असावे, परंतु असे न करता आम्ही त्या प्रत्येकाला एक स्वतंत्र कागद दिलाा .सर्वांना स्वतंत्र बसवले आणि आजच्या आपल्या, आपण करत असलेल्या कामाविषयी काय वाटते ते लिहायला सांगितले. आपल्या कामावर आपण समाधानी असाल तर समाधानी का आहात आणि समाधानी नसाल तर समाधान मिळवण्यासाठी काय करावे अशा दोन बाबीवर लेखन करायला सांगितले . त्या कागदावर त्यांनी त्यांचे नाव ,नंबर किंवा शाळेचे नाव टाकू नये असे अगोदरच सूचित केले होते . शेवटी सर्व कागद एकत्र केले गेले . कोणता कागद कोणाचा हे कळत नव्हते . मग एकेक कागदाचे प्रकट वाचन होऊ लागले .आम्ही समाधानी नाहीत असेच बऱ्याचदा येत होते. त्यामधून अनेक उपक्रमांची सूचना झाली आणि आमची पावलं उपक्रमाच्या दिशेने पडू लागली .

सुरवात स्वत: पासुन करायची ठरवले . दरवर्षी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिले जायचे , पण त्याला फार प्रतिसाद नसायचा , मग आमचं वृक्षलागवड अभियान सुरू झालं दरवर्षी शासकीय रोपवाटिकांमधून 250 मी रोपे विकत आणत असायचो .प्रत्येक दिवशी शाळेत जाताना मोटरसायकलला वायरची पिशवी अडकवलेली असायची , आणि या पिशवीमध्ये पाच रोपटी असायचे.



शाळेवर गेलो की सरांना ही पाच झाडे द्यायचे. लावण्यासाठी विनंती करायची . असे प्रत्येक शाळेवर स्वत: झाड नेऊन द्यायला सुरुवात केली. पुढच्या शाळा भेटीच्या वेळी या झाडांचे काय झालं म्हणून मी उत्सुकतेने विचारायचो . काही मोजक्या शाळा सोडल्या तर अनेक शाळांमधून माझी निराशा होत असायची .सरांकडे उत्तर ऐकायला मिळायचे . झाड खूप चांगल आले होतो ,काल परवा शेळी आली आणि झाड खाऊन टाकलं . मी सरांना लटका धीर देत असायचो .जाऊद्या सर कांही हरकत नाही . मी पुन्हा झाडे देईल .पुढच्या वर्षी पुन्हा तीच पिशवी ,नवीन पाच रोपटे ,प्रत्येक शाळेला दिली जायची, काही शाळेवर जुनीच कारणं सांगितली जायची , पण मी संयम ठेवला होता माझं उत्तर ठरलेलं होतं , काही हरकत नाही सर ,मी पुन्हा पाच झाडे देईल, सलग पाच वर्षे प्रत्येक शाळेला अशी रोपे दिली जायची , काही वर्षानंतर मात्र "शेळ्या ,शाळेत लावलेले झाड खायला लाजू लागल्या . " आम्ही प्रत्येक कृती गांभिर्याने करत होतो . अनेक शाळेमध्ये चिंच,वड, आवळा , सागवान , करंजी यासारखी झाडं दिमाखाने उभी आहेत. त्यांच्या सावलीत अभ्यास करणारी, खेळणारी आणि शालेय पोषण आहार आवडीन खाणारे मुले पाहिली की खूप समाधान वाटते . मला मी काय सुधारणा करावी याचं प्रशिक्षण अशा अनुभवांमधून मिळत होतं.

यासोबतच नवे काही उपक्रम सुरू केले होते.

वाडेकर सरांनी आगर नांदूर येथे 30 जानेवारी 2008 ला साईनाथ बचत बँक सुरू केली. इयत्ता तिसरीच्या भाषा विषयाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये पान क्रमांक 63 वर शिक्षकांसाठी शालेय बचत बँक हा उपक्रम सुचवला होता . तळणेवाडी, राक्षसभुवन, गंगावाडी ,पंचाळेश्वर, गुळज अशा अनेक शाळांमधून बचत बँका सुरू झाल्या .ज्यामधून एक रुपया पासून सुरू झालेली वैयक्तिक बचत १००० रुपया पर्यंत जाऊन पोहोचली .अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या जमा केलेल्या पैशातून आपल्या पालकांना ऐनवेळी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी

मोलाची मदत केली . दुसरीच्या वर्गात शिकणारा शेख साजिद खाजाभाई याने अगदी थोडे थोडे पैसे करून बचत केली .खरे तर या कुटुंबाचे जगातील कुठल्याही बँकेत खाते नव्हते. डब्याच्या पत्र्याच्या चाळण्या बनवणे आणि त्या विकण्यासाठी गावोगावी फिरस्ती करणे हा खाजाभाईच्या संसाराचा आधार .साजेदने एके वेळी वडिलांना आजारपणात दवाखान्यात जाण्यासाठी पैसे उपलब्ध झाले नाहीत , ते पाहिले आणि स्वत:च्या बँकेत



जमा केलेल्या बचतीतून आईच्या सोबत जाऊन रुपये पाचशे काढून वडिलांकडे सुपूर्त केले. यावेळी खाजाभाईच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव साजेद विषयी अभिमान व्यक्त करत होते . साजेदलाही या कार्याचे खूप समाधान वाटले . साजेदच्या वडिलांनी या घटनेनंतर आपल्या तंबाखू गुटखा चे व्यसन बंद करून त्याचा पैसा साजेदला बचतीसाठी नियमित देऊ लागले . तळणेवाडी च्या अनेक विद्यार्थिनींनी बचती मधून एक हजार रुपयाचा स्वत:चा वैयक्तिक विमा विमा उतरवलेला मी पाहिला आहे . लेकरांना सहलीसाठी पैसा उपलब्ध होऊ लागला होता . काही विद्यार्थ्यांनी जमवलेल्या पैशातून बियाणे खरेदी करण्यासाठी पालकांना ऐनवेळेची मदत केली. अडचणीच्या प्रसंगी विद्यार्थी पालकांना आर्थिक त्रास न देता स्वत:च्या बचती मधून पेन–पेन्सिल ,वह्या ,दप्तर, कपडे या शैक्षणिक साहित्याची खरेदी करत असत . पाठ्यपुस्तकांमध्ये सुचवलेल्या शिक्षकांसाठीचा एक उपक्रम म्हणून शालेय बचत बँक सुरू करण्यासाठी शाळांना आम्ही प्रोत्साहित केले. परंतु अशी उदाहरणे पाहिल्यानंतर या बचत बँका विद्यार्थ्यांची कामधेनूच ठरल्या याचे समाधान वाटते .याच आगर नांदूर शाळेवरून बदलून नगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातील शिरसगाव धुपे येथे गेलेल्या वाडेकर सरांनी अकोले तालुक्यातील पहिली आयएसओ शाळा म्हणून शिरसगाव धुपे या आदिवासी पाड्यावरच्या शाळेला मान मिळवून दिला. दीड वर्षांपूर्वी त्यांच्या शाळेवर जाऊन आलो होतो .भल्या सकाळी आम्ही त्यांची शाळा व काम पाहून थक्क झालो होतो. तिथेही सोनु मोनू बचत बँक सुरू होती . माझ्यासोबत विशाल सर होते .त्यांनी यापूर्वी वाडेकर सरांना पाहिले व ऐकले नव्हते .माझ्या मित्राच्या कार्याला व मित्राला गावकऱ्यांकडून मिळणाऱ्या

सन्मानाचा त्यावेळी मला नितांत अभिमान वाटत होता . यावरूनच वाडेकर सरांच्या कामगिरीचा अंदाज विशाल सरांनी अचूक बांधला होता. तिथे कार्यालयामध्ये अनेक कार्यक्रमांच्या पत्रिका लावल्या होत्या .विशेष म्हणजे त्या प्रत्येक पत्रिकेवर प्रमुख पाहुणा म्हणून माझे नाव लिहिले होते. मी पत्रिका पाहिल्या आणि आश्चर्याने वाडेकर सरांकडे पाहिले .यावर मित्र म्हणतो कसा, " साहेब तुमच्या मुळेच हे सर्व काम मी करू शकत आहे,माझ्या इकडच्या सर्व लोकांना तुमचं नाव माहीत आहे .मी नेहमी गेवराईतील कामाविषयी इकडे बोलत असतो . खरं तर दहा वर्षापूर्वीच गेवराईतून नगर मध्ये बदलून गेलेले वाडेकर सर आजही आत्मीयतेने नाते टिकवून आहेत . मित्रा आहेस ना तिथे ?? ?

याच लॉक डाऊनच्या काळात ,गावी आलेल्या दोन भाच्यांना घेऊन सर गावाजवळच्या नदीवर पोहायला गेले. भाच्यांना पाण्याचा अंदाज आला नाही, त्यांनी मदतीसाठी आवाज दिले , मामा दोघांच्या मदतीला धावून गेला,भीतीने दोघांनी मामाला मिठी मारली. आणि नदिने या तिघांची ही मिठी सुटूच दिली नाही . नदीने या तीन जीवांचा प्रवास थांबवला ,तीचा प्रवाह मात्र सुरूच होता ! मित्रा आज अनेक विद्यार्थी व मित्र तुला आणि तुझ्या आठवणीला कायम स्मरणात ठेवत आहोत.........

दरम्यानच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा , निबंध लेखन स्पर्धा, श्रुतलेखन स्पर्धा,अशा विविध स्पर्धा अधून-मधून घेणे सुरू होते, दोन हजार दहा अकरा या वर्षी बीट मधील प्रत्येक शाळेवर संगणक हवे असा संकल्प केला . याला आम्ही 100% संगणक संपन्न शाळा अभियान असे नाव दिले.* लोकसहभागासाठी चांगला प्रतिसाद मिळू लागला. गोदावरीच्या तीरावर दुष्काळाचे चटके व पुराचे तडाखे खात उभे असलेले गुळच हे केंद्र 2011-2 012 साली 100% शाळांना संगणक असणारे केंद्र ठरले. बीट मधील 45 पैकी 38 शाळांना आता संगणक उपलब्ध करून देण्यात यश मिळाले होते. पंचाळेश्वर शाळेने 2013 मध्ये बीड जिल्ह्यातील पहिली जिल्हा परिषद शाळेची वेबसाईट सुरु केली होती. या वेबसाईटचे उद्घाटन त्यावेळचे बीडचे जिल्हाधिकारी आदरणीय शिवानंद टाकसाळे यांनी केले होते. जिल्हा परिषदेच्या शाळेत पालकांच्या पैशातून संगणक आले , ही त्यावेळची इतर शाळासाठी फार मोठी प्रेरणा देणारी बातमी ठरू लागली. महिन्यातून तीन चार शाळांच्या बातम्या अशा येत असत . सुमारे सहा लक्ष 91 हजार रुपयाचा लोकवाटा संगणकासाठी उभा राहिला होता .

आता मात्र तालुक्यातल्या सर्वच शाळा व विद्यार्थ्यांसाठी काही तरी करावं असे वाटू लागले होते. जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या केंद्रातले उत्साही शिक्षक दोन हजार पाच सहा पासूनच खो-खोच्या स्पर्धांचे आयोजन करत होते .या स्पर्धांना तालुक्यामधून खूप प्रतिसाद मिळायचा . तालुक्याचे आमदार महोदय अशा स्पर्धांचे उद्घाटनाला यायचे. शेख अनीस , शेख सिकंदर , एस वाय सुतार , भागवत सोणवणे, मंगेश कुलकर्णी, बापूसाहेब तारूकर ,ज्ञानोबा सगळे, प्रकाश राठोड, वाडेकर अशा अनेक मित्रांच्या पुढाकारातून या स्पर्धा देखण्या होत असत . या सर्वांचा अनुभव पाठीशी असल्यामुळे भव्य तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे

आयोजन करण्याचे निश्चित झाले . गुळज केंद्रातील शिक्षकांचा चांगुलपणा जपण्याचा प्रयत्न व्हावा तसेच इतर अनेक शिक्षकांना या केंद्रातील शाळेत येऊन शिक्षक व केंद्रातील काम पाहण्याची संधी उपलब्ध व्हावी, त्याचबरोबर त्यांच्याकडून चुका समजून घ्याव्यात आणि प्रयत्न व काम स्तुत्य असल्यास शाबासकीची थापही मिळवावी, असा विचार मनात डोकावत होता , यामुळेच तालुकास्तरीय स्पर्धेच्या साठी यजमान म्हणून गुळज शाळेची निवड केली. 22 नोव्हेंबर 2013 ला गुळच केंद्रातील शिक्षकांची बैठकआयोजित केली . तालुकास्तरीय भव्य स्पर्धेचा मानस त्यांना सांगितला .पहिल्याच बैठकीत एकाच केंद्रातील बहाद्दर शिक्षकांनी स्वतःचा 60 हजार रुपयांचा निधी मुख्याध्यापक श्री बाबासाहेब कराड यांच्याकडे सुपूर्त केला . गुळज गावानेही खूप मोठे योगदान दिले . विविध समित्या गठीत करण्यात आल्या . त्यामुळे कामाला गती आली. 11 ते 15 डिसेंबर 2013 दरम्यान तालुक्यातील सर्व केंद्रांमधून सुमारे 22000 खेळाडूंनी सहभाग घेतला. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी खेळण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्याचे कराड सर व इतर जुन्या शिक्षकांनी आवर्जून सांगितले . तर तालुका स्तरावर 1700 विद्यार्थी सहभागी झाले होते. अपेगाव , सुरळे गाव , पंचाळेश्वर , राक्षस भुवन येथे यात्रेला भक्तांची अलोट गर्दी असते . गुळजनेही खेळाडू व क्रीडाप्रेमींची मोठी मांदीयाळी अनुभवली . कबड्डी ,खो–खो, लांब उडी व 100 मीटर धावणे अशा स्पर्धांचे स्वरूप होते. या स्पर्धांचे खूप कौतुक झाले. “मोती आहेत पण ते शोधले पाहिजेत” अशा प्रतिक्रिया आमचा उत्साह वाढवत होत्या. खेळाचे मैदान , खेळाडूंना आवश्यक सुविधा, पंचाचे पारदर्शक वर्तन, आकर्षक पारितोषिके व दर्जेदार प्रमाणपत्रे यासोबतच उत्साही प्रेक्षक तथा क्रीडारसिक या गोष्टी आम्ही जाणीवपूर्वक प्राधान्याने पूर्ण केल्या . मैदानाची आखणी हा आमच्यासाठी फार मोठा अनुभव होता . क्रीडा मार्गदर्शक ढाकणे व श्री गिरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू होते . खेळाच्या मैदानाला काळी माती पोषक ठरत नाही , यामुळे या मातीचा एक फुटाचा थर काढून टाकण्यात आला . त्या जागी सोळा टिप्पर मुरूम टाकण्यात आला , तर त्यावर चार टिप्पर पोयटा म्हणजेच पांढऱ्या मातीचा थर देण्यात आला . सतत तीन आठवडे या मैदानाची पाणी मारून रोलर ने दबाई केली जात असे . राजकमल कंस्ट्रक्शनच्या लाटे आप्पा यांनी यासाठी मोफत सेवा दिली होती. चार हजार रुपये खर्च करून अंबड तालुक्यातील खंडाळा येथून आणलेल्या लाल मातीने गुलमेमेश्वर नगरी वैभवशाली बनली होती. मैदानासाठी स्वयंसेवक नेमले गेले होते. मैदानाच्या सततच्या अभिषेकासाठी झाऱ्या आणि पाण्याचे टँकर दिमतीला उभे होते या मैदानाला अभिलाषा म्हात्रे ,पंकज शिरसाठ ,नरेंद्र शहा, शंतनु इनामदार ,पी टी उषा, अंजू जॉर्ज ,या प्रेरणादायी खेळाडूंची नावे देण्यात आल्याने मैदानाची उंची अधिकच वाढली होती. पंचांना टी–शर्ट, टोप्या उपलब्ध करून दिल्या होत्या.पंच,मार्गदर्शक शिक्षक, खेळाडू, स्वयंसेवक यांच्या चहा–नाश्ता व जेवणाची सोय उत्तम चवीसोबतच आपुलकी ,जिव्हाळा व प्रेमयुक्त असावी यासाठी नियोजन केले होते . 30 जानेवारी 2014 ला दोन आमदार महोदयांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन संपन्न झाले. दोघांनीही केंद्राच्या शाळेचे उपक्रम समजून घेतले शैक्षणिक उपक्रमांची माहिती घेतली, शिक्षकांचे कौतुक केले आणि तोफांच्या सलामीने पावलांच्या रांगा क्रीडानगरी कडे जाऊ लागल्या. शिक्षकांचा उत्साह वाढविण्यासाठी खेळाडूंना शुभेच्छा देण्यासाठी दोन्ही

आमदार मैदानावर आल्याचे पाहताच मैदानावर चैतन्य पसरले. तुतारी ,बीगुल ,बँड पथक, लेझीम पथक , क्रीडानगरी ची शोभा वाढवत होते. एवढ्यात परमेश्वर शिंदे यांनी आणलेल्या क्रीडा मशालीने क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली . टाळ्यांचा अखंड वर्षाव उत्कंठा वाढवत होता . शैलेश ,गणेश ,सचिन, परमेश्वर, राजाभाऊ या शिक्षक मित्रांनी मानवंदनेसाठी खेळाडूंना मदत केली. हा सलामी सोहळा डोळ्याचे पारणे फेडणारा होता. सर्वच उपस्थितांनी सुंदर नियोजनाचे कौतुक केले . माननीय अमरसिंह पंडित यांनी यापुढे "अशा स्पर्धांसाठी पंचायत समिती मधून दरवर्षी एक लक्ष रुपये दिले जातील " अशी घोषणा केली . हा सर्वांसाठी सुखद धक्का होता . आमच्या स्पर्धेचे हे दीर्घकाल परिणाम देणारे मोठे यश म्हणावे लागेल . प्रचंड उत्साहाने सामने सुरू झाले. दर्जेदार मैदाने पाहून मार्गदर्शकांनाही खेळण्याचा मोह झाला . ध्वनीक्षेपकांवरुन सामन्याचे समालोचन सुरू होते . भरत , सौदागर खूपच प्रभावी समालोचन करत . मैदानाना दिलेल्या प्रेरणादायी नावांचा, अंतरराष्ट्रीय खेळाडूंचा पुन्हापुन्हा उल्लेख होत होता . आलेली सर्व पावले क्रीडा नगरीचे वातावरण पाहून दिवसभरासाठी मैदानावरच थबकले . सायंकाळी सहा वाजता सर्वांनी मैदान सोडले. आता उरले होते आमचे स्वयंसेवी शिक्षक आणि दमलेली मैदाने . उद्घाटनाच्या कार्यक्रमात व दिवसभरात झालेल्या कौतुकामुळे आमच्यात आणखीही उत्साह जिवंत होता. रात्री साडेदहा पर्यंत मैदानावर मेहनत केली .पाणी मारून शांत केलेल्या मैदानाला गार वाऱ्याच्या झुळकीने छान झोप लागली. आम्ही घराकडे परतलो होतो, सकाळी लवकर येण्यासाठी !

दुसऱ्या दिवशी सकाळी सातलाच मैदान गाठले. हळूच मैदानाला साद घातली .मैदानावर अलगत सिमेंटची गोल लांबोळकी नळी फिरवून त्याला हलकेच गुदगुल्या केल्या. आमचा हा खेळ सकाळी साडेनऊ पर्यंत सुरू होता. पुन्हा तांबडी माती टाकून व त्यावर पांढऱ्या ओढून मैदानाचे गंध पावडर केले . आता सुंदर मैदाने दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सज्ज झाली होती. सामने जस–जसे पुढे सरकु लागले तस तशा स्पर्धा अधिक रंजक आणि रोमहर्षक होऊ लागल्या. प्रत्येक सामना नवीन आव्हाने उभी करत होता .त्याच वेळी त्यांना पार करण्याचे सामर्थ्यही देऊन जात होता. छोटी मुले त्वेषाने खेळत होती . गुळज शाळेचा बजरंग कुंडारे दंड व मांडी थोपटून प्रतिस्पर्ध्यांना कडवे आव्हान देत होता .त्याच्या डोळ्यात प्रचंड आग होती .सर्वांचे लक्ष वेधून घेण्यात तो यशस्वी झाला होता. सायंकाळ जवळ येत होती हरलेल्या व जिंकलेल्या संघाचे खेळाडू त्यांच्या मार्गदर्शकांसह मैदानावर गोल वर्तुळ करून जागोजाग बसलेली पाहिली . काहींना अश्रू आवरले नाही .प्रतिस्पर्धी संघातील मोठ्या वयाचा खेळाडू , पंचाचा एखादा निर्णय ,सहकारी खेळाडूची कमकुवत साथ ,अशी पराजयाची चर्चा त्यांच्यामध्ये सुरू होती. उद्या अंतिम सामणे होणार, मान्यवर येणार , मोठी तयारी करावी लागणार, अशा विचारा मध्येच दुसऱ्या दिवशी चे सामने संपले. दिवस मावळला . अंतिम सामन्याच्या तयारीसाठी शिमल्या, दमलेल्या मैदानावर धाव घेतली. मैदानाची हलक्या हाताने डागडुजी केली . पाण्याचा शिडकाव करण्याचे काम रात्री साडेनऊपर्यंत सुरू होते .९ .४०ची वेळ असेल, माझा फोन वाजला , मी "हॅलो " म्हणालो, समोरून आवाज आला, "प्रवीण

कळम पाटील आपणच आहात का ? " आवाज अपरिचित व महिलेचा होता . मी थोडा अंदाज घेत , 'हो आपण कोण बोलताय? ' असे विचारले .समोरून आवाज आला , 'मी अभिलाषा म्हात्रे बोलतीये, " क्षणभर माझा व माझ्या कानाचा त्या आवाजावर विश्वासच बसला नाही. ' मॅडम आपण स्वतः आमच्याशी बोलत आहात यावर माझा विश्वास बसत नाही , " यावर त्या म्हणाल्या "सर गुळज, कि काय , असं कुठेतरी ग्रामीण भागात आपण खूप भव्य स्पर्धा घेत आहात , आणि त्यातील एका मैदानाला तुम्ही माझे नाव दिले आहे, तुम्ही खूप मोठेपण दिले आहे मला , आपले आभार मानण्यासाठी व शुभेच्छा देण्यासाठी मी फोन केला आहे " क्षणभर मला काय बोलावे हे सुचलेच नाही . " तुम्ही आमची दखल घेतली , आवर्जून फोन केला , आभार मानले, कौतुक केलं , खरंच आपले मोठेपण, खेळानेच आपल्याला दिले आहे याची आम्हाला खात्री पटते आहे , भारताच्या कबड्डी संघाचे नेतृत्व आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी आपण करत आहात, आमच्यासाठी ही अत्यंत गौरवशाली बाब आहे " आमचे असेच 25 मिनिटे बोलणे सुरू होते माझ्या सोबतच



माझ्या शिक्षकांचाही उत्साह वाढावा यासाठी आमचे संभाषण त्यांना ऐकता यावे यासाठी साउंड ओपन करण्याची परवानगीही मी म्हात्रे मॅडमला मागितली . "अरे वा खुपच छान ,अवश्य अवश्य, " असे म्हणून त्यांनी होकार दिला. काळोखी रात्र, कालच आमावश्या झालेली . बोचरी थंडी आणि आम्ही अभिलाषा म्हात्रे यांना त्यांच्याच नावाने उभ्या केलेल्या मैदानावर , त्यांच्याशी हितगुज करतो आहोत. सर्वांचे कान टवकारलेले . आम्हाला आकाश ठेंगणं झालं. मी उद्या समारोप प्रसंगी म्हात्रे मॅडम यांनी फोनवरून खेळाडूंना शुभेच्छा द्याव्यात अशी विनंती केली . त्यांनी मिश्किल उत्तर दिले " सर खेळणं सोपं आहे ,पण बोलणं कठीण आहे . " मी आग्रह धरला. त्यांनी मग होकार दिला .आणि आमचं बोलणं थँक यु, गुड नाईटने थांबले . बराच वेळ आम्ही कोणीच काही बोललो नाही . नंतर मात्र तब्बल तासभर अभिलाषा म्हात्रे आणि आपल्या स्पर्धा यावर बोलणं सुरू होतं. रात्रीने आपले आर्धे आयुष्य पार केले होते , मंदिरातील भजन संपल होतं , एका रचनात्मक कार्याच्या यशस्वी वाटचालीचे आपण साक्षीदार आहोत याचा आम्हाला अभिमान वाटत होता. या अभिमानात ती काळोखी रात्रही केव्हा सहभागी झाली हे आम्हाला समजलेच नाही. स्पर्धेचा तिसरा दिवस सुरू झाला. महाराष्ट्र राज्य खो–खो असोसिएशनचे कार्याध्यक्ष आदरणीय जे पी शेळके सरांचे आगमन क्रीडानगरी मध्ये झाले. सरांनी , त्यांना दिलेली खुर्ची सोडली आणि थेट मैदान गाठले . ग्रामीण भागातील अस्सल, मराठमोळ्या,

रांगड्या, खेळाडूंच्या पकडी आणि चाल पाहून, कसब पाहून, एवढ्या दूर आल्याचं समाधान वाटल, असे त्यांनी आवर्जून सांगितले .राज्य प्रमुखांची ही दाद पाहून आम्ही फक्त उड्या मारायच्या बाकी होत्या . मनावरचं दडपण कुठल्या कुठं पळून गेलं होतं. राज्य खो–खो संघाचे प्रशिक्षक डॉक्टर तानाजी आगळे यांचे खो–खो असोसिएशनच्या सहसचिव डॉक्टर श्रीमती चित्राआगळे यांच्यासमवेत क्रीडा नगरीत आगमन झाले . गौंडगाव तांडा ,नरसिंह तांडा, खोरी तांडा या सारख्या दुर्गम भागातील खेळाडूंनी वाहवा मिळवलेली त्यांनी पाहिले .100 मीटर धावण्यात नरसिंह तांड्याच्या पूजाने पहिला क्रमांक पटकावला, हे ऐकताच तिच्या वडिलांच्या सुखद आनंदाश्रूने ओल्याचिंब झालेल्या नेत्रांच्या कडा आम्हाला सदगदीत करत होत्या . मुलीच्या कर्तृत्वाचा अभिमानाने त्यांचा ऊर भरून आला. वडिलांनी तिला अलगद उचलून घेऊन छातीला कवटाळले .अथांग अवकाश बापलेकीच्या या स्नेहभावावर सुमन उधळीत होते . प्रेक्षकांच्या गराड्यात पूजा वडिलांच्या हातात स्थिरावली होती.

" मोती आहेत, आणि ते शोधले ही गेले आहेत " , आमच्या स्पर्धांचा उद्देश यापेक्षा वेगळा कसा असू शकेल ! माझ्यामते राबणारे हात आज धन्य झाले होते ! एवढेच नव्हे तर त्या मैदाणाच्या मातीचा प्रत्येक कण चिमुकल्यांच्या घामाच्या सिंचनाने कृतज्ञ झाला होता . ईतरांच्या यशात, आनंदात स्वतःचा आनंद शोधन्याची मोठी संधी आम्हाला मिळाली होती .बीटमधील एका एका उपक्रमाने भव्यता ,उंची, गाठली होती. प्रत्येक जण आपले 100% देत होता .आमचे सर्व असेच आनंद घेत सुरु होते . शिक्षक, आम्ही पालक ,अगदी कामाचा आनंद घेत असत !

जानेवारी 14 ला पुण्याला मी बहिणीकडे गेलो होतो . तिथे सकाळ वर्तमानपत्रात एक बातमी वाचायला मिळाली होती . वसीम खान या रिक्षा चालकांचा सत्कार तेथील महापौर मॅडमने केला होता , अशा स्वरूपाची ती बातमी होती . कारण त्यांच्या रिक्षांमध्ये कोणी अपंग व्यक्ती बसली तर त्या व्यक्तीचे ते अर्धे भाडे घेत असत . या गोष्टीचा माझ्या मनावर खूप खोलवर परिणाम झाला . पुढे 29 एप्रिल 2014 .रोजी आम्ही गुळज केंद्रातील सर्व शिक्षकांची एक सहविचार बैठक घेतली होती. या शैक्षणिक वर्षाचा समारोप व नवीन वर्षाची पूर्वतयारी असे त्या बैठकीचे स्वरूप होते .मी . पुण्याच्या वर्तमानपत्राची बातमी माझ्या शिक्षकांना सांगितली . वसीम खान यांना फार मोठे उत्पन्नाचे साधन नाही , त्यांचे शिक्षणही बेताचेच असणार तरीही ते आपल्या उत्पन्नातला काही वाटा असा समाजासाठी खर्च करतात, आपले संसार तर या चिमुकल्यांच्या आशीर्वादाने फुलत आहेत .जर वसीम खान काही योगदान देत असतील तर आपण असे योगदान आपल्या चिमुकल्यांसाठी दिले पाहिजे का? असा मी प्रश्न विचारला. सर्वांनी पटकन होकार दिला .साहेब हजार हजार रुपये देऊ , दोन दोन हजार देऊ, पाचशे रुपये देऊ ,असे वेगवेगळ्या सूचना त्यांच्या येऊ लागल्या . गेल्या तीन महिन्यात आमचा डोक्यात काही विचार पक्के झाले होते. विद्यार्थ्यांना आनंद ,पालकांचे समाधान, आणि शिक्षकांना सन्मान ! यासाठी वसीम खान सारखे काही तरी करावे याची चौकट डोक्यात तयार होती . एका केंद्रानं खूप चांगला प्रतिसाद दिला होता

आता इतर दोन केंद्रासाठी आम्ही  वाट पाहत होतो . सर्व केंद्रप्रमुख , अर्जून काळे , गुलाब बागवान , संभाजी देशमुख , अशोक निकाळजे  या सारख्या जेस्ट शिक्षकांनी  सुरुवात कुठून तरी करावी असा विचार केला. आणि वडिलकीच्या भूमिकेत असलेल्या कराड गुरूजींनी व सर्व शिक्षकांनी गुळज केंद्रात आधार परिवार नावाच्या उपक्रमाची सुरुवात केली . शिक्षकांनी, शिक्षकांच्या मदतीने , विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला हा उपक्रम .  हे नावही सर्व  शिक्षकांनीच  सुचवले होते . या उपक्रमांमधून चौथी शिष्यवृत्तीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले .प्रत्येक शाळेला अध्ययन संच दिले गेले .परीक्षेचे संलग्नता शुल्क भरल्या गेले .चार हजार विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण देण्यात आले . 16000 विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या, या स्पर्धेसाठीचे रंग पेट्या ,कागद, प्रमाणपत्र, असं सर्व काही आधार परिवाराने उपलब्ध करून दिले होते. स्काऊट गाईड चा तालुकास्तरीय मेळावा , राज्यातील पहिला मेळावा ठरला ! विशेष म्हणजे या मेळाव्याचे नियोजन पाहून  अशा मेळाव्याला जिल्ह्याकडून निधी दिला जाईल अशी घोषणा जिल्हा आयुक्त ( आत्ताचे राज्य आयुक्त ) आदरणीय संतोष मानुरकर यांनी केली आणि पाळलिही .  दोन पाच शाळांच्या गटा गटाने परिसर भेटी आयोजित केल्या जाऊ लागल्या  . तिथे स्थानिक कलावंत ,कवी, लेखक, यांच्या भेटी आयोजित केल्या जाऊ लागल्या, त्यांच्या मानधनाची तरतूद आधार परिवाराने केली . शाळेमध्ये बैलगाडीतून येताना अपघात ग्रस्त झालेल्या गुंतेगाव च्या विद्यार्थ्यांना वैयक्तिक मदत ही करता आली,  उद्याच्या पिढ्या होरपळून जाऊ नयेत यासाठी वीस हजार रोपांची रोपवाटिका निर्मितीचं कामही दरवर्षी केल्या जाऊ लागलं , स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांना खरी कमाई या उपक्रमासाठी या रोपवाटीकांचा आधार दिला जात होता . जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ,शिक्षणासाठी खस्ता खाणाऱ्या व त्यांना उत्तुंग यश मिळवून देणाऱ्या, कर्तबगार मातांचा सन्मान आधार परिवारातर्फे केला जाऊ लागला. वर्षभरात आपली सेवा देऊन सेवानिवृत्त झालेल्या ,आमच्या शिक्षक बंधू–भगिनींचा सन्मानही केला जाऊ लागला, विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा हा तर परमोच्च आनंदाचा क्षण असे.  यामधूनच अनेक गुणी विद्यार्थी तालुक्यांमधून पुढे आले . निता झीने या विद्यार्थीनीच्या वडिलांचे दोन्ही किडण्या निकामी झाल्याने डायलिसीस करावे लागे , रक्ताची गरज भासायची, ऐनवेळी अडचण यायची , निताच्या कुंटूबाची विवंचना शारदा नागरगोजे मॅडमच्या लक्षात आली , त्यांनी केलेल्या सूचनेवरून आधार परिवाराकडून रक्तदान शिबीराचे आयोजन होऊ लागले , पहिल्याच वर्षी १२२ शिक्षकांनी रक्तदान केले , विशेष म्हणजे बनसोडे , सोलाट , जोगदंड या मित्रांनी कुटूंबासह रक्तदान केले  . दूर्देवाने नीताचे , पित्याचे छत्र  काळाने हिराऊन घेतले होते, परंतू  एवढया वर्षानंतरही नीता व तिच्या बहिणीच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी आमच्या भगिनी  नागरगोजे मॅडम आनंदाने पार पाडत आहेत ,  याचा विनम्र अभिमान

वाटतो .अशा सर्व गुणीजनांचा सन्मान करण्याचे पहिल्यांदाच निश्चित केले. पाहूने म्हणून विभागीय आयुक्त यांनाच आनायचे ठरले . 9 मार्च 2015 रोजी माझ्याकडे गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार आला .याच पदभाराच्या पहिल्याच दिवशी आम्ही आधार परिवाराच्या प्रभाकर पराड, तात्यासाहेब मेघारे , चंद्रकांत हराळे , अण्णासाहेब लोणकर, सारंग देशपांडे, दिवंगत मधुकर बैरागी , प्रविण पंडित ,विशाल कुलकर्णी यांच्यासोबत औरंगाबाद येथे विभागीय आयुक्त यांना आधार परिवाराच्या गुणगौरव सोहळ्याचे आमंत्रण देण्यासाठी गेलो होतो. साहेबांनी आम्हाला होकार दिला. शिक्षकांच्या कामाचे खूप कौतुक केले . मला त्यावेळचा प्रसंग



आठवतो आहे . त्यांच्यासमवेत फोटो घेण्यासाठी आम्ही सर्वांनीच पोजीशन घेतली , एवढया मोठ्या अधिकाऱ्यांसमवेत फोटो साठीची पोज होती , सर्वच त्यांच्या दोन्ही बाजूला उभे राहिलो . पण फोटो काढायचा कोणी ? आमची हालचाल पाहून आदरणीय साहेब म्हणाले तुम्ही सर्व थांबा , आणि त्यांनी आमच्या आधीपासून त्यांच्या दालनात समोर बसलेल्या व्यक्तीला सांगीतले ' माऊली , या गुरूजींसोबत आमचा फोटो काढा ' ... त्या माऊलींनी त्यांच्या मोबाईल मधे आमचे फोटो घेतले , बैरागी सर व ईतर दोन मित्रांनी फोटोसाठी आपले मोबाईल माऊलींकडे देऊन फोटो काढण्याची विनंती केली . त्यांनीही आनंदाने फोटो काढले . यानंतर मा आयुक्त साहेब म्हणाले , तुमचे फोटो कोणी काढले माहिती आहेत का ? .. ते आपले डेपुटी कमीशनर आहेत , आम्ही त्यांना माऊली म्हणतो. मग मात्र खूपच लाजलो आम्ही , पुन्हा पुन्हा सॉरी म्हणालो , पण त्यांनी आमच्या मनावरच मोठ दडपण सुंदर शब्दात दूर केले .आता मात्र मला उमगले होते , आम्ही दररोज पेपरमध्ये ज्यांचे निरूपननिरूपन वाचतो तेच हे उपायुक्त माननीय फड साहेब !

पुढे महिनाभर तात्यासाहेब मेघारे यांनी औरंगाबादला साहेबांच्या स्वीय सचिव साहेबांशी संपर्क ठेवला.

आणि तीन एप्रिल 2015 रोजी गेवराई तालुक्यातील गढी येथील नवोदय महाविद्यालयामध्ये औरंगाबाद विभागाचे विभागीय आयुक्त माननीय उमाकांत दांगट साहेब यांच्या हस्ते हा गुणगौरव सोहळा दिमाखात यशस्वी करण्यात आला . विशेष म्हणजे साहेब परिवारासह उपस्थित होते .या कार्यक्रमात मार्गदर्शन पर बोलताना त्यांनी पहिले वाक्य उच्चारले ते असे होते "गेवराईतील शिक्षकांना माझा सलाम आहे" या विभागाच्या आयुक्तांनी दिलेली ही अभिनंदनाची सलामी प्रत्येकाची मान आणि आत्मविश्वास उंचावणारी होती .सभागृहातील ११००

शिक्षकांनी उभे राहून वाजवलेल्या टाळ्यांचा कडकडाट आजही ऐकायला येत आहे . आम्ही योग्य दिशेने जात आहोत याची जणू ती पावती होती . दरम्यान वर्षभर आमचे उपक्रम पाहून व त्याचे यश पाहून बीड जिल्हा परिषदेने 25 ऑगस्ट 2014 रोजी आधार विद्यार्थी सहाय्यता प्रकल्पास लेखी मंजुरी दिलेली आहे. आधार प्रकल्पाने गेवराईतील शिक्षकांची प्रतिमा खूपच उंचावली होती. वर्षभरात सुमारे साडे तीन लक्ष रुपये




विद्यार्थ्यांच्या उपक्रमासाठी खर्च करण्यात आले होते .हा सर्व पैसा शिक्षकां जवळच असायचा. प्रत्येक केंद्र , आपल्या केंद्रातील विद्यार्थ्यांचे नियोजन करायचे, आणि त्यानुसार उपक्रमाची अंमलबजावणी ही केली जायची.त्या केंद्रातील सर्व मुख्याध्यापक हे निर्णय समितीचे सदस्य असायचे. पैसा त्यांचा , उपक्रम त्यांचा, विद्यार्थी त्यांचेच शिवाय यश आणि समाधानही त्यांच्यासह सर्वांनाच .

आम्ही आमच्या विश्वात खूप आनंदात होतो. आमच्या कामाचे कौतुकही केले जात होते ,आणि कामासाठी शुभेच्छाही दिल्या जाऊ लागल्या होत्या. ते दिवस खूप भारावलेले होते . प्रत्येकामध्ये प्रचंड उत्साह होता. अशातच एक व दोन मे २०१५ रोजी सातारा येथे कार्य प्रेरणा प्रशिक्षणासाठी जाण्याची मला संधी मिळाली.......... कवाडे उघडताच कवडसे नव्या वाटा दाखवू लागली .

या प्रवासात आम्हाला आईवडिलांपासून ते आमच्या विद्यार्थ्यांपर्यंत अनेक मेघ सुन्दरम लाभले .ज्या प्रमाणे मेघ पृथ्वीवरील विविध स्त्रोतामधील जलकण वाफेच्या स्वरूपात सामाऊन घेतो , मग ते सागर , सरिता, ओहोळ , नाला , गटार असे कुठलेही स्विकारतो . परंतू जेंव्हा ईतरांना देण्याची वेळ येते तेंव्हा मात्र पर्जन्याच्या स्वरूपात मेघ आपल्यातील शुध्द आणि निर्मळ जलमोतीच देतो, अगदी सर्व अमंगल स्वतः गाळून देतो .....! आमच्या जीवनातही अशा मेघसुन्दरमने आमच्यासाठी आणलेल्या अमृतकणांचाच हा प्रवास होय ! आज असे मेघसुन्दरम सुलभक आमचे काम आणि जीवन यशस्वी बणवत आहेत . असे मेघ सुन्दरम व जलमोती शोधण्याचे सामर्थ्य आम्हा सर्वांना एका खास मेघ सुन्दरमने दिले आहे ! त्या सर्वांच्या कायम ऋणात आहोत .

क्रिडा स्पर्धा बचत बँक हे प्रसंग दिर्घ झाले आहेत , सॉरी ... पण त्यामधून आम्ही खूप शिकत पुढे प्रवास करत आहोत , आणि शिक्षकांच्या कामाला शॉर्ट करणे मला जमले नाही .. सॉरी !!

( परीसाच्या स्पर्शानंतरचा प्रवास पुढील भागात )

**प्रविणकुमार श्रीराम काळमपाटील**

**ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी**

**बीट गेवराई क्रमांक २**

**पंचायत समिती गेवराई , जि बीड**

**मोबाईल क्र–७०३८०४५१७२**

# जरासा झुम लू मैं

## शंकर गाडेकर



'वेध' हा सातत्याने ध्येयाच्या दिशेने घेऊन जाणारा एक विचार आहे.. वेध एक शिक्षणक्षेत्रातील जीवनपद्धती आहे.. वेध हा एक समूह आहे.. वेध ही एक विचारधारा आहे.. वेध हा एक पाय चौकटीत ठेवून आणि दुसरा चौकटीच्या बाहेर नेऊन काम करणारा हा एकसंघ विचार आहे.

"पत्थर भी पूजे जाते है मंदिर मज्जिद जाने के बाद... हर एक को खुद की पहचान होती है वेध परिवार से जुड जाने के बाद.. वेध परिवार से जुड जाने के बाद !", या वाक्याने बोलायला सुरुवात केली.

ठरवलेल्या गोष्टी बऱ्याचदा घडत नाहीत आणि घडणाऱ्या गोष्टी बऱ्याचदा ठरवलेल्या नसतात.. परंतु "जे ठरवतो ते करतोच" असाही संदेश देणारी काही माणसं असतात; काही कुटुंब असतात.. जसा 'वेध' परिवार. एकदा ठरवलं 'शंकरदादा ची झूम करुन बघायचीच !' तर ती करून बघणार म्हणजे बघणारच.. फार तर एखादा दिवस पुढे–मागे होईल. तसाच अनुभव माझ्या झूमच्या बाबतीत आला.. १६/७/२०२० ची 'झूम' दि. १७/७/२०२० च्या शुक्रवारी झाली.

'वेध' हा सातत्याने ध्येयाच्या दिशेने घेऊन जाणारा एक विचार आहे.. वेध एक शिक्षणक्षेत्रातील जीवनपद्धती आहे.. वेध हा एक समूह आहे.. वेध ही एक विचारधारा आहे.. वेध हा एक पाय चौकटीत ठेवून आणि दुसरा चौकटीच्या बाहेर नेऊन काम करणारा हा एकसंघ विचार आहे. झूम मिटींगला बरोबर पाच मिनिटे कमी असतांना जॉईन झालो..प्रतिभाताई ,रमेश दादा आणि आणखी चार–पाच जण जॉईन झालेले होते..ताई दादांचा आवाज आल्याबरोबर मी नमस्कार घातला..तेवढ्यात ऑनलाइन एका कुत्र्याचा भुंकण्याचा आवाज येत होता.. "कुत्र्याचा आवाज बंद करा, टीव्हीचा आवाज बंद करा",असं ताई म्हणत होत्या..कुत्र्याचा आवाज काही बंद होईना मी म्हटलं ,"मी तर दुसऱ्या मजल्यावर आहे कुत्रा माझ्या घरात नाही".. इतरही कोणी काही बोलायला तयार नव्हतं..तेवढ्यात रमेश दादा बोलले " हा कदाचित कुणाच्यातरी अंतर्मनातील आवाज असेल!" ते शब्द ऐकले आणि सगळेच खळखळून हसले.. त्यानंतर खरंच कुत्र्याचं भुंकणं बंदच झालं.. त्या हास्यांच्या फवाऱ्याने स्क्रीन समोर बोलण्यासाठी आलेला तणाव पार दूर निघून गेला.

माझ्या प्रत्यक्ष बोलण्याला सुरुवात होण्यापूर्वी आदरणीय प्रतिभाताई व रमेश दादा यांनी माझा परिचय करून दिला.. पी एस एम च्या प्रेरणेतून `सजा`(शिक्षा) म्हणून समजल्या जाणाऱ्या पेसा क्षेत्रामध्ये मी `मजा` (शिक्षणातील आनंद घेण्यासाठी) करण्यासाठी, विनंती बदलीने सधन तालुक्यातून आलो; अशी बऱ्याच जणांना माहीत नसलेली ओळख ठाकूर दादांनी करून दिली, ताईंनी शेंडी हे माझ्या `बीटाचे नाव` आहे असं सांगून माझ्या शेंडीचा परिचय करून दिला व सूत्रे माझ्याकडे सोपवली.

अकोले तालुका हा अहमदनगर जिल्ह्यातील एक आदिवासी क्षेत्र असलेला तालुका.. शेंडी अर्थात नगर जिल्ह्याचे सर्वात शेवटचं टोक.. इंग्रज अधिकारी `विल्सन` यांच्या नावाने ओळखला जाणारा व शंभर वर्षांपूर्वी बांधलेला `विल्सन डॅम` हा `भंडारदरा धरण` म्हणूनही ओळखला जातो. या डॅमच्या बाजूला असणारं गाव म्हणजे शेंडी. जे माझं बीट मुख्यालय. या शेंडी गावांमधून मला जे सुचतं ते मी लेखणीतून ✍मांडण्याचा प्रयत्न करतो.. महादेव कोळी, ठाकर या आदिवासी बांधवांना राज्यातील सर्वात उंच शिखर कळसुबाईचा जसा अभिमान वाटतो, तसेच आशिया खंडातील क्रमांक दोनच्या सांधन व्हॅली चा सुद्धा ! चार महिने प्रचंड पाऊस असणाऱ्या या भागात डोळ्याचं पारणं फेडणारे उंच उंच धबधबे,( फॉल) तसेच जूनच्या सुरुवातीला `काजवा महोत्सव` सुद्धा पर्यटकांना `आनंद` व आदिवासी बांधवांना `रोजीरोटी` साठी हातभार लावतो.

आदरणीय नंदकुमार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झालेल्या आजच्या झूमध्ये एकविसाव्या शतकातील कौशल्यामधील संभाषण कौशल्याचा पाया अर्थात लेखन कौशल्य या विषयावर संवाद साधताना लेखनासाठी `चिंतन` जर नसेल तर लिहिणाऱ्याचा कसा पोपट होवू शकतो व `चिंतन` असल्यास शब्दसुध्दा पोपटासारखे बोलू शकतात हे सांगण्यासाठी बंडयाला गोष्टीरूपानं उभं करावं लागलं.. जेवढं सांगितलं तेवढंच ऐकलं तर फजिती होऊ शकते.. ,घोका आणि ओका` .. `कॉपी आणि पेस्ट` यांमध्ये `चिंतन-मंथन` जर नसेल तर ज्ञानाचा प्रवास आकलन, उपयोजन व त्यापुढील मार्गावर होणार नाही. का? कशासाठी? असे प्रश्न लेखनासाठी आवश्यक असणारं चिंतन घडवून आणतात; हे सांगितल्यानंतर मला शिक्षण विस्तार अधिकारी पदावर काम करताना लिखाणाची कशी मदत झाली ते सांगण्याचा प्रयत्न केला.

जून 2017 मध्ये हजर शेंडीत झाल्यानंतर पहिल्यांदा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुहिरे या शाळेला भेट दिली..शाळेच्या नावाची पाटी गंजलेली होती,रंग उडून गेला होता.. शेरे बुकात सूचना दिली आणि लोकसहभाग शंभर रुपये सुद्धा शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर यांच्याकडे टेकवला.. तरीसुद्धा दोन दिवसात काही बदल दिसला नाही. आपल्याला जसे सणावाराला नवीन कपडे घालावे वाटतात तसं पाटीलाही वाटत नसेल काय? या चिंतनविचारातून आर्टिकल जन्माला आलं, त्यानं गुहिरे शाळेबरोबरच बीटातील बऱ्याच शाळांचे बोर्ड नवे झाले. पाटी नंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेंडीच्या तक्रार पेटीनं चिंतन दिलं. अन् त्यातून `तक्रार पेटी नव्हे परिवर्तनाची पेटी/अविष्कार पेटी` या लेखातून बिटातील पेट्या तर अद्ययावत झाल्याच

शिवाय त्या सक्रिय झाल्या. "माझ्या मुलीला 15 ऑगस्ट रोजी गावाच्या समोर भाषण करता यावं"' यासारख्या एका-एका कागदाच्या तुकड्यातून खूप चांगले बदल पालकांनी शाळेसमोर सुचवले.. या परिवर्तनाच्या पेटीतून बाहेर आलेल्या कल्पनेतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिचोंडी या शाळेतील बारा विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांसमोर सुंदर भाषणे केली. फिरतीच्या निमित्ताने जमा झालेल्या बस आणि रेल्वे प्रवासाच्या तिकिटांच्या तुकड्यातून बीट शाळेच्या गणपत गायखे सरांनी भाषा, गणित व भूगोल खूप चांगल्या पद्धतीने शिकवला.. आणि त्यातूनच 'कागदांची तुकडे घेऊन जाती सर्जनशीलतेकडे' हा लेख लिहिला गेला. या आर्टिकल च्या शेअरिंग मधून इतर जिल्ह्यातूनही गायखे गुरुजींप्रमाणे प्रतिक्रिया मिळाल्या. भाऊसाहेब पुरी या गुरुजींचा प्रत्येक लग्न, मुंज, कंदूरी अशा ठिकाणी स्वतःच्या जेवणाचं ताट घेऊन जाण्याचा गुण शिक्षण परिषदेच्या निमित्ताने दिसून आला; जो आर्टिकल मधून मांडला आणि ज्याची दखल 'जीवन शिक्षण' मासिकानेसुद्धा घेतली.. त्यानंतर केंद्र, बीट, गट, स्तरावरील उपक्रमांसाठी गुरुजी सक्रियपणे समोर येऊ लागले.

लेखनाचा फायदा शैक्षणिक उपक्रमा बरोबरच प्रशासकीय कामकाजात माहिती संकलनामध्ये सुद्धा खूप चांगल्या पद्धतीने झाला.त्यामुळे 'श्रम' आणि 'वेळ' यांची बचत झाली. काम प्रत्येकजण करतच असतो आणि ते करताना कधी यश मिळतं तर अपयश..परंतु यशासाठी काम करताना जर आपल्या पदरी अपयश पडत असेल तर यशाचं रहस्य काय? हा नक्कीच प्रत्येकाला प्रश्न पडतो. जिवंत राहण्यासाठी जसा प्राणवायू गरजेचा; हे जसं नाक दाबल्यावर कळतं.. तसं 'लिहिल्याशिवाय गत्यंतर नाही' हे जोपर्यंत 'उमजत' नाही तोपर्यंत लिखानातलं मर्म 'समजत' नाही.हे सांगण्यासाठी मला गुरू शिष्याला नदीकाठावर घेऊन जावं लागलं.

"तुम्हाला कसं सुचतं?", हा प्रश्न बऱ्याचदा विचारला जातो.. लेखन हे एक 'कौशल्य' आहे आणि कौशल्य सरावाने प्राप्त होते हे सांगण्यासाठी 'गाडी चालवणं, पोहणं ,टायपिंग करणं , स्वयंपाक करणं', यासारखे उदाहरणं यानिमित्ताने मी मांडली. पहिल्या दिवशी कोणालाच गाडी जमलेली नसते.. गिअर लवकर हाताला येत नाही, क्लच दाबण्याऐवजी ब्रेक दाबले जाते , ब्रेकवर पाय ठेवायचा तर तो एक्सलेटर वर पडतो व सगळीच तारांबळ होऊन जाते.. परंतु सरावाने जेव्हा कौशल्य साधले जाते तेव्हा मात्र गाडी चालवताना एकाच वेळी असंख्य क्रिया आपण करू शकतो. लेखनही अगदी तसेच.माझ्या लेखन प्रवासाची सुरुवात झाली वर्ष 2000-2001 मध्ये..तेरणा शिक्षणशास्त्र महाविद्यालय उस्मानाबाद येथे बीएडच्या वर्षात शिकत असताना "लिहायला शिकायचं असेल तर रोजनिशी लिहा", हे शब्द कानावर पडले, त्या दिवसापासून लेखन प्रवास सुरु झाला. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत ज्या घटना , प्रसंग टिपता आले ते सर्व प्रसंग रोजनिशी मध्ये जसे जमतील तसे मांडले. कोण काय म्हणेल किंवा कुणाला काय वाटेल हा विषयच नव्हता, कारण लेखक मी होतो आणि वाचक सुद्धा एकटा मीच !

बी.एड.नंतर मी बीड या माझ्या मूळ गावी आलो.. रोजनिशी सुरूच ठेवली.. रोजनिशीनंच एक दिवस सांगितलं, "आता एखादी सामाजिक समस्या घे आणि तिच्यावर लिहायला सुरुवात कर.." सुशिक्षित बेकार

होतो, नोकरी लागलेली नव्हती.. त्यामुळे बेकारी,भ्रष्टाचार,लोकसंख्यावाढ हे विषय खूप जवळचे वाटू लागले. एकेक विषय ठरवला, निवडला त्यावर मित्रांशी चर्चा केली, गप्पा गोष्टीही झाल्या, त्यानंतर जे घडायचं त्याला `चिंतन` म्हणतात हे खूप उशिरा समजायला लागलं.. आर्टिकल लिहून झालं की बीडच्या `झुंजार नेता` `पार्श्वभूमी` `चंपावतीपत्र` या स्थानिक वर्तमानपत्रातून छापायला द्यायचं, छापून आलं की खूप आनंद व्हायचा..लेखाचं आणि माझं दोघांचंही कौतुक व्हायचं.. होणाऱ्या कौतुक व आनंदातून दुसऱ्या आर्टिकल साठी प्रेरणा मिळायची.. नोकरी नव्हती म्हणून कसलंच बंधन नव्हतं `दिल खोल`के आणि `मन भरून` बिनधास्त लिहायचो..झुंजार नेता सुद्धा ते `लक्षवेधी` आणि `सडेतोड` या सदरांमध्ये ते छापायचा !

नोकरीला लागलो आणि स्थिर झालो.. पोटापाण्याचा प्रश्न मिटला कि काही प्रमाणात बऱ्याच गोष्टीवर (अपवाद सोडून) गंज चढतो.. असंच काहीसं लेखणीच्या बाबतीत घडलं.. अधून–मधून लिहायचो, पण ती केवळ औपचारिकता वाटत होती.. मला चांगलं लिहायचंय, लिहायला शिकायचंय हा विचार मात्र जिवंत होता. एम.एड्.च्या निमित्ताने सिल्लोड तालूक्यातील जिल्हा परिषद प्रशाला अजिंठा येथून पैठण तालुक्यातील ढोरकीन प्रशालेला विनंती बदली करून घेतली.. ढोरकीनला आल्यानंतर पुन्हा लिहायला सुरुवात केली.. या काळात रोजनिशीकडे दुर्लक्ष झालं होतं..मोर्चा शैक्षणिक व सामाजिक चर्चेकडे वळायचा.. चर्चेतून आलेल्या एखाद्या विषयावर लिहिणं सुरू झालं.. श्रीमती माळेवाडीकर मॅडम, श्री आव्हाळे सर, श्रीमती डोईफोडे मॅडम ,श्री केवट सर हे अप–डाऊन चे सहप्रवासी..ते सर्व माझ्या अल्टोबरोबरंच माझे आणि माझ्या लेखनाचे नियमित वाचक बनले. मी लिहायचं.. गाडीमध्ये केवट सरांकडून प्रकट वाचन व्हायचं..त्यावर चौघांनी दाद द्यायची..गाडी चालवण्याच्या आनंदाबरोबर होणारं कौतुक पुन्हा दुसऱ्या विषयाला स्पर्श करण्यास प्रोत्साहित करायचं ! अजिंठा प्रशालेचे श्री लोसरवार सर सुध्दा माझ्या लिखाणाची व ही आवर्जून वाचायचे व प्रोत्साहन द्यायचे.

डॉ.राजेश चौधरी श्री.रमेश ठाकूर (दादा) या व्यक्तिमत्वांना पाहून मलाही साहेब व्हावं असं वाटलं.. अहमदनगर जिल्हा परिषदेची `सरळ` सेवेची परीक्षा दिली आणि 2013 मध्ये कोपरगाव पंचायत समिती अंतर्गत कोळपेवाडी बीटाला विस्तार अधिकारी म्हणून `सरळ सरळ` जॉईन झालो. गुरुजी म्हणून साडेनऊ वर्षाच्या काळात विविध अनुभवाची पाटी रंगवली गेली होती.. परंतु विस्तार अधिकारी पदावर काम करण्यासाठी मात्र ती आपोआप `ब्लँक` झाली. कोपरगावचे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी श्री नाळे साहेब व ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती शबाना शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विस्तार अधिकारी पदाच्या पाटीवर खूप चॅप्टर (धडा या अर्थानं!) लिहिले गेले. अन् पुन्हा एकदा लेखन प्रवासाला सुरुवात झाली.

कारणं सांगणारी माणसं कधीच यशस्वी होत नाही; आणि यशस्वी होणारी माणसं कधीच कारणं सांगत नाही`, हा मार्केटिंग क्षेत्रात अनुभवलेला अनुभव पुन्हा एकदा या तीन साडेतीन वर्षाच्या काळात घट्ट झाला..झूम मध्ये हे शेअर करताना आजोबा आणि नातवाच्या दोन गोष्टींची शृंखला मांडण्याचा प्रयत्न केला.

पुढे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र आलं आणि सर्वांप्रमाणं मी सुद्धा भारावून गेलो..केंद्रस्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर शिक्षण परिषदा,प्रगत शाळांना भेटी,शिक्षणाची वारी अशा घटनांचे शब्दांकन करण्याची संधी मिळाली.. ही संधी मला सोन्याकडे घेऊन जाईल याची कल्पनादेखील त्यावेळी नव्हती. साताऱ्या मधील कार्यप्रेरणा कार्यशाळेमध्ये "धिरे धिरे यहा का मौसम बदलने लगा है" हे प्रेरणा गीत ऐकलं.. जिस आग से आज पाणी सहसा उबलने लगा है.. या वाक्याने पुन्हा एकदा लेखणीला जागं केलं... त्या वातावरणाने एवढा भारावून गेलो अन् ठरवलं आदिवासी तालुक्यात जाऊन काही काळ काम करायचं आणि शिक्षणासाठी जेवढं भरीव देता येईल तेवढं द्यायचं.. 2017 च्या बदली प्रक्रियेत विनंती बदलीसाठी अर्ज केला आणि 1 जून 2017 पासून भंडारदऱ्याच्या शेंडी'तून कामकाजाला सुरुवात केली. शेंडीत हजर झालो तेंव्हा बीटात 35 शाळा होत्या आज ती संख्या 37 झाली हे लिहिताना माझ्या पदनामातील 'विस्तार' शब्दाला निश्चितच 'आनंद' व 'अभिमान' वाटत असेल. शेअरिंगचं महत्व पीएसएमनं समजावलं आणि मी सुद्धा लि'खाण' शेअर करायला सुरुवात केली..व्हाट्सअप, फेसबुक वरून शेअर करण्यासाठी संख्या व वेग दोन्ही वाढवले. शाळा भेटीचे,विद्यार्थ्यांचे,शिक्षकांचे अनुभव लिहायला लागलो..शेअर करायला लागलो.. हाडाच्या सर्वच शिक्षकांना ते आवडू लागले..पुढे त्याचाच एक परिणाम वेध या शिक्षणाच्या सक्रिय चळवळीमध्ये मला स्थान मिळाले.वेधच्या प्रत्येक पदरखर्ची कार्यशाळेमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली व शब्दांकन करण्याची सुद्धा..पहिल्या वेध कार्य शाळेनंतर केलेल्या शब्दांकनाची प्रतिक्रिया म्हणून आदरणीय नंदकुमार सरांचा फोन आला.. सरांनी नुसतंच कौतुक केलं नाही तर लेखन प्रवासासाठी महत्त्वाच्या दुरुस्त्या देखील सुचवल्या.

पुढे बोलताना , "आपल्या लेखनामध्ये उत्सुकता निर्माण करण्याची क्षमता आहे, रंजकता सुद्धा आहे; परंतु हेच लिखाण जर एखाद्याला घरी बसून सदरच्या कार्यशाळेचा वृत्तान्त समजावू शकले तर ती लिखाणाची सर्वात मोठी 'निष्पत्ती' असेल", असाही संदेश सरांनी यावेळी दिला.लिखानाकडून काय अपेक्षा असते हे अधिक समजावण्यासाठी निलेश घुगे सरांना सुद्धा सरांनी कॉल जोडून दिला.. लिखाणातून एखाद्याची स्तुती करण्याचा मोह माझ्या लेखणीला राहावत नसायचा; त्यावर सुद्धा आदरणीय सरांनी "शक्यतो स्तुती टाळा" असा सल्लादेखील दिला.. माझ्या लेखन प्रवासात प्रत्येकानं पैलू पाडण्याचं काम केलं.. त्या सर्वांनाच धन्यवाद यानिमित्ताने.

'चालक शिकत आहे' या विचाराचा बोर्ड घेऊन कुठलंही काम हातात घेतलं तर अपघात नक्कीच होत नाही, म्हणून मी आजही लिहिताना, बोलताना, वागताना 'दिलगिरी' व 'क्षमा' या शब्दांच्या 'खाऊचा डबा' नेहमी सोबत बाळगतो. मलासुद्धा चांगला 'वक्ता' व्हावसं वाटतं पण 'लेखन' हे मला बोलण्यापेक्षा 'सोपं' वाटतं. याचं कारण लेखनाला चांगलं, अधिक चांगलं करण्यासाठी पुरेसा वेळ आपल्याकडे असतो; परंतु बोलताना होणाऱ्या चुका मात्र पुढच्या वेळेस बोलताना दुरुस्त करण्याची 'संधी', 'वेळ' व तेच 'स्थळ' मिळेल की नाही याची शंका वाटते.

घटना ज्या वेळी घडते त्यावेळी विचारांची व भावनांची `तीव्रता` आणि `वारंवारिता` एका विशिष्ट बिंदूवर असते.. ती वेळ जर दवडली नंतर मात्र धार कमी झालेली असते..पुलाखालून पाणी निघून गेल्यानंतर डोक्याला हात लावण्याचा काहीच उपयोग होत नसतो.पाखरांनी पीक खाऊ नये असं वाटत असेल तर अगोदरच `गोफन` फिरवावी..अन्यथा फक्त आणि फक्त पश्चातापच ! विचार आला होता, खुप छान होता, पण आता तो आठवत नाही असं होवू नये म्हणून सतत वहीपेन किंवा मोबाईलचा वापर विचार टिपण्यासाठी करावा.

हे सगळं सांगत असताना आदरणीय प्रतिभाताईंचा स्क्रीनवर मेसेज दिसला `वेळ संपत आली, प्रश्नोत्तराची वेळ झाली.` सेट झालेल्या बॅट्समनला यॉर्करने गोंधळात टाकावे अशी स्थिती माझी झाली... मीच मला `आवरत` आणि `सावरत` वेगानं माझं म्हणणं पुढं मांडण्याचा प्रयत्न केला. राहिलेल्या मुद्द्यांची मात्र आवर्जून भर घालण्यासाठी लेखन कौशल्याची मला मदत झाली.

श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी मी कितपत `यशस्वी` झालो व ते कितपत `समाधानी` झाले हे प्रश्न विचारणारे श्रोतेच अधिक चांगलं सांगू शकतील.. हा पूर्ण त्यांचा अधिकार. ताईंनी लेखाचे शिर्षक कधी लिहिता ? व वाचनाची काही मदत होते का ? संदर्भात प्रश्न विचारला.. मी आज पर्यंत `बरं`च जरी वाचलं नसेल पण `बऱ्या`पैकी वाचलं आहे.. पुस्तकं मी कमी वाचली असतील परंतु `प्रसंग` आणि `माणसं` वाचनातून मी अधिक शिकलो असेल, असं मला वाटतं.. "तुमच्या मृत्यूनंतर कोण रडणार आहे ? " हे रॉबिन शर्मा या लेखकानं लिहिलेलं माझं आवडीचं पुस्तक..जे मी सतत सोबत बाळगतो.. लेखन करताना कधी प्रारंभीच शिर्षक लिहिल्या जाते, कधी लिहिता लिहिता मध्येच ते सापडते तर कधी शेवटच्या ओळीमध्ये सुद्धा!

आपलं स्व-अनुभव लेखन हे आपल्या जगण्यापेक्षा वेगळं नसावं.. लेखनातून आपण `नम्रता` शब्द वारंवार वापरत असू आणि ती आचरणात नसेल; तसंच `वेळेचे महत्त्व` पुन्हापुन्हा लिहीत असून पण जीवनात मात्र त्याचे `प्रतिबिंब` उमटंत नसेल तर त्या लेखनाला `लाईक` भरपूर मिळतील पण `लाईफ` मात्र असणार नाही.. `आचार` , `विचार` आणि `उच्चार` यांची युती किंवा आघाडी झाल्याशिवाय टिकाऊ `लेखन-प्रपंच` उभा राहणार नाही हेही खरे.

लेखनासाठी काळजीपूर्वक निरीक्षण ,वाचन, श्रवण, `प्रत्येक प्रसंगाकडून शिकण्याची अपेक्षा बाळगणं` आणि सातत्यानं `मला लिहायला शिकायचे` हा ध्यास जर असेल तर प्रत्येकाला `स्व-अनुभव` नक्कीच लिहिता येतील.. मी जर लिहिलं तर माझे सहकारी लिहितील.. माझं पाहून माझे विद्यार्थी लिहतील, माझे मुलंही लिहितील. पण त्यासाठी मी लिहिलं पाहिजे. सुरुवात माझ्यापासुन झाली पाहिजे. माझा मोठा मुलगा `भाग्योदय` व लहाना `अनुभव` हे आजही घरी नित्याने रोजनिशी लिहितात व संध्याकाळी आल्यानंतर मला दाखवतात..कारण मी सुद्धा माझी रोजनिशी लिहितो आणि त्यांना वाचायला देतो.. आजही माझ्या रोजनिशी

मध्ये जरी खंड पडला तरी , खंडानंतर ज्यावेळेस मी परत रोजनिशीला सुरुवात करतो त्यावेळेस `क्षमा` व `दिलगिरी` व्यक्त करूनच रोजनिशीचा पहिला शब्द लिहितो.

मोठ्या मुलाचे नाव `भाग्योदय` ठेवण्याच्यामागची पार्श्वभूमी माझ्या मोठ्या भावाच्या मुलाला मी `उदय` तर मुलीला `भाग्यश्री` या नावाने हाक मारतो.. एम.एड.नंतर लहान्याचा जन्म झाला. एम.एडला अध्यात्मवादापासून कार्यवादापर्यंत सर्व वाद वाचले त्यात मला `कार्यवाद` सर्वात अधिक भावला..कार्यवादामध्ये कृतीला, प्रत्यक्ष अनुभवाला महत्व.. म्हणून त्याचं नाव ठेवलं `अनुभव`..माझ्या चारचाकी च्या मागे लिहिलेला एक विचार तो असा `अनुभव हाच सर्वश्रेष्ठ गुरु`!आम्हा तिघांची ३६५ दिवस काळजी घेणाऱ्या सौ.सुरेखाला मी `सरकार` या नावाने हाक मारतो !

वरील परिच्छेद लिहिण्यामागचा उद्देश आपल्या शब्दाला, लिहिण्याला,आपल्या जगण्याचा.. आपल्या अनुभवाचा स्पर्श असावा.

"तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार" हे वाक्य जर आपणास `अपील` होत असेल तर आपणच आपले लेखन पुन्हा पुन्हा वाचावे, काळजीपूर्वक तपासावे, जिथं अडखळल्यासारखं वाटेल तिथं रचना बदलून पहावी.. आपल्या लेखनातून एखाद्याचा द्वेष ,मत्सर तर होत नाही ना? एखादयाच्या भावना दुखावणार तर नाही ना? कोणी हरकत तर घेणार नाही ना? अशा विवेक साबुत ठेवणाऱ्या प्रश्नांवर घासून पहावे. असं केल्यानं लेखनाचा `दर्जा` आणि `उंची` सुध्दा टिकून राहील. ज्या प्रश्नांचं मी समाधान करू शकलो नाही त्यासाठी आदरणीय नामा दादांनी मार्गदर्शन केलं त्याबद्दल धन्यवाद दादांचे !

`झूम मिटींग`च्या निमित्ताने शेवटी दुष्यंत कुमार यांच्या दोन ओळी सांगाव्याशा वाटतात,"सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नही,मेरी कोशिश है कि ये सूरत बदलनी चाहिए "

सर्वांना स्व–अनुभव लेखन कार्याला शुभेच्छा !


डॉ.शंकर आ.गाडेकर

विस्तार अधिकारी (शिक्षण)

बीट– शेंडी (भंडारदरा डॅम) ता.अकोले जि अहमदनगर.

9890201591

shankara78gadekar@gmail.com

(बीड/औरंगाबाद/अहमदनगर)

# तालुका प्रगत करताना

डॉ.गणपती कमळकर



22 जून 2015 च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयामुळे महाराष्ट्राच्या शिक्षण विभागाला वेगळी दिशा दिली .राज्याच्या वाडी-वस्तीवर चळवळ सुरु झाली. राज्याचे प्रधान सचिव मा. नंदकुमार यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने शाळा-शाळांमध्ये रचनावाद , ई-लर्निंग ,डिजिटल क्लासरुम यांच्या माध्यमातून मूल प्रगत होण्यासाठी शिक्षक व प्रशासकीय यंत्रणेची धडपड सुरु झाली.

गडहिंग्लज तालुका हा कर्नाटक राज्याच्या सीमेस लागून आहे. तालुक्यात 89 महसूल गावे व जिल्हा परिषदेच्या 128 प्राथमिक व 1 माध्यमिक शाळा आहे. 1 जुलै 2014 रोजी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर तालुक्यातील प्राथमिक शाळांना भेटी देऊन तालुक्याचा शैक्षणिक आढावा घेतला. शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत विचार करत असताना अप्रगत विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता साधारणपणे सोळा टक्के विद्यार्थी कर्नाटक राज्याच्या लागून असणाऱ्या गावातील शाळांमध्ये आढळून आले. ही संख्या तालुक्यातील इतर शाळांपेक्षा जास्त होती. साधारणतः ही संख्या दुप्पट असल्याचे प्रकर्षाने जाणवले. त्यांच्या मातृभाषेमुळे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र निर्माण करण्यातील तो अडसर ठरू लागला. परंतु त्यामुळे खचून न जाता प्रधान सचिव श्री नंदकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सखोल अभ्यास करण्यात आला व ही समस्या कशी सोडविता येईल यावर उपायात्मक चर्चा करण्यात आली व ती अमलात आणण्याची ठरविले. परंतु यामध्ये शंभर टक्के यश संपादन करण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र (PSM) चा आधार घेतला.

22 जून 2015 च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयामुळे महाराष्ट्राच्या शिक्षण विभागाला वेगळी दिशा दिली .राज्याच्या वाडी–वस्तीवर चळवळ सुरू झाली. राज्याचे प्रधान सचिव मा. नंदकुमार यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने शाळा–शाळांमध्ये रचनावाद ,ई–लर्निंग ,डिजिटल क्लासरूम यांच्या माध्यमातून मूल प्रगत होण्यासाठी शिक्षक व प्रशासकीय यंत्रणेची धडपड सुरू झाली. या शासन निर्णयामुळे शिक्षकांना अध्यापनाची आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची तर पर्यवेक्षीय यंत्रणेला शाळा भेटीची नवी दृष्टी मिळाली. तालुका प्रगत करण्यासाठी व शंभर टक्के मुले शिकण्यासाठी रचनावाद पद्धतीची शाळांमध्ये अंमलबजावणी करण्यासाठी मुख्याध्यापक व उपक्रमशील शिक्षकांच्या कार्यशाळेचे खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आले. केंद्रनिहाय मुख्याध्यापक व शिक्षकांची कार्यशाळा आयोजित केली व त्यामध्ये अप्रगत विरहित वर्ग व शाळेसाठी

ज्ञानरचनावाद किती महत्वाचा आहे याची माहिती देण्यात आली. यामध्ये सुरुवातीस कोणत्याही प्रकारची सक्ती न करता शिक्षक व मुख्याध्यापक यांना प्रेरणा देण्याचे काम केले. यासाठी तालुक्यातील उपक्रमशील व ज्ञानरचनावाद याचे ज्ञान असणाऱ्या शिक्षकांचे सहकार्य घेतले .प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयाचे सखोल वाचन केले व त्याचा अभ्यास करण्यात आला आणि ज्ञानरचनावाद राबविण्यात आलेल्या शाळांना शिक्षकां सहित भेटी देण्यात आल्या.

## कुमठे बीट अभ्यास दौरा

प्रत्यक्षात ज्ञानरचनावाद पद्धतीने कशा प्रकारे अध्ययन व अध्यापन केले जाते, मुल कसे शिकते याचा परिणाम व यशस्विता पाहण्यासाठी तालुक्यातील प्रत्येक केंद्रातील उपक्रमशील शिक्षक व ज्ञानरचनावाद बद्दल जिज्ञासा असणाऱ्या शिक्षकांची निवड करून सातारा जिल्ह्यातील कुमठे बीटला भेट दिली. या शिक्षकांनी रचनावादाचा अभ्यास केल्यानंतर प्रत्येक केंद्रात ज्ञानरचनावादी एक आदर्श शाळा तयार करण्यात आली. गडहिंग्लज तालुक्यात दहा केंद्र असून 10 आदर्श शाळा तयार करण्यात आल्या.

## 100% जिल्हा परिषद शाळेत ज्ञानरचनावाद पद्धतीची अंमलबजावणी

ज्ञानरचनावाद किती फायदेशीर आहे व आपल्या शाळेत सहज करता येतो व मूल त्याद्वारे प्रत्यक्ष कृतीतून किती जलद शिकते हे शिक्षकांना समजले. सुरुवातीस इयत्ता पहिली व दुसरी चे वर्ग ज्ञानरचनावादी करण्यात आले. त्यानंतर इयत्ता पाचवी पर्यंतचे वर्ग ज्ञानरचनावाद पद्धतीसाठी तयार करण्यात आले. काही शाळांमध्ये शिक्षकांनी आपल्या कल्पकतेने इयत्ता सहावी व सातवीच्या भाषा ,गणित, इंग्रजी विषयाच्या काही संकल्पना रचनावाद पद्धतीने शिकविण्यास सुरुवात केली. अशा तऱ्हेने जिल्हा परिषदेच्या शंभर टक्के शाळांमध्ये ज्ञानरचनावाद पद्धतीची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. यामध्ये साहित्य निर्मिती करत असताना देखील शिक्षकांनी आपल्या कल्पकतेचा वापर केला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी ,शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या गडहिंग्लज तालुक्यातील रचनावाद शाळा यांना भेटी व कार्यशाळा घेण्यात आली.



## गडहिंग्लज शिक्षण पर्यटन क्षेत्र

तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये ज्ञानरचनावाद पद्धतीची यशस्वी अंमलबजावणीची दखल राज्याचे प्रधान सचिव मा.नंदकुमार यांनी घेतली. 21 व 22 नोव्हेंबर 2015

रोजी मा. प्रधान सचिवांनी गडहिंग्लजमध्ये दुंडगे नं. 1, हेळेवाडी, उर्दू नेसरी या शाळांना भेट देऊन रचनावाद पद्धतीने मुले कशी जलद शिकतात हे पाहून मुलांचे व शिक्षकांचे कौतुक केले व त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांची कार्यशाळा संपन्न झाली. त्यानंतर कोल्हापूर, सिंधुदुर्ग, नागपूर महानगरपालिका, मंठा जिल्हा जालना, गोंदिया तसेच शिक्षण सेवेमधील नवनियुक्त वर्ग 1 चे अधिकारी इस्लामपूर ,तासगाव ,रायगड, विविध जिल्ह्यातील शाळा व्यवस्थापन समिती ,डी.टी.एड, बी.एड. चे विद्यार्थी पालक अशा पंधरा हजार लोकांच्या भेटी गडिंग्लज तालुक्यातील विविध शाळांना दिल्या व रचनावाद पद्धतीसाठी अभ्यास दौरा केला. केंद्रीय मानव संसाधन विकास सचिव मा.अनिल स्वरूप यांनी 6 मार्च 2017 रोजी गडिंग्लज तालुक्यातील ऐनापुर ,करंबळी शाळांना भेट देऊन ज्ञानरचनावाद व ई–लर्निंगच्या माध्यमातून विद्यार्थी कसे शिकतात त्याची माहिती घेऊन समाधान व्यक्त केले.

## गडहिंग्लज नवोपक्रम यशोगाथा

तालुक्यामध्ये जिल्हा परिषद शाळे मधील प्राथमिक शिक्षक पटसंख्या वाढीसाठी व गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबवीत होते. त्या उपक्रमाची देवाण–घेवाण तालुक्यातील इतर शाळेतील शिक्षकांना व्हावी म्हणून यामध्ये 24 शाळांतील 28 शिक्षकांचे नवोपक्रम एकत्रित घेण्यात येऊन गडहिंग्लज नवोपक्रम यशोगाथा तयार करण्यात आली. याचा फायदा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेचा पट वाढण्यास व विद्यार्थी गुणवत्ता वाढण्यास झाला.

## छोट्या दोस्तांचा कवितासंग्रह

तालुक्यातील शिक्षकांनी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राच्या चळवळीत स्वत:ला झोकून देऊन मुल प्रगत करण्यासाठी अथक प्रयत्न सुरू केले. याचाच परिणाम म्हणून भाषा विषयात मुले गतीने शिकू लागली. मुले गोष्टी कविता रचतात हे तालुक्यातील अनेक शाळांमध्ये पाहण्यास मिळू लागले .मुले अभिव्यक्त व्हायला




लागली. अशा लिहिणाऱ्या मुलांना दिशा देणे आवश्यक होते. तालुक्यातील शिक्षकांबरोबर चर्चा करून लिहिणाऱ्या मुलांची लेखन कार्यशाळा घेण्याचे निश्चित केले.

जिल्हा परिषद शाळांमधील 110 मुलांची लेखन मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. मुलांच्या कल्पक डोक्यातून जे बाहेर येतं त्याचा आपण विचारसुद्धा सुद्धा केलेला नसतो. मुलांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि त्यांना अभिव्यक्त होण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे म्हणून छोट्या दोस्तांना कविता करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. 110 मुलांनी कविता लिहिल्या. त्यातील निवडक 53 मुलांच्या 58 कवितांचा समावेश करून छोट्या दोस्तांचा कवितासंग्रह तयार करण्यात आला आहे. सांगलीच्या सुजन प्रकाशन संस्थेने कवितासंग्रह प्रकाशित करून मोलाचे सहकार्य केले. 15 फेब्रुवारी 2017 रोजी प्रकाशन झाल्यापासून अगदी महिनाभरात लहानांपासून थोरांपर्यंत वाचकांनी हा कवितासंग्रह आपलासा केला व कविता संग्रहास प्रचंड प्रतिसाद लाभला. अल्पावधीतच 1000 पुस्तकाची पहिली आवृत्ती संपली. महाराष्ट्र टाईम्स, दिव्य मराठी, साप्ताहिक सर्वकाळ मध्ये छोट्या दोस्तांच्या कवितांचे परीक्षण प्रसिद्ध झाले. हा प्रतिसाद पाहता अक्षरवेध प्रकाशन गडिंग्लज यांच्या सहकार्याने 17 एप्रिल 2017 रोजी दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष बाबा भांड आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव यांनी शुभेच्छा देऊन मुलांना लिहिण्यासाठी प्रेरणा दिली.

## असर रिपोर्ट ला अनुसरून तालुक्याचा विश्लेषणात्मक अहवाल

ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट असर 2016 चा अहवाल दिनांक 18 जानेवारी 2017 रोजी नवी दिल्ली येथे जाहिर झाला. या अहवालामध्ये देशातील सर्व शाळांचा अहवाल ,अध्ययन संपादणूक पातळी चा सर्वेक्षण अहवाल सादर करण्यात आला. याच अहवालास अनुसरून प्रधान सचिवांच्या सूचनांनुसार तालुक्याचा विश्लेषणात्मक अहवाल तयार करण्यात आला. त्यासाठी नियोजनात्मक कार्यवाही करण्यात आली.

गडहिंग्लज तालुक्यांमध्ये 129 जिल्हा परिषद शाळा व नव्वद खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळा आहेत .तालुक्यामध्ये अध्ययन संपादणूक पातळीचे सर्वेक्षण करण्यासाठी लॉटरी पद्धतीने 20 जिल्हा परिषद व 13 खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांची निवड करण्यात आली. या शाळा केंद्र निहाय व नगरपालिका क्षेत्रातील देखील निवडण्यात आल्या. वरील शाळांचे सर्वेक्षण करण्यासाठी तालुक्यातील विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख ,विषयतज्ज्ञ, विशेष शिक्षक, अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी यांची सर्वेक्षणासाठी मदत घेण्यात आली. यामध्ये असरच्या चाचणी चा उपयोग करण्यात येऊन शाळास्तरावर विद्यार्थी निहाय चाचणी घेण्यात आली. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून सविस्तर विश्लेषणात्मक अहवाल तयार करण्यात आला. यामध्ये देखील राज्याच्या व जिल्ह्याच्या तुलनेने गडहिंग्लज तालुका भाषा व गणित विषयांमध्ये पुढे असल्याचे दिसून आले .तसेच इंग्रजी व खाजगी माध्यमाच्या शाळांपेक्षा जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता अधिक चांगली असल्याचे दिसून आले. शाळा सिद्धी मध्ये स्वयंमूल्यमापन अंतर्गत 203 शाळा ए ग्रेड मध्ये आलेल्या आहेत.

तालुका प्रगत करण्या साठी प्रधान सचिव मा.नंदकुमार यांची प्रेरणा व मार्गदर्शन लाभले .तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, सभापती शिक्षण व अर्थ जि. प. कोल्हापूर मा. अंबरीशसिंह घाटगे ,सभापती मा. जयश्री तेली ,मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक )श्री. सुभाष चौगुले ,तालुका गट विकास अधिकारी सीमा जगताप, सर्व पदाधिकारी, पत्रकार ,सर्व शिक्षक संघटना प्रमुख व तालुक्यातील वाडी–वस्तीवर स्वतःला झोकून देऊन काम करणारे शिक्षक या सर्वांचे सहकार्य मिळाले .सर्वांचे मनःपूर्वक आभार.

डॉ. गणपती कमळकर,

गटशिक्षणाधिकारी ,

पंचायत समिती गडहिंग्लज,

मोबाईल– 9421109093

# तालुका प्रगत करताना



धनपाल फटिंग

चंद्रपूर जिल्हा परिषद मध्ये  उपशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार मिळाला. उपशिक्षणाधिकारी पदावर काम करण्याची संधी मिळाली . यावेळी जिल्हा परिषदेकडून बीटातील शाळेकरिता विशेष निधी ई लर्निंग करिता मिळवून घेतला. सर्व शाळा डिजिटल झाल्या. बीटात  गुणवत्तावाढीसाठी वेगवेगळे प्रयोग सुरु होते.

**कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातील मी सदस्य.   गडचिरोली जिल्हा परिषद मध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू  झालो. शाळेवर रुजू होतात माझ्या समोर भाषिक आव्हान होतं.सर्व मुले छत्तीसगडी भाषा बोलायचे.  त्यामुळे पहिल्या दिवसापासुनच भाषा शिकावी लागली. त्यामुळे मुलांचे शिकणे सोपे झाले. शाळेमध्ये जीवन शिक्षक मासिक येत होतं. मासिकांमधील विविध वैचारिक व शिक्षकाचे अनुभव वाचून आपले सुद्‌धा लेख प्रकाशित व्हावे ही इच्छा होती.  यासाठी लेखन करीत होतो. जीवन शिक्षण मासिकात लेख येण्यासाठी शाळेमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे आवश्यक होते. त्यामुळे वेगवेगळे प्रयोग सुरू केले.जीवन शिक्षण मासिकांमध्ये लेख पाठविले परंतु प्रकशित झाले नाही.**

**दोन वर्षांनी  चंद्रपूर जिल्ह्या परिषदेच्या शाळेत मध्ये रुजू झालो.अतिशय दुर्गम भागातील शाळा होती. तिथेही नवीन नवीन प्रयोग राबविणे सुरु होते. शैक्षणिक साहित्य विविध स्पर्धांमध्ये भाग घेणे या गोष्टी सुरू असतांना गट साधन केंद्रात साधन व्यक्ती म्हणून संधी मिळाली.युनिसेफच्या मार्फत आमची शाळा प्रकल्प चंद्रपूर मध्ये सुरू असल्यामुळे विविध प्रकारचे प्रशिक्षणला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. त्यामुळे माझे स्वत:चे सक्षमीकरण होत होते.नवीन नवीन शैक्षणिक अनुभव नवीन शैक्षणिक विचार मिळत असल्यामुळे वेगळे प्रयोग शाळेवर करता येऊ लागले. राज्यातील व विविध राज्यातील शाळांच्या अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. होमी बाबा सेंटर मुंबई येथे दहा दिवसाची नवनिर्मिती मार्फत दहा दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण केले. गणिताचे संबोध स्पष्ट होण्यास खूपच मदत झाली. यावेळी मा.नंदकुमार साहेब  उपस्थित राहून मार्गदर्शन करीत होते. येथेच सर्वप्रथम साहेबांची  भेट झाली. यानंतर अनेक मासिकांमध्ये विद्‌यार्थ्यांच्या शैक्षणिक अनुभवावर आधारित शैक्षणिक लेखन करू लागलो. जीवन शिक्षण सह अनेक मासिकांमध्ये लेख**

प्रकाशित झाले. भाषा गणित व उपक्रम, शालेय परिपाठ, छान छान कथा असे दहा पुस्तके मुलांसाठी प्रकाशित के ली.

सन 2007 मध्ये सरळ सेवेने विस्तार अधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण झालो.विस्तार अधिकारी पदावर रुजू झालो. प्रशासनातील बऱ्याच गोष्टी माझ्यासाठी नवीनच होत्या. त्यानंतर काही दिवसातच गटशिक्षणाधिकारी पदाचा प्रभार मिळाला. आमची शाळा प्रकल्प सुरू असल्यामुळे मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम तालुक्यामध्ये सुरु होते.निलेश निमकर सर भाषा,गणित विषयासाठी मार्गदर्शन करायचे. विविध शाळांना भेटी देऊन गुणवत्ता वाढीसाठी काम सुरू होते. तालुक्यातील शाळेमध्ये वाचन–लेखन यासाठी विशेष उपक्रम राबवले.

चंद्रपूर पंचायत समितीमधील ताडाळी बीटात बदली झाली. तसेच चंद्रपूर जिल्हा परिषद मध्ये उपशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार मिळाला. उपशिक्षणाधिकारी पदावर काम करण्याची संधी मिळाली . यावेळी जिल्हा परिषदेकडून बीटातील शाळेकरिता विशेष निधी ई लर्निंग करिता मिळवून घेतला. सर्व शाळा डिजिटल झाल्या. बीटात गुणवत्तावाढीसाठी वेगवेगळे प्रयोग सुरु होते. याच काळात कुमठे येथील 100% मूल शिकत असलेल्या शाळा भेट अभ्यास दौरा सुरू होते. या दौऱ्याला मला जाता आले नाही. नागपूर येथील सभेत मा.नंदकुमार सर आढावा सभेत ज्या अधिकाऱ्यांनी अजून पर्यंत त्याला भेट दिली नाही त्यांनी जाण्याची सूचना दिली. त्यानुसार भराडे मॅडम यांची परवानगी घेऊन सोबत काही शिक्षकांना घेऊन कुमठे बीटाचा दौरा केला.



कुमठे शाळेला भेट दिली. येथील मूल स्वतः शिकतो ही संकल्पना अतिशय नवीन होती. सर्व उपक्रमाची माहिती घेतली. या पद्धतीने आपल्या बीटातील विद्यार्थी शिकू शकतील असा विश्वास निर्माण झाला. शिक्षकांची सभा घेऊन या पद्धतीने काम सुरू केलं. यासाठी कुमठे शाळेतील निंबाळकर मॅडम आणि प्रतिभा भराडे मॅडम यांनी खूप सहकार्य केले. बीटातमध्ये रचनावादी पद्धतीने काम सुरु झाल्यानंतर मा. नंदकुमार सर यांनी कुमठे बीटातील दोन शिक्षकांना पाठवून सर्व शिक्षकांची कार्यशाळा घेण्यासाठी कळवले.

त्यानुसार इंदिरा गायकवाड, विद्या गाढवे मॅडम यांनी तीन दिवसाचे प्रशिक्षण दिल्यानंतर शिक्षकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला . बीटातील काम वेगाने पुढे जाऊ लागले.यादरम्यान मा. नंदकुमार सर ताडाळी बीटातील दोन शाळेला भेट दिली. विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मुलांची प्रगती पाहून शिक्षकांचे कौतुक केले. बीटातील 25 पैकी २० शाळा २५ निकषानुसार प्रगत झाल्या. मूल साहित्यातून शिकू लागली.शैक्षणिक साहित्याच्या कार्यशाळा घेतल्या. यादरम्यान विदर्भातल्या अनेक शाळेच्या शिक्षकांनी या शाळेला भेट दिल्या. बीटातील शंभर टक्के शाळा प्रगत झाल्या. मा.नंदकुमार सरांनी अमरावती येथील कार्यशाळेत असर रिपोर्ट प्रमाणे विद्यार्थी भागाकारात फारच कमी असल्याचे विश्लेषण केले. शंभर टक्के मुलांना भागाकार येण्यासाठी सरांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर मी ताडाळी बीटातील शंभर टक्के मुलं भागाकर करतील यासाठी काम सुरू केले. भागाकार न येणाऱ्या कारणांचा शोध घेतला यातील शेवटच्या मुलापर्यंत पोहोचलो. अडचणी समजून क्षमतेनुसार मदत कशी करायची हे



शिक्षकांना सांगितलं . शाळा स्तरावर या विद्यार्थ्यांच्या पुन्हा पुन्हा सराव चाचणी घेण्यात आली त्यामध्ये 97 टक्के यश मिळालं. एप्रिल 2013 मध्ये माननीय नंदकुमार सर , राज्याच्या टीमने प्रत्येक विद्यार्थ्याला भेटून 100% मुले भागाकार करतात काय? याची पडताळणी करण्यात आली. CWSN मुलांनी सुद्धा वाचन व भागाकारात प्रगती केल्याचे दिसून आले. ताडाळी बीटातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचाळा शाळेची आंतरराष्ट्रीय शाळा म्हणून निवड झाली. मा.नंदकुमार सरांनी शाळेला भेट देऊन शाळेचे, विद्यार्थ्यांचे, गावकऱ्यांचे कौतुक केले. शाळेच्या प्रगतीकरिता शुभेच्छा दिल्या यामुळे शिक्षकांना प्रेरणा मिळाली.

सन 2017 मध्ये प्रशासकीय बदली झाली. राजुरा तालुक्यातील चुनाळा येथे गुणवत्तेवर काम सुरू करण्यात आले. सुरुवातीपासून शिक्षकांचे प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीमध्ये बदल दिसून येत असताना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चंद्रपूर येथे विषय सहायक म्हणून भाषा विषयासाठी निवड झाली. त्यामुळे जिल्हा स्तरावर काम करण्याची संधी मिळाली. जिल्ह्यातील वेगवेगळ्या गुणवत्ताप्राप्त शाळांना भेटी दिल्या. त्या शाळेतील वेगवेगळे अनुभव खूप प्रेरणादायी होते. जे विद्यार्थी मूलभूत क्षमतेत मागे होती यासाठी

काम सुरू झाले असतानाच भद्रावती पंचायत समिती येथे प्रभारी गट शिक्षणाधिकारी पदाची नवीन जबाबदारी देण्यात आली.

शाळा, केंद्र, बीट प्रगत झाल्याचे मी बघितले होते या निमित्ताने मला संपूर्ण तालुक्यामध्ये काम करण्याची संधी मिळाली. तालुका प्रगत करण्यासाठी मी कामाला लागलो. केंद्रप्रमुख प्रशासकीय कामांकडे अधिक लक्ष देत होते. मी पहिल्या दिवशी पासून केंद्रप्रमुख यांची शैक्षणिक विषयावरती चर्चा करु लागलो. साप्ताहिक सभेमध्ये गुणवत्ता हा प्रथम विषय असायचा. प्रशासकीय विषयाकडे फार कमी लक्ष दिले.शिक्षकांच्या कोणत्याही समस्या प्रलंबित नाही. त्यामुळे शाळा भेटीवर भर दिला. ताडाळी बीटातील अनुभव माझ्या सोबत असल्यामुळे या तालुक्यात काम करणे फार सोपे झाले.शिक्षण परिषदेमध्ये उपस्थित राहून, संधी मिळेल त्या पद्धतीने मी प्रत्येक शिक्षकांपर्यंत , विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. शिक्षकांमध्ये विश्वास निर्माण केलं. शिक्षक जोमाने काम करू लागले. चंद्रपूर जिल्ह्यात अध्ययन निष्पत्ती वर आधारित गुणवत्ता विकास कार्यक्रम सुरू होता. या कार्यक्रमांमध्ये शंभर टक्के मुलांना वाचन लेखन, शंभर टक्के मुलांना गणित मूलभूत क्षमता येण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण विचारातील 17 मुद्यापैकी 6 मुद्यावर काम सुरू झाले. याचा खूप मोठा फायदा झाला. या कार्यक्रमामध्ये चंद्रपूर जिल्ह्यात आणि विभागांमध्ये गुणवत्तेत भद्रावती तालुका पुढे आला. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण विचार यातून आंतरराष्ट्रीय पातळीवरील काम करता येऊ शकते. आंतरराष्ट्रीय शिक्षण विचार याविषयावर निलेश सर, मा.नंदकुमार सर यांच्या कार्यशाळेमुळे शिक्षकांना प्रेरणा मिळाली. तालुक्यातील शिक्षकांनी बाबळेवाडी येते भेट दिली. या दौऱ्यातून प्रेरणा घेऊन शिक्षकांनी काम सुरू केले. आंतरराष्ट्रीय शिक्षण विचार मधील सहा मुद्द्यावर कार्य केल्यानंतर अनेक शाळांमध्ये गुणवत्तेत बदल दिसू लागला. मुलांची प्रगती दिसून आली. वेध गृपच्या माध्यमातून नवीन उपक्रमांची माहिती मिळते. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलता, वाचता येण्यासाठी या सत्रात नियोजन करण्यात आले आहे.

**धनपाल फटिंग,**

**प्रभारी,गटशिक्षणाधिकारी ,**

**पंचायत समिती भद्रावती, जिल्हा परिषद चंद्रपूर**

**dhanpalf399@gmail.com ,9405502997**

# सुभाषित

गोदावरी राठोड



माझ्या घरात अजूनही एक गोष्ट कायम आहे ,बाबांच्या खोलीत एकाच ठिकाणी पूर्वीची जूनी व नवीन आणलेली भगव्द्गिता -जशी आहे तशी, मामासाहेब दांडेकरांची ज्ञानेश्वरी ,बायबल, हदीस, कूराण,ऑक्सफर्ड अडव्हॉन्स लर्नर्स डिक्शनरी, ऑक्सफर्ड कन्साईज डिक्शनरी,मनाचे श्लोक,एकाच ठिकाणी एकाच रांगेत ठेवलेले असतात , *बाबा नेहमी म्हणतात हे सगळे ग्रंथ म्हातारपणी वाचायचे नसतात जीवन जगून झाल्यानंतर मरणाची वाट पाहण्यात वेळ जात नाही म्हणून ही ग्रंथसंपदा आपलीशी करायची नसते ,तर अगदी लहानपणी पासून मूलांना वाचायला दिली तर त्यातून घेतलेले काही शहाणपण त्यांना आयूष्यभर उपयोगी पडेल.

**मला जवळपास सात भाषा येतात मराठी ,हिंदी आणि इंग्रजी या भाषा शाळेत शिकल्याने येतात, माझी मातृभाषा ही बंजारा बोलीभाषा आहे आमच्या घरात व पूर्ण गावात ही बोलीभाषा बोलली जाते .माझी मातृभाषा ही 99% राजस्थानी व 90% मारवाडी आहे, स्थलकालपरत्वे झालेल्या बदलामूळे बोलीभाषा थोडीशी वेगळी आहे इतकेच त्यामूळे राजस्थानी मारवाडी भाषा शकिाव्या लागल्या नाही . लहानपणी आईच्या नवीन साड्यांच्या पॅकींगसोबत करकरीत रद्दीचा पेपर यायचा ,बहूतेक वेळा हा गूजराती पेपर असायचा,फक्त नवीन साड्यांसोबतच मिळतो म्हणजे खूप स्पेशल असणार अशी माझी समजूत ,तो पेपर वाचायला फार मजा यायची त्यावेळी गूजराती अ, व ख यात फरक कळायचा नाही पण नंतर नंतर पूर्ण गूजराती लिपी वाचता येऊ लागली व गूजराती भाषा अगदी माझ्या मातृभाषेसारखीच असल्याने ती ही जमली त्यामूळे ,राजस्थानी,मारवाडी व गूजराती भाषा अस्खलित नाही पण अडखळत कमी गतीने पण समजपूर्वक यायला लागली.**

**आमच्या लहानपणी घरात टीव्ही होता त्यामूळे टव्हिी बघून बघून मराठी आणि हिंदीचा सराव झाला. मी शाळेत जायला लागले त्यावेळी आमच्या घरात एक पोते भरून गोष्टीची पूस्तके होती आणि भिंतीतले फडताळ भरून कॅसेट्स होते ,मोठ्या बोल्ड टाईपची खूप चित्रे असलेली पूस्तके वाचताना खूप चांगले वाटायचे आणि समजायचेही छान,घरात टेपरेकॉर्डर होता त्यामूळे खूप लहानपणी रेडीयोवर हिंदी मराठी गाणी ऐकून कान तयार झाला ,टेपरेकॉर्डरमूळे रेडीयोवर लागलेले चांगले गाणे ही रेकॉर्ड केले जायचे ,कॅसेट,ए साईड ,बी साईड , 60,90(60-90 म्हणजे सिक्स्टी,नाईन्टी नव्हे ,ती कॅसेटची रेकॉर्डीगची क्षमता होती ,उगाच गैरसमज नसावे) हे शब्द आपसूकच आमच्या तोंडात असायचे, त्याचा उपयोग शाळेत मराठी हिंदी,इंग्रजी शिकताना**

झाला.मराठी छान बोलता येते म्हणून कौतूक व्हायचं त्यामूळे आपल्या घरातल्या भाषेपेक्षा दूसऱ्या भाषा चांगल्या असतात असे वाटायचे आणि दूसऱ्या भाषा शिकावेसे वाटायचे .सूदैवाने मला प्राथमिक व माध्यमिक शाळेत मराठी व इंग्रजी शिकवणारे शिक्षक खूप चांगले मिळाले.

चाळीस वर्षापूर्वी आणि जवळपास 1995 पर्यंत आमच्या गावातील महिला माझ्या आईकडे पत्र वाचून किंवा लिहून घ्यायला यायच्या आमची आई लग्न करून सासरी आली तेव्हा गावात ती शिकलेली एकमेव महिला होती ,पिवळसर रंगाचे छोटे पोस्टकार्ड आणि निळसर रंगाचे घडी घालता येणारे माठे आंतरदेशीय पत्र असे पत्राचे दोन प्रकार असतात हे मला आईनेच सांगितले होते , आई कर्नाटकातील कन्नड माध्यमात शिकलेली, कन्नडमधली जिलेबी जिलेबी अक्षर पाहून मजा यायची ,गावातल्या महिलांच्या गरजेपोटी आईने मराठीही शिकून घेतली बदल्यात बाबांनी आईकडून कन्नड लिहायला वाचायला शिकून घेतले .त्यामूळे त्यामूळेआईला पाच भाषा अस्खलित येतात,बाबांना जवळपास आठ भाषा येतात त्यावेळी आम्ही मूले एकाचवेळी मातृभाषा मराठी, हिंदी, इंग्रजी अशा चार भाषांच्या गराड्यात असल्याने इतर भाषेकडे लक्ष गेले नाही,आमच्यावेळी शाळेत जरी पाचवीपासून इंग्रजी असली तरी घरी मात्र पहिलीदूसरीपासूनच बाबा इंग्रजी शिकवायचे विशेष करून उन्हाळी व दिवाळी सूट्टीच्या काळात ,चाररेघी वही ,नवनीतचा शब्दकोश ,घेऊन बाबांनी सांगितलेला अभ्यास झाल्यावर खूप छान छान पदार्थ लाडू, चिवडा,करंज्या,आंबे,कलिंगड खायला मिळायचे ,मला वाटायचे इंग्रजी शिकल्यामूळे छान छान खायला मळितं म्हणजे इंग्रजी खूप छान असणार आहे. त्यामूळे मी दूसरीतच सर्व इंग्रजी अक्षरे लहियला शकिले.

आम्हाला तिसरीला राठोड गूरूजी होते ,एकतर ते गावातलेच होते आणि गंमत म्हणजे ते गावातले असल्यामूळे गावात त्यांच्यापेक्षा सगळी मोठी माणसे त्यांना जशी हाक मारायचे तशीच आम्ही मूले पण त्यांना एकेरी नावाने हाक मारायचो त्यांची जास्त भिती वाटायची नाही ,ते नेहमी म्हणत आवडीचा पदार्थ जसा चाटून पूसून खातो त्यासारखे मिळेल ते पूस्तक किंवा कागद ही अगदी आवडीने वाचायला पाहिजे एरवी गावात कागद म्हणजे फक्त दूकानातल्या सामानाची पूडी बांधून आलेला कागद पण आमच्या घरी वर्तमानपत्र यायचे पण त्याला त्यावेळी सगळे पेपर म्हणायचे आणि पेपर वाचायला ,पेपर मागायला लोक यायचे आणि शाळेत गेल्यापासून शाळेतल्या पेपरमूळे हा पेपर हातात धरायला भति वाटायची इतक्या पानावर प्रश्न असले तर सोडवायला खूप दिवस लागतील अशी माझी पेपरबद्दलची धारणा होती पण पेपरमध्ये कधी कधी रंगीत चित्र, गोष्टी ,जाहिरात असतात हे समजायला लागलं,( घरातल्या पेपरचा कव्हर पूस्तकाला घातला तर शाळेतला पेपर सोपा जातो असं मला वाटायचं.)मग घरातले साबण,टूथपेस्ट,आणि सर्वात आवडते कछूआ छाप मच्छर अगरबत्तीच्या पॅकमधले अत्यंत बारिक अक्षरातले सूचनापत्रक ,तो घडी केलेला कागद आई आम्हाला आजिबात द्यायची नाही, (तो कागद विषारी असतो असे आईला वाटायचे ) पण त्यामूळे तो कागद कसंही करून मिळवायची फार उत्सूकता असायची अगदी कचऱ्यातूनही शोधून काढायचे ,त्यावर खूप बारीक अक्षरात आठदहा भाषेत सूचना लिहीलेल्या असायच्या त्यामूळे एकच बाब आठदहा भाषेत असलेली गंमत छान वाटायची सर्वात आधी इंग्रजी अक्षरे त्याशेजारी हिंदी मग मराठी त्यानंतर वाचता न येणाऱ्या,पंजाबी,बंगाली,तामिळ,तेलगू,कन्नड, भाषेतल्या सूचना असायच्या पण मराठी आणि हिंदीच वाचता

यायच्या .poison, विष व त्याठिकाणी असलेले इतर भाषेतील शब्द तेच असणार असा अंदाज घेऊन ते हेच शब्द असावेत असा शब्द ओळखायचा खेळ खेळण्यात मजा यायची .

तसेच आणखी म्हणजे शाळेत आपण अंकलिपी वापरायचो त्यात मराठी अक्षर ओळख सोबतच इंग्रजी रनिंग लिपी व उर्दू लिपीचीही ओळख असलेली अंकलिपी मिळायची त्यामूळे उत्सूकतेपोटी इंग्रजीचे कर्सवि लेखन करत होते ते शिकायला खूप वर्ष लागले आणि उर्दू मधले अलिफ ,बे,पे,से,टे सूद्धा यायला लागले उर्दूमधले एक ते दहा अंक मला लिहायला ,वाचायला येतात ऊर्दू मध्ये सगळेच अक्षर एकसारखे वाटतात फक्त टिंबांचा फरक असतो त्यामूळे खूप सोपी असली तरी अक्षरातील सारखेपणामूळे मी खूप गोंधळात पडले आणि उर्दू लिपी लेखन वाचनात मागे पडले मात्र अगदी शूद्ध उर्दूही मला समजते बोलता व ऐकता येते.

परदेशी रॉक म्यूझिक ऐकायची आवड निर्माण झाली ती रिकी मार्टीनमूळे ,मलावाटते कोणत्या तरी फूटबॉल वर्ल्डकपवेळी बहूधा कप ऑफ लाईफ खूप गाजले होते आणि ते गाणे मला फार आवडले होते पण तो नेमका काय गातोय हे समजत नव्हते ,त्यामूळे तो काय गातोय हे कसं समजेल त्याच्या मागे लागले,आपण पूस्तकात वाचतो त्यापेक्षा गाण्यातली इंग्रजी कठीण वाटायची , मराठी सारखे इंग्रजीचे स्त्रोत फारच कमी म्हणजे अगदी पाठ्यपूस्तक व इंग्रजी शिक्षक सोडले तर शिकण्याची संधी फारच कमी असायच्या त्यामूळे सगळी भिस्त शिक्षकांवर ,जितके चांगले इंग्रजी शिक्षक तितकीच इंग्रजीपर्यंत आपली धाव ,पण इंटरनेट आल्यापासून शिकण्याचे स्त्रोत व संधी वाढलेले आहेत त्यामूळे आता मनात येइल ते सर्व शकिता येतं ,या रॉक च्या वेडापायी इंग्रजीव्यतिरिक्त इतर भाषाही ओळखीच्या झाल्या कप ऑफ लाईफ मध्ये un, dos, tres म्हणजे एक दोन तीन अशी स्पॅनिश भाषाही आहे आणि माझ्यासाठी स्पॅनिश भाषा म्हणजे एनरिक इग्लेशियस चे गाणे असा आहे –पहिल्यांदा Bilamos,त्यानंतर ,Hero मग हळूहळू सर्व च गाणी आवडायला लागली पण पून्हा तेच ऐकायला छान वाटते पण समजत काही नाही, कितीही वेळा ऐकलं तरी, मग गेल्या पाचसहा वर्षात गूगलगूरूजींची मदत घेतली त्यामूळे एनरिक अगदी तोंडपाठ झाल्यासारखाच आहे .अगदी गंमत म्हणून एखादे वाक्य कोणत्या भाषेत कसे लिहीले वाचले जाते हे गूगल ट्रान्सलेटवरून सहज शक्य आहे.मी नेटवर फेसबूकवर,काही इंग्रजी चार्ट सापडले तर जवळपास रोजच आपल्या वेध slack वर शेयर करत असते

बहुनि मे व्यतितानी जन्मानि तव चार्जून (भगव्दि्गता,अध्याय 4,श्लोक–5),अर्थात खूप मे महिने व्यतीत झाले आणि तेव्हा तूझा जन्म चार जून ला झाला,मी लहान असताना गीतेतील श्लोकाचा असा अर्थ लावला होता .पण नंतर लक्षात येऊ लागले की मला वाचता येणारी ती भाषा मराठी लिपीतील आहे पण भाषा वेगळीच आहे ,भगव्दि्गता जशी आहे तशी – हा भलामोठा ग्रंथ रोज पाहून ,वाचून ती संस्कृत भाषा आहे हे समजायला लागले, संस्कृत भाषा वाचता येते पण समजत नाही म्हणून मिळेल तिथे, टीव्ही,पूस्तक,पेपर सगळीकडे शोध सूरू झाला आणि दहावीपर्यंत माझ्याकडे संस्कृत कात्रणांचा खूप मोठा संग्रह तयार झाला .संस्कृत ची कधी गरज पडत नाही,कूठे व्यवहारात उपयोग नाही, आणि शाळेत शिकायला नव्हती त्यामूळे फक्त आवडीपूरते भाषेचे स्वरूप राहिले व जाणीवपूर्वक भाषा शिकायची राहून गेली .

सोलापूरमध्ये डॉ द्वारकानाथ कोटणीसांच्या घरात (सध्या स्मारक) माझ्या मैत्रिणीचे सासरे चिनी भाषेचे वर्ग चालवतात ,मी सोलापूरमध्ये राहायला आले की त्यांच्याकडून चिनी भाषा शिकून घेणार आहे, आणि संधी मिळाली तर अरबी भाषाही शिकणार आहे.

या भाषा तर असतातच पण आपण लहान असताना आपली सर्वांची कोडवर्डची पण भाषा असते उदा.च ची भाषा ,म ची भाषा जी फक्त विशेष कारणांसाठीच वापरायचो आपण.माझ्या घरात अजूनही एक गोष्ट कायम आहे ,बाबांच्या खोलीत एकाच ठिकाणी पूर्वीची जूनी व नवीन आणलेली भगव्दि्गता –जशी आहे तशी, मामासाहेब दांडेकरांची ज्ञानेश्वरी ,बायबल, हदीस, कूराण,ऑक्सफर्ड अडव्हॉन्स लर्नर्स डिक्शनरी, ऑक्सफर्ड कन्साईज डिक्शनरी,मनाचे श्लोक,एकाच ठिकाणी एकाच रांगेत ठेवलेले असतात , ❊बाबा नेहमी म्हणतात हे सगळे ग्रंथ म्हातारपणी वाचायचे नसतात जीवन जगून झाल्यानंतर मरणाची वाट पाहण्यात वेळ जात नाही म्हणून ही ग्रंथसंपदा आपलीशी करायची नसते ,तर अगदी लहानपणी पासून मूलांना वाचायला दिली तर त्यातून घेतलेले काही शहाणपण त्यांना आयूष्यभर उपयोगी पडेल.

गोदावरी राठोड
शिक्षण विस्तार अधिकारी
जिल्हा परिषद सोलापूर

# कडक भाकरी

स्वाती स्वामी



माझा लेसन उत्कृष्ट होण्या पाठीमागे एक दिवसाचा सराव नसून मी आल्यापासून मुलांसोबत घालवलेला प्रत्येक क्षण होता माझा त्यांच्यावरील व त्यांचा माझ्यावरील विश्वास व प्रेम होते आज मी जेव्हा शाळा भेटीला वर्गात जाते तेव्हा असं वाटतं की आपणही यांच्यात मूल होऊन पुन्हा आनंद लुटावा.

मी का लिहीत नव्हते. कारण लिहण्याचा कंटाळा..... मला आठवतं मी दहावीत असताना माझे स्वाध्याय पूर्ण नव्हते.आणि स्वाध्याय पूर्ण असल्याशिवाय रिसीट मिळणारं नव्हते. माझी प्रिय मैत्रीण लता हिला मी दाब देऊन माझ्यासारखे वाकडे तिकडे अक्षरं काढायला लावून स्वाध्याय पूर्ण करून घेतला. माझी अक्षरं मेकअप नसल्यासारखी असतात कारण त्यांना कधी मी वेळ दिलाच नाही... असो आज माळी साहेबांनी सांगितले "पहिली ओळ लिहल्याशिवाय तुम्ही लेखन सुरू करू शकत नाही"

आज ती पहिली वेळ लिहीत आहे 12 जुलै 2020 स्वानुभव लेखन वेध कार्यशाळा

हो. आजपासून मी लिहिणार

माझ्यासाठी लिहिणार. आठवणार. साठवणार. रवंथ करणार

गणित विषयाला घाबरणारी मी आर्ट साइड घेण्यामागे हे एक कारण. दोन्ही भाऊ इंजिनियर,बहीण डॉक्टर.आणि मी न ठरविता झालेली टीचर शिक्षणसेवक म्हणून मोहोळ तालुक्यात जि प शाळा नरखेड येथे जॉईन झाले शाळेला नवीन टीचर.. टिचरला नवीन शाळा.. सर्वांनाच कुतूहल आणि कौतुक.सर्वात लहान त्यामुळे सर्वांची लाडकी.दुसरीचा वर्ग मिळाला होता. चिमुकल्यांच्या प्रेमाने भारावून गेले होते. त्यात आमच्या HM सरांचा नातू टिल्ल्या माझ्या वर्गात त्यामुळे मी म्हणेल ती पूर्वदिशा. कारण मला नाराज करणं म्हणजे टिल्याला नाराज करण्यासारखं होतं जे HM सरांना(आजोबांना)परवडणारं नव्हतं.

गप्पागोष्टींचा तास होता मम्मी पप्पांच्या भांडणापासून ते आजी आजोबा कसे लाड करतात हे सांगण्यासाठी सगळी चिमणी पाखरं चिव चिव करत होती. इतक्यात वर्गात एक चष्मा घातलेल्या बाई आल्या ज्यांना मी ओळखलं नाही.वर्षा मला हळू आवाजात काहीतरी सांगत होती पण ऐकू आलं नाही. तेवढ्यात सर्व मुलं त्या बाईना एकसाथ नमस्ते म्हणाली मग लक्षात आलं या कोणतरी अधिकारी असाव्या. आणि मग मी त्यांना नमस्कार केला.(तोपर्यंत गाडी स्टेशनवरून सुटली होती) नवीन शाळेत नवीन टिचरचे नऊ दिवस संपले होते.ते आता लक्षात आलं. थोड्यावेळाने त्या शाळेतून गेल्या. आणि HM यांनी स्टाफ मिटिंग बोलावली. "केंद्रप्रमुख होत्या त्या.... तुम्ही ओळखले नाही म्हणाल्या.."HM बोलले. मी त्यांना प्रथमच पाहिलं होतं मला कसं माहीत असणार मी सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. त्यावेळी गट संमेलन असायचे ते आमच्या शाळेत घेण्याचे नियोजन करण्यासाठी त्या आल्या होत्या. HM यांनी प्रत्येकाला एक –एक जबाबदारी सोपवली. माझ्याकडे इंग्रजी



लेसन व केंद्रातील सर्व शिक्षकांची पाणी पिण्याची सोय ही जबाबदारी होती. हे ऐकून डोळ्यात पाणी घेऊन मी वर्गात परतले. नवीन गाव ओळखीचे कोणी नाही.....पाण्याची सोय कशी करावी? वर्षाने माझ्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्ह ओळखला आणि म्हणाली टीचर मला चावी द्या.सकाळी सगळं पाणी भरून ठेवते. मी म्हटलं तू कशी भरणार एवढी मोठी स्टीलची टाकी? ती म्हणाली मी तायडीला सांगते. मला वाटलं हिच्या घरी कुणीतरी तायडी म्हणजे मोठी मुलगी आहे ती मदत करेल.मला दुसरा पर्याय नव्हता मी वर्षाकडे चावी दिली. आणि इंग्रजी लेसन घेण्यासाठी HM कडे एक अट ठेवली. मला माझ्या वर्गातील सर्व मुलांना शूज आणि टाय हवा आहे. तसा टिल्यानेही हट्ट धरला. HM ने लगेच पैसे काढून दिले.आणखी पैसे लागणार होते पण माझी पहिली पेमेंट होण्यासाठी अजुन उशीर होता. मग माझ्या वडिलांनीही पैसे दिले.. माझी लेक सर्वांसमोर लेसन घेणार म्हणून त्यांना अभिमान वाटत असावा.

सकाळी वर्गात येऊन पाहते तर काय वर्ग अगदी चकाचक,स्वच्छ झाडलेला, समोर सडा रांगोळी, पिण्याच्या पाण्याची टाकी भरलेली. वर्षा मला पाहताच धावत पळत आली... "टीचर टीचर आम्ही सगळं केलं तायडी गावाला गेलती" होय वर्गातील सर्व चिमुकल्यानी हे सगळं केलं होतं माझ्यासाठी. त्यांच्याकडील छोट्या छोट्या बाटल्यांनी एवढी मोठी टाकी भरली होती. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मन भरून आलं होतं. तेंव्हा पासून वर्षा वर्गाची मिनी टीचर झाली. सर्व कामात पुढाकार, धाडसाने निर्णय घेणारी. सर्वांना एकत्रित ठेवण्याची जादू तिला येत होती तेंव्हापासून माझ्या वर्गाची चावी माझ्याकडे कधीच नव्हती. इंग्रजी लेसनही उत्कृष्ट झाला.टाय व शूज घालून माझी आधीच स्मार्ट असणारी लेकरं अजूनच स्मार्ट दिसू लागली. एक दिवसाचा सराव तरीही लेसन उत्कृष्ट झाला. केंद्रप्रमुख व सर्व केंद्रातील शिक्षकांकडून शाबासकी मिळाली. आता मला चांगला आत्मविश्वास आला होता. या एका लेसनने केंद्रात पॉप्युलर केलं होतं. केंद्रप्रमुखही प्रत्येक कामासाठी स्वाती.. स्वाती करत होते. त्या दिवसानंतर चार दिवसातच सम्पूर्ण शाळेतील मुलं टाय आणि शूज मध्ये दिसू लागली.

एक गोष्ट माझ्या लक्षात आली माझा लेसन उत्कृष्ट होण्या पाठीमागे एक दिवसाचा सराव नसून मी आल्यापासून मुलांसोबत घालवलेला प्रत्येक क्षण होता माझा त्यांच्यावरील व त्यांचा माझ्यावरील विश्वास व प्रेम होते आज मी जेव्हा शाळा भेटीला  वर्गात जाते तेव्हा असं वाटतं की आपणही यांच्यात मूल होऊन पुन्हा आनंद लुटावा. एक– एक वर्ष करत कधी ही चिमुरडी चौथीला आली समजलंच नाही.स्नेहल आणि अक्षय या दोघांसाठी मला जास्त मेहनत घ्यावी लागली नाही कारण त्या दोघांचेही पालक शिक्षक होते.  त्यावेळी वर्गात एका कोपऱ्यात अगदी काडीपैलवान असा एक मुलगा बसायचा गजानन मी आल्यापासून त्याचे निरीक्षण करत होते त्यांने आपली जागा कधी सोडली नाही आणि तो जास्त बोलत नसायचा. एकदा त्याला मी जवळ बोलवुन घेतलं  त्याला म्हटलं "तू रोज तिथेच का बसतो ?पुढे ये... इथं बस.तसं त्यानं डोळे मिचकावत "हो टीचर "म्हणतं लगेच आपलं दप्तर उचललं आणि पुढे येऊन बसला त्याच्या या लगेच केलेल्या कृतीचा मला फार कौतुक वाटलं.त्या दिवशी त्याच्या चेहऱ्यावर वेगळाच आत्मविश्वास चमकून गेला.हळूहळू त्याचं वर्गातल बोलण वाढत होतं.हळूहळू तो वर्गात मिक्स होऊ लागला प्रश्नांची उत्तरे देऊ लागला तेव्हा माझ्या लक्षात आले की याची ग्रास्पिंग पावर जबरदस्त आहे.  प्रत्येक गोष्टीत त्याचा पुढाकार वाढत चालला त्यावेळी धाडसी शिरीष कुमार हा पाठ  मी नाट्यीकरणातुन  घेत होते. त्यावेळी गजाननने शिरीष कुमार ची हुबेहुब भूमिका साकारली होती हिम्मत असेल तर माझ्यावर गोळी झाड असे म्हणताना त्याची इंग्रजांविरुद्ध असलेली चीड त्याच्या चेहऱ्यावर दिसायची.त्यावेळी इंग्लिश स्कुल नरखेड या माध्यमिक शाळेच्या वतीने वक्तृत्व व कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धेसाठी गजाननला शिरीषकुमार हा विषय देवून पाठवले. उद्देश

फक्त त्याचं स्टेज डेअरिंग वाढावं इतकंच होतं. पण या पट्ट्याने द्वितीय क्रमांक पटकावला. तेंव्हा पासून गजाननाने पाठीमागे वळून पाहिलं नाही.त्यानंतर केंद्रात होणाऱ्या प्रत्येक स्पर्धेत त्यानं यश मिळवलं.

शांत दिसणारा, कधी न बोलणारा गजानन...... अजब आहे ना.. मीच नाहीतर सर्व शाळा त्याचं कौतुक करू लागली. मी फक्त त्याला जवळ बोलवून पुढे बसवलं. जे काही केलं त्यानं त्याच्या जिद्दीने आणि कष्टाने. टिचरचं माझ्याकडे लक्ष आहे .या एका जाणिवेने त्याच्यातील ती जिद्द बहुतेक बाहेर आली असावी का ?

आणखी एक आनंदाची गोष्ट म्हणजे स्नेहल आणि अक्षय या दोघांनीही शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात द्वितीय क्रमांक मिळवला.शाळेला खूप मोठं यश मिळाले होते. मुख्याध्यापकापासून ते सर्व स्टाफ शिष्यवृत्तीसाठी एकजुटीने मेहनत घ्यायचे. अर्थातच नरखेड शाळेची ती परंपरा होती.पण.....आमची शाळा चौथीपर्यंतच होती. आता ही सगळी मुलं हायस्कुल ला जाणार होती. तो क्षण माझ्यासाठी खूपच दुःखाचा होता. खुप काही शिकवलं होतं मला या लेकरांनी. 5वीला जाऊनही मधल्या सुट्टीत सगळी लेकरं मला भेटायला यायची.

पुन्हा नवीन इनिंगला सुरुवात झाली.वर्गात शुभम चौधरीने एन्ट्री केली आणि वर्गाचं वातावरणच बदलुन गेलं. खरं तर त्याचे वडील त्याला मोहोळला इंग्लिश मिडीयम स्कुल पाठवणार होते. पण वर्गातील मुलं गावात जावून अशी काय चिव–चिव करू लागली होती.की गावात वर्गाची हवाच झाली होती.पालकांनी नाव दाखल करण्यासाठी गर्दी केली. शुभम, प्रथमेश,बंटी, प्रज्वल, प्रशांत, सूरज,वैभव, रेश्मा ही गँग म्हणजे वर्गात नुस्ती धमालच. त्यावेळी माझ्या लग्नात वऱ्हाडी मंडळी म्हणजे माझ्या वर्गातली सगळी चिमुकली, पालक ग्रामस्थ आणि स्टाफ.. लग्नात पुढारी... सेलिब्रिटी आल्यानंतर लग्नसमारंभाची शान वाढते असे म्हणतात. पण माझ्या लग्नाची शान ही माझीसगळी चिमुकली.... "टीचरचं लग्न....टीचरचं लग्न"म्हणून उड्या मारत होती. माझ्या यांनाही याचं खुप कौतुक वाटलं. मी सर्वांची ओळख करून देत होते हा गज्जू ही बंटी....एक– एक दिवस सोनेरी आठवण देत गेला. माझा वर्ग माझ्यासाठी जीव की प्राण होता.

सगळ्यात आश्चर्यकारक म्हणजे या मुलांच्या पालकांचा माझ्यावर इतका विश्वास की माझ्याकडे दहा– दहा दिवस राहायला पाठवायचे. नरखेड मध्ये पाच वर्षे कशी गेली लक्षातच आलं नाही. पण या पाच वर्षांनी मला जे दिलं ते मी शब्दात व्यक्त करू शकत नाही.

स्वाती स्वामी

शिक्षण विस्तार अधिकारी

जि.प.सोलापूर

# माझा जीवन प्रवास

भाऊसाहेब काकडे



"आपण कसे शिकलो?, कसे शिकत आहोत? , हे ज्यांना कळते, तेच इतरांना शिकण्याचे मार्ग सुचवू  शकतात. " ह्या मा नंदकुमार साहेबांच्या विधानाने सर्व वेधकऱ्यांना लिहिण्यास बळ व दिशा दिली. प्रत्येक " विचारावर विचार करण्याचे कौशल्ये " शिकवल्यामुळे माझे सहकारी खूपच प्रभावीपणे आपल्या विचारांना शब्दांची वाट करून देवू लागले.

**मध्यम शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. वडील जुनी चौथी खाजगी शाळेत शिकलेले, आई म्हणायला निरक्षर होती पण तिचे व्यवहारी गणित एकदम भारी होते.पहिलीत असतांना १९७२ चा दुष्काळ पडला. दुष्काळात गावातील सर्व लोकांसोबत आम्ही पण बडींगच्या जायचो. उन्हाच्या कहारात अनवाणी छोट्या टोपल्याने माती बडींगवर टाकायचो. तळपणारा सूर्य आग ओकायचा. दिवसाला एक ब्रास वर्किंग व्हायला पाहिजे, यासाठी धावत–पळत मातीकाम करणारे आई वडील डोळ्यासमोर उभे राहतात. आम्ही दुपारी सर्व गावातील मजूर जेवणासाठी दूरवर झाडाच्या आसऱ्याने जेवणासाठी जायचो. जेवणात निलो ज्वारी, हुलगे, बरबडा यांच्या भाकरी, पिठले, बाजरीच्या खळगुट, फांदाची भाजी, हिरव्या मिरचीचा ठेचा असे मेनू असायचे. आठवड्याला पोषण आहारात कधी गूळ मक्याची तर कधी साखर मक्याची सुकडी प्रति मानशी एक छोटा डबा याप्रमाणे मिळायची. सुकडीसाठी खूप मारामार व्हायची. सुकडी म्हणजे त्यावेळचे पक्वान्न होते. आजही सुकडीचे नाव जरी घेतले तर त्याची चव आठवते. पिण्याचे पाणी कुठल्यातरी साठवणीच्या विहिरीतून बैलगाडीवर लोखंडी ड्रम मधून यायचे. एका कुटुंबाला मोजून कळशीभर पाणी मिळायचे. पाण्यात छोटे छोटे जीवजंतू असायचे. पाणी धोतराने गाळून प्यायचो.पण कधी कोणी आजारी पडले नाही याचे आज खूप नवल वाटते.**

**दुष्काळी बडींग काम आता सर्वांच्या अंगवळणी पडले होते. सायंकाळ झाली कि, चार ते पाच किलोमीटर दुरवरुन गावी डोक्यावर टोपले, टिकास, फावडे घेऊन घरी जायचो. रस्त्याने स्वयंपाकासाठी काटक्या, गोवऱ्या गोळा करून घेऊन जायच. दिवसभर मातीकाम करुन आई थकायची. घरी आल्यावर**

आडावरून रात्री चार भांडे पाणी आणायचे. सर्वांनी हात–पाय धुवून चहा घ्यायचा. आई स्वयंपाक करायची, तोपर्यंत आम्ही थकून उपाशी झोपायचो. स्वयंपाक झाल्यावर आई आम्हाला झोपेतून उठून जेवू घालायची. सकाळी पहाटे कोंबड्याने बाग दिला की सर्व गाव आडावर पाणी पोहऱ्याने शेंदून आणायचं. दिवस उगण्या अगोदर स्वयंपाक करून परत कामावर जाणे हा नित्यक्रम होता.

मे महिन्यात ऊन खूप कळकळ करत होते. वावटळीने जोर धरला होता. कुणाच्या घरावरील छताचे पत्रे उडत होती, अनेक कुटुंबे बेघर व्हायची. या बेघरांना गावातील माणुसकीचा ओलावा असणारी कामगार त्यांना आधार द्यायची. खर तर दुष्काळ होता अन्नाचा. माणुसकीचा मात्र सुकाळ होता. मे महिन्याच्या शेवटी वावटळीने मात्र कहर घातला होता. आकाशात ढग गरगरत होती, उकाडा वाढला होता. सकाळी पावश्या पक्षी मंजुळ आवाजात पेरते व्हा म्हणत होता. कामावरील प्रत्येकजण पाऊस पडणार म्हणून आनंदात होता. दुपारची वेळ होती आकाशात काळेभोर ढग भरून आले होते. सोसाट्याचा वारा सुरु झाला होता. सर्वजण झाडाच्या आसऱ्याला जमा झाली होती. विजा कडाडत पावसाच्या सरी आकाशात झेपावत होत्या. आम्ही सगळे देवाचे नावाचा जयजयकार करत होतो. वाऱ्याचा सुंसू आवाजासह पावसाने आम्हाला झोडपले होते. पाऊस एवढा होता की, शेजारचे काही दिसत नव्हते. पाऊस पडल्याचा आनंदापेक्षा आता पावसामुळे प्राणहानी होती कि काय याची सर्वांना धडकी भरली होती.तासाभरात सगळीकडे पाणीच पाणी झाले होते. पाऊस ओसरला होता. पावसाने तासभर झोडपून काढले होते. आता सर्वाना हुडहुडी भरली होती. नदी,नाले तुडूंब भरून वाहत होती. आन्ही सर्वजण नदी नाले ओलांडून गाव जवळ केले. गावात आलो तर काय गावातील अनेक गुरे वीज पडून मृतू पडली होती. सगळ गाव या जनावारांजवळ जमा झाले होते. ज्यांची जनावरे दगावली ते हाय मोकलून रडत होती. गावातील सर्वजण त्यांना सावरत त्या जनावरांना मुठ माती देवून गावात परतली होती. पाऊस पडूनही गावात मात्र शोककळा पसरली होती.


भाऊसाहेब काकडे

केंद्रप्रमुख

केंद्र:– राजूर ता:– भोकरदन जि जालना

भ्रमणध्वनी ८९९९६३९५२१

# असा माझा प्रवास

नीता सोनवणे



2012ला माझी धुळे जिल्हयात शिरपूर तालुक्यात बदली झाली आणि तेथून मला माझी स्वतःची ओळख खऱ्या अर्थी होऊ लागली .विस्कटलेले मन व विचार यांना सावरण्याची सर्वात पहिली संधी म्हणजे साताऱ्याला मी प्रतिभाताई व नामा सरांना ऐकले .आपण ज्या पदावर आहोत ते केवळ बेगडी पद नसून स्वतःला सिद्ध करण्याची ही संधी आहे याची जाणीव झाली.

माझं बालपण तस चारचौघा सारखच होतं . आई वडील दोघे नोकरदार व कडक शिस्तीचे होते . १९८९ला मी एसएससी ७० गुणांनी पास झाले आणि तिथून माझ्या मनात जीवनात काहीतरी करण्याची उर्मी तरंगासमान लहरु लागली .एका अशा समाजात मी जन्मले होते जी थे मुलीच्या इच्छा आकांक्षांना काहीही किंमत नसते .. त्यामुळे नोकरदार पालक असूनही सामाजिक दडपणामुळे माझे १६ व्या वर्षी लग्न झाले व आता आपले जीवन चौकटीतच जाणार असे वाटून जड मनाने मी वास्तवाचा स्वीकार केला . मनात सल टोचतच राहिल.... पण म्हणतात ना जीथ एक दरवाजा बंद होतो तीथे लगेच आशेची अनेक मुक्त द्वारे निर्माण होतात ... त्याप्रमाणे माझ्या जोडीदाराने मला दिलेल्या भक्कम पाठबळामुळे मी डीएड़ बीएड् एमएड् पीएचडी एलएलबी असा शिक्षणाचा व प्राथमिक माध्यमिक शिक्षिका विस्तार अधिकारी असा अखंड तेजोमय प्रवास करत राहीले .जोडीला काही दुःखे कौटुंबिक जबाबदाऱ्या गृहिणी पद हे होते.

तालुक्याच्या गावी नामांकीत संस्थेत मी शहरी / ग्रामीण भागात मी १६ वर्ष प्राथमिक व माध्यमिक शिक्षिका म्हणून काम केले . शहरात सुजाण पालकांची मुले आमच्या शाळेत होती . मला त्या नोकरीत फारशी आव्हाने जाणवलीच नाहीत , एक कंम्फर्ट झोनमधे मी होती . मला माहित असलेले माझे २००हुन अधिक विद्यार्थी शिक्षक ५० डॉक्टर ५० इंजिनिअर व ३तरही अनेक मुले मुली वेगवेगळ्या क्षेत्रात आज नोकरी करत आहेत ही माझी मी जमवलेली संपत्ती होय

सगळ कस अलबेल असतांना मेंदूत मात्र सदैव आपण काहीतरी वेगळे केले पाहिजे हा किडा वळवळत असायचा . शाळेत रोज दुपारी मधल्या सुटीत वर्तमानपत्र मी वाचत असे . आणि अशातच नंदुरबार जिल्हा परिषदेची विस्तार अधिकारी पदाची जाहीरात दिसली व अर्ज केला . खाजगी शाळेत असल्याने सोळा वर्षात केवळ एक दोन वेळा डोके मोजणी वगळता मला या पदाचे काम जबाबदाऱ्या किंवा इतर कोणतीच माहिती

नव्हती ... दोन चार स्टे अडीअडचणी हो ना क२त अखेर मी १००९ साली विस्तार अधिकारी बनले .आपण काहीतरी खूपच मोठ झालोय अशी हवापन डोक्यात शिरली .. सुरुवातीची ३ /४ वर्ष मी केवळ गटांगळ्या खात राहीले .. पश्चात्ताप करत राहीले की मला या नोकरीत येण्याची दुर्बूदधी का सुचली ?कारण राजकारणी प्रशासन व संघटना या चक्रव्यूहात मी इतकी भांबावुन गेली की सारं नकोस झाले .

२०१२ला माझी धुळे जिल्हयात शिरपूर तालुक्यात बदली झाली आणि तेथून मला माझी स्वत:ची ओळख खऱ्या अर्थी होऊ लागली .विस्कटलेले मन व विचार यांना सावरण्याची सर्वात पहिली संधी म्हणजे साताऱ्याला मी प्रतिभाताई व नामा सरांना ऐकले .आपण ज्या पदावर आहोत ते केवळ बेगडी पद नसून स्वत:ला सिद्ध करण्याची ही संधी आहे याची जाणीव कुमठेबीटचे काम ताईच अनुभव कथन व नामा सरांच्या विचार मांडण्याच्या सहजतेतुन जाणवलं . मनात एक वह्मी चेतला .तोडकं मोडकं काम सुरु झालं .बीट मधे काम करतांना शिक्षकांच्या कामातील अडथळे व बालकाच्या शिकण्यातील अडसर समजु लागले . आणि माझ्या नकळत मी आदिवासी पाडयांवर कधी लेकरांच्या प्रेमात पडले कळलेच नाही . याच काळात अजून एक घटना घडली की जीला मी कधीही विसरु शकणार नाही मा नंदकुमार सरांच्या प्रेरणेतून जिल्हास्तरीय शिक्षण परिषद जिल्हयाच्या ठिकाणी झाली . त्यात मी मा प्रविणदांना पाहिल्यांदा ऐकले आणि विस्तार अधिकारी पदावरील दिव्यत्व मी अनुभवल . त्याच परिषदेत शिक्षण क्षेत्रात परिस म्हणुन काम करणारे निश्चयाचे महामेरू मा नंदकुमार सर मी पाहिल्यांदा बघितलेत .... महत्वाचे म्हणजे जिल्ह्यातून विस्तार अधिकारी गटातून सादरीकरणाची संधीही मला मिळाली . या परिषदेत मला साहेबांची शाबासी मिळाली आणि तेथून मात्र मी मागे फिरून बधितलेच नाही

सुरुवातीला विस्कटलेल्या कामात हळूहळू वस्तुनिष्ठता येऊ लागली. कुणी आपल्याला चांगले म्हणावे म्हणुन नव्हे तर स्वत:ला छान वाटावे म्हणून काम करत राहिले करत आहे आजवरची ठळक कामे –

१) शिक्षक व अधिकारी दरी नष्ट व्हावी व चांगल्या कामातुन प्रेरणा घेता यावी याकरता कुमठे च्या शाळा त्र्यंबकेश्वर जवळची केशव सरांची हिवाळी पाडा शाळा व इतरही ठिकाणी शैक्षणिक दौरे केलेत व आपणही काम करु शकतो ही जाणीव निर्माण झाली .

२ ) सतत ३ वर्षापासून स्थलांतरीत बालका करता काम सुरू आहे . हमी कार्ड देणे मुले जेथे जातील तेथे प्रवाहात यावेत याकरता काम ... शाळा सुंदर व गुणवत्तापूर्ण शिक्षण याकरता काम ,गाव जत्रात स्टॉल लावणे माता मेळावे शाव्यस सक्षमीकरण अशी सदैव धावपळ सुरू आहे .

३ ) बालरक्षक चळवळीच्या माध्यमातून शाळाबाह्य मुले प्रवाहात जोडलीत... गुहाडापाडा या वस्ती व२ची सुमारे २८ मले प्रवाहात आलीत ४ ) बोलीभाषे करता कार्यशाळा हस्तलिखित निर्मिती ५ ) आनंददायी रचनात्मक प्रकल्प १०० % शाळांत फुललेल्या परसबागा व १ली / २री करता वाचन लेखन यावर चांगले काम झाले . बीट मधून सुमारे ३० शाळांत १ली व दुसरीची मुले किमान १ क्षमता पूर्ण केलेली आहेत .८ शाळा १००

% गुणवत्ता प्राप्त किमान क्षमता पूर्ण केलेल्या आहेत . शिक्षक सदैव वेगवेगळ्या कृती घेत असतात. सहजतेने मलाही सांगतात .. खूप समाधान वाटते . खूपदा अडथळेही निर्माण होतात निर्माण केले जातात पण त्या सर्व तून पार जाण्याचे कौशल्य आता जमू लागले आहे .

दरम्यान वेध परिवार व साहेबांची प्रेरणा मरगळीला दुर सारून फुंकर मारत असते व कामाची गती वाढते . या सर्व प्रवासात माझ्या अंगाच्या साहेबपणाच्या शृंखला कधी गळून पडल्या समजलेच नाही असा हा प्रवास ज्याने मी घडले व घडतच राहील . शिकत राहणे ही प्रक्रीयाच मुळात खूप अमंददायी आहे . शाळेच्या आवारात शिरतांना मला बिलगणारी चिमुकली लेकरं जेव्हा सोनोन्या म्यांडम म्हणून मला बिलगतात तेव्हा मला मी खूप धनवान आहे असा विचार येतो... मुल गातात .. “गाते हे है आज गीत हम , मंजिलो को ढुंढते हुए” त्या वेळी बाकी काही नाही पण यातून विचारी पिढी निर्माण होत आहे याचे समाधान मिळते .

नीता मुरलीधर सोनवणे

विस्तार अधिकारी (शिक्षण)

पंचायत समिती शिरपूर ता शिरपूर जि धुळे

फो न 9403918984, 9404812348

Email Id:- drneeta1119@gmail.com

# माझे शिकणे आणि शिकवणे

तात्यासाहेब मेघारे



माझी सर्व मुले धीटपणे बोलु शकली पाहिजेत , वयोगट लहान असला तरी अभिव्यक्ती झाली पाहिजेत , त्यांच्या मनातील शाळेची व माझ्या विषयीची संपूर्ण भीती नाहीशी व्हायला पाहिजे, त्यांनी मला खूप काही विचारले पाहिजे , तरच माझा पुढचा शैक्षणिक प्रवास छान होणार होता आणि मी ठरवलेल्या गोष्टीत मला यश मिळत होतं .

**१९८४ चे माझे ७वी चे वर्ष मी विसरू शकत नाही . जिल्हा परिषद माध्यामिक शाळा धोंडराई ता . गेवराई जिल्हा. बीड चा मी विद्यार्थी. स्कॉलरशीपची परिक्षा दोन महिन्याने आहे म्हणून मी शिकवणी लावली. महिन्याची फीस होती १० रुपये . पहिल्या महिन्यात आनंदाने क्लास केला .पटापट उत्तरे सांगून सरांची शाबासकी मिळवली , सोडवायला दिलेली गणितं सर्वात पहिल्यांदा सरांना दाखवायची घाई ! राईट ! शाब्बास !! , आरे वा ..ऽ ऽ ! असे शब्द ऐकले की कान तृप्त व्हायचे . आजून ज्यांनी सोडवायला सुरुवातच केली नाही त्यांनी वहीतले डोके वर करुन आपल्याकडे आश्चर्याचा कटाक्ष टाकला की आतल्या आत खूपच मस्त वाटायचं !**

**दुसऱ्या महिन्यात हया आनंदावर विरजण पडलं ते घरच्या नकाराने .१० रुपये मिळणार नाहीत , टिवीशन बंद , शाळा सुटल्यावर नेहमीसारखं थेट शेतात आलं पाहिजे , कामात थोडीफार मदत होते , गाईला चारा पाणी होते , गोठ्यातील झाडलोट होते , शिवाय १० रूपये आणि स्कॉलरशीपचे मोठे पुस्तक आपल्याला परवडत नाहीत !वडीलांचे बोलणे खरे होते . कौटुंबिक आर्थिक परिस्थीती हालाखीची होती , शिकवणी वर्गातून तिसऱ्या दिवशी कदमाचा महादू घरी बोलवायला आला , जाधव सरांनी बोलावलं म्हणाला .मी सरांचा आवडता विद्यार्थी झालो होतो ! सरांनी माझं सगळं ऐकुन घेतलं आणि मला सांगीतल , एवढा महिना शिकवणी वर्गात बस , तु अभ्यास करून नक्कीच स्कॉलरशिप परिक्षा पास होशील . मग तुला ३०० रूपये मिळणार. मग त्यातले माझे शिकवणी वर्गाचे फिसचे १० रू मला दे . उरलेले तुझ्या वडीलांजवळ ठेव , त्यांना लगेच लक्षात येईल शिकण्याचा नक्की फायदा होतो . फक्त २ते ३ महिन्यात हे खरे होणार आहे , तुला जिद्दीने अभ्यास करायचा आहे व रोज एवढा महिना घरच्यांचे न ऐकता क्लास ला यायचे आहे .ते पुढे नक्की तुला ८वीत नवीन वहया पुस्तके घेऊन देतील व शाळेत आणि शिकवणी वर्गाला पण नक्की पाठवतील !**

मल्हारी भानुदासराव जाधव सर ! माझ्या बालपणात मला लाभलेला देवमाणूस ! सरांनी सांगील्याप्रमाणेच सगळं घडलं आणि मी शिष्यवृत्तीधारक बनलो .सरांचे १० रुपये आणि बाजारातले पेढा घेऊन सरांच्या रुमवर गेलो तर सरांनी ते १० रुपये पण मलाच बक्षिस देऊन टाकले ! भारीच वाटलं , पुढे शिकलास तर मोठा माणूस होशील , बघ आता येथून पुढे ..... ! मी ७वी स्कॉलरशिपच्या परिक्षेतून बंडखोरपणा आणि आत्मनिर्भरता या दोन्ही गोष्टी जाधव सरांकडून शिकलो त्या वर्षी ! पुढे याच प्रेरणेच्या शिदोरीवर १९८७ ला ७९.७१ % गुण घेऊन १०वी ची परिक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालो !

अवघ्या ५० रुपयावर व एक पत्राची पेटी घेऊन भारावलेल्या अवस्थेत डॉक्टर होण्याचं स्वप्न बाळगून मी औरंगाबादचं देवगीरी कॉलेज गाठलं .आमच्या गावच्या डॉक्टर कटारनवरे साहेबांच्या ओळखीने तीन आठवडे त्यांच्या नातेवाईकाकडे नंदनवन कॉलनीत राहायला व जेवायला मिळाले . पुढे पदमपुरामधील संत तुकाराम वस्तीगृहात गुण कमी असल्यामुळे समावेश होऊ शकला नाही आणि मग माझी धावपळ वाढली .कुटूंबाकडून मदत मिळणार नव्हती , जवळची गेवराई सोडून औरंगाबाद कशासाठी असा आईवडिलांचा सवाल असायचा . गावातली श्रीमंताची मुलं गेलीत तिथे म्हणून हा गेलाय तिथे , आपली परिस्थिती न बघता लोकांच्या आरोळीवर चालणारा मुलगा आहे आपला हे त्यांचे गृहितक .

दै . मराठवाडा चे दिवंगत संपादक आ. कृ वाघमारे यांच्या समाजसेविका पत्नी आशाताई वाघमारे यांना भेटण्याचा सल्ला मला देवगिरी कॉलेज मधून मिळाला . आत्ताच्या तापडीया नाटयगृहाजवळच्या स्व. बाबुराव काळे चौकात एका जुन्या वास्तूत राहात असलेल्या ताईंना माझा वर्गमित्र सुधीर जाधव आणि मी भेटलो . ताईंनी माझं सर्व ऐकून घेतलं आणि मला स्वातंत्र्य सैनिक लाला लक्ष्मीनारायण जयस्वाल यांच्याकडे एक शिफारस पत्र देऊन पाठवले . आणि एकदाची माझी औरंगाबादला राहाण्या खाण्याची सोय मोफत झाली . लालाजींनी मला औरंगपुऱ्यातील संभाजी व्यायामशाळेजवळच्या डॉ. ग .चि . सिमंत अनाथ विदयार्थी वस्तीगृहात सामावून घेतलं ! दोन वर्ष देवगीरी महाविदयालयाने मला खूप काही समृद्ध केले . प्राचार्य सखाराम बागल सर , मराठी विषयाचे प्रा . फ़ मुं शिंदे सर , रसायनशास्त्राचे प्रा. हमीद सर , गणिताचे प्रा .बी.व्ही भोसले सर आणि हमीद सरांचा विदयालंकार कोचींग क्लास माझ्या मनावर खूप मोठा प्रभाव पाडून गेले .सन १९८९ ला ६७.८३ % गुण घेऊन मी १२ वी विज्ञान परिक्षा उत्तीर्ण झालो आणि भंगलेले डॉक्टर होण्याच स्वप्न सोडून देऊन मी नवं स्वप्न बघितले! होय शिक्षक होण्याचं स्वप्न होतं ते . अंबाजोगाईच्या शासकिय अध्यापक विदयालयातून मी सन १९९१ ला विशेष प्राविण्यासह डी.एड. पास झालो आणि ४ ऑगस्ट १९९२ ला जिल्हा परिषद औरंगाबाद मध्ये जिल्हा परिषद प्रा . शाळा झांजर्डी केंद्र ढोरेगाव ता गंगापुर येथे प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झालो . आणि आता माझं शिकणं आणि शिकवणं दोन्ही पण जोरात सुरू झाले.

जिल्हा परिषदेच्या शाळेत अध्यापक म्हणून दाखल व्हायच्या आत आणि डि .एड . चा निकाल लागायच्या आत मला गेवराई च्या महात्मा फुले विदयालय गेवराई या शाळेने माझ्यावर विश्वास व्यक्त करून

नोकरीची संधी दिली .पगार ठरला होता ३०० रूपये . आणि तो आनंदाचा दिवस होता २६ जून . शाळेने मला माझा आवडता विषय गणित ७ वी , ८वी , ९वी आणि १०वी ला पण शिकवण्याची संधी दिली .शाळेतील १० वी च्या त्या बॅचच्या कुमार खेडकर ,सत्संग मुंढे, वंदना कांडेकर आदी मुलांनी अनेक प्रश्न विचारून खरं तर मला आणखी अभ्यासाची आणि पुढे शिकण्याची प्रेरणा दिली .दरम्यान शिक्षक म्हणून ओळख निर्माण झाली आणि माझ्या धोंडराई गावात माझा देखील विद्या अलंकार कोचिंग क्लासेस तयार झाला . छान ट्युशन सुरू झाले . माझा छोटा भाऊ नारायण ( B.E.Civil अभियंता मनपा मुंबई ) यावेळी ८वी ९वीत असावा , त्याच्या सोबत त्याचे वर्गमित्र महादेव गायकवाड ( प्राध्यापक , वैदयक महाविद्यालय औरंगाबाद घाटी ), रामदास बांगर ( एम .डी आता नगर येथे हॉस्पीटल ) अशी बरीच मंडळी होती . मुलांपेक्षा मीच खूप तल्लीन होऊन जायचो गणित शिकवण्यात . मला १५० पैकी १४० गुण मिळाले गणितात आणि बीजगणित व भूमीती दोन्ही पेपरमधे ५ , ५ गुण कमी आल्याची सल मी खूप वेळा ऐकवायचो मुलांना ! मुलं म्हणायची सर आम्ही नक्की आऊट ऑफ घेऊन दाखवू . पण ड गटातील गणीताचा सराव जरा जास्त घ्या ! खूप मजा यायची कलास मध्ये, खूप स्पर्धा आणि चढाओढ चालायची मुलांमध्ये . शिकण्याची इच्छा निर्माण करण्यात मी यशस्वी होतोय याचा माझा मलाच साक्षात्कार घडायचा . पण काही दिवसानं इंग्रजी पण कधी कधी घेत जा सर असा सूर उमटायचा आणि मला जरा धास्ती वाटायची ! इंग्रजी मला जमायचं नाही चांगलं याची कबुली दयायला मन तयार होत नव्हते!पण तरी मी सुरू केलं आणि एकदिवस खूपच गंमत झाली.आजचे डॉ रामदास बांग (एम .डी) यांनी माझा १० वीचा क्लास संपल्यावर मला भेटून विचारलं , सर मला नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेट काढायचं . कुठं मिळतं ते ?. मी क्षणभर विचार केला . माहीत नसूनही माहीत असण्याचा आव आणला. Crime , criminal हे दोन शब्द ऐकण्यात होते , गुन्हेगारीशी संबंधित अशी पुसटशी कल्पना होती .आपलं दुबळं इंग्रजी आणि नॉन क्रिमी लिअर शब्दाच नेमकं मराठी भाषांतराचे अज्ञान लपवत मी बिनधास्त सांगीतले ... .... ! पोलिस स्टेशनला जा ! ! तिथे मिळते . अन् त्यानंतर पुढे काय घडले असेल याची कल्पना आल्यानंतर व ते तिथे मिळत नाही हे त्याला ही आणि नंतर मला ही इतरांनी लक्षात आणून दिल्यानंतर खूप ओशाळल्यासारखे वाटले . कारण कोणत्या सरांनी तुला इथे पाठवले ? आणि काय शिकवतात ते तुम्हाला ? या शिवाय दुसरे कोणतेच प्रश्न तिथे विचारले गेले नसतील याची बोचरी जाणीव मला झाली !

या प्रसंगात माझी मलाच लाज वाटली. माझ्यासाठी हा अविस्मरणीय प्रसंग होता . आपल्या इंग्रजी भाषेच अज्ञान आणि सामान्य ज्ञानाच अथवा अवांतर माहितीचं उणेपण मला खूप मनाला लागल ! आता इंग्रजीत पदवीधर व्हायची मी प्रतिज्ञाच केली . आणि खऱ्या अर्थाने माझं शिकवता शिकवता शिकणं सुरू झालं ! आज ३० वर्षांनी सुद्धा डॉ रामदास बांगर यांच्याशी बोलणं किंवा भेटणं झालं की मला क्रिमी लिअर सर्टीफिकेट आठवतं . शिक्षकाने सतत शिकत राहावे , स्वत:ला अपडेट ठेवत राहावे , मी माहीती घेऊन पुन्हा सांगतो अशी नम्र पणे माहीत नसलेल्या गोष्टीची प्रामाणिक कबुली देता येण्याची सवय अंगी बाणवता

आली पाहिजे . खूप वाचत राहिलं पाहिजे . आपलं सामान्य ज्ञान वाढवत राहिले पाहिजे या सर्व बाबी या प्रसंगाने मला समजल्या. प्रत्येक अध्यापक त्याच्या आयुष्यात आलेल्या विद्यार्थी वर्गाकडून खूप काही शिकत असतो .. ! शिकवता शिकवता शिकण आपसूक सूरू असतं !

दिनांक ४ ऑगस्ट १९९२ ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा झांजर्डी केंद्र ढोरेगाव ता गंगापुर येथून माझ्या जिल्हा परिषद सेवेचा श्रीगणेशा झाला .ढोरेगाव पासून पुर्वेला ८ ते ९ कि मी अंतरावर पुर्वेला झांजर्डी गाव वसलेले आहे .जेमतेम २०० ते २५० लोकवस्तीचं हे गाव .२७ पटसंख्या असलेली १ली ते ४थी पर्यंतची शाळा .एकच वर्ग खोली , समोर व्हरांडा , समोर सुमारे ३० ते ४० उंच निलगीरी वृक्ष , त्याच्या पुढे दगडी बांधकामातील पाण्याची टाकी ,डाव्या बाजुला माळवद रूपी मंदीर . शाळा आणि पाण्याची टाकी यामधून जाणारा रस्ता .जेमतेम दोन गल्ल्याचे गावं ! वारकरी संप्रदायाचा वारसा जगणारे , वयाची पन्नाशी उलटलेले , अंगावर नेहरू शर्ट , धोतर , डोक्यावर गांधी टोपी , खांद्यावर उपरणे , कपाळावर उभा आष्टीगंध, गळ्यात तुळशीची माळ , डोळ्यावर चष्मा , पिळदार शरीरयष्टी असलेले आसलेले आदरणीय तुकाराम देवराव नवले हे या शाळेचे मुख्याध्यापक . माझ्या जाण्याने त्यांना खूप आनंद झाला . शेजारच्या कोडापूर वस्तीवरून त्यांचे सायकल ने येणे जाणे , त्यांचा वक्तशीरपणा , मुलांमध्ये त्यांच्याबद्दलचा दरारा , त्यांची मुलांना वाटणारी भीती , या सर्व बाबी जेमतेम आठवडा भरात माझ्या निरिक्षणात आल्या .१ते ४ ची सर्व मुले साक्षर व्हावीत व त्यांना अंकगणितातल्या ४ मुलभूत क्रिया याव्यात हे दोन उद्दिष्टे गुरुजींनी निर्धारीत केलेली . गुरुजींनी ३री ची ७ व ४थी ची ६ अशी १३ मुले व दोन वर्ग मला दिली आणि गावातच भिमराज पाटील करपे यांच्या ३ खणाच्या खोलीत माझं बस्ताण बसवलं . झपाटून अध्यापनाच काम करायचं , मुलांचा सर्वांगिण विकास , मुलांना आनंदी ठेवण , त्यांच्यात रममाण होणं , अशी डी एड ला ऐकलेली व शिकलेली संपुर्ण माहितीचे उपयोजन करण्याची मला पण खूप घाई होती !



आता ३ री, ४थी चे वर्ग बाहेर झाडाखाली भरवायला मी सुरुवात केली . सुरुवातीला परिचय सांगणे गप्पा , खेळ , गाणी , आवडीनिवडी , सांगणे , छंद जाणून घेणे यात मी आठवडा घातला , मुलांच्या आवडीचे खेळ , कबड्डी , तिथला आवडीचा खेळ कुस्ती , पोरींच लंगडी , शिवणा पाणी , मग दुपारून गाणे , शाळेचे

वातावरण बदलून गेलं , भीती नाहीसी झाली .१०० % उपस्थितीचे उद्दिष्ट पुर्णत्वाला गेले आणि नवीन सर शाळेला आलेत ही गोष्ट प्रत्येक घरात पोहचली . मला विद्यार्थ्यांचा आणि त्यांना माझा चांगलाच लळा लागला होता . गावचे तलाठी भाऊसाहेब वाडेकर अप्पा अधुनमधुन गावात यायचे , त्यांची माझी ओळख वाढली , त्यांनी मला लोकसहभाग मिळवून देण्याचा शब्द दिला , काही दिवसानंतर पंचक्रोशीतील खडी क्रेशर ,खदाणी, काही कॉन्ट्रॅक्टर यांची आणि माझी त्यांनी भेट घडवली , काही आर्थिक स्वरूपात आम्ही निधी उभारला आणि सरकारी गणवेशाची वाट न पाहाता आम्ही १५ गणवेश खरेदी केले , काही वहया पेन घेतली , गोष्टीची काही पुस्तके पण आणली . तब्बल ३ हजार रुपये आम्ही गोळा करून खर्च केली . पिण्याचे पाणी , शौचालयाची दुरुस्ती याही गोष्टी हाती धरल्या . आमची एखमेव वर्गखोली रंगाने नटवली , भिंती बोलक्या केल्या , आता गावातील प्रत्येक गरीब पालक सुद्धा आम्हाला मदत करायला उत्सूक झाला . बघता बघता आमच्या शाळेत माईक आला , दोन खुर्चा वाढल्या , आसन पट्टया आल्या , पिण्याच्या पाण्याचा स्टीलचा पिंप आला . मुलांना प्रकटवाचन , पाढे पाठांतर , बेरीज वजाबाकी , शुद्धलेखन असा आमचा शैक्षणिक प्रवास सुरू झाला !



माझी सर्व मुले धीटपणे बोलु शकली पाहिजेत , वयोगट लहान असला तरी अभिव्यक्ती झाली पाहिजेत , त्यांच्या मनातील शाळेची व माझ्या विषयीची संपूर्ण भीती नाहींशी व्हायला पाहिजे, त्यांनी मला खूप काही विचारले पाहिजे , तरच माझा पुढचा शैक्षणिक प्रवास छान होणार होता आणि मी ठरवलेल्या गोष्टीत मला यश मिळत होतं . माझ्या १०० % ( अवघे १३ !) आता छान वाचता येऊ लागले होते , सर्वांचे हस्ताक्षर सुधारू लागले होते , श्रुत लेखनात यश मिळत होते . आणि इंग्रजी बाराखडी सोबतच आमची इंग्रजी शब्द संपत्ती वाढू लागली होती !

मी गावात राहात असल्याने मला माझे समवयस्क मित्र पण तयार झाले .दत्तु बोबडे , अशोक करपे , चंद्रकांत पंडीत , फारोख शेख , रघु रोडगे , पंढरीनाथ रोडगे . या मंडळीनी रात्रीच्या प्रौढ शिक्षण वर्गात स्वंयसेवक म्हणून काम करण्याची तयारी दाखवली , यापैकी चंद्रकांत पंडित आणि दत्तु बोबडे यांनी आपल्या पत्नी पण प्रौढ निरक्षर महिलांसाठी स्वंयसेविका म्हणून या चळवळीत सहभागी करून घेतल्या .झांजर्डीत शिक्षणाचे वारे वाहु लागले . इकडे आमच्या तिसरी चौथीचे अनंता राजगुरू , चंद्रभान रोडगे , सरू रोडगे , नंदा रोडगे , द्वारका

करपे अशी छान टिम झपाटून अभ्यासाला लागली . शेजारच्या कोडापूर गाव आणि वस्तीवरील मुले सुद्धा झांजर्डीच्या शाळेत प्रवेश मागू लागली . शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम बसू लागले . छोटी नाटयछटा , चुटूकले, नृत्य गीते , व्यसनमुक्तीवरची गाणी , हुंडाबळी , स्त्री पुरुष समता , अंधश्रधा निर्मूलन यावर आम्ही बसवलेले ५ , ५ मिनिटाचे चुटूकले आमच्या शाळेत येऊन रावसाहेब मोरे यांनी पाहिले . ते उत्तम पेटी वादक होते , त्यांचा पिंड सुद्धा अभिनयाचा व विनोदी स्वभावाचा होता . त्यांनी मला सुचवले की तुमची पोरं जे शाळेत बोलतात हे लोकांपर्यंत पोहचलं पाहिजे , एकदिवसी त्यांनी हे सगळं शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमीत्ताने संध्याकाळी गावच्या देवळासमोर  घडवून आणलं आणि गाव खूप खुष झालं ! रावसाहेब मोरे यांच्याकडे रिक्षा होती , मंडप होता , माईक , साउंड सिस्टीम होती आणि त्यांच्याही अंगात कलागुण होते . त्यांनी पंचक्रोशीत आमच्या शाळेच्या विद्यार्थांचे ( फिरता रंगमंच ! ) ६ ते ७ प्रबोधन पर सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणले .कोडापूर , पुरी , नंद्राबाद , सोलेगाव येथे आमच्या शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे खूप कौतूक झाले . माझ्या निवेदनावर पण टाळया पडायच्या . जमलेल्या रकमेतून रिक्षा व ड्रेसिंग चे भाडे वगळता सर्व निधी शाळेसाठी असायचा . गंगापूर सहकारी साखर कारखान्याचे संचालक सर्जेराव पाटील राऊत आणि गंगापूर पंचायत समीतीचे उपसभापती रावसाहेब गोरे यांनी आमच्या या फिरत्या प्रबोधन आणि मनोरंजनपर रंगमंचाचे खूपच कौतूक करून माझ्या पाठीवर शाबासकीची थाप टाकली होती ! माझ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची तर दृष्ट काढली जायची मीठ मिरची ओवाळून घरी आल्यावर ! झांजर्डीतील तीन वर्षात फार कमी वेळा माझा स्टोव्ह पेटला असेल . खूप प्रेम मिळाले गावाकडून आणि माझ्या विद्यार्थी वर्गाकडून . खूप आनंदात व उत्साहात गेले झांजर्डीचे तीन वर्ष . याच गावात राहून डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापिठाचा बहिस्थ विदयार्थी म्हणून मी इंग्रजी विषय ऐच्छिक घेऊन पदवीधर झालो !  एवढया छोटया गावातून, १५० कि मी अंतरावरून किमान २५ ग्रामस्थ माझ्या लग्नाला आले होते १९९५ ला !

जिल्हा परिषद प्रा. शाळा झांजर्डी येथून जुन ९५ ला प्रा.शा. आगर नांदूर केंद्र आपेगाव ता पैठण येथे माझी बदली झाली . आणि आता माझ्या घरापासून साधारण ३५ ते ४० कि.मी . अंतरावर मी आलो होतो . माझं कुटूंबासहीत स्थलांतर आई वडीलांना नको वाटलं म्हणून मग माझं धोंडराई ते आगर नांदूर अस रोज जाणं येणं सुरू झालं . गावात रोज दिसल्याने माझ्या गावातील काही प्रतिष्ठीत मंडळी मला म्हणाली की आपल्या गावच्या ब–याच मुलामुलींनी गेवराईच्या र. भ. अट्टल महाविद्यालयात ११ वी ला प्रवेश घेतला आहे , बरेच जण १२ वी ला पण आहेत . तुम्ही सकाळी १२वी चा एक तास घ्या आणि सायंकाळी १० वीचा एक तास घ्या . आणि मी हा म्हणालो . आता मी एक सायकल घेतली होती . पहाटे ५ वाजता उठायचं , माझं सर्व आवरून ६ वाजता १२ वीचा इंग्रजी चा तास घ्यायचा . ७ वाजता जेवणाचा डबा सायकलला लटकावून मी धोंडराई ते शहागड असा ८ते ९ कि.मी कच्च्या रस्त्याने प्रवास करायचो . शहागडला सायकल ठेवून कधी बस तर कधी काळीपिवळीने शहागड ते आगर नांदूर ( ३० कि .मी ) . साडे नऊ ते पावणेदहा वाजायचे . मग साडेचार पर्यंत

शाळा आणि परत ६ वाजेपर्यंत शहागड आणि ७ वाजता सायंकाळी घरी येऊन १० वीची एक बॅच असा माझा द्रविडी प्राणायाम सुरू झाला . खूपच धावपळ व्हायची . पण दिवस उत्साहात आणि आनंदात जात होते . दरम्यान मी आंतरजिल्हा बदलीची फाईल टाकली होती आणि त्याला यश येत होते . मला आपसी बदली ची संधी मिळाली , कामगार  शेख गेवराईतून माझ्या जागी व मी पैठण हुन गेवराईत असा आमचा योग जुळून आला. मी १ ऑगस्ट ९७ ला आंतरजिल्हा बदलीने थेट माझ्या गावात ! होय जिल्हा परिषद माध्यमिक शाळा धोंड राई येथे रुजू झालो.

तात्यासाहेब मेघारे

जि.प.मा.शाळा धोंडराई,

ता:–गेवराई, जि:–बीड

# एक गुरूजी घडताना



दादासाहेब नवपुते

डीएडला असताना गिजुभाई बधेका यांचे 'दिवास्वप्नाचे' अनेक पारायणे केलेले. डोक्यात फक्त गिजुभाई फिरायला लागले.माझ्या नोकरीचा पहिला दिवस. पूर्ण दिवस आम्ही स्वच्छतेत अन खेळण्यात घातला. मुलांची भीड चेपली.तशी ती जवळ यायला लागली. चार कधी वाजले कळले नाही.

डीएड संपले .आता काय करायचे. सगळी मुलं परीक्षा संपल्याबरोबर आपापल्या जिल्ह्यात गावी गेली.मी ही औरंगाबादला भाड्याच्या खोलीत राहायला लागलो.डीएड संपल्याने वडिलांना पैसे मागण्याचा प्रश्नच नव्हता.गावातील काकांच्या वशील्याने चिकलठाणा एमआयडीसीत एका कंपनीत कामाला लागलो.बारा तास काम.दीड हजार रुपये पगार.

एके दिवशी पेपरला निवड मंडळाची बातमी आली.कंपनी सोडून परत अभ्यासाला लागलो. परीक्षा दिली. पास झालो.मुलाखत दिली. मित्रासोबत ऑर्डरची वाट पाहत बसलो.कंपनीचा पगार कामाला आला.

एक दिवस पोस्टमन खोलीवर आला.पत्र दाखवले.नोकरीची ऑर्डर.किती आनंद झाला म्हणून सांगू.पण पोस्टमन काही पत्र देईना. मग पन्नास रुपये चहापाण्याला दिले.लगेच ऑर्डर घेतली.फोडून वाचली.औरंगाबाद पंचायत समितीला गेलो. ऑर्डर दाखवली.रजीस्टरवर सही केली.मोठ्या खुशीत शाळेची ऑर्डर घेतली.गावाचे नाव वाचले.प्रा.शा.गाडीवाट. के.कचनेर. बाकीचे मित्र नोकरीसाठी गावापासून दूर गेले.मी मात्र नोकरीसाठी माझ्याच गावाजवळ गेलो. आनंदच आनंद.दुसऱ्या दिवशी गावात घारदोनला गेलो.एव्हाना गावात बातमी गेली देखील.जवळचे लोक भेटायला आले. गाडीवाटला शिकवणारे सर घारदोनलाच राहायचे. त्यांच्या सोबत सकाळीच गाडीवाटच्या शाळेत पायी निघालो. घारदोन ते गाडीवाट साडेतीन किलोमीटर हे अंतर पायी चालण्याशिवाय पर्याय नव्हता.

रस्ता होता हो .पण माझ्याकडे काहीच वाहन नव्हते ना. मग आम्ही दोघेही पायीच निघालो.पाउलवाटेने चालता चालता कशी असेल शाळा , विचार मनात पिंगा घालू लागले.शाळेचे चित्र

डोळ्यासमोर यायला लागले.मी खोडेगावच्या  झेडपी शाळेत पाचवी ते सातवी शिकलेलो.आमच्या पंचक्रोशीतील सर्वात सुंदर आन मोठी शाळा म्हणजे खोडेगावची शाळा. गाडीवाटची शाळा ही अगदी तशीच असेल असा विचार पक्का झाला. अर्धे अंतर पार केले.मी पहिल्यांदाच गावात आलो असल्याने ,सरांशी फारसी ओळख नव्हती. चुपचाप त्यांच्या मागे चालत राहिलो.

चढणीचा रस्ता सुरू झाला. उजव्या बाजूला वाहणारा ओढा.कडेने पाऊलवाट.

"गाडीवाटला कधी गेले होते का?"

सरांच्या प्रश्नांने विचारांची साखळी तुटली.शाळेचे चित्र दाट झाडीत विरून गेले.

"नाही सर" वाटेतील बोरीचे झुडुप चुकवत मी खांदे उडवले.

"कमाल आहे,इतक्या जवळ राहता अन गाडीवाटला कधीच गेले नाही" सरांनी प्रश्नार्थक कटाक्ष टाकला.

" सातवी पास झाल्यापासून शिक्षणासाठी बाहेरच राहिलो, गावाकडेही आता फ़ारसे ओळखत नाही." एका दमात सांगून मोकळा झालो.

"कशी आहे शाळा,"मी जरा चाचरतच विचारले.

"चांगली आहे" सर गालातल्या गालात हसत होते. मला हायसे वाटले.चढणीचा रस्ता संपला.गाव स्पष्ट दिसायला लागले.तसा मी नजरेनेच शाळा शोधायला लागलो.पण छे काही निशाणी दिसेना. गावात घुसलो.गुलमोहराच्या झाडाला वळसा घालून सर एका पत्राच्या घरामागे थांबले. "आली तुमची शाळा." सर हसतच बोलले.मी घाईतच घरासमोर गेलो. हो ती शाळाच होती. खोलीच्या समोरच्या भिंतीवरील फुटलेला सिमेंटचा फळा त्याची साक्ष देत होता.मी बरोबर मैदानात मध्यभागी दक्षिणेकडे तोंड करून उभा होतो. शाळा मला अन मी शाळेला बघत होतो. माझ्या बरोबर डाव्या हाताला ,पूर्वेकडे दहाबारा अँगल वाकडे तिकडे ,उत्तर दक्षिण उभे, कधी काळी तारेचे कुंपण असल्याची साक्ष देत  होते. त्यापलीकडे वस्ती होती.सरांनी सांगितले ती गाडीवाटची झोपडपट्टी . नेमक्या त्याच वेळी झोपडपट्टीत दोन बायकांचे भांडण चालू होते. आम्ही आलो तसे मुले शाळेच्या पटांगणात गोळा झाली.सरांनी माझी ओळख करून दिली.भेदरलेल्या नजरेनी मुले माझ्याकडे पाहत होती. माझ्या कल्पनेतील शाळा पार कुठल्या कुठे नाहीशी झाली.

उत्तरेकडे तोंड करून दोन खोल्या उभ्या होत्या. मैदानातच पत्रे उडालेली ,भिंती पडलेल्या एक खोलीचे खंडर उभे .त्यामागे मोठे बाभळीचे झाड.  खोलीसमोरचा थोडा भाग सोडला तर बाकी मैदानात पंधाड वाढलेले.उत्तरेला दूरवर गाव वस्ती.मावळतीला खळवाड्या. उंचसखल मैदानात माझी शाळा उभी होती.

परिपाठ न होताच  मुले वर्गात जाऊन बसली.कुणीतरी घंटी वाजवली. शांत बसलेली खोली गोंगाट करू लागली. सोबत आलेल्या सरांनी एकमेव जुने कपाट उघडले. हजेऱ्या काढल्या. शिक्षक हजेरी काढली . सही केली. त्यांच्या नावाखाली माझे नाव लिहिले.मला सही करायला सांगितली.मी सही केली.तारीख बघीतली.24 जुलै 1997.`

सरांनी एक ते चार वर्गाच्या चार हजेऱ्या माझ्या हाती सोपवल्या.

"या हजऱ्या, हे मुले, ही शाळा ,सांभाळा." सर हसतच बोलले.

मी शाळेच्या स्वप्नभंगातून नुकताच सावरलो .

"आता ही शाळा तुमच्या ताब्यात.तुम्ही आजपासूनच या शाळेचे मुख्याध्यापक" , मला काहीच समजेना.

" अन तुम्ही" मी पुरते गोधंळून विचारले.

"सर मी या शाळेवर एक वर्षांपासून डेपोटेशनवर आहे. तुम्ही आले .आता माझी सुटका झाली. मी आता घारदोनला माझ्या मूळ शाळेवर जातो. तसेच कचनेरलाही जाऊन येतो.तुम्ही हजर झाल्याचा रिपोर्ट देतो."

कपाटाची चावी मला देत सर बोलले.मघापासून सर का हसत होते ,याचा उलगडा झाला. काही कागदपत्र घेऊन सर कचनेरला केंद्रीय शाळेकडे रवाना झाले.

मुलांचा गोंगाट वाढत चालला. तसा मी मुलाकडे मोहरा वळवला. टेबलाला टेकून,हात बांधून,पायाची अढी घालून उभा राहीलो.तसा वर्ग चिडीचूप झाला.थोडं स्माईल करून "मला तुमचे नाव सांगाल का?"टेबलावरील डस्टर भिंगरी सारखे फिरवत मुलांना विचारले.

ओळीने एकेक मुलगा गाणे म्हणावे तसे आपले नाव एका सुरात सांगू लागला. मुली हाताने तोंड झाकून उगीचच हासू लागल्या.त्या का हसत होत्या , काही समजेना. एक मुलगा नाव सांगायला उठेनाच.तशी एक धीट मुलगी "ऐ एक्या नाव सांगना तुपलं" अशी त्यावर खेकसली. तसा एक्या उभा राहिला अन ,मा$झे नाव ए$क$ना$थ आहे.पूर्ण वाक्यात नाव सांगून ,न मोडलेली पायाची अढी तशीच मुडपून खाली बसला.

भगवान नावाचा मोठा मुलगा हळूच काहीतरी बोलत होता.काय बोलतोय असे विचारल्यावर योगेश म्हणाला, " सर तो  म्हणतोय की तुम्ही किती दिवस शिकवणार हे?"

"किती दिवस म्हणजे काय, मी कायमचा इथे आलोय .तुम्हाला शिकवायला."

तशी सरला कोळगे म्हणाली "सर या शाळात कोणतेच सर चार महिन्यापेक्षा जास्त वेळ शिकवत नाही. लगेच बदलून नवे सर येतात."

तिचे म्हणणे खरे होते .

(पुढे काही दिवसांनी मला असे समजले की , एखाद्या शिक्षकाला शिक्षा करायची असल्यास त्याचे गाडीवाटला डेपोटेशन प्रशासन करत असे. कारण हे गाव औरंगाबाद तालुक्यातील अतीशय दुर्गम गाव होते. दळणवळणाचे कोणतेही साधन नसलेले.)

समोर एक ते चार वर्गाचे 62 मुले बसलेले. मी एकटाच.डीएडला असताना गिजुभाई बधेका यांचे 'दिवास्वप्नाचे' अनेक पारायणे केलेले. डोक्यात फक्त गिजुभाई फिरायला लागले.माझ्या नोकरीचा पहिला दिवस. पूर्ण दिवस आम्ही स्वच्छतेत आन खेळण्यात घातला. मुलांची भीड चेपली.तशी ती जवळ यायला लागली. चार कधी वाजले कळले नाही.एरवी घंटी वाजल्याबरोबर मोकाट घराकडे धावत सुटणारी लेकरं पाच वाजले तरी जायचे नाव घेइनात. शेजारच्या वस्तीतील बाया बापड्या आमची गंमत पाहत उभ्या. काही बापडे चहा घेऊन आले.मग ओळख झाली.मी घारदोनच्या श्रीमंतरावाचा मुलगा म्हटल्यावर वडिलांच्या ओळखीची काही मंडळी आली. काहींनी सोयरेपणाची ओळख काढली.मग पाच वाजता गावात चहापाण्यासाठी गेलो. ओळखीने ओळख वाढायला लागली. गावाशेजारचा गुरुजी म्हणजे लोकांना फारच आधार अन विश्वास वाटला. गावात कोळगे गुरुजी होते.ते नेमके घारदोनला म्हणजे माझ्या मूळ गावी मुख्याध्यापक. त्यांचीही ओळख झाली.

दुसऱ्या दिवशी आठ वाजताच शाळेवर हजर.कालच ठरलेले असल्याने लेकरं माझयाही आधी शाळेत आलेली. खुरपी अन फावडे घेऊन.सकाळीच कामाला लागलो.सारे मैदान दुपारपर्यंत साफ केले. सगळी घाण मावळतीच्या खड्यात टाकली. आता कुठे मैदानाने मोकळा श्वास घेतला. मुले मैदानभर खेळायला लागली. दुपारी जरा जास्तच गरम व्हायला लागले.तसे सगळे मुले घेऊन गुलमोहराच्या झाडाखाली बसलो. कुणाला गाणे, कविता येतात का विचारले.मुलांनी गाणे ऐकवले.मुलींनी सर्व कविता एकाच तालात म्हणून दाखवल्या. मग मीही लेकरांना, गे मायभू तुझे मी ही कविता वेगळ्याच तालात म्हणून दाखवली.लेकरांना ती जाम आवडली. सर आणखी कविता म्हणून दाखवा ना. मुलांचा आग्रह सुरू झाला. चार वाजत आले होते पण आमच्या गप्पा–गोष्टी संपत नव्हत्या. उद्या आम्ही मराठी वाचायला शिकणार होतो. बरोबर सकाळी साडेआठला शाळा सुरू झाली. सर्वांकडे मराठीची पुस्तके होती. दहा–बारा मुले सोडले तर कोणालाही ठीक वाचता आले नाही. मुले नाराज झाली. खाली मान घालून शांत बसली. दुपारच्या जेवणाच्या वेळेत मी पेट्या ,कपाट उचकले. दोन रंगीत पेन सापडले.काही पांढरे कागद सापडले.मुलांना हातभार लांबीच्या तुर्हाटीच्याकाड्या काड्या आणायला लावल्या. जुन्या पुठ्ठ्यावर पांढरे कागद चिटकवले. तीन बाय तीन इंची चौरस तयार केले. चौरसावर मुळाक्षरे

लिहून काढले. त्या चौरसाला काड्यांच्या दांड्या लावल्या. प्रत्येक मुलाकडे एक चौरस देऊन त्या मुलाला त्याच्या अक्षराचे नाव सांगितले. मुलांची अक्षर ओळख सुरू झाली. चार दिवसात सर्व मुलांना सर्व मुळाक्षरे पाठ झाली. सचित्र बालमित्र या उजळणीच्या मदतीने कान्याचे शब्द. वेलांटीचे शब्द, ऊकाराचे शब्द, असा सराव घेत गेलो. वाचता येणारी मुले इतरांना मदत करत होती. 15 ऑगस्ट च्या दिवशी सर्व मुलांनी गावासमोर मराठीचे कोणतेही पान वाचून दाखवले. गावकरी खुश झाले.गणिताचा सराव, पाढ्या चा सराव चालूच होता. भरपूर खेळायचे.अन भरपूर अभ्यास करायचा . असा आमचा नित्यनेम सुरू झाला.काही इंग्लिश शब्द मुलांना शिकवले.नाव सांगणे. हे काय आहे, असे विचारणे.त्याची उत्तरे देने. असा आमचा एक ते चारचा इंग्लिशचा अभ्यास सुरू झाला. गावात चर्चा रंगू लागली.काही शिकलेली माणसे पहिली दुसरीच्या मुलांना what is your name असे गल्लीत विचारू लागली. मुले पण हात बांधून my name is.. सांगू लागली. विशेष म्हणजे इंग्लिश त्या काळी पाचवी पासून होते.

हिवाळा सुरू झाला. थंडी पडायला लागली. मुले कुडकुडत शाळेत यायला लागली. सकाळी बराच वेळ मैदानात बसायला चांगले वाटू लागले. पण शाळेच्या उत्तर पूर्व कोपऱ्यात गावकरी लघवी करू लागले. त्याचा वास आम्हाला यायला लागला. मुले कुरकुर करू लागली. तुम्हीच काहीतरी उपाय सांगा असे मी मुलांना विचारले. एका मुलाने जालिम उपाय सांगितला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही दोन दगड, काही बांगड्या हळद ,कुंकू ,लिंबू असे साहित्य आणले. रात्री मुलांनी दगडावर हळद-कुंकू वाहिले .बांगड्या ठेवल्या आणि काही फुले टाकली .लिंबू आजूबाजूला कापून टाकली. चमत्कार झाला. गावकरी शाळेच्या कोपऱ्यात लघवी करायचे बंद झाले. मुलांनी गोष्ट गोपनीय ठेवली.पण वस्तीत चर्चा सुरू झाली.आम्हाला काय .आमची समस्या सुटली होती.

दिवसामागून दिवस जात होते. मुले शाळेत चांगलीच रमली होती. लिहिणे, वाचणे या गोष्टी आम्ही केव्हाच पार केल्या होत्या.शाळा म्हणजे मज्जा आणि अभ्यास म्हणजे सोप्पी गोष्ट असे सूत्र जमले. वर्ष संपले.तसा मी हेडमास्तरकीच्या कामातही पारंगत झालो. कागदाला कागद.हिशोबाला हिशोब जुळवू लागलो.माझा आर्थिक व्यवहार नेहमी तोट्यात असायचा.सादिलवार पुरायचा नाही.खिशातून खर्च व्हायचा.

चौथी पास झाल्यावर मुले घारदोनला पायी शाळेत जायची.अनेक मुलीची शाळा पाचवीतच बंद व्हायची. विचार केला अन गाडीवाटला पाचवीचा वर्ग सुरू केला.गुरुजी मिळणार नाही या अटीवर प्रशासनाने पर्वाणगी दिली. मुली आनंदाने शिकायला अन लहान मुलांना मदत करायला लागल्या. अशीच सहावी अन सातवी ही आम्ही सुरू केली. आता गाडीवाटची शाळा सातवीपर्यंत झाली. मध्यनतरीच्या काळात मला दोन, तीन महीने असें काही शिक्षक बांधव डेपोटेशनवर मदतीला यायचे. त्यांना मी खुशाल सांगायचो तुम्हाला जेव्हा वाटेल तेव्हा शाळेत या. त्यांना खूपच आनंद व्हायचा. मला एकट्याला काम करण्याची संधी मिळायची. दोन हजार साली. मला दोन जोडीदार कायम मिळाले. कामाचा आवाका वाढला. वेगवेगळे उपक्रम सुरू झाले. 26

जानेवारी 1997 ला सकाळी आम्ही शाळेच्या इतिहासातील पहिला सांस्कृतिक कार्यक्रम घेतला. मुलांना अन पालकांना खूपच मज्जा आली.

1999साली झेडपी औरंगाबादच्या इतिहासात झेडपीच्या शाळेत पहिल्यांदा रात्री सांस्कृतिक कार्यक्रम गाडीवाटच्या शाळेत झाला.पेपरला बातमी आली.आमचे गाडीवाट गाडीवाटमध्ये स्टार झाले. आजुबाजूच्या गावात गाडीवाट या शाळेचे नाव निघू लागले. लोक महिनाभर शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची चर्चा करत होती.अशातच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत मुलांच्या खो–खो च्या स्पर्धा जाहीर झाल्या. मग काय मी आणि माझे जोडीदार जाधव सर आणि राठोड सर आम्ही खो–खो च्या स्पर्धेची तयारी सुरू केली. आमची मुले पारंगत व्हायला लागली .सकाळ–संध्याकाळ खो–खोचे सामने रंगू लागले. पहिल्या वेळेस आमची गाडीवाट ची मुले स्पर्धेत भाग घेण्यासाठी गाडीवाट वरून औरंगाबादच्या जिल्हा परिषद मैदानावर गेली. आम्ही सेमीफायनल पर्यंत राउंड जिंकले. खुल्या गटात स्पर्धा असल्यामुळे आमचा सामना फायनल ला तेरणा हायस्कूल च्या मुलांसोबत लागला. ती प्रचंड तयारीची मुले होती. आमच्या मुलांनी ही जीवाची बाजी लावून सामना ओढून आणायचा प्रयत्न केला, पण बोनस वेळेमध्ये एक गुणाने हरलो. हा सामना एक वेळेस टाय झाला होता. मला खूप रडायला आले.लेकरं पण रडू लागली. सामन्याचे पंच आमच्या मुलाच्या खेळाचे कौतुक करत होते. पण काय उपयोग आमची जिल्हास्तरावर खेळण्याची संधी हुकली होती.

गावी आलो.पालकांना लेकरं औरंगाबाद ला सुर्धेत गेल्याचाच खूप आनंद होता.लेकरांनी पुढच्या वर्षी जिल्हास्तर जिकण्याचा संकल्प केला.पालकांना लेकरांचे कोण कौतुक वाटले.

काळ कसा भराभर पुढे सरकत होता. इंग्रजी वाचून समजायलाच हवे. हा आमचा खाक्या होता.पहिलीपासून इंग्रजी आल्याने मुलांचे इंग्लिश खूपच खराब झाले होते. कारण की एक ते चार या वर्गाचे इंग्रजीचे मूल्यमापनच व्हायचे नाही.मग या वर्गाला शिकवणारे हा विषय शिकवायचे नाही.इंग्रजीची अगदी कला कार्यानुभव विषयासारखी गत झाली. मी पाच ते सातला इंग्लिश शिकवायचो.पाचवीत a b c d शिकवायचो.वेळ पुरायचा नाही.मग रोजचे टार्गेट सेट करायचो. कधी कधी टार्गेट पूर्ण व्हायचे नाही.मग आम्ही रात्री शाळा भरायचो. सात ते दहा. पालक बॅटऱ्या ,कंदील घेऊन नऊ वाजेपासूनच मैदानात जमा व्हायचे. वर्गातील मुलाचा अभ्यास पाहून खुश व्हायचे. लेकरं पण आनंदात राहायची.दिवसापेक्षा रात्री चांगलं कसं काय समजतं?असे एकमेकांना विचारायची.या प्रशनाचे उत्तर मला खरेच समजले नाही.पण रात्री मुलाच्या शिकण्याचा वेग खरोखरच दुप्पट व्हायचा.

पंधरा जानेवारीला लोकमत पेपरमध्ये सामूहिक नृत्य स्पर्धेची जाहिरात आली. सत्तविस जाणेवारीला लोकमतच्या लॉनवर स्पर्धा होती. औरंगाबादला स्पर्धा म्हणजे आमच्या हातापायात स्फुरण चढायचे.मुलांना सांगितले .मुले हुरकळली. छान शेतकरी गीत बसवले.प्रॉपर्टी ,कोरीओग्राफी माझीच होती. एकच चॅम्पियन संघ

निवडला जाणार होता. लोकमतला जाऊन नावनोंदणी केली. सव्वीस जानेवारीला इतर कार्यक्रमासोबत स्पर्धेचे नृत्य ही गावकऱ्यांना दाखवले. जानेवारीला संध्याकाळी मुले औरंगाबादला मुक्कामी आणली.एका एका गुरुजींच्या घरी दोन तीन मुले ,अशी वाटणी झाली.आता आम्ही सात गुरुजी शाळेवर काम करत होतो.

अठरा मुलेमुली आमच्या संघात होती. मुलांना गुरुजींच्या घरी मुक्कामाला राहण्यात भलतीच मज्जा आली. शिवाजी नगरला मी आणि जाधव सर राहायचो.मुले इकडुन तिकडे अन तिकडून इकडे अशी खूप रात्रभर फिरत राहिली. सकाळी शिवाजिनगरच्या गणपती मंदिराच्या मैदानात आम्ही गाण्याचा सराव केला. शिवाजी नगरच्या रहिवाशांची फुकट करमणूक झाली. त्यांच्या शुभेच्छा घेऊन आम्ही संध्याकाळी लोकमत पेपरच्या लॉनवर हजर झालो. यादी बघितली.सगळ्या नामी इंग्लिश मेडियमच्याच टिमा. आमचा सादरीकरणाचा सोळा पैकी तेरावा नंबर. कोणीतरी टीव्ही स्टार संचलन करीत होते. डोळ्यांचे पारणे फिटावी अशी नृत्ये सादर होत होती. आमचा नंबर आला.सुत्रसंचालकाने झेडपीची एकमेव टीम ,त्यातही ग्रामीण भागातून आलेली,म्हणून आमचे आधीच कौतुक केले.श्री.राजेंद्र बाबू दर्डा यांनी लेकरांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. कंटेम्परी.बॉलिवूड.हिप हॉप, या प्रकारानंतर मैदानात तुडुंब भरलेल्या प्रेक्षकांनी गावरान,ठसकेबाज शेतकरी नृत्यावर ठेका न धरला तरच नवल. स्पर्धा संपली.निकाल लागले. आमचा दुसरा नंबर आला.चॅम्पियनशीप थोडक्यात हुकली.

दुसऱ्या दिवशी लोकमतने आमच्या गाडीवाट शाळेची विशेष दखल घेतली. औरंगाबाद तालुक्यात शाळेमुळे गाडीवाटची ओळख वाढली.सातवी पास झाल्यावर लेकरांना शाळा सोडू वाटायची नाही.निरोप समारंभात आणि दाखला नेतांना लेकरं गळ्यात पडून खूप रडायची.शाळेला विसरू नका म्हणून सांगायचो.मुलं कधीच शाळेला अंतर द्यायची नाही. दहावी पास झाल्यावर पालक यायचे.आता काय करायचे ,म्हणून विचारायचे. मग कुणाला आय टीआय, कुणाला पॉलिटेक्निक. कुणाला आकारावी अशी व्यवस्था लावायचो. बारावी नंतर मुले, इंजिनियरिंगला, बीएस्सी कॉम्प्युटर ला गेली. प्रगती सांगत राहिली.जमेल तसे लेकरांना मदत करत गेलो. सगळी गरिबांची ,शेतमजुरांची लेकरं.प्राणपणाने शिकत होती.परीक्षा पास होत होती.प्रत्येक निकालाला पेढे घेऊन येत होती.सगळ्यात आधी जितेंद्र आडे ,फार्मसी झाला.त्याला औरंगाबादला चांगली नोकरी मिळाली. शाळेत मी वारंवार जितेंद्रच्या नोकरीविषयी बोलायचो.मुलांना अभ्यासासाठी चेतवायचो.खरच मुलाचा अभ्यास वाढायला लागला.मुले एकमेकांच्या पुढे जायला लागली.माझे सर्व सहकारीही प्रचंड मेहनत घ्यायचे.अनिल पाटील नावाचे सर तर वर्गावरून बाहेर यायचेच नाही.त्यांना बळेच बाहेर काढावे लागायचे. मगच दुसऱ्याना वर्गावर संधी मिळायची.गणेश घुले सरांचा वर्ग सर्वात उत्तम असायचा. खिचडीचा हिशोब अन जबाबदारी माझ्याकडे होती.दरवर्षी उत्तम आहार पुरवूनही बरेच पैसे शिल्लक राहायचे.त्या पैशातून आम्ही शाळेला कम्प्युटर, साऊंड सिस्टम, टीव्ही, व्हाइट बोर्ड, खेळाचे साहित्य. विहिरीवरून पाईपलाईन,पाण्यायाचा

पंप. वर्गातील इंटरकोम सिस्टम ,हे सगळे साहित्य खरेदी केले. सात तरुण शिक्षक आणि एक मुख्याध्यापक आणि तीनशे साठ लेकरं असा आमचा लवाजमा वाढला.

शाळेत राजकारण वाढायला लागले, तसा मी शालेय पोषण आहार व्यवहार दुसऱ्या एका सरांकडे सुपूर्द केला.सगळे लक्ष्य मुलावर केंद्रित केले.इतर खेळाबरोबरच आमचा लेझीमचा संघ जबरदस्त होता. त्यावर्षी लोकमत आणि व्हिडिओकॉन ग्रुपने राज्यस्तरीय लेझीम स्पर्धा आयोजित केल्या होत्या.बरोबर ओळखलं.आम्ही भाग घेतलाच.औरंगाबादच्या राजीव गांधी मैदानावर स्पर्धा होत्या. लगझरी बसेसने मुलाचे नटलेले संघ दाखल झाले.आम्हीही गाडीवाटवरून टाटा टेम्पोने मैदानावर पोहचलो. आमचा 80 लेकरांचा संघ.मुली निळ्या पांढऱ्या झेडपी ब्रँड फ्रॉक मध्ये.अन मुले खाकी पॅन्ट अन पांढरा शर्ट मध्ये. इतर संघाचे ढोल ताशे, तर आमची एकमेव हलगी. आमचा सादरीकरणाचा नंबर आला.मी अनिल पाटील सरांना माईक हलगीजवळ धरून राहा असे सांगितले. टिपराचा हलगीवर काडकन आवाज केला.हलगीच्या आवाजाने मुले हुरकळली.ताल धरला.मुले बेभान होऊन लेझीमचा फॉरम्याट मध्ये घुसली.पहिल्याच मिनिटाला मैदानावरील सर्वांचे लक्ष आमच्या खेळण्याकडे केंद्रित झाले.मला माझ्या हलगीवर पूर्ण विश्वास होता.वेगवेगळ्या तालात हलगी कडाडु लागली.फॉरम्याट बदलत होते.परीक्षकांनी पेन्सिली आणि कागद खाली ठेवले.समोर येऊन आमची लेझीम बघू लागले.तसा मुलांना आणखीनच चेव चढला. आमच्या आवताराकडे बघून नाकं मुरडणारी ,आता आ वासून आमची लेझीम बघत होती.बरोबर पंधराव्या मिनिटाला आमचा शो थांबला.मी आणि माझी लेकरं घाम पुसतंच मैदानाच्या बाजूला आमच्या जागेवर जाऊन बसायला लागलो.मैदानभर नुसता टाळ्यांचा आवाज निनादात होता. गतवर्षीच्या विजेत्या संघाच्या मुख्याध्यापकांनी हा हलगी वाजवणारा शिक्षक असूच शकत नाही ,कोणीतरी खाजगी बाँडवाला आहे, अशी परिक्षकांकडे तक्रार केली.मला बोलावले.मी खरच शिक्षक आहे.याची त्यांना खात्री पटवून दिली. प्रकरण शांत झाले.

निकाल काय लागला काय विचारता.आहो आपल्या झेडपीच्या संघाने ती स्पर्धा जिंकली.त्यावेळचे शिक्षण मंत्री मा.राजेंद्र बाबू दर्डा आणि विरोधी पक्षनेते मा.विनोद तावडे यांच्या हस्ते आम्हाला बक्षीस अन ट्रॉफी मिळाली. संध्याकाळी गावी परतलो .त्याआधी वार्ता गावात पोहचली.सारा गाव आमच्या स्वागताला वेशीवर हजर होता.शाळेपर्यंत आमची मिरवणूक काढली.लेकरांचे कवतुक झाले.मलाही खूप शाब्बासकी मिळाली.खेळ,वाद–विवाद, भाषण,नृत्य,यासारख्या स्पर्धात आमची मुले चमकू लागली.शाळेचे अन गावाचे नावही चमकायला लागले.

चला आईसोबत भांडी घासू या.

आई बाबाचे पाय चेपू या.

डोंगरात झाडे लावू या.

यासारख्या उपक्रमातून सामाजीकतेचे भान लेकरांत पेरीत गेलो.शाळेतच बाजार भरवून लेकरांना व्यवहार शिकवला. आनंदनगरीचे आयोजन करून लेकरांना धंद्याचे गमक शिकवले.व्याख्यानमालेचे आयोजन करून लेकरांना इतरांच्या आयुष्यातील अडचणी समजावल्या. शिक्षकांना या व्याख्यानमालेत बोलते केले.लेकरांना अनुभव श्रीमंत केले. मे 2013 साली माझी गाडीवाटवरून गारखेडा नं.1 येथे बदली झाली.

या रोजी गाडीवाट मध्ये 42 इंजीनियर, 1 कृषी अधिकारी, दोन पोलीस.दोन आर्मी जवान.एक बिल्डर,62 प्रायव्हेट कार्पोरेट कर्मचारी.अशी गाडीवाटची प्रगती होती.शाळेत तिनशेऐंशी विद्यार्थी आणि तेरा शिक्षक होते.

ऑगस्ट दोन हजार तीन मध्ये माझी गाडीवाट वरून झालेली बदली ,लेकरांनी एक महिना एक दिवस शाळेवर बहिष्कार टाकून प्रशासनाला रद्द करायला लावली होती.

गारखेड्याला बदली झाल्यावर माझ्यातील शिक्षक आणि माणूस प्रचंड विकसित झाला.झेडपीची बंद पडायच्या मार्गावर असलेली गारखेड्याची शाळा ,बदलीत औरंगाबाद जवळची शाळा भेटत असतांनाही आव्हान म्हणून स्विकारली.नावारूपाला आणली.मला या शाळेतील अनुभवाने पार बदलून टाकले.

काय ?

ते सगळे अनुभव सांगू म्हणता. सांगतो ना. पण पुढच्या भागात.


दादासाहेब नवपुते

जि.प.प्रा.शाळा गाडीवाट, केंद्र :–कचनेर

ता,जि:– औरंगाबाद

मोबाईल क्र:–७५८८५३४८९६

# शेतीतून शिकण फुलवताना

बाबू मोरे



आता मुलांना आणि पालकांना शाळेविषयी आवड निर्माण झाली होती. शाळेतील मुलं सांगायची सर आम्हाला सुट्टी नको आम्ही सुट्टीच्या दिवशीही शाळेत येतो. जेव्हा गणपती आणि दिवाळीच्या सुट्ट्या लागायच्या तेव्हा मुले मला सांगायची, "सर आम्हाला सुट्टी नको शाळाच पाहिजे. तुम्ही पण गावाला जाऊ नका. आम्हाला करमत नाही". असे म्हणून त्यांचे डोळे डबडबायचे व ते माझ्याही डोळ्यात आश्रू आणायचे. शाळेत मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत होते.

मी पहिलीत शिकत असतांना मनाशी पक्के केले होते की आपण शिकून शिक्षकच व्हायचे. बीड जिल्ह्यातील चाकरवाडी या गावातील एका शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला आहे.मी शालेय जीवनात गोदावरीबाई परुळेकर यांचा 'पड्यावरचा चहा' हा पाठ अभ्यासत असतांना मला वाटायचं की जर आशा आदिवासी भागात काम करायची संधी मिळाळी तर किती चांगले होईल.त्याबाबत माझ्या मनात खूपच उत्सुकता निर्माण झाली होती. 2009 साली मला माझ्या स्वप्नातील व्यवसायात शिक्षणसेवक म्हणून पदार्पण करण्याची संधी मिळाली. माझी पहिली शाळा जि.प. जांभे केंद्र– साखरे जी पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात मला मिळाली. त्या ठिकाणी साडेचार वर्षे सेवा करत असतांना शाळेच्या परिसरात विविध झाडे लावणे, लोकसहभागातून शाळेचा विकास, क्रीडास्पर्धेत तालुका विभागापर्यंत मजल मारणे, वक्तृत्व स्पर्धेत तालुका स्तरापर्यंत मजल, मुलांची गुणवत्ता, शाळाबाह्य मुलांबाबत भरीव काम, विज्ञान प्रदर्शनात सुयश, पाड्यात वाचनालय सुरू करणे आशी विविध कामे करत होतो. त्याचे समाधान ही मनाला होते. ही सर्व कामे करत असतांना पड्याशी चांगले स्नेहबंध निर्माण झाले होते.

पुढे डिसेंबर 2013 साली माझी जांभे शाळेतून जी.प.प्राथमिक शाळा, खोमारपाडा येथे बदली झाली. या शाळेत मी तिसरा शिक्षक म्हणून हजर झालो.कारण त्यावेळी शाळेचा पट होता ८८. त्यावेळी मला श्री. अविनाश जाधव (मुख्यशिक्षक) तर श्री.सुनिल शिंदे हे सहकारी शिक्षक म्हणून सहकारी भेटले. मी जेव्हा खोमारपाडा शाळेत हजर झालो तेंव्हा पाड्याच्या तिन्ही बाजूने असलेल्या डोंगराच्या व तेथील हिरवळीच्या मी प्रेमातच

पडलो.चारही बाजूने असणाऱ्या हिरवळीने मना++ला प्रसन्न वाटत होतं. शाळेत पहिली ते पाचवीपर्यंतचे वर्ग, दोनच वर्गखोल्या, शाळेला मोकळी जागा नसल्यातच जमा, शाळेत एक-दोन कडू मेंदीची झाडे, शाळेला कुंपण नाही की गेट नाही, शिवाय दिवाळीनंतर स्थलांतरित होऊन जाणारी १६ ते १७ मुले, गैरहजर राहणारी मुले, तसेच शाळाबाह्य मुलांचाही प्रश्न होताच. शाळेला कसलेच कुंपण नसल्याने व रस्ता अगदी जवळ असल्याने शाळेतील मुले जेव्हा दुपारी जेवायला बसायची तेव्हा कधी कुत्री, तर कधी जनावरे मुलांच्या ताटातील जेवण खायची.अशी ही शाळेची परिस्थिती होती.

मला शाळेचे हे चित्र बदलायचे होते. त्यासाठी प्रथम काय करता येईल याचा मी विचार करू लागलो. मी सुरुवातीला दीड वर्ष शाळेचा व पाड्याचा अभ्यास केला आणि ज्या समस्या होत्या त्या लोकसहभागातून सोडविण्याचे ठरविले. प्रथम शाळेच्या मागील बाजूला कडू मेंदीची झाले लावली. माझे सहकारी शिक्षक श्री.सुनील शिंदे सर व मी आम्ही मुलांच्या मदतीने चालू पावसात झाडे लावण्यासाठी पाच खड्डे खोदले. त्यानंतर शाळेत पालकांची बैठक बोलावली. त्याच दिवशी सकाळी शाळेत जातांना नर्सरी मधून सावलीसाठी उपयुक्त असलेली पाच सप्तपर्णीची रोपे मोटारसायकलवर घेऊन गेलो होतो. बैठकीसाठी ७० ते ८० पालक आले होते. त्यात प्रथम आम्ही शाळेत काय काय करणार आहोत हे शाळेचे मुख्य शिक्षक श्री.




जाधव सर यांनी सांगितले. त्यासाठी आम्ही प्रत्येक शिक्षकाने १०००रु. द्यायचे घोषित केले. पालकांना आमची शाळा विकासाची योजना आवडली. आणि त्याच बैठकीत पालकांना तुम्हाला जमेल ती मदत करण्याचे आव्हान केले. पालकांनी त्याला सहमती दर्शविली. बैठक संपल्यावर शाळेच्या समोर खोदलेल्या खड्ड्यात पालकांच्या हस्ते सप्तपर्णीची पाच रोपे लावली. ती झाडे रस्त्याच्या अगदीच जवळ असल्याने गाय, बैल व बकरी पासून त्यांचा बचाव करण्यासाठी त्याला बाजूने मी बोरीची काठी लावली. नंतर जाधव सर यांनी त्याला लोखंडी जाळ्या उपलब्ध केल्या. शाळेला समोरच्या बाजूला जागा अगदीच कमी असल्याचे कुंपण करावे की नाही हा प्रश्न मनात यायचा. पण कुंपनशिवाय शाळेला शोभा नाही असे नेहमी वाटायचे.मग त्यासाठी पैसे जमा करण्यासाठी शाळासुधार पावती पुस्तक तयार करून घेतले. शिक्षक करत असलेली मेहनत पाहून पालकांनी व ओळखीच्या व्यक्तीकडून जवळ जवळ १८०००/- रु. जमा झाले. ही रक्कम छोटी वाटत असेल पण ज्या पालकांना पायात चप्पल घ्यायची म्हटले तरी पैशाची मारामार त्यांनी दिलेली ही मदत शाळेसाठी लाखमोलाची

होती. त्यातून शाळेसाठी लोखंडी जाळी तारेचे व सिमेंट पोल चे कुंपण करून घेतले.  त्यासाठी भात कापणीची कामे असतांनाही पालक विनामूल्य मदत करायला आली. पण अजूनही शाळेला दोन गेटची गरज होती. त्यातील एक लाकडी गेट पाड्यातील दोन पालकांनी विनामूल्य बनवून दिले.पण लोखंडी गेट कोठून मिळेल याचा विचार करत असतांना समजले की पाड्यातील गणेश ओझरे व जयवन टोकरे हे दोघे व्यक्ती सरकारी सेवेत आहे. त्यांना फोन वरून संपर्क केला व शाळेसाठी करत असलेल्या कामाबाबत माहिती सांगितली त्यांनी लगेच ५०००/– रु. मदत केली. त्यातून दोन लोखंडी गेट बनवून घेतली. हे काम करत असताना पाड्यात लाईटचा दाब खूपच कमी असल्याने आणलेली वेल्डींग मशीन चालेना. काय करावे काही सुचेना. मग जाधव सर यांनी जराही वेळ न लावता जनरेटरची सोय केली.त्यादिवशी शनिवार होता. आम्ही सर्व शिक्षक सकाळी ७:०० वाजताच शाळेत आलो होतो. त्यादिवशी आम्हला ते काम पूर्ण करायला दुपारचे ३:००वाजले होते. पण कोणाच्याही चेहऱ्यावर निराशा किंवा राग नव्हता.त्याचे कारण आम्ही सर्वचजण शाळेचा कायापालट करण्याच्या ध्येयाने झपाटलो होतो.झालेल्या कामाचे पाड्यातील लोकांच्या हस्ते उदघाटन करून घेतले. जूनला लावलेली झाडे आता खुलू लागली होती. त्यात विटा लावून विविध शोभेची, फुलांच्या झाडांची लागवड मुलांच्या मदतीने केली. आता शाळेत शिकण्यास पोषक वातावरण निर्मिती होऊ लागली होती. मला तर असे व्हायचे की शाळा सुटली तरी तेथेच बसून राहावं असं वाटायचं. मुलं ही आता आनंदाने शाळेत येऊ लागली होती. शाळेत रमायला लागली होती.



याचा परिणाम असा झाला की शाळेचा पट ८८वरून ९८ झाला. त्याच वर्षी पाड्यात फिरून शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन ८ते १० मुलांना समकक्ष वर्गात प्रवेश दिला.मी जि.प.शाळा जांभे येथे असतांना ज्या ३० ते ३५ शाळाबाह्य मुलांना दाखल केले होते त्या अनुभवाचा येथे बराच उपयोग झाला. आता मुलांना आणि पालकांना शाळेविषयी आवड निर्माण झाली होती. शाळेतील मुलं सांगायची सर आम्हाला सुट्टी नको आम्ही सुट्टीच्या दिवशीही शाळेत येतो. जेव्हा गणपती आणि दिवाळीच्या सुट्ट्या लागायच्या तेव्हा मुले मला सांगायची, "सर आम्हाला सुट्टी नको शाळाच पाहिजे. तुम्ही पण गावाला जाऊ नका. आम्हाला करमत नाही". असे म्हणून त्यांचे डोळे डबडबायचे व ते माझ्याही डोळ्यात आश्रू आणायचे. शाळेत मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत होते. त्याचा बदल मुलांमध्ये जाणवत होता. शाळेचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले होते. तसेच जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत रिले मुली या प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला.

हे सर्व होत असतांना माझ्या पाड्यातील बरेच पालक भात शेतीची कामे पूर्ण करून प्रत्येक वर्षी कामाच्या शोधात पालघर, वसई–विरार, भिवंडी, कल्याण व मुंबई येथे साधारणपणे डिसेंबर महिन्यात स्थलांतर करतात. आणि जातांना त्यांच्या सोबत शाळेत शिकणारी मुले ही घेऊन जातात. अशी ही स्थलांतरित होऊन जाणारी मुले होती १७. स्थलांतरित होऊन जाणारी मुले ही सर्व ठिकाणी कमी जास्त प्रमाणात असणारी समस्या आहे. त्याचा बराच परिणाम मुलांच्या शिक्षणावर होतो किंवा काही मुले शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर ही जाण्याची भीती असते. माझ्या पाड्यात असणारी ही समस्या मी प्रथम मुलांची सोय पड्यातीलच एखाद्या नातेवाईकडे, मोठ्या बहीण भाऊ याच्या मदतीने सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. मात्र यश १००टक्के येत नव्हते. यासाठी जमीन व पाण्याची चांगली उपलब्धता लक्षात घेऊन त्यावर शेती मार्गदर्शनातून आपण पालकांचे व मुलांचे स्थलांतर थांबवू शकतो असा विचार मनात आला. आपण फक्त तोंडी सांगून पालक आपले ऐकणार नाहीत. हे मला माहित होते. म्हणून शाळेच्या समोर असलेली अर्धा गुंठा पडीक जागा मुलांच्या मदतीने खोदून घेऊन त्यात विविध भाज्या व कांदे यांची लागवड केली. त्याचा फायदा असा झाला की मुलांना ३ महिने ताज्या भाज्या खायला मिळाल्या व पालक हे सर्व पहात असल्याने त्यांना आपणही विविध पिके आपल्या शेतात घेऊ शकतो हे प्रत्यक्ष मला दाखविता आले. याचाच फायदा घेत २०१७ साली गणपती सुट्टी पूर्वी शाळेत पालकांची बैठक घेऊन त्यांना शेती करण्यास तयार केले.माझ्यावर विश्वास ठेवून त्यांनी ती केली. व त्याचा चांगला फायदा त्यांना झाला ही. आता पालक बाहेर कामाला जाण्यापेक्षा शेती करण्याला पसंती देतात. त्यासाठी मी सुट्टीच्या दिवशी जाऊनही त्यांना मार्गदर्शन करत आहे. आता पालकांना शिक्षक घेत असलेल्या मेहनतीचा आदर वाटू लागला होता. त्याचा परिणाम शाळेच्या पटसंख्या वाढीवर झाला. पुढे तोच पट ११५ पर्यंत वाढत गेला. मी शेतकरी कुटुंबातील असल्याने शाळेत जागा नसतांनाही भंगारमधील प्लॅस्टिक टबमध्ये आद्रक, बटाटे, ऊस व रताळे इ. पिकांची लागवड शाळेत करत होतो. त्याचा परिणाम असा झाला की मुलांनाही त्याची आवड निर्माण झाली. एके दिवशी तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या एका मुलाचे पालक आले आणि म्हणाले की, 'पोराला काय झाले काय माहिती काल बाजारातून भाजीसाठी आणलेली बटाटे कापून जमिनीत लावली.' मला ते त्याने का केले होते ते समजले. नंतर तीन महिन्यांनी तोच पालक मुलाने मागे लावलेल्या बटाट्याला दोन तीन किलो बटाटी निघाली हे पण सांगायला विसरला नाही. मुलांचे शिकणे सोपे



व्हावे म्हणून मी विविध शैक्षणिक साहित्य बनवितहोतो.त्यामधीलच `ज्ञानरचनावादी कृती फलक` या साहित्याचा तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला. शाळेत मुलांच्या मदतीने विविध बियांचा वापर करून रोपे बनविणे, पर्यावरणावर आधारित उपक्रम, परिसर भेट, वनभोजन, बागकाम, लेझीम, कवायत, विविध शैक्षणिक कार्यक्रमांना भेटी, हस्ताक्षर सुधार, मूल्यसंस्कार, स्वच्छता, देशभक्ती इ. वर आधारित विविध उपक्रम राबवित आहे.माझ्या शाळेतील मुलांनी २०१६ ते २०१८ दरम्यान जिल्हास्तरावर सलग तीन वर्ष (२५×४) या प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून शाळेचे नाव मोठे केले आहे.

मी तर प्रयत्न करत होतो पण यासाठी एखाद्या सामाजिक संस्थेची मदत मिळाली असती तर काम करायला आणखी मजा आली असती असे नेहमी वाटायचे.मुलांचे व पालकांचे स्थलांतर थांबावे यासाठी मी येथील शेतकऱ्यांना गेल्या चार वर्षांपासून शेतीविषयक मार्गदर्शन करत आहेत. त्याचा परिणाम असा झाला की, शाळेतून स्थलांतर होऊन जाणारे १६ते१७ मुलांचे प्रमाण आज ० झाले आहे.अक्षरधारा फाउंडेशन ही संस्था शेजारीच असलेल्या मुसळपाडा जि.प.शाळेत छान काम करत आहे त्याची कल्पना मला होती. त्या शाळेवर पाण्याची टाकी व नळ



बसविण्याचे काम या संस्थेकडून चालू असतांना मी त्या संस्थेच्या प्रतिनिधींना भेटलो व खोमारपाडा शाळेत येण्याची विनंती केली. पण घाईत असल्याने त्यांनी येण्यास नकार दिला. आता काय करायचे हा प्रश्न मला पडला.मग मला एक युक्ती सुचली मी मोबाईलमध्ये असलेले शाळेचे, मुलांचे व उपक्रमाचे काही फोटो त्यांना दाखविले. त्याचा परिणाम असा झाला की त्यांना घाई असतांनाही ते शाळेवर आले. मला याचा पक्का विश्वास होता की ते एकदा शाळेवर आले तर ते माझी शाळा घेणारच. आणि शेवटी तेच झाले त्यांना शाळा , तेथील मुले आवडली व त्यांनी सन २०१८ पासून माझ्या शाळेला मदत करण्याचे ठरविले. आता ही संस्था शाळेतील मुलांना दर शनिवारी शाळेतील मुलांना प्रत्येकी एक या प्रमाणे केळी शाळेत पोहच देते. शिवाय मुलांना लागणारे खेळाचे साहित्य, चप्पल, शैक्षणिक साहित्य,दप्तर, इ.आवश्यक वस्तू देते. या संस्थेला माझे पालकांचे स्थलांतर थांबावे यासाठी करत असलेले शेती मार्गदर्शनाचे काम आवडले व त्यासाठी त्यांना मला मदत करायचे ठरविले.त्यासाठी आर्थिकदृष्टीने कमकुवत व स्थलांतरित होऊन जाणारी १८ कुटुंबे निवडण्यात आली. त्यांची

बैठक घेऊन आपण कोणत्या पिकांची लागवड करू शकतो, किती जागेत कोण काय लागवड करणार, इ. बाबींवर चर्चा करण्यात आली. त्यासाठी अक्षरधारा फाउंडेशन ने आवश्यक ते मार्गदर्शन पालकांना केले. या परिसरात लाल कांद्याचे उत्पन्न घेतले जात नाही. शिवाय त्याला चांगली मागणी असते म्हणून नोव्हेंबर मध्ये कांद्याचे बी मी माझ्या स्वतःच्या गावावरून गावातील एका एसटी वाहकाच्या मदतीने आणले. व ते शेतात एकाच जागी टाकले. याची तीन कारणे होती. एक म्हणजे गेल्यावर्षी कांद्याचे रोप खूपच महाग होते. ते विकत घेणे शक्य नव्हते. दुसरे म्हणजे खात्रीचे बी टाकायचे आणि तिसरे म्हणजे सर्व शेतकऱ्यांना रोप कसे तयार करायचे हे माहिती व्हावी. कांद्याचे बी टाकल्यानंतर पालकांना मधल्या काळात पैसे मिळावे म्हणून पालक, मेथी, वांगे,पत्ताकोबी, मिरची,कारले,दुधी,डांगर,मका,तीळ,गवार, शिराळा, काकडी, हरभरे,लसूण, टरबूज इ. ची लागवड केली. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कांद्याची लागवड झाली. पालकांना लॉकडाऊन काळात विविध पिकांपासून पैसे मिळायला सुरुवात झाली होती. जे पालक मजूर म्हणून काम करत होते ते आज मालक झाले आहेत. दत्तू ठाकरे या शेजाऱ्याच्या शेतात फक्त शेणखतावर ४ ते ५ टन बरबूज निघाणी. लॉकडाऊन काळात सगळीकडे बंद असल्याने ती विकायची कशी हा प्रश्न पडला. दत्तू हा मेहनती व जिद्दी शेतकरी आहे. त्याने ती सर्व टरबूज डोक्यावर वाहून विकली. त्यातून त्याला ३५०००ते४०००० रु. मिळाले. कांदाही ३५ टन निघाला. तो ही कसा विकावा हा प्रश्न होता. मग मी विविध सामाजिक संस्था, मित्रमंडळ तसेच अक्षरधारा फाउंडेशन ने ही 4 टन कांदा घेऊन तो विकण्यास सहकार्य केले. लॉकडाऊन काळात या पालकांना एक नवीन आशा व आधार दिल्याचे काम यातून झाले. या सर्व कामात मी पूर्ण लॉकडाऊन काळात हे काम करत होते. या सर्व कामात मदत करत असताना मी एक वर्ष आणि दोन महिने झाले गावी जाऊ शकलो नाही. दिवळीसारखा सण ही पाड्यात साजरा केला. ज्या शेतकऱ्यांकडे टरबूज केले होते त्याच्या विहिरीचे पाणी कमी पडू लागले तेव्हा लॉक डाऊन काळात मजूर मिळत नसल्याने स्वतः हातात पहार घेऊन विहिरीत उतरलो व ५ फूट विहीर खोल गेल्याने पाण्याचा प्रश्न मिटला. माझे हे काम माझ्या शेळेच्या पाड्यापुरते मर्यादित न ठेवता ते इतरही पाड्यात चालू आहे. माझे व अक्षरधारा फाउंडेशन चे हे काम खोमारपाडा, मातेरपाडा, लयनीपाडा, मुसळपाडा, फणशीपाडा, ठाकरपाडा व खडकीपाडा येथील पालकांसाठी चालू आहे. चालू वर्षी ते नवीन ५० कुटुंबांना या उपक्रमात आणण्याची इच्छा आहे.. त्यासाठी मला अक्षरधारा फाउंडेशन नेहमीच सहकार्य करण्यास तयार आहे. शाळेतील मुलांसाठी मदत करणारी ही संस्था पालकांचे स्थलांतर थांबावे यासाठी आर्थिक स्वरूपात मदत करत आहे. सन २०१९-२० साली याच संस्थेने पालकांना शेतीसाठी एक लाख पस्तीस हजार रु.मदत केली आहे. ज्याच्या फळस्वरूप १८ स्थलांतरित होऊन जाणारी कुटुंबे विविध पिकांच्या माध्यमातून कोरोनासारख्या संकटाच्या काळात काही अंशी पैसे कमवू शकली. मी स्वतः दादडे केंद्रासाठी बालरक्षक म्हणूनही काम करतो. माझ्या या कामाची दखल घेत जिल्हा परिषद पालघर यांनी मला २०१८-१९ साली सन्मानपत्र देऊन गौरविले आहे.

माझ्या तालुक्यात मुलांसाठी खूप चांगले काम करणारी सुहृद फाउंडेशन ही संस्था आहे. आणि या संस्थेने माझी शाळा घ्यावी असे पाच सहा वर्षांपासून वाटत होते आणि ते ही माझे स्वप्न २०१९–२० साली पूर्ण झाले. ही संस्था माझ्या शाळेतील मुलांना सोमवारी १० मुलांमागे एक भाजीपाला जुडी याप्रमाणे एक पालेभाजी, मंगळवारी अंडी, बुधवारी पालेभाजी सोबत १.५ किलो गुळ व १.२५ शेंगदाणे, गुरुवारी फळभाजी व गुळ फुटाणे, शुक्रवारी अंडी व शनिवारी फळभाजी ३.५ किलो तसेच गुळ व शेंगदाणे असा हा आठवड्याचा पौष्टिक आहार देते. तसेच वर्षातून दोन वैद्यकीय तपासण्या, डोळे तपासणी, शाळेत प्रथमोपचार पेटी, विविध शैक्षणिक साहित्य, पुस्तके मुलांना, टाय–बेल्ट, ओळखपत्र, दात घासायला ब्रश व पेस्ट, तसेच शाळेसाठी भौतिक सुविधांसाठी मदत करते. याचा परिणाम आता असा झाला आहे की मुलांना आता घराचे जेवण नको वाटते.कारण घरी तर त्यांना फक्त भात व डाळच खायला मिळतो. सुहृद फौंडेशनमुळे मुलांचे आजारी पडायचे प्रमाणही कमी झाले आहे. तसेच मुलाच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीवरही परिणाम झाला आहे. अशी ही संस्था विक्रमगड तालुक्यातील १० शाळांवर काम करते.माझ्या शाळेला सन २०१८ मध्ये ग्रामपंचायतने एक वर्गखोली डिजिटल करून दिली आहे.तसेच जि.प.पालघर यांनी ही एक प्रोजेक्टर दिला आहे.त्यामुळे मुलांचे शिकणे आनंददायी व सोपे झाले आहे.



कोरोनामुळे सर्वत्र बंद असल्याने पालकांना जीवनावश्यक वास्तूंसाठीही पैसे नव्हते आशा परिस्थितीत सुहृद फाउंडेशन यांनी दोन टप्प्यात 365 किट, अक्षरधारा फाउंडेशन 40 किट व केशवसृष्टी फौंडेशन 50 किट यांचे वाटप खोमारपाडा येथे केले. व पालकांना संकट काळात आधार देण्याचे काम केले. यात काही दिव्य व्यक्ती व निराधार व्यक्तींनाही मी विविध संस्थांमार्फत मदत मिळवून दिली आहे. माझा हा शेती प्रयोग ऍग्रो वन पेपर मध्ये आला होता. तो वाचून भालचंद्र सावंत सर बेलापूर हे फोन वरून मला या उपक्रमासाठी शुभेच्छा देतात व काही मदत करू इच्छितात. मी त्यांच्याकडे इलेक्ट्रिक मोटार ची मागणी करतो. व ही भली व्यक्ती अवघ्या तीन दिवसात मोटार पंप पोहच करायला स्वतः येते. तसेच उपविभागीय कृषी अधिकारी श्री. प्रवीण गवांदे साहेब हे स्वतः येऊन शेतकऱ्यांचे मार्गदर्शन करतात या गोष्टी निश्चितपणे खूप ऊर्जा देऊन जातात. चालू वर्षी शेतकऱ्यांना आद्रक, बटाटे, लसूण, मिरची, इ. नगदी पिके लावण्यास सांगायचे आहे. शेतीपूरक व्यवसाय

करण्याकडे वाळवायचे आहे, आधुनिक शेतीपद्धती वापरायच्या आहेत. या काही योजना आहेत.मला या कामासाठी माझे केंद्रप्रमुख श्री.शंकर हडबाल सर तसेच वरिष्ठ अधिकारी नेहमी प्रोत्साहन देत असतात.

बाबु चांगदेव मोरे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोमारपाडा

केंद्र- दादडे ता-विक्रमगड जि. पालघर

मोबाईल-९३७०१४३३१०

ईमेल-morebabu88@gmail. Com

# माझा शिक्षण अद्भुत प्रवास

नितीन गबाले



मी मुलांसाठी वाचन पाठ तयार करून त्यांचा वापर केला. इंग्रजीच्या rhyming वर्डस व साध्या , सोप्या वाक्यांच्या मी स्वाध्याय पुस्तिका बनविल्याला .त्यांचा वापर इतर ऑफ तासिकेत येऊन केला. पुस्तकातील नवीन व अवघड शब्दांची यादी करून त्यांचा वाचन सराव करुन घेतला. वाक्यांची रचना कशी करतात याबद्दल मुलांशी चर्चा केली. त्यांना काळ व वाक्यांचे प्रकार उदाहरणे देऊन सांगितले. पटपट इंग्रजी व मराठीचा अभ्यासक्रम पूर्ण केला .

**शिक्षक म्हणून मला व माझ्या विद्यार्थ्यांना समृद्ध करणारा माझा अदभूत शिक्षण प्रवास :–**

## पर्व एक : -

आनंदवाडी हे अतिशय लहानसं गाव . डोंगराच्या कुशीत वसलेलं . गाव कसलं ? जेमतेम पन्नास घराची एक वाडीचं म्हणा ना! आम्ही पाच भावंडं. चार भाऊ आणि एक बहीण. वडील आणि आई शेतीत घाम गाळून सोनं पिकवत. थोरल्या भावांचा आणि बहिणीचाही त्यांना कामात थोडा आधार राहायचा . गावात सारखा कोरडा नाही तर ओला दुष्काळ तर पाचवीला पुजलेला! आठ– नऊ एकर जमीन ; तीही कोरडवाहू.म्हणतात ना कठीण परिस्थिती आणि संकटं त्यांच्यासोबत संधी सुध्दा घेऊन येत असतात.

मोठा भाऊ औरंगाबादला आला .काम करून शिकावं या हेतूनं त्यानं हा मोठा पण धाडशी निर्णय घेतला; कारण तिथे न कोणी ओळखीचं न पाळखीचं. निसर्गाची साथ म्हणावी तशी मिळत नसल्यानं गावाकडं काही आमचं भागत नव्हतं. वडिलांनी रोजगारासाठी औरंगाबादला भावाकडे येण्याचा निर्णय घेतला.गावातल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत मी तिसरीपर्यंत शिकलो होतो. औरंगाबाद मध्ये माझ्या शिक्षणाचे एक नवे पर्व सुरु झाले. एन सहा या भागातल्या एका महानगरपालिकेच्या शाळेत मी सातवीपर्यंत शिकलो .पुढं अमर विद्यालयात मॅट्रिकपर्यंत शिक्षण कसं बसं पूर्ण केलं.घरच्या गरिबीमुळं मला इतर मुलं मदत करायची. कधी कधी डब्बा वेळेवर बनत नव्हता ; अशावेळी माझे मित्र मला त्यांचे डब्बे शेअर करायचे. येथे मला हानिफ, लियाकत, दिलीप, शेषराव, अमर, गणेश हे जिग्री मित्र मिळाले.माझे आई वडील मोल मजुरी करून आम्हाला शिकवतं

होते. त्यांनी घाम गाळून अत्यंत कठीण व प्रतिकूल परिस्थितीत आम्हाला शिकवलं. जर ते गावातचं राहिले असते तर मला शिक्षक कधीचं बनता नसतं आलं.त्यामुळं त्यांचे उपकार आम्ही कधीचं फेडू शकणार नाहीत!

पुढे आई वडिलांना आधार मिळावा म्हणून माझ्या मोठ्या भावाने (रघुनाथ भाऊने) दहावीपर्यंतचे शिक्षण कसेबसे पुर्ण केले. तो वडिलांसोबत पेंटींगचं काम करू लागला . त्याची आम्हांला शिक्षणात खूप मदत होऊ लागली.

शिक्षकांच्या मेहनतीमुळं व माझ्या प्रयत्नामुळे दहावीत पूर्ण शाळेतून माझा दुसरा क्रमांक आला. मला एक लाल रंगाची हिरो रेंजर ही मोठया टायरची सायकल बक्षीस मिळाली.या बक्षिसाचं किती अप्रूप होतं मला! बक्षीस पाहून माझ्या आनंदाला आणि उत्साहाला उधाण आले होते.मी आनंदाच्या भरात बेभान होऊन त्या सायकलने पूर्ण औरंगाबादला एक चक्कर मारली! किती ऊर्जा अन उत्साह होता त्यावेळी! घरच्यांना माझ्या या डोळे दिपवणाऱ्या यशाचा खुपचं अभिमान वाटला. मोठया भावाने गल्लीत मिठाई वाटली. जणू काही ऑलिम्पिकमध्ये मला गोल्ड मेडलचं मिळालंय एवढा आनंद माझ्या कुटुंबाला झाला होता !गरीब परिस्थितीमुळे पटकन नोकरी मिळावी या उद्देशानं शीशुविकास या डीएड कॉलेजमध्ये घेतला एकदाचा प्रवेश!

मॅट्रिकच्या यशामुळे मला आता पुढे शिकण्याची प्रेरणा मिळाली.

डीएड कॉलेजमध्ये गोपाळ, रमेश , जयवंत , नदीम यासारखे जीवाला जीव लावणारे चांगले मित्र मिळाले.डीएड प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालो .कुटुंबाला पटकन आर्थिक आधार मिळावा म्हणून शिक्षकाची नोकरी शोधू लागलो. अनुभव नसल्याने व शिकवण्याचे म्हणावे तितके चांगले कौशल्य नव्हते; त्यामुळे नोकरी लवकर मिळत नव्हती. काही ठिकाणी डोनेशन मागितलं गेलं. त्यामुळं पुन्हा निराश झालो. पण जवळकर सरांच्या ज्ञानप्रकाश शाळेत मुलाखत दिली. मुलाखत छान झाली .सुंदर हस्ताक्षरात नोकरीचा अर्ज लिहिला होता.या मुलाखतीने अन सुंदररीतीने लिहिलेल्या अर्जाने मला तिथे नोकरी मिळवून दिली!.

पगार होता रुपये पाचशे प्रति महिना !

ज्ञानप्रकाश विद्यालयात एक ते दीड वर्ष काम केलं. शाळा मोठी होती. एका वर्गात चाळीस पन्नास मुलं होती. पाचवी ते आठवीच्या वर्गांचं इंग्रजी व हिंदी हे विषय मला शिकवायला दिले. त्यावेळी माझं वय होतं अठरा – एकोणीस वर्ष! माझी शरीरयष्टी व उंची जेमतेमचं! वर्गातील काही मुलं माझ्यापेक्षाही उंच होती; त्यामुळं मला वर्गात सुरुवतीला थोडा दबाव व भीती जाणवायची. मी एक दिवस आठविला इंग्रजी व्याकरण शिकवत होतो.व्याकरणातील Add question tag शिकवत होतो.अचानक एका हुशार पण खोडकर मुलाने मला वर्गात एक वेगळा व अवघड प्रश्न विचारला , " सर, I am a clever student. आणि let's play now. या दोन वाक्यांचे question tag कसे करायचे? मला इंग्रजी व्याकरणाचा म्हणावा तितका सराव नव्हता. उत्तर मलाही माहीत नव्हते. मी विचार करण्याचे नाटक केले. खरं तर मला घामचं फुटला! आता काय करावं या मोठया विवंचनेत मी पडलो. जणूकाही 'मला ते येतं' असा खोटा आव आणण्याचा मी प्रयत्न केला. वेळ मारून नेऊन माझी या धर्मसंकटातून तात्पुरती सुटका करून घेण्याचा

केविलवाणा प्रयत्न सुरू केला.या मुलाला म्हंटलं आज आपण फक्त भूतकाळाच्या काही वाक्यांचा सराव करू वं उद्या अशा वाक्यांचे tag शिकूया. खरं म्हणजे अशा वेळी शिक्षकांनी गोंधळून न जाता "मला याची कल्पना नाही ; उद्या अभ्यास करून सांगतो ," असं स्पष्टीकरण द्यायला हवं हे मला नंतर समजलं! अर्थात नंतर मी इंग्रजी व्याकरणाचे एक दोन चांगले पुस्तकं वाचली . माझ्या पूर्वीच्या शाळेतील माझ्या इंग्रजीच्या आदरणीय मुदगडकर सरांकडून व्याकरणाबाबत मार्गदर्शन घेतले.दुसऱ्या दिवशी मुलांना त्या वाक्यांचे question tag कसं करतात हे आत्मविश्वासाने शिकवलं. मुलं समाधानी झाली. मलाही खूप आनंद वाटला. जेंव्हा शिक्षकांना मुलांच्या चेहऱ्यावर नवं काही शिकल्याचा आनंद दिसतो तेंव्हा त्यांना मनातून आनंद होत असतो. पण शीक्षकांनी मुलांना जो घटक शिकवायचा तो शिकवण्याअगोदर त्या घटकाचा पूर्ण अभ्यास केलाच पाहिजे हे तत्व मला चांगलंच उमगलं.

त्यावेळी शाळेला ग्रँट नव्हता.पगार अतिशय तुटपुंजा असल्यानं मी घरगुती ट्युशनस घायला सुरुवात केली. त्यातून थोडा आर्थिक आधार मिळू लागला. त्यानंतर मे एकोणिसशे पंच्यांनव्व या काळात जिल्हा परिषदेच्या निवडमंडळाची शिक्षक या पदांसाठी जाहिरात आली.मला आनंद झाला. स्पर्धा परीक्षेची पुस्तकं आणली. जोराचा अभ्यास सुरू केला. शासकीय नोकरी मिळणं ही माझी सर्वात मोठी गरज होती. एकदाची परीक्षा दिली. ऑक्टोबरला निकाल लागला. जिल्हापरिषदेच्या इमारतीच्या भिंतीवर यादी लावलेली होती. मनात भीती, उत्सुकता आणि अपेक्षा या तिन्ही मानसिक अवस्थांची गर्दी झाली होती. डोळे मोठया अपेक्षेने यादितील माझं नाव उत्सुकतेने शोधत होते. माझं नाव येईपर्यंत मनात प्रचंड धाकधूक सुरू झाली. मन आणि मेंदू फक्त माझ्या नावाची आतुरतेने वाट पहात होते. शेवटी माझी बेचैनी व उत्सुकता संपली. पहिल्या शंभर मध्ये नाव ब्यांन्नव क्रमांकावर होतं. माझं नाव बघून माझा जीव भांड्यात पडला. माझं शिक्षक बणण्याचं स्वप्न त्या दिवशी पूर्ण झालं होतं.मी तिथूनचं माझ्या आईवडिलांचे व देवाचे आभार मानले. त्यांचे मनाच्या गाभाऱ्यातून दर्शन घेतले. मी माझ्या गावातून शिक्षक होणारा पहिला मुलगा होतो. माझ्या या यशात माझे आईवडील, माझा मोठा भाऊ रघुनाथ यांचा सिंहाचा वाटा होता.

मला त्यादिवशी रात्रभर आनंदाच्या भरात झोपचं आली नाही! पाच सहा दिवसानंतर मला घरी ऑर्डर आली. मला औरंगाबाद तालुका मिळाला . दुसऱ्या दिवशी पंचायत समीतीतून मला नवीन आदेश मिळाला . मला माझी पहिली शाळा मिळाली . शाळेचं नाव होतं : रामवाडी लाड केंद्र लाडसावंगी !या गावाला कुणी जायला तयार होत नव्हतं ; कारण हे गाव औरंगाबादपासून सुमारे पन्नास किलोमीटर होतं. डोंगराच्या कुशीत वसलेलं ! त्याठिकाणी जातांना शेतातून व डोंगरावरून एक पायवाट होती. मला नोकरी लागण्याचा आनंद मोठा असल्याने मी पहिल्या दिवशी मोठया आनंदानं व उत्साहानं शाळेत जायला निघालो. सोबत तेथील माझे सहकारी श्री पाटील सर होते. शेतातून, डोंगरातून रस्ता पार करीत आम्ही चालू लागलो. धापा टाकत, घाम पुसत शाळेत पोहचलो ! शहरातल्या एका मोठया शाळेतून एकदम लहानश्या वस्तीवरील छोट्या शाळेत मी आलो.शाळेची इमारत म्हणजे दगड मातींनी बांधलेली ओबडधोबड खोली! हे सर्व बघून माझं तर अवसानचं गळालं. मला वरचे वर्ग शिकवायला आवडायचे . इथे तर दोघात चार वर्ग! एक ते चार वर्ग. एका वर्गात नऊ ते दहा मुलं . मी

तेथील वातावरण पाहून थोडं उदास झालो. आम्ही चालून थकल्यामुळं लगेच साडेदहा वाजता थोडं जेऊन घेतलं.जेवणानंतर लगेच मी मुलांशी गप्पा मारायला सुरुवात केली. सर्व मुलं एकत्र बसवली.माझा परिचय करून दिला.

"Good afternoon friends, My name is Nitin sir. I am your new teacher." मुलं इंग्रजी ऐकत ऐकत माझ्याकडं कुतुहलानं व उत्सुकतेने पहात होती. त्यांना थोडं समजलं की,मी माझं नाव सांगतोय. माझा परिचय करून देतोय. त्यानंतर मुलांना मराठीतून बोलायला सुरुवात केली. मुलांना आवडतील अशा छान गप्पा मारल्या. त्यांना त्यांच्या घराविषयी, शेतीविषयी, मित्रांविषयी प्रश्न विचारले. त्यांना माझं बोलणं खूप आवडलं कारण मुलं मला हासून छान प्रतिसाद देत होती. त्यांना लगेच मैदानावर खेळायला घेऊन गेलो. लंगडी हा खेळ घेतला. मुलं आता ताजीतवानी, प्रसन्न वाटू लागली.त्यांना वर्गात घेऊन गेलो. त्यांना विचारलं," तुम्हाला गाणं आवडतं का?"

मुलांनी एकासुरात "हो .. " म्हटलं.माझा आवाज बऱ्यापैकी (कामपूरता) बरा होता. एक दोन कृतीयुक्त गाणी गाऊन मुलं जाम खुश झाली होती. गाणं आणि खेळ या दोन गोष्टीचं मुलांना भलतं वेड असतं. नेमक्या मुलांना भावणाऱ्या या बाबींपासून मी सुरुवात केली. मग काय मुलं आणि माझी पहिल्याचं दिवशी छान गट्टी जमली.

सुरुवात छान झाली.

"किती मुलांना गोष्ट आवडते रे ? " हा प्रश्न ऐकून मुलांनी एकच कल्लोळ केला , "मला, मला ". आता मुलांना मी त्यांच्या आवडीची गोष्ट सांगायला सुरुवात केली. `अचक मचक पटक पटक`, अशी मी स्वतःच तयार केलेली गोष्ट त्यांना सांगितली. मुलं आता रंगात येऊ लागली. त्यांना गोष्ट फारचं आवडली. त्यांना या गोष्टीवर काही प्रश्न विचारले.दोन तीन मुलं सोडून सगळ्यांनी उत्तरं दिली. अश्याप्रकारे हसत खेळत धम्माल करतं माझा पहिला दिवस संपला. दुसऱ्या दिवशी आम्ही सकाळी 30 मिनिटं लवकर शाळेत गेलो. नाविण्यपूर्ण व कृतीयुक्त असा परिपाठ मी स्वतः घेतला. पाटील सरांना माझे हे सगळे प्रयोग / उपक्रम आवडू लागले. गोष्ट, सुविचार,वस्तुविषयी दोन तीन वाक्यांत बोलणं, इंग्रजी सूचना, कृतीयुक्त गाणं, गणिताची सोपी तोंडी उदाहरणे इत्यादी उपक्रम परिपाठात सुरु केले. तिसरी चौथीच्या मुलांना आता काही मराठी वाक्ये वाचायला सांगितली. 19 पैकी 10 मुलांनी छान वाचलं. पण 6 मुलं अडखळत वाचत होती . 3 मुलं अजिबातचं वाचत नव्हती . या मुलांना मदतीची गरज होती हे मला समजलं.

गणिताचं सुध्दा असंच काही होतं. मी त्यादिवशी मुलांचे गट केले व प्रत्येक गटात एक गटप्रमुख नेमला. त्याला या मुलांना मदत करण्यास सांगितले. प्रत्येक मुलाला `सचित्र बालमित्र ` हे पुस्तकं दिली; कारण गाव अत्यंत दुर्गम भागात असल्याने तिथं पुस्तकं मिळणं शक्य नव्हतं. काही मुलांकडे ही पुस्तकं होती.मी तिसरी चौथी व पाटील सरांनी पहिली दुसरीचे वर्ग घेतले होते . काही आवश्यक साहित्य तयार करण्यासाठी मी एका शनिवारी सुट्टी घेतली. मला यासाठी आता दोन दिवस मिळाले . बाजारात गेलो. माउंटबॉर्ड, मार्कर पेन, कोऱ्या

वह्या, काही पोस्ट काड्‌र्स , जाड कागद इत्यादी साहित्य आणलं. त्यापासून अंक, संख्या, शब्द, वाक्य, इंग्रजी शब्द इत्यादींचे आकर्षक काड्‌र्स बनवले. खराब होऊ नये म्हणून सर्व कार्डसला प्लाष्टीकच्या पिशव्या कव्हर लावल्या.

या काड्‌र्सचा मला खूप उपयोग झाला. मुलं आता गटात या काड्‌र्सचा वापर करून शब्द लिहू वाचू लागली. लहान गूळगुळीत दगडं, सागरगोटे, गोट्या व चिंचोक्याच्या मदतीनं मी त्यांना एकत्र करणं, मिळवणं, काढून टाकनं, दुप्पट करणं, त्यांचे सारखे भाग करणं इत्यादी संकल्पना / संबोध खेळातून मुलांना समजू लागल्या. मुलं शिकू लागली . त्यांची बेरीज, वजाबाकी , गुणाकार , भागाकार यांची सुरुवात झाली.

एक दीड महिन्यात माझ्या या उपक्रमाचे गोड फळं आता मला दिसू लागली .मी त्यांना आता इंग्रजी कृतीयुक्त गाण्यातून ऐकवून सराव देऊ लागलो. इंग्रजीच्या पुस्तकांतील rhymes यासाठी उपयोगी पडल्या.मुलांशी इंग्रजी बोलू लागलो. इंग्रजी सूचना, प्रश्न विचारू लागलो. वर्गातील उपलब्ध वस्तूबद्‌दल प्रश्न विचारू लागलो. चित्र दाखवून त्याचे नाव वाचून घेऊ लागलो.

मुलांना इंग्रजी ऐकण्याची संधी मिळू लागली.मुलांना इंग्रजी सूचना समजू लागल्या. मुलं एकमेकांना या सूचना देऊ लागली. What is your name? What is this? Do you like bat? यासारखे वाक्ये मुलं बोलू लागली.अधुमधून काही मुलं अनुपस्थित राहत होते .त्यांच्या घरी जाऊन पालकांचं उदबोधन केलं.पालकांना आता शाळेचं महत्व पटू लागलं. ते मुलांना शालेय पाठवू लागले. माझं आता सर्व मुलांशी छान ट्युनिंग जमलं होतं.

पण अचानक जानेवारी महिन्यात या सर्व उपक्रमांची साखळी तुटली. अचानक माझी प्रतिनियुक्ती केंद्रांतर्गत एक मोठया शाळेवर झाली. त्या शाळेचं नावं होतं उच्च प्राथमिक शाळा औरंगपूर !त्या शाळेत शिक्षकसंख्या अपुरी असल्यानं मला तिथं नेमण्यात आलं.या शाळेत एकूण 150 विद्यार्थी शिकत होते. सातवीपर्यंत शाळा होती. पुन्हा नव्यानं सुरुवात करावी लागणार होती.

पण मी आता जास्त मुलांना शिकवणार होतो . मला वरील वर्गांना शिकवण्याचा दीड वर्षांचा अनुभव होता. मला वरच्या वर्गाला इंग्रजी गणित व मराठी हे विषय शिकवायला मनापासून आवडायचे. मोठया वर्गाच्या तुलनेत लहान वर्गांना शिकवणं जास्त आव्हानात्मक असतं असं मला वाटतं.खरं म्हणजे बदल्या होणं ही पूर्ण प्रशासकीय बाब असते. अचानक बदली झाल्यावर नवीन ठिकाणी मुलांशी नाळ जुडण्यास थोडा वेळ लागतो. त्यांना समजून घ्यावं लागतं. त्यामुळं शिक्षकांची एका शाळेवरून दुसऱ्या शाळेत किमान पाच सहा – वर्षे बदली व्हायला नकोचं अस माझं वैयक्तिक मत आहे. मी तो आदेश घेऊन नव्या शाळेत रुजू व्हायला गेलो . सोबत तेथील शिक्षक श्री खाडे सर होते. खाडे सर खूप अनुभवी व मदत करणारे शिक्षक होते. त्यांनी मला या शाळेबद्‌दल व तेथील हुशार मुलांबद्‌दल बरंच काही सांगितलं.

मी जेव्हा औरंगपूर या शाळेत पोहोचलो तेव्हा तेथे परिपाठ चालू होता.

## पर्व दुसरं : -

उच्च प्राथमिक शाळा औरंगपूर.

माझ्या नाविण्यपूर्ण शिक्षणप्रयोगांची प्रयोगशाळा :–

औरंगपूरच्या शाळेत मुलं परिपाठ सादर करीत होती. परिपाठ हा मुलं समृद्ध होण्याचा एक नयनरम्य सोहळा असतो. परिपाठात मुलांना व्यक्त होण्यासाठी ते एक आनंददायक व्यासपीठ असतं. शाळेतील उपक्रमांचा तो एक आरसा असतो. परिपाठ म्हणजे मुलं शिकण्यासाठी ,सुसंस्कृत होण्यासाठी एक दैनिक उत्सव असतो. परिपाठात मुलं कविता, सुविचार,बोधकथा इत्यादी उपक्रम सादर करीत होती. पण, सर्व काही यांत्रिकपणे. काही मुलांचं लक्ष परिपाठात नव्हतं. काही मुलं माझ्याकडं उत्सुकतेनं पाहू लागली. ओमकार झाल्यावर परिपाठ संपला. त्यानंतर मुख्याध्यापक श्री बहुरे सर यांनी मुलांना माझा परिचय करून दिला. मला पाचवी ते सातवीचे इंग्रजी व गणित देण्यात आले. मुलांची गुणवत्ता वाढविण्याची मोहीम मला देण्यात आली. वरच्या तिन्ही वर्गांची जबाबदारी माझ्यावर आणि खाडे सरांवर होती. मी तिन्ही वर्गांच्या मुलांना मैदानावर घेऊन गेलो . तिथे त्यांना गोलाकार उभं केलं. 'Fire on the mountain', हा खेळ घेतला. मुलांनी हा मजेशीर खेळ खूप एन्जॉय केला. मूलं आता खुपचं आनंदी दिसू लागली. त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसत होता. त्यानंतर मी त्यांना माझा परिचय होण्यासाठी माझी छोटेखानी मुलाखतचं घेण्याचं सांगितलं. काही मुलांनी माझे नाव, गाव, छंद व माझ्या कुटुंबाबद्दल प्रश्न विचारले. काही मुलं लाजरी बुजरी होती. मी त्यांच्याजवळ गेलो. तुम्ही सुध्दा मला किमान एक तरी प्रश्न विचारला पाहिजे ; नाहीतर मी तुम्हाला बोलणार नाही", अशी प्रेमळ धमकी दिली.गंम्मत म्हणजे त्या चारही मुलांनी मला एकचं नाही तर दोन तीन प्रश्न विचारले! नंतर चार पाच दिवस मुलांशी गप्पा मारणे, गाणी गोष्टी सांगणे, त्यांचे खेळ घेणे , चित्रकलेची परीक्षा घेणे, निसर्ग सहल नेणे इत्यादी मुलांचे आवडीचे उपक्रम राबविले.

औरंगाबादहुन दररोज औरंगपूरला जाणं येणं करणं त्रासदायक ठरू लागलं.शिवाय वेळ पण वाया जाऊ लागला. मी तेथेच शाळेच्या जवळ एका बऱ्यापैकी मोठया खोलीत राहायला लागलो. मोठी मुलं पण माझ्याकडे राहू लागली. शाळा सुटल्यावर घरून एक तासात पुन्हा माझ्या कडे येऊ लागली. फक्त जेवण करायला ती घरी जायची. बरीच मुलं घरून डब्बा घेऊन यायची. संध्याकाळी पाच ते सात आम्ही खंडोबाच्या टेकडीवर खेळायला जायचो . तेथे गाणी गाणं, गोष्टी सांगणं , कोडी सांगणं, शब्दांच्या भेंड्या खेळणं इत्यादी गोष्टीत आमचे दोन तास कसे पटकन निघून जायचे कळतंच नव्हतं. संध्याकाळी माझ्यासोबत अंगत पंगत करून मुलं जेवायची. जेवणाअगोदर मुलं एका सुरात प्रार्थना म्हणायची. त्यानंतर लगेच आम्ही आमचा अभ्यास सुरू करायचो. म्हणजे पुन्हा एकदा आमची दोन ते अडीच तासांची शाळा भरायची! काही मुलं आणि मुली ऐनवेळी अभ्यासाला यायची. स्पोकन इंग्लिश, नवोदय परीक्षा तयारी, गणिताची तयारी आणि इंग्रजी व्याकरण यांची मी तयारी करून घ्यायचो.नंतर आमच्या शाळेत अत्यंत कल्पक व कष्टाळू असे दोन शिक्षक रुजू झाले.

एक होते मिलिंद गिरधारी आणि दुसरे होते उमेश पिंपरखेडकर.

मला आता खूप मोठी मदत व आधार मिळू लागला. आम्हाला खेळण्याचे मोठं मैदान नव्हतं . शाळेसमोर भरपूर जागा होती पण तिथं जमीन खालीवर होती. घाण होती . काट्यांनी व लहानसहान।झुडुपांनी व्यापलेली होती. एक दिवस आम्ही सर्व शिक्षक व सर्व मुलं सर्व तयारीनिशी तिथं गेलो. समोरचं मैदान पाच तासात स्वच्छ केलं. आमच्या मदतीला गावकरीही धाऊन आले त्यांनीही ट्रॅक्टर व जेसीबी आणून मैदानाचे सपाटीकरण केले. आता दररोज दुपारी तीन ते चार तेथे मुलांचे खेळ , कवायत व्हायची. रविवारी शनिवारी दुपारी देखील आमचे खेळ चालायचे. खेळानंतर पुन्हा आमचा अभ्यास सुरू!

आम्ही आता शाळेत : 100% मुलांचं इंग्रजी वाचन,इंग्रजी बोलणं यांच्या तयारीसाठी अतिरिक्त वेळ देणं, व्याकरण, गणिताची पूर्ण तयारी, शिष्यवृत्ती व नवोदय वर्गाची तयारी करून घेणं , नाविण्यपूर्ण व विविध उपक्रमांनी युक्त असा परिपाठ घेणं, सहलीचे आयोजन, निसर्ग सहल, खेळांच्या स्पर्धा , सामान्य ज्ञानाच्या स्पर्धा, आनंदनगरी, इत्यादी उपक्रमांचे आयोजन करू लागलो ; या सर्व उपक्रमांची गोड व रसाळ फळं आम्हाला मिळू लागली.आमचे दोन मुलं नवोदय शाळेसाठी निवडले गेले, शाळेचा पट 30 मुलांनी वाढला. शेजारच्या सय्यदपूर गावातील मूलं पाचवीला लाडसावंगी हायस्कूल मध्ये जायची ; ती सर्व आता आमच्या शाळेत येऊ लागली! यामुळं आमचा आत्मविश्वास वाढू लागला. पालकांचे खूप चांगलं सहकार्य लाभलं. केंद्रस्तरीय क्रीडास्पर्धा झाल्या होत्या. त्याठिकाणी आमच्या मोठया व लहान दोन्ही गटांतील मुलांनी खो–खो मध्ये व धावण्याच्या स्पर्धेत अजिंक्यपद मिळविले. आमच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे 100% मुलं शिकू लागली! इंग्रजीत एक दोन मुलं मागे राहायची. त्यांना मदत करण्यासाठी आम्ही गटप्रमुख नेमले त्यांच्यामुळे आता सर्व मुलं इंग्रजी वाचू बोलू लागली. गटात मुलं काम करू लागली . गटप्रमुख त्यांचा अभ्यास घेऊ लागले.

नजर लागेल अशी एक सुंदर व आदर्श शाळा उभी राहिली.या सर्व जडणघडणीमध्ये आम्ही सर्व शिक्षक एक टीम म्हणून काम केलं. मुख्याध्यापक श्री बहुरे सर यांनी खूप मोठं सहकार्य व मार्गदर्शन केलं.

पण डिसेंम्बर 2000 साली पुन्हा एकदा माझी अचानक बदली वरझडी या शाळेवर झाली.

## पर्व 3 :-

उच्च प्राथमिक शाळा वरझडी

माझ्या नाविण्यपूर्ण शिक्षणप्रयोगांची प्रयोगशाळा.

एकतीस जानेवारी रोजी वरझडी या शाळेवर रुजू झालो. हे गाव औरंगाबादपासून फक्त 23 किलोमीटर; पण एकूण अंतरापैकी दहा किलोमीटर रस्ता दगडांचा आणि खड्यांचा होता. तेथे जायला दिडतास लागला. शहरापासून शाळा जवळ होती. आता शहरात राहता येईल याचा थोडा आनंद होता. शाळेवर पोहोचल्यावर थोडं बरं वाटलं. ही शाळा डोंगराच्या पायथ्याशी होती. शाळेच्या डावीकडे शेती होती.मागे व उजवीकडे उंच डोंगर.

समोर घरं. शाळा उंचावर होती. जणू काही एखादा गडचं! या शाळेत सुध्दा मला वरच्या वर्गांचे गणित आणि इंग्रजी हे विषय देण्यात आले. वर्गात गेलो . पूर्वीच्या अनुभवाप्रमाणे मुलांशी खेळांतून ओळख करून घेतली. गाणी, गोष्टी व खेळ यांच्या माध्यमातून मुलांची मनं जिंकून घेतली. एकदा का मुलांना आपलंसं करून घेतलं की, पुढील काम खुप सोपं जातं.

मुलांचा अध्ययन स्तर पाहून त्यांचे पाडले. प्रत्येक गटात एक गटप्रमुख नेमला. त्यांना वेळेचे नियोजन देऊन अभ्यास दिला. औरंगपूरच्या शाळेच्या अनुभवाने मला आता येथील मुलांना शिकण्यासाठी चांगले उपक्रम व अनुभव देण्यासाठी फारशी अडचण आली नाही.मुलं खेळात , चित्रकलेत छान कामगिरी करत. बरीचं मुलं गोड गायची.नृत्य छान करायची.पण या गावात बरेचं पालक शेतमजूर असल्याने ते मुलांना पण कापूस वेचायला व इतर कामासाठी सोबत न्यायचे . त्यामुळं मुलांची 20% अनुपस्थिती होती.यावर उपाय म्हणून आम्ही त्यांच्या गृहभेटी करणे, त्यांचं उदबोधन करणे, शाळेतील खिचडी अधिक दर्जेदार करणे, आशा मुलांना अभ्यासाचं साहित्य वाटणे , खेळ घेणे , निसर्ग सहल काढणे इत्यादी उपक्रम सुरू केले. प्रत्येक विषयांच्या आम्ही स्वाध्याय फाईल्स तयार केल्या त्यामुळं मुलांना घरी त्या पूर्ण करण्याचं आव्हान मिळालं. ज्या।मुलांनी वेळेत काम केलं त्यांचा फुल देऊन आम्ही कौतुक करू लागलो. जे मुलं त्यांचा अभ्यास पूर्ण करू लागले त्यांचा आम्ही आता bright students म्हणून गौरव करू लागलो. त्यामुळं इतरही मुलं या स्पर्धेत उतरली आणि याचा खूप मोठा फायदा झाला. एक दोन मुलं सोडली तर आता कुणीही अनुपस्थित राहतं नव्हतं. आम्ही आता आमचा परिपाठ देखील आकर्षक केला. परिपाठात म्हणी कविता, इंग्रजी कोडी, इंग्रजी बोलणे, गणिताचे सूत्रं सांगणे , तोंडी गणित सोडवणे आणि सामान्य ज्ञान, आजचे जोडाक्षरे युक्त वाक्य वाचणे इत्यादी नाविण्यपूर्ण उपक्रम सुरू केले .त्याच वर्षी 27 फेब्रुवारीला माझं लग्न झालं. माझी पत्नी जालना जिल्ह्यात शिक्षिका होती. तिची बदली मी माझ्याचं शाळेत करून घेतली. आता आम्ही दोघे पतिपत्नी शाळेचा कायापालट करण्यासाठी काम करू लागलो.

पुढील वर्षी आम्ही सुरुवातीलाच वर्षभराचे नियोजन केले. त्यानुसार आमचे उपक्रम चालू होते. मराठीच्या पठाडे मॅडम यांचा आवाज अत्यंत गोड होता. त्यांनी बरीच गीतं आणि प्रार्थना पेटीवर बसवून मुलांकडून गाऊन घेतल्या. त्यांच्या या उपक्रमामुळे मुलांची उपस्थिती आता 100% राहू लागली. आम्ही आमचा अभ्यासक्रम लवकर संपवून त्यांची नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी घेऊ लागलो. मी गणित, बीडकर मॅडम बुद्धिमत्ता व पठाडे मॅडम मराठी चा अभ्यास घेतं.आता आमच्या शाळेची गुणवत्तेची गाडी सुसाट धाऊ लागली . मुलांची गुणवत्ता पाहून पालकदेखील जाम खुश होते.पुढे पठाडे मॅडमची बदली झाली. त्यांनी त्यांच्या उत्कृष्ट कामाची छाप शाळेवर टाकली होती. त्या मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम खूप छान बसवून घ्यायच्या. त्यांच्या जागेवर गणिताचे एक उत्कृष्ट शिक्षक श्री पिंपरखेडकर सर आले.दुसऱ्या वर्षी आम्ही आमच्या मागील उपक्रमांचा धडाका लावला. शाळेचं बाह्य सौंदर्य वाढवण्यासाठी आम्ही काही मोठया कुंड्या आणून त्यात फुलांची झाडं लावली . शाळेसमोर खड्डे करून तिथे काही झाडं लावून शाळा हिरवीगार केली आता परिपाठ अधिक आकर्षक होण्यासाठी आम्ही दोन ढोल , एक ताशा, एक ट्रॅंगल आणून त्यावर राष्ट्रगीत घेऊ

लागलो. मुलांची उत्कृष्ट लेझीम बसवली. सकाळी आम्ही 30 मिनिटं लवकर येऊन मुलांच्या इंग्रजी कविता, पाढे व इंग्रजी व्याकरण घेतलं. दुपारी जेवणाची सुट्टी तीस मिनिटांची केली व त्या वेळेत आम्ही नवोदय व शिष्यवृत्तीची तयारी घेतली.बीडकर मॅडमनी गणित , मी मराठी व पिंपरखेडकर सरांनी बुद्धिमत्ता चाचणीचा कसून सराव करून घेतला.गणिताच्या , मराठीच्या व इंग्रजीच्या आमच्या स्वनिर्मित फाईल्स खूप काम करू लागल्या. त्यामधून मुलं दररोज 50 उदाहरणं सोडवू लागली. इंग्रजीच्या वाक्यांचा सराव करू लागली. परिच्छेद वाचून त्यावरील प्रश्न सोडवू लागली.

या सर्व उपक्रमांचा फायदा आम्हाला दिसून आला. शिष्यवृत्ती परीक्षेत 95% मुलं उत्तीर्ण झाली.

एक मुलगा नवोदयसाठी पात्र ठरला.प्रत्येक जण मुलांकडे वैयक्तिक लक्ष देऊन , अधिक सराव देऊन मुलं शिकण्यासाठी धडपड करीत होती .या कामातून आम्हाला खूप आनंद आणि समाधान मिळत होतं.त्यावेळी शिक्षणमंत्री श्री पुरके साहेबांनी वाचन लेखन कार्यक्रम सुरू केला होता. पण आम्ही शब्दांचे , वाक्यांचे आणि गणिताच्या संख्येच्या व उदाहरणांच्या स्वाध्याय फाईल्स तयार करून त्यांचा सराव घेणं अगोदरपासूनचं चालू केलं होतं ; त्यामुळे आमच्या मुलांना हे शब्द , वाक्य वाचनं, गणित करणं अवघड गेलं नाही. मी मराठीच्या जोडशब्दांचे , वाक्यांचे , इंग्रजीच्या शब्दांचे व वाक्यांचे काही तक्ते तयार करून मुलांना ते घरी भिंतीवर चिकटायला सांगितली. मुलांनी तसं केलं. त्याचा चांगला परिणाम झाला. मुलांच्या मोठया भावांनी / पालकांनी ते तक्ते वाचून, लिहून घेतले. त्यामुळे मुलांचा छान सराव झाला

मराठी, इंग्रजी व गणिताचे प्रत्येकी 200 स्वाध्याय काड्र्स आम्ही तयार केले होते. या सर्व साहित्याचा आम्हाला खूप फायदा झाला. त्यातील प्रत्येक विषयाचे एक स्वाध्याय कार्ड् मुलं पूर्ण करून आणू लागली.

प्रजासत्ताक दिन जवळ आला होता. त्यावर्षी आम्ही मुलांचा उत्कृष्ट कार्यक्रम बसवला. भरपूर बक्षीस मिळाले. शाळेबद्दल पालकांना प्रेम व अभिमान वाटू लागला.

20 ऑगस्ट 2001 रोजी मला कन्यारत्न प्राप्त झालं.माझी मुलगी लहान असल्यानं आम्ही गावातचं राहायचं ठरवलं.आम्ही एक वर्ष गावात राहिलो. त्याकाळात मी शाळा सुटल्यावरही वरच्या वर्गातील मुलांचा गणित व इंग्रजीचा अभ्यास घ्यायचो. शनिवारी व रविवारी दोन तास मुलांचे खेळ घ्यायचो. नंतर मी औरंगाबादला राहायला गेलो.याच शाळेत असतांना मला 2010 मध्ये पुत्रप्राप्ती झाली. त्यामुळं ही शाळा मला सर्वात लकी ठरली असं म्हणावं लागेल. चांगल्या कामाचं चांगलंचं फळ मिळतं .

याप्रमाणे मी वरझडी या शाळेत तब्बल बारा वर्षे सेवा केली.

त्यानंतर दोन वर्षे मी थोडा अस्थिर झालो होतो .माझी बदली दोन वर्षात दोनदा झाली! 2012 ते 2013 पर्यंत मी गंगापूर तालुक्यातील अगरवाडगाव येथे काम केलं. त्यानंतर पुढच्याच वर्षी मे 2013 ला

गणोरी हायस्कुल येथे बदली झाली. तेथे मी जुलै 2014 पर्यंत होतो. जुलै 2014 मध्ये मी प्रमोशनने उच्च प्राथमिक शाळा सांजखेडा येथे भाषेचा पदवीधर म्हणून रुजू झालो.

## पर्व चार

**उच्च प्राथमिक शाळा सांजखेडा**

सांजखेडा येथील माझ्या शिक्षणप्रयोगांचे अनुभव सांगण्यापूर्वी मला गणोरी हायस्कुल मधील माझ्या चौदा महिन्यांच्या अनुभवाबद्दल थोडं बोलायचंय.हायस्कुल मध्ये प्रत्येक शिक्षकांना विषय दिलेले असतात. दररोज सात –आठ तासिका घ्याव्या लागतात.पण ह्या 30 मिनिटांच्या तासिका खरचं पुरेशा असतात का हा माझ्या मनातला प्रश्न आहे . तीस मिनिटात मुलं कशी शिकतील , किती समजून घेतील व शिक्षकांशी किती आंतरक्रिया करतील हे प्रश्न मला येथे पडले होते. त्यामुळं पाचवीपर्यंत मुलांचा पाया व मूलभूत संबोध, संकल्पना स्पष्ट होणं , त्यांचं आकलन होणं हे खूप गरजेचं आहे.मी आठवीचा वर्गशिक्षक होतो.20% मुलांना मराठी व 50% मुलांना इंग्रजी वाचन्याच्या अडचणी होत्या. मी त्यांच्यासाठी वाचन पाठ तयार करून त्यांचा वापर केला. इंग्रजीच्या rhyming वर्डस व साध्या , सोप्या वाक्यांच्या मी स्वाध्याय पुस्तिका बनविल्याला .त्यांचा वापर इतर ऑफ तासिकेत येऊन केला. पुस्तकातील नवीन व अवघड शब्दांची यादी करून त्यांचा वाचन सराव करून घेतला. वाक्यांची रचना कशी करतात याबद्दल मुलांशी चर्चा केली. त्यांना काळ व वाक्यांचे प्रकार उदाहरणे देऊन सांगितले. पटपट इंग्रजी व मराठीचा अभ्यासक्रम पूर्ण केला .इतर शिक्षकांच्या आठवीच्या वर्गावरील बुलेटीन तासिका मी घेतल्या. हे सर्व प्रयोग आठवी अ या वर्गातील होते. वरील प्रयोगांनंतर दोन महिन्यानंतर 90% मुलं आता बऱ्यापैकी इंग्रजी वाचू लागले. त्यांना वाक्ये बनविता येऊ लागले. इंग्रजी समजू लागली.

इंग्रजीच्या तुलनेत मराठीचा सराव लवकर झाला. 100% मुलं मराठी वाचू लागली, श्रुतलेखन करू लागली.मुलांना मी घरी मराठीचे व इंग्रजीचे आव्हानं देऊ लागलो. मुलं आता मला गणिताच्या ही काही अडचणी विचारू लागली. मी त्यांचे पूर्ण संमाधान करू लागलो. मुलांमध्ये प्रचंड आत्मविश्वास आला होता. तिनंच महिन्यांत मुलांच्या मनात मी घर केलं होतं. ती माझ्याशी मोकळेपणाने बोलू लागली. मुलं आता मराठीच्या व इंग्रजीच्या छोट्या छोट्या कविता करू लागली. इंग्रजी बोलू लागली.पालकांच्या चांगल्या प्रतिक्रिया येऊ लागल्या. मुख्याध्यापक श्रीमती गौशिया मॅडम यांनी त्यावर्षी माझा वर्ग पूर्ण प्रशालेतून सर्वोत्तम वर्ग म्हणून निवडला .आम्हाला खूप आनंद झाला.पण जेव्हा माझी पदवीधर म्हणून बढती झाली तेंव्हा मी मुलांना सांगितलं की , आता मला नवीन शाळेत जावं लागेल. तेंव्हा मुलांच्या चेहऱ्यावर नाराजी व दु:ख पसरलं . काही मुलं म्हणाली , "सर, प्रमोशन घेणं आवश्यकच असतं का ?" तुम्ही तुमचं प्रमोशन रद्द करा.इथंच रहा अशी विनवणी करू लागली. माझ्याही मनात to go or not to go असं झालं होतं. मनात विचारांचं द्वंद्व चालू होतं. मी खूप विचार केला. मला वाटलं एवढी मोठी शाळा बदलण्यापेक्षा एखादी मध्यम विद्यार्थी संख्या असलेली शाळा बदलणं सोप्प आहे.मी त्यांची कशीबशी समजूत घातली . मी जातांना मुलांच्या डोळ्यात पाणी आलं.

त्यांना पाहून मलाही मनातून वाईट वाटलं. तिथं चार पाच वर्षे राहून काहीतरी वेगळं काम करावं असं मलाही वाटलं ; पण माझ्या बढतीच्या स्वार्थी विचारानं आणि औरंगाबाद तालुक्यात जाण्याची संधी या दोन कारणांमुळे मी तेथून जाण्याचं ठरवलं.

मी सांजखेडा येथे 14 /07/14 रोजी रुजू झालो. आता मी एक परिपूर्ण व अनुभवी शिक्षक झालो होतो. माझ्याकडं आता विविध अनुभव व उपक्रमांचा साठा होता. मला माझ्या विद्यार्थ्यांनीचं एक चांगला व कुशल शिक्षक बनवलं होतं.मी सांजखेडा शाळेत रुजू झाल्यावर तिथं माझं एक दोन दिवस मनचं लागलं नाही . पूर्वीच्या शाळेची, तेथील माझ्या वर्गातील मुलांची मला आठवण।येत होती. नंतर मुलांशी बोललो. गप्पा मारल्या. त्यांना त्यांच्या आवडीनिवडी विचारल्या. मी पण माझा परिचय नेहमीसारखाचं मुलाखतीच्या स्वरूपात करून दिला. मुलांना मी गाण्याच्या, गोष्टींच्या व मैदानावरील खेळांच्या माध्यमातून इथंही आपलंसं केलं.

मात्र येथील मुलं पटकन माझे दोस्त बनली. मला येथील मुलं खुपचं लवकर एखादी नवी गोष्ट ग्रहण करतात हे समजलं. मला पाचवी ते आठवीचे इंग्रजी व मराठी विषय देण्यात आले.

मुलांचा अभ्यास घेतांना मला मुलांच्या इंग्रजी व गणित या दोन विषयावर काम करावं असं कटाक्षानं वाटलं.मुलांना इंग्रजी वाचन, संभाषण करतांना खुपचं अडचणी यायच्या.मराठीचं श्रुतलेखन यामध्ये मुलं चुका करायची. काही इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मुलं छान इंग्रजी बोलतात याचं मला फार कौतुक वाटायचं . मग ग्रामीण भागातील मुलं का नाही तसं फाडफाड इंग्रजी बोलू शकतं ?जर नियोजनबद्ध व सोप्या पद्धतीनं , विविध उपक्रम सुरू करून व त्यात सातत्य ठेवलं तर हे शक्य आहे असं वाटतं होतं.ग्रामीण भागातील मुलेही उत्कृष्ट इंग्रजी बोलू , वाचू शकतात , गणित , विज्ञान सुद्धा विविध अनुभवातून शिकू शकतात या बाबी सत्यात उतरवण्यासाठी आम्ही एक दिवस बसून चर्चा केली.

मुलांची गुणवत्ता वाढवण्यासाठी मी सर्व शिक्षकांनी एक प्रतिज्ञा घेतली, वसा घेतला की, प्रत्येकांनी अप्रगत मुलांसाठी 1 ते दोन तास जास्तीचा द्यायचा .तसेच येत्या वर्षभरात स्वप्नातील शाळा निर्माण करायची! याच काळात एक दिवस केंद्राचे केंद्रप्रमुख जे अत्यंत कष्टाळू व उत्कृष्ट वक्ते आहेत त्यांनी शाळेला भेट दिली. त्यांनी आम्हाला गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रेरित केलं . एकदा का गुणवत्ता वाढली की, पालकांना शाळा आवडायला लागेल . त्यांचे सहकार्य मिळेल. त्यानंतर आपण शाळा I.S.O मानांकित करू अशी योजना सांगितली.यासाठी बिटचे विस्तार अधिकारी व अत्यंत कल्पक व 100% मुलं शिकण्यासाठी सतत धडपड करणारे श्री रमेश ठाकूर सर यांनी आम्हाला खूप सहकार्य केले. मदत केली.

आता आम्ही माझ्या पुढाकाराने शाळेचा परिपाठ मुल शिकण्यास पोषक करण्याचं ठरवलं. सर्व शिक्षकांनी मिळून दोन ढोल , दोन ताशे, दोन ट्रँगल, व एक हलगी विकत आणली. आता राष्ट्रगीत तालासुरात व वाद्यांच्या आवाजात सुरु झालं. मी परिपाठात अनेक नाविण्यपूर्ण उपक्रम सुरू केले. इंग्रजी शब्द व त्याच्यापासून काही वाक्ये व प्रश्न बनवणे,एका इंग्रजी वाक्यांचे अनेक वाक्ये तयार करणे, Doing

actions., एक छोटं संभाषण, date operation, read the card and tell the parts of speech, सूत्रावरून तोंडी गणितं सोडविणे, दैनंदिन जीवनातील बेसिक उदाहरणे तोंडी सोडवणे, Who am I ?, का व कसे ? , आजचा प्रयोग, माझे कार्ड वाचा , अंक कार्डावरून संख्या बनवा व इंग्रजीत सांगा इत्यादी उपक्रम मुलं परिपाठातचं करू लागले. त्यामुळे मुलांचा दररोज सहज व सतत अभ्यास होऊ लागला.

अजूनही काही मुलं इंग्रजी वाचन व संभाषणात मागे होती. मराठी श्रुतलेखनात चुका करायची. गुणाकार व भागाकार यामध्ये काही मुलं चुका करायची . यासाठी आम्हीं जबाबदाऱ्या वाटून घेतल्या. शाळेत दररोज दोघांनी पन्नास मिनिटं अगोदर जाऊन मुलांचं मराठी श्रुतलेखन, इंग्रजी संभाषण, आणि मराठी व इंग्रजी वाचन यांचा सराव करण्याचं ठरलं. नियोजनाप्रमाणे मुख्याध्यापक श्री केदारे सरांनी मराठी वाचन, पाटील मॅडमनी गणित बेसिक , आणि मी इंग्रजी वाचन, संभाषण आणि घुगे सरांनी मराठी श्रुतलेखन इत्यादी उपक्रम दोन महिने घेतले. काही रविवारी सुध्दा आम्ही जाऊन अभ्यास पूर्ण करायचो! याचा खूप छान परिणाम दिसून आला. गुणवत्तेची गाडी वेगानं धावू लागली.अजूनही काही मुलं मराठी, इंग्रजी व गणितात मागे होती. त्यासाठी मी मराठी, गणित आणि इंग्रजी सुधारण्यासाठी तब्बल दहा प्रकारच्या activity books बनविल्या. सुरुवातीला मी पाचवी ते आठवीच्या एकूण 75 मुलांना त्यापैकी तीन प्रकारच्या activity books मी स्वतःच्या पैशातून आणून दिल्या. मुलं याचा घरी उपयोग करू लागली. आता आमचे 99% मुलं प्रगत झाले. दोन तीन मुलं सतत अनुपस्थित / स्थलांतरित।होती. दोन तीन मुलं CWSN होती.मुलं आता इंग्रजी बोलू लागली.

इंग्रजीत मुलाखत घेऊ लागली, डिबेट करू लागली. विविध प्रसंगावर बोलू लागली, ऐनवेळी कोणत्याही विषयावर इंग्रजी बोलू लागली.वाचू लागली. खरवापर्यंतची संख्या लिहू अन वाचू लागली. अब्जापर्यंतच्या संख्येवरील क्रिया करू लागली. मराठी श्रुतलेखन अचूक करू लागली. कविता व गोष्टी लिहू लागली. प्रयोग करू लागली. याच वेळी महाराष्ट्राचे शिक्षण सचिव मा. नंदकुमार साहेबांनी PSM ( प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र) हा महत्वाकांक्षी कार्यक्रम सुरू केला होता. महाराष्ट्रातील प्रत्येक मुलं शिकलं पाहिजे यासाठी त्यांनी शिक्षकांना नवप्रेरणा व उर्जा दिली. कुमठे बिटमधील रचनावाद व त्याची जादू सगळीकडे पसरली होती. मी देखील माझ्या सहकार्यासोबत व मा. ठाकूर साहेबांसोबत कुमठे बिटचा दौरा केला. राकुसलेवाडी ही सुतार सरांची 100% प्रगत असलेली एक अदभुत शाळा मी पाहिली.

असं म्हटलं जातं इच्छा तेथे मार्ग असतो. या उक्तीनुसार कुमठे बिटच्या आदरणीय भराडे ताईंच्या मार्गदर्शनाखाली तेथील कष्टाळू व कल्पक शिक्षकांनी रचनावादाने 100% बिट प्रगत करून दाखवण्याची किमया केली होती. रचनावाद व प्रत्येक मुलं कसं शिकु शकतं यावर अनेक कार्यशाळा झाल्या. आम्हाला आता पटलं की, आम्ही सुध्दा तसं करू शकतो. त्यानुसार आम्ही विविध उपक्रम घेऊन आमची शाळा 2014 च्या मार्चअखेर प्रगत करून दाखवली.आमची मूल इंग्रजीत विविध उपक्रम सहज सादर करू लागली. फाड फाड इंग्रजी बोलणारी मुलं असणारी व 100% प्रगत शाळा म्हणून आमची शाळा प्रसिद्ध झाली. अनेक वृत्तपत्रात आमच्या मुलांच्या गुणवत्तेच्या बातम्या येऊ लागल्या. 2015 – 16 दरम्यान आदरणीय नंदकुमार साहेबांनी व शिक्षणमंत्री मा. तावडे साहेबांनी पूणे,नागपूर व औरंगाबाद येथे शिक्षणाची वारी आयोजित केली

होती .वारीत या तिन्ही ठिकाणी आमच्या शाळेतील 30 मुलांचा संघ` live spoken English activities ` सादर करण्यासाठी सहभागी झाला. मुलांनी अफलातून असे इंग्रजी बोलण्याचे विविध उपक्रम सादर करून तमाम महाराष्ट्रातील शिक्षक व अधिकाऱ्यांचे मनं जिंकून घेतली. *खेड्यातील मुलं देखील कोव्हेंटच्या मुलासारखं असखलीत व आत्मविश्वासाने इंग्रजी बोलू शकतात हे सर्वप्रथम आमच्या शाळेतील मुलांनी सर्वांना दाखवून दिलं.

याचा परिणाम असा झाला की, पालकांनी आता शाळेला भरभरून मदत केली. शाळेला जमीन दान दिली, सुमारे चार लाखांचा निधी दिला .मैदानावर गट्टू बसवले, ग्रामपंचायतीने ग्रीन शेड बसविले. त्यानंतर लगेच शालेय व्यवस्थापन समिती , पालक व शिक्षकांच्या मदतीनं आम्ही शाळेला ISO प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रयत्न केले. आम्हाला आमच्या अविरत प्रयत्नांचे अखेर गोड फळ मिळाले. शाळेला आय. एस., ओ. प्रमाणपत्र मिळाले.आता शाळा भौतिक सुविधा आणि मुलांची उत्कृष्ट गुणवत्ता या दोन्ही बाबतीत समृद्ध झाली होती.आम्हाला याचा खुपचं आनंद झाला. एका स्थानिक कंपनीने मुलांची गुणवत्ता पाहून शाळेला कंपाऊंड वॉल, स्वच्छता गृह, फरशी, सोलर प्लांट, खिडक्या दरवाजे बदलणं, दोन ई लर्निंग किट्स इत्यादी सुविधा दिल्या.

त्यानंतर काही दिवसांनी ABP माझा या मराठी वृत्तवाहिनीने आमच्या शाळेची मुलं कशी इंग्रजी बोलतात याची साडेचार मिनिटांची बातमी TV वर दाखवली .सर्व मुलं , पालक, आणि शिक्षक जाम खुश झाली होती. आमचे कष्ट फळाला आले होते. हा सर्व बदल रचनावाद, PSM व आमच्या सर्व शिक्षकांच्या प्रयत्नामुळे झाला होता. शाळेची पटसंख्या आता 150 वरून 195 पर्यंत गेली. विविध जिल्ह्यातील व आमच्या जिल्ह्यातील शिक्षक आमच्या शाळेला भेटी देऊ लागले. अनेक वरिष्ठ अधिकारी शाळेला भेटी देऊ लागले. विधान सभेचे अध्यक्ष, श्री हरिभाऊ बागडे आणि आमदार श्री भुमरे साहेब यांनी देखील शाळेला भेट दिली. केरळच्या डायटच्या टीमने देखील शाळेला भेट देऊन मुलांचे तोंडभरून कौतुक केले . मुख्याध्यापक केदारे सर यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागेवर श्री त्र्यम्बक पुनवटकर सर हे नवे मुख्याध्यापक म्हणुन रुजू झाले.त्यांनी देखील मागील गुणवत्तेत अधिक भर टाकणार काम केले. ते अत्यंत कल्पक व संवेदनशील मुख्याध्यापक होते.त्यांच्या काळात आम्ही निसर्ग सहल, आनंदनगरी, क्रीडास्पर्धा, क्षेत्रभेटी, तज्ज्ञांची व्याख्यानं आयोजित करणे, सामान्य ज्ञानाची कोण` होईल ज्ञानपती? , सरप्राईज टेस्टस, बाल सभा आयोजन, विज्ञान प्रदर्शन, इंग्रजी व गणित जत्रा, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम सुरू केले .

त्याशिवाय शाळेच्या प्रांगणात 100 झाडं लावणं, गुऱ्हाळला भेट देणे, साखर कारखान्याला भेट देणे, आईवडिलांचं ऋण व्यक्त करण्याचा उपक्रम घेणे, निसर्ग सहलीचे आयोजन, प्रत्यक्ष झाडाखली व नदीच्या पात्रावर वाळूत बसून नदीचं आत्मवृत्त यासारखी पाठ शिकवणं, The best class of the week हा उपक्रम घेणे, कोण होईल ज्ञानपती? , मेगा सरप्राईज टेस्टस घेणं, विविध मनोरंजक कृतीयुक्त खेळ घेणे , आजारी मुलांना पूर्ण वर्गासहित जाऊन भेट देणे इत्यादी उपक्रम आम्ही येथे राबविले.

आतापर्यंतच्या माझ्या 23 वर्षातील माझ्या सेवेतिल सांजखेडा येथील काम हे मला सर्वोत्तम वाटतं.

यासाठी आम्हाला PSM कार्यक्रम , आदरणीय नंदकुमार साहेबांची प्रेरणा, आद. ठाकूर सर, खांडेभराड नाना, आद. बेदरे सर या सर्वांची खूप मोठी प्रेरणा व मार्गदर्शन मिळालं.

सांजखेडा येथे मी एकूण पाच वर्षे सेवा केली. त्यानंतर माझी बदली गारखेडा केंद्रातचं केंद्रीय शाळेवर जून 19 रोजी झाली.

## पर्व पाच :-

उच्च प्राथमिक शाळा गारखेडा नं. एक.

मी 16 जून 2019 रोजी गारखेडा नंबर एक या केंद्रीय शाळेत रुजू झालो . येथील शाळेचे मैदान खूप मोठे आहे. शाळा खूप सुंदर आहे. शाळेच्या प्रांगणात आकाशाला भिडणारी चिंचेची व लिंबाची भरपूर उंचच्या उंच अशी झाडं आहेत. शालेय प्रवेश करताच येथील बाग व झाडं मनं प्रसन्न करतात. सगळा शीण जातो. मरगळ दूर होते. मनात एक चैतन्य व उत्साह संचारतो.शिक्षकांशी बोललो, परिचय झाला.शिक्षकांनी आणि मुलांनी माझं स्वागत केलं. परिपाठ झाला. परिपाठात बदल करायचं ठरवलं. मागील शाळेतील परिपाठ व तेथील उपक्रमांची भरपूर मोठी शिदोरी आता माझ्याकडे होती.इंग्रजी शब्द आणि वाक्ये बनवणं, इंग्रजी व मराठीचे कार्ड वाचणे, खरवापर्यंतची संख्या बनवणं, इंग्रजी कोडी, changing sentences, इंग्रजी संभाषण,रोज एक प्रयोग , गणित, मराठी, सामान्य ज्ञान, date operation, Realia activity, making spellings, प्रश्न माझ्या मनातला, action ॲक्टिव्हिटी, सामान्य ज्ञान, भाषांतर इत्यादी उपक्रम परिपाठात हळू हळू सुरू केले. याचा परिणाम मी मागील सर्व शाळेत अनुभवला होता. शाळेतील उपस्थिती वाढविणे, पालकांचं सहकार्य घेणं, आणि शाळेची गुणवत्ता वाढवणं यासाठी आम्ही शिक्षकांनी एकत्र बसून चर्चा केली. त्यामध्ये असं ठरलं की, आम्ही सर्वांनी पगारातून प्रत्येकी दहा पाच हजार रुपये वर्गणी करून शाळेला खेळाचे साहित्य, ढोल, ताशा, ट्रॅंगल, वायरलेस माईकस आणायचे.त्यानुसार आम्ही काम सुरू केलं. मुलांना खेळण्यासाठी भरपूर साहित्य मिळाले. मुलं जाम खुश. उपस्थिती वाढली. परिपाठ आता रंगू लागला. मुलं प्रत्येक उपक्रमात भाग घेऊ लागली. त्यांची इंग्रजीची आणि गणिताची भीती दूर झाली.

मुलांचे खेळाचे कौशल्य छान होते. मराठीत मुलं चांगली होती. याठिकाणी पूर्वी उपक्रमशील व कष्टाळू शिक्षक नवपुते सरांनी चार वर्षात खूप बदल केला होता. मुलांमध्ये उत्साह होता. त्यामुळं मला याचा फायदा झाला.पण मुलांच्या इंग्रजी आणि गणितावर खूप काम करणं आवश्यक होतं. इंग्रजी वाचन , संभाषण, मराठी श्रुतलेखन यावर आम्ही सुरुवातीला काम करायचं ठरवलं.मी इंग्रजी व मराठी, केळकर मॅडमनी गणित, किरण जाधव सर यांनी बेसिक गणित घ्यायचं ठरलं.शाळा औरंगाबाद पासून फक्त अठरा किलोमीटर होती.नवीनच महामार्ग झाला होता , त्यामुळं शाळेत जायला फक्त 20 ते 30 मिनिट लागायची. त्यामुळं लवकर कामं आटोपून आम्ही दररोज सकाळी एक तास लवकर शाळेत जाऊ लागलो. तेथे इंग्रजी संभाषण, वाक्य व प्रश्न बनविणे,

त्यांचा वाक्यांत वापर करणे, मराठी श्रुतलेखन, गणितं सोडवण्याचा सराव , पाढे पाठांतर, इत्यादींचा सराव आम्ही सुरू केला.मुलांचे त्यांच्या अभ्यासानुसार व गरजेनुसार गट केले. विषयमित्र नेमून दिले. मुलांना प्रेरणा देण्याचं काम केलं. त्यांची शिकण्याची जिज्ञासा जागृत करण्यासाठी त्यांना विचार करण्यास भाग पाडणारे कामं दिली. उदा.झाडं कशी व का वाढतात? आपली पृथ्वी फिरते मग आपण, आपली घरं का फिरतांना दिसत नाही? तुम्ही मनानं गोष्ट/कविता लिहू शकता काय? इंग्रजीत वाक्य कसं बनतं? कोणकोणत्या शब्दांचा जास्त वापर केला जातो ? फुलांचा रंग,मुलांचे रंग वेगवेगळे का? व्यायाम किंवा कष्टाचं काम नाही केलं तर शरीरावर काय परिणाम होईल ?इत्यादी प्रश्न आम्ही टप्याटप्याने त्यांना दिले.मुलं त्यावर काम करू लागली. गूगल, you tube वर याची माहिती सर्च करू लागली.

वेध ग्रुपमधील आंतरराष्ट्रीय शिक्षण विचार आम्हाला समजला. मुलं स्वतः शिकू शकतं ते दिलेलं आव्हान पूर्ण करू शकतं, अभ्यासक्रम चार महिन्यात पूर्ण होऊ शकतो आणि मुलं तंत्रज्ञानाचा वापर करून सुध्दा शिकू शकतं या आम्हाला पूर्वी अशक्य वाटणाऱ्या गोष्टीवर आमचा विश्वास बसू लागला.आमच्या बऱ्याच मुलांनी एका आठवडयात मराठी , हिंदीचे सर्व धडे वाचून काढली. दोन तासात काही मुलांनी 300 तर काही मुलांनी 400 च्या वर इंग्रजी वाक्ये लिहून दाखविली .मराठी बोलताना आपण किती इंग्रजी शब्द बोलतो याची यादी मुलांनी घरून करून आणली. असे 180 ते 200 शब्द मुलांनी शोधून , आठवून , विचारून लिहून आणले.म्हणजे आपण दररोज अनेक इंगजी शब्दवापरत असतो याची आपल्याला जाणीव सुद्धा नसते. त्यामुळं आपण थोड्या प्रयत्नाने व सरावाने इंग्रजी बोलू शकतो असा आत्मविश्वास मुलांना आला होता.मी दररोज वापरली जाणारी 200 इंग्रजी शब्द, क्रियापद, विशेषणं, सर्वनाम, सामान्य नाम, सहाय्यकारी क्रियापदांची यादी मुलांना दिली. त्यांचे मराठीतील अर्थ शोधून आणण्यास सांगितले. बऱ्याच मुलांनी अर्थ शोधले , इतर मुलांना या मुलांनी व आम्ही अर्थ सांगितले. वाक्य व प्रश्न कसे बनते याचे तंत्र मी त्यांना सांगितले. व त्या वाक्यांचे उपयोग कसे करावे हे सांगितले. Action activity च्या उपक्रमातून त्यांना काळाचे वाक्ये कसे ओळखायचे हे प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून सांगितले. त्यानंतर इंग्रजी कोडी, रियालिया , दररोज एक इंग्रजी गोष्ट ऐकण्यासाठी देणे, स्वतः इंग्रजी बोलणे , इंग्रजीतून सूचना देणे, छोटी संभाषण घेणं इत्यादी उपक्रम सुरू केले.विषयमित्र त्यांचं काम छान पद्धतीनं करीत होती.दररोजच्या सरावाने आता आमची 100% मुलं इंग्रजी बोलू लागली.वाचनासाठी प्रथम rhyming words चा वाचनासाठी सराव करून घेतला. त्या शब्दांचे 200 इंग्रजी वाक्ये बनवून घेतले. त्यांचा दररोज वाचन सराव घेतला. इंग्रजीच्या कविता चालीवर गाऊन घेतल्या. वाचून घेतल्या. मोठी वाक्ये वाचून घेतली. वाचन सरावासाठी मी तब्बल दोनशे वाक्यांचे काड्‌र्स बनवून घेतले . त्यांचा सराव विषयमित्र घेऊ लागले. गणिताच्या महत्वाची सूत्रं यांची काड्‌र्स मुलांना वाटली. आता मुलं या सूत्रांचा वापर करून तोंडी उदाहरणे सोडवू लागली. दररोज किमान वीस इंग्रजीचे व मराठीचे शब्द व वाक्ये मुलं वाचू लागली , त्यांचे श्रुतलेखन करू लागली. ज्या मुलांचा परिपाठ असायचा त्या मुलांना एक तास सर्व साहित्य खेळायला मिळायचं. आठवड्यातून तीन दिवस आम्ही त्यांचा खो –खो , कबड्डी, धावणे, बॅडमिंटन, व क्रिकेट हे खेळ आलटून पालटून घ्यायचो.ऑगस्ट महिन्यापासून मी आणि माझे मुख्याध्यापक रविवारी सुध्दा शाळेत जाऊन चार तास मुलांना शिकवायचो .आता आमच्या मुलांचा अभ्यास बहरत चालला होता. मुलं छान व्यक्त

होत होती. कविता, गोष्टी लिहू लागली. भाषण करु लागली. 15 ऑगस्टला आमच्या 20 मुलांनी इंग्रजीतून भाषणं केली.पालकांना मुलांचा अभ्यास समजू लागला.

दिवाळीनंतर ठाकूर सरांनी सरपंच , अध्यक्ष आणि पन्नास पालकांना वाबळेवाडी या आंतरराष्ट्रीय शाळेला भेट देण्यास सांगितले. मी त्यांच्यासोबत दुसऱ्यांदा तेथे गेलो. तेथील अदभुत वातावरण पाहून सर्व पालक खूप प्रभावित झाले. त्यांनी नंतर शाळेच्या मैदानाच्या समोरील भागात गट्टू बसविले. मैदानाचे सपाटीकरण केले. शाळेची सुंदर व आकर्षक अशी कमान बसविली. शाळेची एक खोली दुरूस्त केली. हातपंपावर मोटार बसविली. 100 झाडं लावली. आता गावकरी शाळेसाठी झटू लागले. शाळेचा चेहरामोहरा बदलण्यासाठी कंबर कसली. शाळेचे अध्यक्ष श्री लक्ष्मण चौधरी व सरपंच श्री शैलेश भाऊ चौधरी व ईतर पालकांनी स्वत: शाळेसाठी हातात फावडं , टिकाव घेऊन श्रमदान केलं. त्यांचं आम्हाला वेळोवेळी सहकार्य मिळालं आणि अजूनही मिळत आहे.

"आतापर्यंत आमच्या मुलांनी एवढा अभ्यास कधी केला नव्हता, ते कधी एवढं छान इंग्रजी बोलत नव्हते " अशी प्रतिक्रिया पालक देऊ लागली. घरी मुलांनी जास्तीतजास्त अभ्यास करावा यासाठी मी आणि केळकर मॅडमनी मी तयार केलेल्या इंग्रजी, गणित मराठी व सामान्य ज्ञानाच्या दोनशे अध्ययन पुस्तिका वाटल्या. आता मुलं पाठयपुस्तकाच्या बाहेर जाऊन अभ्यास करू लागली. मुलांना , पालकांना आता शाळा आवडू लागली. आमच्या शाळेचा अंतिम अध्ययन स्तर 90% च्या पुढे गेला.जर मार्च मध्ये कोरोनाचे संकट नसते आले तर आमच्या शाळेचे अध्ययन स्तर 100% पर्यंत नक्कीचं गेला असता.इतरही अनेक नाविण्यपूर्ण उपक्रम आम्ही राबविले. विज्ञान प्रदर्शन, आनंदनगरी, निसर्ग सहल, औरंगाबादला आम्ही तीन वेळा सहल नेली, 'तानाजी, मिशन मंगल : चित्रपट मुलांना सिनेमागृहात नेऊन दाखविले, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षा तयारी घेतली, अनेक तज्ज्ञांची व्याख्याने व तासिका आयोजित केली, व्हाट्स अँप वर मुलांचा व पालकांचा गट तयार करून त्यावर आम्ही त्यांचा अभ्यास घेणे, गृहपाठ देणे, शैक्षणिक व्हिडीओ पाठविणे, पालकमित्र म्हणून काही पालकांची मदत घेणे, महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी दप्तरमुक्त शाळा भरविणे, महिन्यातून एकदा एक मेगा सरप्राईज टेस्टस, कोण होईल ज्ञानपती यासारख्या स्पर्धा आयोजित करणे, मुलांचे गणित व इंग्रजी शिकण्याचे व्हिडिओ youtube वर अपलोड करणे इत्यादी उपक्रम आम्ही सुरू केले. त्यांचा खूप छान परिणाम दिसून आला. आमची शाळा आता 100% प्रगत झाली. 100% इंग्रजी बोलणाऱ्या मुलांची शाळा म्हणून आमची शाळा आता प्रसिद्ध झाली.

अनेक अधिकारी, विद्याप्राधिकरणचे प्राचार्य व त्यांचे सहकारी व अनेक शिक्षकांनी आमच्या शाळेला भेट दिली.मुलांचे कौतुक केले. त्यांना प्रेरणा दिली. तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी आदरणीय चव्हाण मॅडम,गारखेडा बिटचे विस्तार अधिकारी श्री ठाकूर सर, केंद्रप्रमुख श्री खांडेभराड नाना यांची आम्हाला वेळोवेळी साथ, मदत व मोलाचे मार्गदर्शन मिळाले.खर म्हणजे डीएडचे माझे वर्गमित्र व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व श्री ठाकूर सरांच्या आग्रहामुळे मी ही शाळा घेतली होती . त्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ केला. मिळालेल्या संधीचं सोनं केलं.शाळेचे मुख्याध्यापक श्री राठोड सर, सहकारी शिक्षक किरण जाधव सर, केळकर मॅडम, मूले

मॅडम, जोशी मॅडम, यांची मोलाची साथ मिळाली.माझ्या सहकारी शिक्षकांच्या सहकार्याने मला गारखेडा नं. एक या शाळेत डोंगराएवढं काम करता आले !

खरचं शाळेच्या नावाप्रमाणेच आम्ही आमची शाळा गुणवत्तेत जिल्ह्यात एक नंबरला आणली असंच म्हणावं लागेल!


श्री नितीन दत्तापा गबाले,

प्राथमिक पदवीधर शिक्षक ,

जि. प. केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा गारखेडा नं. एक ,

तालुका जिल्हा : औरंगाबाद.

मोबाईल न.9158561333

# बालरक्षक चळवळीची मुहुर्तमेढ



## जगदीश कुडे

मी मुलांचे स्थलांतर रोखण्यात 100% यशस्वी झालो असलो तरी माझे एक स्वप्न होते पालकाचे देखील स्थलांतर आपल्याला रोखायचे. मी त्यादृष्टीने काम करणे सुरु केले. परंतु मला मार्ग सापडत नव्हता. काय करावे हा माझ्यापुढे प्रश्न होता. मुलांचे तर आपण स्थलांतर रोखले. माझ्या शाळे पासून प्रेरणा घेऊन जालना जिल्ह्यातील अनेक शाळांनी विद्यार्थीस्थलांतर रोखले होते. परंतु पालकांचे स्थलांतर रोखणे एवढे सोपे काम नव्हते. कारण पोटापाण्याचा प्रश्न होता.

औरंगाबाद–हैदराबाद हायवेवरील वाटुर फाटा या ठिकाणापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर च्या माळरानावर वसला आहे श्रीराम तांडा. या छोट्याशा तांड्याची लोकसंख्या जेमतेम साडेचारशे. याठिकाणी सर्व बंजारा समाजाचे लोक राहतात. त्यांचा प्रमुख व्यवसाय मजुरी. गावात केवळ दोन चार सदन शेतकरी वगळता बाकीचे 75 टक्के लोक मजुरीसाठी स्थलांतरित होतात. आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या हे गाव मागासलेलेच.

डोंगराच्या कुशीत वसलेल्या व पक्का रस्ता नसलेल्या गावातून 1993 साली शिक्षणाची पहाट उगवली. गावातल्या मारुतीच्या मंदिरात शाळा भरायची. गावात वीज नाही, पाणी नाही, मुलांचे निरक्षर आई वडील, अठराविश्व दारिद्र्य अशा परिस्थितीत असलेल्या या तांड्यातील शाळेची स्थिती मला सुधारायची होती. थोड्या दिवसात माझ्या लक्षात आले की , इथल्या लोकांच्या कामाचे स्वरूपच असे होते की या ठिकान चे पालक मुलांना घेऊन वर्षाचे काही महिने ऊस तोडणी किंवा इतर कामे करण्यासाठी परगावी, परराज्यात जायचे. त्यामुळे अशा मुलांच्या शिक्षणात जो खंड पडतो त्याबाबत काय करायचे हा प्रश्न मला पडला. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मी पालक सभा बोलावली माझे विचार सर्वांना सांगितले. मि जे शाळे संदर्भात व गावा संदर्भात स्वप्न पाहिले आहे हेसुद्धा मी गावकरी समोर सांगितले. गावकऱ्यांनी माझ्या विचारांना सहमती दर्शवली व आपली मुले शाळेत पाठवण्यास सुरवात केली. हळूहळू शाळेमध्ये वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता कशी वाढेल यासाठी माझ्या शाळेतील सहकारी शिक्षक नसिरखाॅ पठाण सरांच्या मदतीने शैक्षणिक कार्य सुरू केले. बंजारा समाज असल्यामुळे बंजारा ही त्यांची बोलीभाषा. मीसुद्धा त्यांच्यासोबत संपर्क साधण्यासाठी संवाद वाढवण्यासाठी बंजारा बोली भाषा शिकलो.

एक दिवस मी वर्गामध्ये बाप ही कविता शिकवण्यास सुरुवात केली. शेतामधी माझी खोप, तिला बोराटीची झाप, तिथे राबतो कष्टतो माझा शेतकरी बाप. लेतो अंगावर चिंध्या खातो मिरची भाकर , काढी उसाची पाचट जगा मिळाया साखर, काटा त्याच्याच का पायी काय केलं त्यांन पाप, तिथे राबतो कष्टतो माझा शेतकरी बाप. ही कविता मी जेव्हा शिकवायला सुरुवात केली तेव्हा मला वर्गातील एका मुलींनी कविता शिकवत असताना गुरूजी ही कविता शिकवू नको थांब कारण मला माझा बाप या कवितेमध्ये दिसतोय असे म्हणू लागली व ढसाढसा रडत होती. कारण त्या मुलीचे आई वडील ऊस तोडीच्या कामाला गेलेले होते. व तिथून पुढे खऱ्या अर्थाने मी त्या गावासाठी , गावातील लोकांसाठी, शाळेतील मुलांसाठी संवेदनशीलपणे काम करणे सुरू केले व हळूहळू मला माझ्या कामात यश मिळत गेले. मी शाळेतील विद्यार्थ्यांचे स्थलांतर रोखण्यात व शाळाबाह्य मुले शाळेच्या प्रवाहात आणण्यात 100% यशस्वी झालो.

मी मुलांचे स्थलांतर रोखण्यात 100% यशस्वी झालो असलो तरी माझे एक स्वप्न होते पालकाचे देखील स्थलांतर आपल्याला रोखायचे. मी त्यादृष्टीने काम करणे सुरू केले. परंतु मला मार्ग सापडत नव्हता. काय करावे हा माझ्यापुढे प्रश्न होता. मुलांचे तर आपण स्थलांतर रोखले. माझ्या शाळे पासून प्रेरणा घेऊन जालना जिल्ह्यातील अनेक शाळांनी विद्यार्थीस्थलांतर रोखले होते. परंतु पालकांचे स्थलांतर रोखणे एवढे सोपे काम नव्हते. कारण पोटापाण्याचा प्रश्न होता. खायला काही नाही, घरी जमीन नाही, हाताला काम नाही मग जगायचे कसे ? हा प्रश्न श्रीराम तांडा गावातील लोकांसमोर होता. मी ज्यावेळेस त्यांना सांगायचो कि तुम्ही स्थलांतर नाही केले तर जमणार नाही का ? त्यावेळेस ते लोक सांगायचे, गुरुजी आमच्या हाताला काहीतरी काम द्या. आम्ही इथून जाणार नाही. आम्हाला हाऊस आली नाही आमच्या लेकरा बाळांना सोडून दुसऱ्या गावाला दुसऱ्या जिल्ह्याला , परराज्याला काम करण्याची. आमची देखील मनोमन इच्छा नाही परंतु नाईलाज आहे पोटापाण्यासाठी आम्हाला भटकंती करावी लागत आहे. आमचे तिकडे मन लागत नाही .आम्हाला नेहमी आमच्या मुलांची आठवण येते. लेकरांना आमच्या वाचून करमत नाही.तुम्हाला आमच्या लेकरा वाचून करमत नाही. तुम्ही आमची लेकर शाळेमुळे आमच्यासोबत येऊ देत नाहीत. आमची लेकरं आमच्यासोबत आली तर त्याची शाळा बुडते म्हणून शाळेसाठी आम्हाला आमची लेकरं तुमच्या भरोशावर सोडून कामासाठी स्थलांतर करावे लागते. गुरुजी यावर तुम्हीच काहीतरी मार्ग काढा ?. आम्ही गरीब माणसे आहोत. आमचं कुणी ऐकणार नाही. तुम्हीच कुणाला तरी बोला .आमचं ग–हाणं सरकारच्या कानावर घाला.तुम्हीच यावर मार्ग शोधू शकता.आपले नंदकुमार साहेब आहेत ना त्यांना एकदा सांगा.नंदकुमार साहेब यावर काहीतरी मार्ग काढतील .तुम्ही जर काही मार्ग काढला तर आम्ही सुद्धा आमच्या लेकराबाळा सोबत राहू.आमच्या जीवनात काहीतरी चांगले घडेल हा भोळाभाबडा विश्वास ठेवून पालक वर्ग मला बोलत होता.मला देखील कळत नव्हते आपण यासाठी काय करावे ?मला मर्यादा पडत होत्या. मला देखील वाटायचे की आपण यांच्यासाठी काहीच करू शकत नाही. कारण माझ्या कडे कुठलाच पर्याय नव्हता की या पालकांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी.

पण  मला एक पक्क  माहीत होतं की आपण आपल्या  शाळेची  विद्यार्थी गुणवत्ता वाढवली तर नक्कीच आपल्या शाळेकडे बाहेरगावच्या लोकांचे लक्ष जाईल व  काहीतरी एक  चांगले  घडेल. मी  शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता वाढीकडे  लक्ष दिले. हळू हळू विद्यार्थी गुणवत्ता वाढायला सुरुवात झाली.श्रीरामतांडा शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता पाहून  बाहेरगावच्या मुलांनी श्रीरामतांडा  शाळेत शिकण्यासाठी  प्रवेश घेतला.  विद्यार्थी संख्या वाढली 25  विद्यार्थीपटावरची शाळा  147 विद्यार्थी पटापर्यंत  गेली.

स्थानिक श्रीरामतांडा गावातील फक्त 27 च विद्यार्थी आहेत.  बाहेर गावाहून,तालुक्याच्या ठिकाणाहून,15 खेड्यातून 120 मुले 10 स्कुल बस भरून 25 कि.मी.अंतरापासून श्रीरामतांडा शाळेत शिकायला यायला लागली. श्रीरामतांडा शाळेतील विद्यार्थी पटसंख्या 147 पर्यंत गेली.विद्यार्थी प्रवेशासाठी पालकांच्या शाळेत रांगा लागायला सुरुवात झाली.



श्रीराम तांडा शाळेचा नावलौकिक झाला.  अनेक अधिकारी पदाधिकारी  इतर गावच्या शाळा व्यवस्थापन  समित्या, स्वंयसेवी संस्था पदाधिकारी, पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते, इतर गावच्या शाळा सहली श्रीराम तांडा  शाळेला भेट द्यायला सुरू झाली. मला आनंद वाटला आपण जे काम करीत आहोत नक्कीच  त्या कामाला आता कुठे यश मिळत आहे म्हणून समाधान वाटले. शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ करण्याबरोबरच गावातील पालकांना गावातच रोजगार कसा उपलब्ध होईल या कामाच्या शोधात होतो परंतु मार्ग सापडत नव्हता. शाळा पाहण्यासाठी बाहेरगावाहून जे लोक येत होते अधिकारी पदाधिकारी येत होते ६त्यांच्यासमोर मी  गावातील पालकांना रोजगार कसा उपलब्ध करता येईल याची माहिती विचारत होतो. मला बऱ्याच जणांनी बरेच मार्ग  सांगितले. परंतु मला माझ्या  कामात यश मिळत नव्हते. मी माझे प्रयत्न सोडले नाही.

सन 2017 मध्ये  एक दिवस असेच  दुपारच्या वेळी शालेय स्वच्छता व आरोग्य या विषयासंदर्भात एका संजिवनी सक्षमीकरण व विकास संस्था औरंगाबाद  संस्थेने श्रीराम तांडा शाळेला भेट दिली. त्या संस्थेचे अधिकारी व पदाधिकारी यांनी मुलांसोबत  संवाद साधला.  स्वच्छता व आरोग्य संदर्भात त्या  संस्थेच्या टीमने शालेय मुलांची एक स्पर्धा घेतली. त्या स्पर्धेमध्ये त्यांनी काही बक्षिसे ठेवली होती. स्वच्छता व आरोग्य यावर प्रश्न उत्तर होती. आमच्या श्रीराम तांडा शाळेतील बहुतांशी मुलांनी स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. चांगल्या

पद्धतीने प्रश्नांची उत्तरे दिली होती. श्रीराम तांडा शाळेतील मुलांना भरपूर प्रमाणात बक्षिसे मिळाली. संजिवनी सक्षमीकरण व विकास संस्था औरंगाबाद संस्थेच्या अधिकाऱ्यांनी शाळेतील मुलांचे कौतुक केले. व मला शाळे बाबतीत माहिती विचारली. मला आनंद झाला. की आता मला प्रश्न मांडण्याची संधी मिळाली आहे. मी संजिवनी सक्षमीकरण व विकास संस्था औरंगाबाद या संस्थे संदर्भात माहिती त्या अधिकारी वर्गाकडून जाणून घेतली. संस्थेची ध्येय धोरणे माहिती करून घेतली. या संस्थेला आर्थिक सहाय्य कोण करते या बदल देखील माहिती त्या अधिका–यांकडून घेतली. तसेचा संजिवनी सक्षमीकरण व विकास संस्था औरंगाबाद या संस्थेला आर्थिक सहाय्य केकेएसबीएमझेड जर्मनी ही संस्था करते असे मला संजिवनी संस्थेच्या अधिका–यांनी सांगितले.

या नंतर मी श्रीरामतांडा गाव व श्रीरामतांडा शाळा बाबतीत सर्व माहिती सांगितली. शालेय गुणवत्ता, श्रीराम तांडा गावातील मुले, बाहेर गावावरून श्रीराम तांडा शाळेत शिक्षण घेण्यासाठी येत असलेली मुले, श्रीराम तांडा गावातील लोकांचा व्यवसाय, पालकाचे स्थलांतर यासंदर्भात त्या टीम सोबत चर्चा केली. चर्चेअंती ज्या मुलांना बक्षिसे मिळाली होती त्या मुलांच्या बाबतीत देखील चर्चा झाली. चर्चे अंती मी असे सांगितले की यामध्ये काही मुलांचे पालक स्थलांतरित होऊन दुसऱ्या जिल्ह्यात, राज्यात मोलमजुरी करण्यासाठी गेली आहेत. या स्थलांतरित पालकांसाठी आपल्याला आपल्या माध्यमातून काही करता येईल का ? असा प्रश्न जेव्हा मी संजिवनी संस्थेच्या अधिकाऱ्यांपुढे मांडला त्यावेळेस त्यांनी सांगितले की आम्ही आमच्या वरिष्ठां समोर तुमचा विषय 100% मांडू व सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करूत.नक्कीच आमचे वरिष्ठ अधिकारी आपणास या कामात मदत करतील असा मला त्यांनी विश्वास दिला. मला खूप आनंद झाला. माझ्या कामाला नक्कीच यश मिळेल असा आत्मविश्वास माझ्या मनात निर्माण झाला. ही गोष्ट मी तत्कालीन प्रधान शिक्षण सचिव मा. नंदकुमार साहेब यांच्या कानावर घातली. आदरणीय साहेबांनी मला सांगितले की जगदीश तु प्रयत्न करून पहा तुला तुझ्या कामात नक्कीच यश मिळेल. तू स्थलांतरित मुलांसाठी प्रयत्न करीत आहेस त्याच बरोबर तुला आता स्थलांतरित पालकांसाठी सुद्धा प्रयत्न करण्याची संधी मिळत आहे. पालकांचे स्थलांतर थांबवण्यात तुला जर यश मिळाले तर तुझ्या श्रीराम तांडा गावातील स्थलांतराचा प्रश्न कायमचा मिटेल. आदरणीय नंदकुमार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली मी पालकांचे स्थलांतर रोखण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मी त्या स्वयंसेवी संस्थेच्या सतत संपर्कात राहत गेलो. संजीवनी संस्थेच्या अधिका–यांना मी वारंवार फोन करत गेलो. शाळेतल्या प्रत्येक शालेय व सहशालेय कार्यक्रमासाठी मी त्यांना निमंत्रित करत होतो. माझ्या शाळेतील गुणवत्ता, माझे शैक्षणिक कार्य, गावकर्यां सोबत असलेला माझा संपर्क, निस्वार्थी भावनेने चालू असलेले श्रीराम तांडा गावातील काम, प्रत्येक मूल शिकावं म्हणून चालू असलेली धडपड, प्रत्येक पालक व मुल आनंदी व समाधानी असावे यासाठी जीव तोडून चाललेली माझी मेहनत हे सर्व त्याच संस्थेच्या अधिकाऱ्यांनी हेरले व मी त्यांना सांगितलेल्या कामाला त्यांनी मान्यता दिली. एक दिवस संजीवनी संस्थेचे अधिकारी माझ्या

श्रीराम तांडा शाळेत  आले. आम्ही शाळेमध्ये बैठक घेतली. या बैठकीसाठी गावातील लोकांना  बोलावले. गावकर्यां समोर व संस्थेच्या अधिका–यांसमोर  मी गावातील ज्वलंत प्रश्न  मांडले. गावात रोजगार कसा उपलब्ध करता येईल यासाठी चर्चा घडवून आणली. सुरुवातीला काही गोष्टीमध्ये  तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या.  परंतु उद्‌देश स्वच्छ साफ होता. निस्वार्थी भावनेने काम मला उभे  करायचे होते. यासाठी मी गावकऱ्यांना व स्वयंसेवी संस्थेचे अधिकाऱ्यांना  विनंती केली की आपण तांत्रिक बाबी  बाजूला ठेवून  एक सकारात्मक विचार घेऊन आपण काम सुरू करूयात. श्रीराम तांडा गावकऱ्यांनी एकमुखाने निर्णय मान्य केला. याकामी मला गावातील संजय रामजी चव्हाण व कृष्णा चव्हाण  यांनी मोलाचे सहकार्य केले. श्रीराम तांडा गावातील ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच, मा. ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य, श्रीराम तांडा गावातील गावकरी, महिला  भगिनी,  पालक वर्ग, सहकारी शिक्षक यांनी या कामांमध्ये मला मोलाचे सहकार्य केले व काम सुरू होण्याच्या दृष्टीने  हालचाली सुरू झाल्या. श्रीराम तांडा गावामध्ये महिला बचत गटांची स्थापना करणे  सुरू झाले. पुरुष बचत बचत गटाची स्थापना सुरू झाली. गाव एका ध्येयाने पेटून उठले.  गावातील लोकांना गावातच रोजगार उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न सुरु झाले.  हाताला काम मिळाल्यामुळे इतर ठिकाणी काम करण्यासाठी जावे लागायचे काही प्रमाणात कमी झाले. गावातील  मजूर वर्ग  गावातच काम करू लागला. शेतीमधील कामे सुरू झाली. गावातील मजुरांना रोजगार उपलब्ध झाला. हाताला काम मिळाले. पोटाला भाकर मिळाली. गावातील  मजुराला  गाव सोडून इतर ठिकाणी जाण्याचे काम कमी झाले . घर सोडण्याचे काम राहिले नाही.

बचत गटाच्या माध्यमातून महिलांना  वेगवेगळे प्रशिक्षण दिले गेले. आर्थिक स्वावलंबनाचे धडे दिले गेले. बचतीचे महत्त्व सर्वांना करायला लागले. आर्थिक व्यवहार कळायला लागला. प्रत्येक बचत गटाचे बँकेत खाते उघडले गेले. बँक बचत गटांना सहाय्य करण्यासाठी पुढे आल्या. श्रीराम तांडा गावामध्ये या संस्थेच्या माध्यमातून स्वंरोजगार केंद्र निर्मितीसाठी  हालचाली सुरू झाल्या. शाळेमध्ये महिला मेळाव्याचे आयोजन केले गेले. संस्थेच्या अधिकाऱ्यांना बोलावले. संस्थेच्या अधिकाऱ्यांनी महिला मेळाव्यामध्ये मार्गदर्शन केले. बचत गटांच्या प्रतिनिधी सोबत चर्चा केली.   श्रीराम तांडा गावात   नवचैतन्य निर्माण झाले. शाळा व गाव एक विचाराने काम करायला लागले. एकजुटीची ताकद सर्वांना कळाली. आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन गावात जागृत झाला. संजीवनी सक्षमीकरण  व विकास संस्था औरंगाबाद  च्या माध्यमातून श्रीराम तांडा गावातील महिला भगिनींची राज्यस्तरीय अभ्यास दौरा  काढण्यात आला.  वेगवेगळ्या गावांना भेटी देऊन त्या ठिकाणी गावाच्या एकजुटीच्या  माध्यमातून गावाचा विकास कसा घडला आहे हे दाखवण्यासाठी  या अभ्यास दौ–यांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये मा.श्री. आण्णा हजारे यांचे आदर्श गाव राळेगण–सिद्‌धी, आदर्शगाव पाटोदा ,सेंद्रिय खत निर्मीती केंद्र, तसेच वेगवेगळ्या गावात भेटी देण्यात आल्या. गावाच्या विकासासाठी जे जे  करता येईल ते ते प्रयत्न  करणे सुरु झाले. बचत गटाच्या महिलांना अभ्यास दौरा  घडवून

आणल्यानंतर श्रीराम तांडा गावात काय बदल करता येतील यावर विचार करण्यासाठी श्रीराम तांडा शाळेत बचत गटाचा मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये गाव स्वच्छ करणे, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे, घरोघरी स्वच्छता ग्रह निर्माण करणे, स्वच्छतेच्या सवयी अंगीकारणे, श्रीरामतांडा गावात रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे अशा वेगवेगळ्या विषयावर चर्चा झाली. त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. श्रीराम तांडा गावातील जवळपास 70 महिला भगिनींनी शालेय परिसर स्वच्छ करून दिला. शालेय परिसरात सडा–सारवण केली. शाळेच्या आजूबाजूला असलेली घाण, केरकचरा, वाढलेले गवत स्वच्छ केले. शाळेपासून चांगल्या कार्याला सुरुवात केली.

श्रीरामतांडा गावातील मजूर वर्गाला काम मिळण्यासाठी काही ठिकाणी सिमेंट बंधारे बांधले गेले. तसेच काही सिमेंट बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यासाठी काम करण्यात आले.काही शेतक–यांच्या शेतामध्ये



बांधबंदिस्तीची कामे करण्यात आली. काही शेतक–यांना फळबाग लागवडीसाठी थोड्या प्रमाणात मदत करण्यात आली. भाजीपाल्याचे प्लॉट घेण्यात आले. शेतकऱ्यांना स्पिंकलर घेण्यासाठी थोड्या प्रमाणात अर्थसहाय्य करण्यात आले.तसेच शेतीची अवजारे, घरगुती सौर दिवे, गरम पाण्याचे चुली, साठी अर्थसाहाय्य करण्यात आली. बचत गटातील महिला भगिनींना प्रशिक्षण देण्यात आली. वरील सर्व कामाला संजिवनी सक्षमीकरण व विकास संस्था औरंगाबाद यांच्या सहकार्याने जर्मनी येथील संस्थेकडून अर्थसहाय्य घेऊन कामे करण्यात आली.

महिलांसाठी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन श्रीराम तांडा शाळेत करण्यात आली. गावात स्वंयरोजगार निर्मिती केंद्र उभी करण्यासाठी संजीवनी सक्षमीकरण संस्थेची व गावक–यांची मदत घेण्यात आली.श्रीराम तांडा गावामध्ये स्वंयरोजगार केंद्र निर्मिती करीत असताना प्राधान्यक्रम ठरवून प्रत्येकाला वेगवेगळ्या केंद्रासाठी संजीवनी सक्षमीकरण व विकास संस्था औरंगाबाद यांच्या सह कार्याने व केके एस बी एम झेड जर्मनी यांच्याकडून काही प्रमाणात अर्थ सहाय्य मिळाले आहे. श्रीरामतांडा गावामध्ये किराणा दुकान, ससे पालन, शेळीपालन, कुकुट पालन, शिलाई मशीन, पिठाची गिरणी, मोबाईल रिपेरिंग दुकान, कडबा कुट्टी, सुतार काम साहित्य, वेल्डिंग मशीन, चिकन शॉप, कोंबडी खुराडे यासारखे अनेक लघुउद्योग केंद्राची निर्मिती श्रीराम तांडा गावात झाली.कमी भांडवलात स्वतः चा छोटासा उद्योग सुरु करता आला.

मला या ठिकाणी सांगण्यास आनंद होत आहे कि आज श्रीराम तांडा गावामध्ये वरील सर्व केंद्रे चालू आहे. गावातच रोजगार उपलब्ध झाल्यामुळे गावातील लोकांना रोजगारासाठी इतरत्र स्थलांतर करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. शेतीपुरक व्यवसायाकडे आज आमचे श्रीरामतांडा गावातील गावकरी वळू पहात आहेत. आज मला श्रीराम तांडा या गावात काम करत असताना पालकांचे स्थलांतर रोखण्यात हळूहळू यश मिळत आहे.माझी श्रीराम तांडा शाळा पाहण्यासाठी व गावातील कामे पाहण्यासाठी महाराष्ट्रातील, महाराष्ट्राबाहेरील तसेच देशाबाहेरील टिम ने भेटी दिल्या आहेत. भारताबाहेरील जर्मनी व जपान येथील शिष्टमंडळाने श्रीरामतांडा शाळेला व गावाला भेटी दिल्या आहेत. श्रीराम तांडा शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता पाहून व गावातील माझे कार्य पाहून माझ्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे विदेशातील टिम ने कौतुक केले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी स्वच्छ व निर्धोक मिळावे म्हणून पाणी फिल्टर सारखी योजना बक्षीस म्हणून दिले आहे. पाणी फिल्टर ची किंमत अंदाजे दोन लाख रुपये आहे.मला हे सर्व कार्य करण्यासाठी माझ्या श्रीरामतांडा शाळेतील सहकारी शिक्षक अविनाश लोमटे,सुषमा शेळके,सुनिता दुभळकर यांचे देखील मला खुप सहकार्य मिळाले आहे.

मला या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते की आदरणीय नंदकुमार साहेबांनी बालरक्षक चळवळीमध्ये विद्यार्थ्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी माझ्यावर जो विश्वास दाखवला , मला काम करण्याची संधी मिळाली म्हणूनच श्रीराम तांडा शाळा व गाव प्रकाश झोतात आले. पूर्ण महाराष्ट्राचे लक्ष श्रीरामतांडा गावाकडे लागले व या संधीचे मी सोने करण्याचा प्रयत्न करीत आहे.श्रीरामतांडा शाळेतील विद्यार्थी स्थलांतर 100% रोखण्यात मी सहकारी शिक्षक,शाळा व्यवस्थापन समिती श्रीरामतांडा व श्रीरामतांडा गावक–यांच्या सहकार्याने यशस्वी झालो आहे.आता माझे पुढचे लक्ष पालकांचे स्थलांतर रोखणे हे आहे. व पालकांचे स्धलांतर रोखण्यासाठी देखील ब–या पैकी यश मला संपादन होत आहे.

माझा हे लिहीण्यामागचा एकच उद्देश आहे की आपले प्रेरणादायी मार्गदर्शन व प्रत्येक समस्येवर काम करीत असतांना समस्येच्या मूळापर्यंत जाऊन माहिती घेणे व त्या समस्येवर कायमस्वरूपी काम करणे आपल्या याच प्रेरणादायी विचाराने मी भारावून जाऊन कार्य करीत आहे व मला माझ्या कामात आनंद व समाधान मिळत आहे.

जगदीश कुडे

जि.प.प्रा. शाळा श्रीरामतांडा

ता.मंठा जि. जालना.

मोबाईल:– ९४०५०६९९००

# बालरक्षकचळवळीची कडी

## पेंटू मैसनवाड



बालरक्षकाच्या चळवळीतून 100% मुलांना टॅब साठी पालकांनी प्रत्येकी सहा हजार रुपये जमा करुन दिले आहेत. आज घडीला माझ्या शाळेतील 100% मुलांकडे टॅब आहेत. ज्यावेळी कोरोना येईल याची तिळमात्र ही शंका नव्हती त्यावेळी सुरु केलेल्या या प्रयत्नाचा कोरोनाच्या काळात फलित झाले मुलांकडे टॅब असल्याने त्यांच्या Online शिक्षणातील अडथळा दूर झाला.

**(प्रेरणास्थान आदरणीय नंदकुमार साहेब तत्कालीन प्रधान शिक्षण सचिव महाराष्ट्र)**

**साऱ्या वंचित हातात**

**ठेवू अक्षरांचे दिवे**

**अन् तृषार्त ओठात**

**प्रकाशाचे गीत नवे**

**अन्न, वस्त्र, निवारा ,आरोग्य या जश्या मानवाच्या मूलभूत गरजा तसेच शिक्षण आहे. या शिक्षणावर ही सर्वांचा समान अधिकार आहे . शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळातील मुलांपर्यंत पोहचवण्याची खुप मोठी जबाबदारी शासनाने उचललेली आहे. पण काही ना काही कारणास्तव काही मुलं ही शिक्षणापासून वंचित राहतात. मग त्यात वेगवेगळी कारणे ही असतात. शारीरिक व्यंग, आर्थिक परिस्थिती, पालकांचे व्यसन, विभक्त कुटुंब, स्थलांतरित कुटुंब, शाळेची भीती, इतर मुलांच्या मानाने वाढलेले वय, न्यूनगंड अशा स्वरूपाची विविध कारणे यामुळे काही मुलं शाळेला टाळण्याचा प्रयत्न करतात . काहींच्या तर खांद्यावर बालपणापासूनच कुटुंबाची जबाबदारी पडते. या मुलांना शाळेच्या प्रवाहात आणणे कठीण होऊन जाते. परंतु मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला पाहिजे, त्यांचा शिक्षणाचा हक्क त्यांना मिळालाच पाहिजे.**

**अर्जुनासह आता एकलव्य ही घडावा**

**समतेचा प्रकाशा चौफेर पडावा**

हेच बालरक्षक चळवळीणे हेरले. स्थलांतरित होणाऱ्या मुलांना,शाळे पासून दूर पळणाऱ्या मुलांना, भुई मध्ये दडलेल्या त्याबीजाला अंकुरित करण्याचं भाग्य मला बालरक्षक चळवळीमूळे मिळाले. काही वंचित लेकरांच्या हातातील ज्ञानाच्या दिव्याने पूर्ण कुटुंब उजळून निघतयं हे बघून माझी चालण्याची गती वाढतेय.

17जून 2019 रोजी जि प दहिफळ भोंगाने केंद्र वाटूळ ता. परतूर जि जालना येथे जाँईन झालो .तत्पूर्वी के प्र मंठा जा जालना येथे 2015 दरम्यान येथे स्थलांतरित मुलांचे शंभर टक्के उपस्थिती शंभर टक्के शिक्षणासाठी प्रयत्न केले होते. तो अनुभव पाठीशी होता. त्यामुळे आपल्या नवीन शाळेत एकही मूल शाळेपासून वंचित राहणार नाही याचा मी निर्धार केला

संग्राम ज्ञानदेव बोंबले हे लेकरू अतिशय चंचल, नदीवर मासे पकडायला जाणे, मुलांची खोडी काढणे, स्थीर न बसणे, शाळेत पाऊल टाकताच शाळेतून गायब होणे असा हा संग्रामला शाळेत यायला नकोसे वाटायचे. त्यावेळी त्याला विश्वासात घेणे गरजेचे होते . त्याच्या पालकांशी मी मैत्रीपूर्ण नाते निर्माण केले.

जेव्हा जेव्हा त्यांच्या घरी जायचो तेव्हा तेव्हा त्याला आपुलकीने जवळ घ्यायचो, त्याच्याशी मित्राप्रमाणे बोलायचो तेव्हा तोम्हणायचा, "अरे हे गुरुजी तर आमच्याच घरातल्या सारखे". तेव्हा तो शाळेत यायला लागला. आज मात्र तो गुणवत्तापूर्ण शिक्षण घेतोय, इंग्रजीचे वाचन करतोय. विशेष म्हणजे तो विषय मित्र म्हणून इतर त्याच्या सवंगड्यांना शिकतोय .

अशीच आमची विद्यार्थिनी सायली गौतम साळवे वर्ग तिसरा. तिला तिचा आरोग्याचा प्रश्न भेडसावत होता. त्यामुळे ती वाचन लेखन करण्यास सक्षम नव्हती.

सातत्याने दारू पिणारे वडील, घरामध्ये असलेले शिक्षणाचे अज्ञान ,सायली अगदी अबोल

असायची . तेव्हा तिच्यातील सुप्तगुणांना हेरून त्या गुणांना वाव देण्याचा मी प्रयत्न केला. त्यामुळे तिचे शाळेत न येण्याचे प्रमाण कमी झाले. आज ती नेहमी शाळेत येत आहे. तिचा बेसिक पाया तयार करून तिला शाळेच प्रवाहात आणले आहे .यामुळे प्रभावित होऊन तिच्या नेहमी नशेत असणाऱ्या वडिलांनी टॅबसाठी सहा हजार रुपये देऊ केले. शाळेपासून दुरावलेल्या मुलांना शाळेच्या प्रवाहात आणून त्यांना ज्ञानदान देण्या इतका आनंद कशातचं नसतो

या माझ्या कार्यासाठी मला नित्य माझे मार्गदर्शक मा. प्रविण काळम पाटील व तसेच पहिले बालरक्षक जगदिश कुडे सरांची मोलाची साथ लाभलेली आहे.माझ्यासह 156 बालरक्षकांनी स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची शपथ घेतली होती. कोल्हापूर येथील गडिंग्लज तालुक्यात आयोजित केलेल्या

कार्यक्रमात महाराष्ट्रातील बाल रक्षकाचे प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे कार्य करता आले. यासाठी नूतन मघाडे मॅडम यांचे आभार मानावेसे वाटतात.

याच बालरक्षकाच्या चळवळीतून 100 % मुलांना टॅब साठी पालकांनी प्रत्येकी सहा हजार रुपये जमा करून दिले आहेत. आज घडीला माझ्या शाळेतील 100% मुलांकडे टॅब आहेत. ज्यावेळी कोरोना येईल याची तिळमात्र ही शंका नव्हती त्यावेळी सुरू केलेल्या या प्रयत्नाचा कोरोनाच्या काळात फलित झाले मुलांकडे टॅब असल्याने त्यांच्या Online शिक्षणातील अडथळा दूर झाला. त्यावेळी घरोघरी जाऊन तंत्रज्ञानाच्या शिक्षणाच्या बाबतची उदासिनता सकारात्मक दृष्टिकोनात बदलण्याच्या प्रयत्नाला आलेल्या अडचणींचे आता फुलं झाली मुलांच्या सुट्या वाया न जाता सत्कारणी लागल्या. 2019 ला 15 प्र असणारी शाळा आता 27 पटावर गेली आहे. एकही मुलं शाळाबाह्य नाही. पालकांचे शाळेशी आता आपुलकीचे नाते आहे. त्यामुळेच पालकांची मेंदू विकास कार्यशाळा यशस्वीरित्या घेण्यात यश आले.भाषा इंग्रजी गणित या सर्व भेटीतील साहित्यामुळे शिक्षणाच्या वाटचालीसाठी गती मिळाली, आज 100% मुलं शाळेत येतात ,शाळेत शिकतात, शाळेत टिकतात.

या बालरक्षक चळवळीच्या या साखळीची एक कडी बनण्याचे भाग्य लाभले .त्यामुळे मी धन्य समजतो जोपर्यंत कार्य करता येईल तोपर्यंत ही गती अशीच कायम टिकेल ही आशा व्यक्त करतो.

मैसनवाड पी व्ही

प्रा शा दहिफळ भो पूर्व

ता परतूर जिल्हा जालना

मो न 7798615505

# माझा संघर्षमय शैक्षणिक प्रवास



सविता ढाकणे

जिथे प्रेरणा असते तेथे कल्पनांची टंचाई नसते कल्पना मनात येतात आणि ते प्रत्यक्षात हातून सहजपणे रुजविल्या जातात अशी प्रेरणा मला सर्वांकडून मिळत राहिली. समृद्ध, संवेदनशील व सामाजिक भान असणारे भावी पिढी निर्माण करण्यासाठी अतिशय मजबूत अशी पायाभरणी निर्माण होणे आवश्यक असते. याच दिशेने माझे पाऊल पडत आहे असा विश्वास मला मिळत आहे. आणि समाजाला एक नवी दिशा देणारे मार्ग निर्माण करण्यात माझा वाटा असेल याचा मला प्रचंड अभिमान आहे .

"प्रवास ध्यासाचा, प्रवास प्रगतीचा ,प्रवास गुणवत्तेचा ,प्रवास श्वासाचा,

## पर्व 1

**जन्म झाल्यापासूनच मी एक संघर्षमय जीवन जगले आहे. कारण अपंगत्व घेऊनच मी जन्माला आले. दोन वर्षाची झाले तरी मला उभाही राहता येत नव्हते. आईने दवाखान्यात नेले. तपासणी झाल्यावर डॉक्टर म्हणाले की, पाय कमजोर आहेत. त्यामुळे मी चालू शकणार नाही. हे ऐकून आईच्या पायाखालची जमीनच सरकली. पण आई डगमगली नाही. माझी मुलगी एक दिवस नक्कीच चालेल.असा आत्मविश्वास बाळगून मला घरी आणले.**

**त्यानंतर आई माझी अतिशय मायेने, प्रेमाने काळजी घेऊ लागली. गावातील म्हाता-या बायका आईला म्हणायच्या की, " अगं, या अपंग पोरीला कधीपर्यंत सांभाळशील. ती कधीच चालू शकणार नाही". हे ऐकून आईने सडेतोड उत्तर दिले, " माझी पोरगी एक दिवस नक्कीच चालणार आहे." नंतर एक दिवस मी सहज आईला म्हणाले, " आई, मला कधी चालता येईल गं. मला बाकीच्या मुलांसारखे धावायचंय, खेळायचंय." हे ऐकून आईने मला घट्ट पोटाशी कवटाळले आणि म्हणाली," सविता बेटा,लवकरच चालशील, इतर लेकरांसोबत खेळशील." हे ऐकून मला उत्साह आला. मी चार वर्षाची झाल्यावर आईला म्हणाले, " आई,मला**

बुट आण,मग मी चालेन." आईने लगेच बाजारातून बुट आणले. बुट घातल्यावर मी खरचंच उभी राहीले आणि हळूच एक पाऊल टाकले. काही दिवसानंतर मी हळूहळू चालू लागले. सर्वांना खुप आश्चर्य वाटले. लोक आईला म्हणाले की, " तू जिद्दीने मुलीची काळजी घेतलीस. त्यामुळेच ती चालू लागली." आई अभिमानाने लोकांना सांगू लागली की, "माझी पोरगी एक दिवस मोठी होणार आहे. मी तिला मास्तरीन करणार आहे." आईचे हे शब्द ऐकून माझा आत्मविश्वास वाढला.

खरे तर माझी आई अडाणी होती. पण मुलीला खुप शिकवायचे स्वप्न उराशी बाळगून होती. मी सहा वर्षाची झाल्यावर गावातील जि.प. प्राथमिक शाळेत प्रवेश घेतला. आईला माझी खुप काळजी वाटू लागली. शाळेत मुले मला त्रास देतील का?, खेळताना पडेल का? अशा अनेक विचाराने तिच्या मनात काहूर निर्माण झाले. त्यानंतर मी नियमित शाळेत जाऊ लागले. अभ्यास करु लागले. शरीराने अपंग असले तरी मी खुप हुशार होते (असे माझे कुसळकर गुरुजी म्हणायचे). शरीराने अशक्त,उंची कमी त्यामुळे मनात न्युनगंढ निर्माण झाला. एकटीच कोप–यात बसायची. पण गुरुजीने माझ्या मनातले ओळखले आईला म्हणाले, " ताई, तुमची सविता खुप हुशार आहे. एक दिवस ती तुमचे नक्कीच नाव काढेल." हे ऐकून आईचा आनंद गगनात मावत नव्हता.

गावात फक्त चौथीपर्यंत शाळा होती. पुढील शिक्षणासाठी 5 किमी अंतरावर परगावी जावे लागणार होते. बसने प्रवास करावा लागणार. आईच्या चेह–यावर काळजी स्पष्ट दिसत होती. मी आईच्या मनातील चलबिचल ओळखली. मी आईला म्हणाले," आई, तू काळजी करु नकोस गं. मी बसमध्ये हळू चढेन–उतरेन. तू बिनधास्त रहा. हे ऐकून आईचे मन सुपासारखे झाले.

त्यानंतर मी पाच किमी अंतरावरील चापडगाव येथे पाचवीसाठी प्रवेश घेतला. बसचा पास काढला. मैत्रीणीसोबत मी रोज शाळेत जाऊ लागले. पण एक दिवस बसमध्ये चढताना पायरीवरुन माझा पाय घसरला. मी डायरेक्ट खाली पडले. पण नशीब बलवत्तर , जास्त काही लागले नाही. हे ऐकून आईला तर रडूच कोसळले. दुस–या दिवशी बस स्टँ ंडवर येऊन बसमध्ये चढताना मला मदत करा अशी आई मैत्रीणींना विनवणी करु लागली. हे पाहून मला खुप वाईट वाटले. मी आईला म्हणाले, " आई, तू माझी अजिबात काळजी करु नकोस. मी स्वत:ची काळजी घेईन. माझा आत्मविश्वास पाहून आईला आनंद झाला.

मी नियमित शाळेत जायची,अभ्यास करायची. मला पाचवीपासूनच इंग्रजीची आवड निर्माण झाली.कारण मला इंग्रजीला भांबळ मॅडम होत्या.रोज पाच शब्द पाठांतर करावे लागत.व्याकरण खुप छान शिकवले. सहावीपासूनच इंग्रजीतून विचार करायची व बोलायचाही प्रयत्न करायची. खुप मजा वाटायची.

घरी आल्यावर आईला शाळेतील गमती–जमती सांगायची. ती अडाणी असली तरी सतत मला मार्गदर्शन करायची. अपंगत्व असणारी व्यक्ती आणि अपंग मुल असणारी आई यांना जीवनात किती अडचणी येतात. हे

दोघीही अनुभवत होतो. त्यावर मातही करत होतो. एकमेकींना समजून घेत होतो. खरच माझ्या आयुष्यात आईचे खुप मोठे योगदान आहे.

सन 1998 मध्ये मी 12 वी उत्तीर्ण झाले. अपंगत्वामुळे पेपर लिहीण्यास अडचणी यायच्या. पण त्यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांना अर्धा तास वेळ वाढवून मिळतो. हे माहीतच नव्हते. पेपरमधील येत असूनही वेळेअभावी पेपर पुर्ण करु शकत नव्हते. त्यामुळे दुर्दैवाने मला बारावीत फक्त 65 % गुण मिळाले. डि.एड. साठी प्रवेश मिळाला नाही. आईवडील दोघेही अडाणी होते. बाकी कुणाचे मार्गदर्शन मिळाले नाही. माझे शिक्षिका होण्याचे स्वप्न अधूरेच राहणार की काय? असे मला वाटू लागले. पण आईने मला वेळोवेळी धीर दिला.

पुन्हा आत्मविश्वासाने मी तालुक्याच्या ठिकाणी बी.ए.साठी प्रवेश घेतला. काहीही झाले तरी डि.एड. करुन शिक्षिकाच व्हायचे हेच स्वप्न लहाणपणापासून उराशी बाळगलेले होते. त्यामुळे बी. ए. करताना जास्त उत्साह नव्हता. तरीही खुप अभ्यास करुन इंग्रजी विषयात पदवी मिळवली.

त्यानंतर माझा एस.एन.डि.टी महीला विद्यापीठ ,पुणे येथे बी.एड.साठी नंबर लागला. शिक्षिका होण्याचे स्वप्न पुर्ण होणार या विचाराने माझा आनंद गगनात मावत नव्हता. विद्येचे माहेरघर पुणे येथे मी यशस्वीपणे बी.एड. पुर्ण केले. बी.एड.ला 80 मुलींची बँच होती. तेथे मी एकटीच खेड्यातील मुलगी होते. माझी भाषा इतर मुलींमध्ये वेगळी वाटायची. मग बोलाताना मला संकोच वाटायचा. त्यामुळे मी इंग्रजीमधून जास्त बोलायची. अशीच एकदा मी सराव पाठ घेताना मुलींमध्ये जोक झाला. त्या सर्वजणी हसल्या. मला वाटले की, माझी उंची किंवा दिव्यांगत्वालाच हसल्या. मी खुप डिस्टर्ब झाले. रडायला लागले.त्यावेळी आमचे मार्गदर्शक श्री. लोंढे सर यांनी वर्गात मला खुप मोलाचे मार्गदर्शन केले. माझ्यातील आत्मविश्वास जागा केला. मी इतरांपेक्षा कमी नसून मी उत्क्रुष्ट पाठ घेऊ शकते. प्रत्येक संकटावर मात करु शकते. असा माझा विश्वास जाग्रुत केला. लोढे सरांच्या त्या अनमोल मार्गदर्शनाने मी सर्व उपक्रमात सहभागी झाले. यशस्वीपणे बी.एड.पुर्ण केले.

सन 2004 मध्ये नगर येथे इंग्रजी विषय घेऊन एम.ए. पदवी प्राप्त केली.

अशा प्रकारे मी माझे शिकणे यशस्वीरीत्या पुर्ण केले. या प्रक्रियेमध्ये मला अनंत अडचणी आल्या. पण प्रत्येक अडचणीत दिपस्तंभासाखी माझी आई माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीली. तिच्या पाठबळामुळे माझी शिक्षणरुपी नाव किना–यापर्यंत पोहचली. तसेच या माझ्या शैक्षणीक प्रवासात मला श्री.कुसळकर गुरुजी, श्रीम.भांबळ मँडम, श्री.पोळ सर, श्री. लोंढे सर परीसाप्रमाणे लाभले. त्यांच्या चरणस्पर्शामुळे माझ्यासारखी कमकुवत मुलगी एम.ए.बी.एड. पर्यंतचा शैक्षणीक प्रवास यशस्वीपणे पार पाडू शकली. पालक आणि शिक्षकांची खंबीर साथ असेल तर प्रत्येक दिव्यांग लेकराचे आयुष्य निश्चीतच यशस्वी होईल. यात तीळमात्र शंका नाही. दिव्यांग मुलांना सहाणूभूती किंवा मदतही नकोय. त्यांना फक्त इतरांसारखीच वागणूक हवीय. त्यांचा आत्मविश्वास व स्वाभीमान ढळू देता कामा नये. एवढेच मला सांगावेसे वाटतेय.

# माझे शिकवणे

**पर्व 2**

सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे 4 ऑक्टोबर 2005 रोजी मला रायगड जिल्हा परीषदेचा नोकरीचा कॉल आला. माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. रायगडमधील पोलादपूर येथे हजर व्हायचे होते. खरं म्हणजे, पोलादपूर हे नाव प्रथमच ऐकले होते. त्यामुळे तेथे जाण्याचा मार्गही माहीत नव्हता. शेवटी महाराष्ट्राचा नकाशा आणला. त्यात पोलादपूर शोधले. डेपोमध्ये जाऊन जाण्याच्या मार्गाविषयी चौकशी केली.पुण्यावरुन महाबळेश्वरमार्गे पोलादपूरला पोहचलो. दि. 7 ऑक्टोबर, 2005 रोजी रुजू झाले.

नोकरी लागल्याचा विलक्षण आनंद झाला होता. पण तेथील उंच डोंगर, घनदाट झाडी, भरपूर पाऊस अशी परीस्थीती पाहून मी तर घाबरुनच गेले. सोबत आई व भाऊ होते. मला आई म्हणाली, " बाळा, अशा परीस्थितीत खरच तू राहशील का? घरापासून 500 किमी अंतरावर राहणे अवघडच आहे. चल आपण परत जाऊया....... मी तर निशब्धच झाले. आईला काय उत्तर द्यावे. तेच कळेना. मग मनात धैर्य एकवटून मी आईला समजावले," आई, तू जिद्दीने मला शिकवलेस. मी शिक्षिका व्हावी, म्हणून तू सतत स्वप्न पाहीलीस. माझी इतकी काळजी घेतलीस. आता आपले स्वप्न पुर्ण करण्याची वेळ आली आहे. कठीण परीस्थितीवर नेहमी मात करण्याची शिकवन तुच मला दिली आहेस. तु काळजी करु नकोस. मी या ठिकाणीही आनंदाने राहीन. मला फक्त तुझा आशीर्वाद दे." हे ऐकून आईचे डोळे पाणावले. तिच्या डोळ्यातून माझ्या विषयीचा अभिमान ओसंडून वाहू लागला. हजर होऊन आम्ही घरी आलो. नंतर साहित्य घेऊन मोठ्या उत्साहाने शाळेच्या गावी गेलो.

उंच उंच डोंगर, खोल द-या, लाल लाल माती, कौलारु घरे, भाताची शेतं, धो धो कोसळणारा पाऊस हे सुंदर वर्णन वाचल्यावर आपल्या डोळयासमोर लगेच कोकण येतो. हे अगोदर मी चित्रात किंवा टिव्हीवरच पाहीले होते. पण आता प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी आली होती.अशाच नयनमनोहर कोकणात सेवा करण्याची संधी मला लाभली होती. कारण रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालूक्यात मोरसडे शाळेत मी रुजू झाले होते. मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की, इतक्या निसर्गरम्य ठिकाणी सेवा करण्याची संधी मिळेल.

परीसर अतिशय सुंदर होता. पण घरापासून पाचशे किमी अंतरावर रहावे लागेल, म्हणून मन खिन्नही झाले होते. कधी कधी वाटायचे की, सर्वकाही सोडून गावाकडे निघून यावे. पण त्याचवेळी आईचा चेहरा समोर यायचा. कारण मी अपंग असूनही माऊलीने मला तळहातावरील फोडाप्रमाणे जपले होते. अपंगत्वाची जाणीवही होऊ दिली नव्हती. मी शिकून मोठे व्हावे. शिक्षिका व्हावे असे आईचे स्वप्न होते. तेच पुर्ण करण्याची संधी मला मिळाली होती. त्यामुळे येईल त्या संकटावर मात करुन पुढे चालायचे असा मनाशी ठाम निश्चय केला होता.

स्वतः दिव्यांग असल्याने शालेय जीवनात किती अडचणी येतात. हे मी स्वतः अनुभवले होते. इतर मुलांप्रमाणे खेळता येत नाही, दप्तराचे ओझे पेलवत नाही, धावता येत नाही, लेखन करतानाही अडचणी येतात. मलाही अशा खुप समस्या आल्या होत्या. कधीकधी मी रडलेही. पण श्री. कुसळकर गुरुजींनी माझी बुद्धीमत्ता अचूक हेरली होती. तसेच मला येणा–या अडचणींमुळे मनातील चलबिचलही ओळखली. माझे लाडही करायचे.अभ्यासाबरोबरच इतर मुलींप्रमाणेच शेणाने वर्ग सारवणे, झाडून घेणे अशी कामेही सांगायचे. जेणेकरुन मी दिव्यांग आहे. मला जमणार नाही.असा न्यूनगंड माझ्या मनात येणार नाही.

मला लाभलेल्या आदरणीय शिक्षकांमुळेच मी घडले. त्यामुळे स्वतः शिक्षिका झाल्यावर दिव्यांग लेकरांसाठी काम करायचे हे ठरवले होते. माझे सौभाग्य की, मला शिक्षण हे पवित्र कार्य करण्याची संधी मिळाली.

कोकण म्हणजे डोंगराळ भाग. शिवाय भरपूर पाऊस. तेथे एकच पीक घेतले जाते. त्यामुळे सर्वांची आर्थिक परिस्थीती बेताची होती.पण मुलांची बुद्धीमत्ता अतिशय तल्लख होती.सर्वांना शिक्षणाची आवडही होती. याचा विचार करून मी ठरवले की, मुलांकडून कसलीच फी घ्यायची नाही. आजतागायत मी तो नियम कायमच ठेवलाय.

रुजू झाल्यानंतर माझे मुख्याध्यापक श्री. सोनकांबळे सरांची जिल्हा बदली झाली. तेव्हापासून मुख्याध्यापक चार्ज माझ्याकडे आला. माझे मुख्याध्यापक श्री. सोनकांबळे सर अतिशय शांत,सहकार्य व्रुत्तीचे होते. मी हजर झाल्यावर रुम पाहून देणे व इतर सर्वकाही मदत केली. नवीन परीसर,नवीन माणसे असल्याने मला शाळेत कधी कधी रडायला यायचे. पण सरांनी अगदी मुलीप्रमाणे मला सांभाळले. त्यांची मला खुप मदत झाली. त्यांची बदली झाल्यावर आकाश कोसळल्यासारखी माझी अवस्था झाली. कारण चार्ज सांभाळून 50 पट असलेल्या शाळेची जबाबदारी माझ्यावर आली. कारण लगेच नवीन शिक्षक येणार नव्हता. अक्षरशः मी दोन दिवस रडून काढले.

पुन्हा धैर्य एकवटून परिस्थीतीला तोंड देण्यासाठी उभी राहीले. माझे रुममालक श्री.कोळसकर तेथील हायस्कूलचे क्लर्क होते. त्यांनी माझा आत्मविश्वास वाढवला. कार्यालयीन टपालाची कामे कशी करायची याबद्दल मार्गदर्शन केले. अंगणवाडीताई व गावातील मोठ्या वर्गातील मुलांची मदत घेऊन मुलांना शिकवणेही सुरु ठेवले. (आत्ताची अभ्यासमित्र ही संकल्पना मी सन 2006 मध्येच राबवली होती). तसेच शाळेच्या खात्यात काही पैसे शिल्लक होते. त्याचा विनियोग करुन वर्गाच्या भिंती ऑईलपेटने बोलक्या करुन घेतल्या. डोंगरातील शाळा असूनही आकर्षक रंगात चित्र,तक्ते,शब्द,नकाशे पाहून मुले हरखून गेली.आनंदाने अभ्यास करु लागली. यावरुन मी एक गोष्ट शिकले की, आत्मविश्वास व करण्याची प्रबळ इच्छा असेल तर कठीण परिस्थीतीवर मात करता येतेच.

त्यानंतर दोन महीण्यांनी बडे मॅंडम शाळेवर हजर झाल्या. त्यांच्या सोबतीने अनेक उपक्रम आम्ही शाळेवर राबवले. तीन वर्षाने मॅंडमचीही बदली झाली. मग श्री. येलाले सर रुजू झाले. आम्ही दोघांच्या सहकार्याने पारंपारीक गीते, न्रुत्य,पाढे पाठांतर,इंग्रजी शब्द पाठांतर स्पर्धेत तालुकास्तरापर्यंत मजल मारली. शाळेच्या प्रत्येक कामात शा.व्य.अध्यक्ष व पालक वर्गाचे नेहमी सहकार्य असायचे. पावसाळ्यात तेथे मुलांची विशेष काळजी घ्यावी लागे. नदीच्या पलीकडील मुले आमच्या शाळेत यायची. नदीला सतत पुर यायचा. पलीकडे जाण्यासाठी लोखंडी हलता सांकव होता. मुले त्यावरुन जाताना घाबरायची. पालक भात लावणीसाठी शेतात असायचे. अशा वेळी त्या पूलावरुन दोन दोन मुले घेऊन पलीकडे पोचवावी लागत. माझे सहकारी येलाले सर हे काम काळजीपुर्वक करत. सर्व मुले घरी पोहचल्याशिवाय दोघांनाही घरी येता येत नसे. पालकांचा विश्वास संपादन केल्यामुळे सर्व पालक आमच्याकडे मुले सोपवून बिनधास्त कामाला जात असत. खुप समाधान वाटायचे.

तेव्हांचाच एक प्रसंग आपल्यासमोर मांडावा वाटतोय.

सन 2011 मध्ये 15 जून रोजी शाळा सुरु झाली. शाळेच्या पहिल्याच दिवशी अंगणवाडीताईंनी मला सांगितले की, वरच्या वाडीमध्ये एक सहा वर्षाचा अपंग मुलगा आहे. मी लगेच ताईला सोबत घेऊन त्या मुलाचे घर गाठले. घराच्या अंगणात पाऊल ठेवत नाही. तोच कविता गायनाचा आवाज माझ्या कानावर पडला. मी आश्चर्यचकीतच झाले. तोच मुलगा अतिशय सुंदर आवाजात मनसोक्तपणे कविता गायन करत होता. त्याच्या आईने मला पाहीले आणि बाई आल्या असे म्हणताच आवाज बंद झाला. पुढे जाऊन पाहते तर......... मी निशब्धच झाले. तो पुर्णपणे झोपलेला होता. त्याचे दोन्ही हात व पाय खुप लुळे आणि बारीक होते. तसेच मणक्याचीही समस्या असल्याने बसूही शकत नव्हता. अशी भयानक अवस्था पण तिक्ष्ण बुद्‍धिमत्ता असलेल्या त्या मुलाचे नाव होते अमर संतोष उतेकर. वडील मुंबईला मजुरीचे काम करत होते. त्याला तीन बहीणी होत्या. घरची परिस्थितीही गरिबीची होती. त्याची आई या चार लेकरांना मजूरी करुन सांभाळत होती.

मी अमरशी गप्पा मारायला सुरवात केली. पण तो माझ्याशी बोलेना. लाजत होता. शाळेत येणार का? तेथे खुप मजा आहे. मित्र आहेत असे त्याला सांगीतले. उद्या अमरला शाळेत घेऊन या असे त्याच्या आईला सांगून मी शाळेत निघाले. घराबाहेर पडतेय तोच मागून आवाज आला. बाई,मलाही शाळेत यायचय..... हे ऐकून मला विलक्षण आनंद झाला.

दुस–या दिवशी मी लवकरच शाळेत पोहचले. तर मला मोठा गलका ऐकू आला. मला पाहताच सर्व मुले ओरडू लागली, "अमर शाळेत आला, अमर शाळेत आला". हे ऐकून अमरच्या चेह–यावरही आनंद ओसंडून वाहत होता. परीपाठ झाल्यावर अमर व त्याच्या आईचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्याला वह्या,पुस्तके,गणवेश,दप्तर दिले. अमरचा आनंद गगणात मावत नव्हता. तो बोलत नव्हता. पण त्याचे डोळे व चेहरा सर्वकाही सांगत होते.त्याला बसताही येत नसल्याने त्याच्या आईला मांडीवर घेऊनच बसावे लागले. बारा

वाजले असता आई घरी जाण्याचा हट्ट करु लागली. घरी लहान मुली होत्या. तसेच किती वेळ मांडीवर घेऊन बसावे? असा प्रश्न होता. दुपारी खिचडी खाऊन जा असे सांगून थांबवले. उद्या शाळेत येणार सांगून अमर आईसोबत घरी गेला.

मी श्री.काळे सर, अपंग समन्वयक, पं.स.पोलादपूर यांना फोन करुन व्हिलचेअरची मागणी केली. पण सध्या शिल्लक नाही असे सांगितले. पण मी लगेच हवी आहे असा हट्टच धरला. पण काय गंमत दोन दिवसांनी चक्क श्री. काळे सर स्वत:च व्हिलचेअर घेऊन शाळेत आले. अमर,सर्व मुले आणि मला खुप खुप आनंद झाला. मग काय कुणी व्हिलचेअर घेऊन,कुणी छत्री पकडून, कुणी त्याचे दप्तर घेऊन लवाजमा रोजच शाळेत येऊ लागला. आर्थिक अडचणीमुळे त्याची आई कामाला जायची. मग अमरची शाळेत रजाच होऊ लागली.मग आईला समजावले. पण परिस्थितीपुढे ती हतबल होती. शेवटी मी एक निर्णय घेतला.शा.व्य.समितीची मिटींग घेतली. मुख्याध्यापक चार्ज माझ्याकडेच असल्याने निर्णय घेणे सोपे जायचे. सर्वांना अमरची अडचण सांगीतली. अमर शिकलाच पाहीजे.असे मी सर्वांना सांगितले. शाळेतील शालेय पोषण आहार शिजवण्याचे काम अमरच्या आईला देण्यात यावे असा सर्वानुमते ठराव घेतला. त्यानंतर अमर व आई दोघेही नियमित शाळेत येऊ लागली. तसेच अमरच्या आईला अपंग मदतनीस भत्ताही मिळवून दिला. अमर आनंदाने शिक्षण घेऊ लागला.

अमरला कमोड चेअर,रो लेटर, कॅंपिलर अशी अनेक उपयोगी साहित्य मिळवून दिले. तसेच अलिबाग येथे जाऊन अपंग प्रमाणपत्र, वनफोर्थ कार्ड काढून दिले. माझ्या छोट्याशा प्रयत्नाने अमरसारख्या 100% दिव्यांग असणा–या मुलाच्या जीवनात शैक्षणीक,उत्साहाचे व आनंदाचे वारे वाहू लागले. त्याच्या चेह–यावरील आनंद म्हणजे मोठ्या पुरस्कारापेक्षाही ग्रेट आहे.

सांगायचे तात्पर्य म्हणजे दिव्यांग व्यक्तींना जन्मापासूनच मोठ्या संघर्षाला,अडचणींना तोंड द्यावे लागते. शिक्षक म्हणून आपण त्यांना समजून घेतले, त्यांचे मनोबल वाढवले, योग्य मार्गदर्शन करुन अचून दिशा दिली तर दिव्यांग मुलेही सामान्य मुलांप्रमाणेच स्वत:च्या जीवनात यशस्वी  वाटचाल निश्चितच करतील.

चला तर मिळून सारे,

दिव्यांगाना सोबत घेऊ,

अल्पशा मदतीने त्यांचे,

जीवन प्रगतीकडे नेऊ.

अशा प्रकारे रायगड येथे 9 वर्षे सेवा केली. या काळात खुप चांगले अनुभव आले. घरापासून दूर राहूनही अनेक चांगली माणसे भेटली. सीमा,अर्चना,ज्योती,मथूरा (रुम पार्टनर) या लहान बहीणी मिळाल्या.

कोकणातील सांस्क्रुतिक परंपरांची जवळून ओळख झाली. अशाचत दि. 31ऑगष्ट 2014 रोजी तेथून गेवराई,जि.बीड येथे माझी जिल्हा बदली झाली. येताना तेथील आठवणी व शैक्षणीक अनुभवांची शिदोरी सोबत घेऊन आले.

सविता उत्तमराव ढाकणे,

स.शि. महारटाकळी,

ता.गेवराई,जि.बीड.

फोन. 9422857473

# शब्दांचे बाग फुलवताना



मीनाक्षी राऊत

साहित्य ही जीवनाच्या सर्वांगाना कवेत घेणारी कला आहे. जन्म आणि मृत्यू या शाश्वत गोष्टींच्या मध्ये येणाऱ्या सर्वच अशाश्वत गोष्टी या साहित्याचा विषय होवू शकतात. यासाठी जाणीवांचा भावनेचा विस्तार होणं गरजेच असतं. हाच जाणिवांचा विस्तार व्यक्तीचे व्यक्तिमत्व अधिक संपन्न, समृध्द करत असतो. भावनिक, मानसिक बौध्दिकदृष्ट्या निकोप आणि सुदृढ समाजरचनेसाठी जाणिवा विस्तारलेल्या व्यक्तिमत्वाची संख्या वाढत जाणे गरजेच असतं.

शिक्षक होणे ध्यानीमनी नसताना ही किशोरवयीन अवस्थेत अवतीभवती घडणाऱ्या प्रसंगाचा जेव्हा मनावर खोलवर परिणाम होत जायचा .काही गोष्टी आनंद पेरायच्या, काही दु:ख तर काहींचा तर निषेध करावासा वाटायचा.,पण कंठातून निघालेले स्वर परत कंठात विरघळून जायचे. कोंडमारा व्हायचा. मनातले वादळ मनातच थोपवतांना होणारी मनाची त्रेधात्रिपट मनातले उमलणारे अंकुर उधळून लावायचे .अशावेळी आधार द्यायची ती लेखनी मनातल्या भावना कागदावर रेखाटल्या जायच्या. आपलेच शब्द आपल्याशी संवाद साधायचे या संवादासंवादातूनच लेखनीशी नाते मैत्रीपूर्ण झाले.

खरचं साहित्य ही जीवनाच्या सर्वांगाना कवेत घेणारी कला आहे. जन्म आणि मृत्यू या शाश्वत गोष्टींच्या मध्ये येणाऱ्या सर्वच अशाश्वत गोष्टी या साहित्याचा विषय होवू शकतात. यासाठी जाणीवांचा भावनेचा विस्तार होणं गरजेच असतं. हाच जाणिवांचा विस्तार व्यक्तीचे व्यक्तिमत्व अधिक संपन्न, समृध्द करत असतो. भावनिक, मानसिक बौध्दिकदृष्ट्या निकोप आणि सुदृढ समाजरचनेसाठी जाणिवा विस्तारलेल्या व्यक्तिमत्वाची संख्या वाढत जाणे गरजेच असतं. ज्याप्रमाणे मातीशी ओलेपण जपणं पाण्याला सांगाव लागतं नाही त्यातल्यात्यात शिक्षकाला नाहीच नाही स्वत: रूजतांना तो गुण इतरांमध्येही रूजवत असतो.स्पर्धेच्या युगामध्ये आपला विद्यार्थी हा विज्ञानाचे तंत्र तर शिकतोय पण जगण्याचे मंत्र विसरायला नको यासाठी संवेदनांचे बिजारोपण व्हायला हवे.विद्यार्थांनी आपल्या अवतीभवती असलेल्या सर्व शाश्वत अशाश्वत गोष्टींकडे भावनिक, सजग दृष्टिकोनातून बघावं सामाजिक, भावनिक ,मानसिक विकास मुलांचा

व्हावा.आपल्या भावना शब्दात व्यक्त करण्याची मुलांना संधी मिळावी, एका निकोप समाजरचनेची निर्मिती व्हावी हा दृष्टिकोन ठेवून मुलांनी लिहिते व्हावे , त्यांच्या मनातल्या द्वंद्वाला योग्य दिशा मिळावी ,विद्यार्थी व शिक्षक हे नाते दृढ करण्यासाठी त्यांच्या लेखनीला प्रोत्साहन देण्यास सुरूवात केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, भाषणात वापरतं असलेल्या काव्यांच्या पक्तींचा प्रभावीपणं मुलांना माहीत होतं त्यामुळे मुलांना लिखाणाची आवड होती .

ती मुलांमध्ये कशी उतरावी हा प्रश्न निर्माण झाला

पहिल्यांदा आम्ही ओव्या गोळा करायला सुरुवात केली .साहित्य हे प्रत्येक गावागावात मुरलेलं आहे. आपल्या आजींना जमतं आपल्याला का नाही म्हणून मुलांनी लेखनाला सुरूवात केली

त्यात एक अडचण आली मुलं इतरांच्या लेखनाला ही माझं म्हणून सांगू लागली त्यांच्या वयाच्या मानाने ते जड ही होते

त्यामुळे मुलांची रूची वाढेल त्यांना आनंद मिळेल म्हणून यमक जुळणार्या छोट्या छोट्या कविता करायला लागलो

काही मुलं गमतीशीर गाणे ही लिहू लागली जसे की

एक होता जाड्या

तो काढायचा खोड्या

लयभारी बनवायचा

कागदाच्या होड्या

अशा स्वरूपाची चाल लागेल अशी गाणी ,कविता मुलं तयार करू लागली .शब्दांची बाग लावायची म्हटली तर निरिक्षण या ओलाव्याबरोबर संवेदनशीलतेची सुपिकता ही असावी लागते. बीज पेरायचे काहीना काही निश्चितच उगवेल ही आशा होतीच ज्यांना आवड होती ते लिहू लागले .प्रोत्साहन, कौतूकरूपी खतपाणी त्यांना घालत राहणे गरजेचे होते तेव्हा गारखेडा बिटच्या आदरणीय ठाकूर साहेबांच्या वाचनकट्टा या गृपने मुलांना भरपूर प्रोत्साहन दिले जय साहित्य प्रतिष्ठान संजय कुलकर्णी सरांच्या या गृपवर बालकांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी काव्यस्पर्धा आयोजित केल्या होत्या.आता स्पर्धेत उतरायचं म्हटलं तर नुसतं यमक जुळवण्यात अर्थ नव्हता त्यात आशयाची जोड हवी होती .

पुन्हा प्रश्न आला आता आशय लिहायचा कसा ती संवेदना आणायची कुठून ?

मुलांना मग झाडावर लिहायला सांगितले मुलांनी झाडाचे वर्णन केले

झाड हिरवे असते

झाडासारखे कुणी नसते.

झाडांची पानं, फुल ,फळ जे दिसते त्याचे वर्णन मुले करत होती

अशा स्वरूपातील अनेक कविता मुलांच्या यायला लागल्या .आपल्याला फक्त वर्णन नकोय जी दिसते ती कविता नाही जे अनुभवता येते जी दिसतं नाही खूप काही सांगत असते ती म्हणजे कविता हे असं आमचं लॉंजीक कविता तर लिहायची कशी? मग त्यांना सांगितले आता झाडाशी बोला. झाडाला ही भावभावना असतात ते तुमच्याशी कसा संवाद साधताय तो साधा.

मग मुलं लिहायला लागली

ऋतूजाच्या कवितेतील या काही ओळी

झाडा तू मानवाला तूझ्याकडील सर्वच देतो

पण तो जसा आईचं काळीज काढतो तसा हा माणुस तूलाच तोडतो

तेव्हा तूला वेदना होतात का रे

झाडा तू शेवट होईपर्यंत त्यांच्याच उपयोगी पडतो .

तूला पाहून आम्ही मुलं घडतो

अशा स्वरुपाचे लेखन ज्यात आशय आहे ती मुलं लिहू लागली. विद्यार्थांना व पालकांना लेखनासंदर्भात अधिक सजग करण्यासाठी दप्तरातील स्पंदन हा सर्व मुलांचा काव्यसंग्रह गावकऱ्यांच्या हस्ते प्रकाशित केला.

विषय देऊन कविता करणे, एखाद्या ना एखाद्या विषय घेऊन कविता लिहिली तेव्हा लिहिणाऱ्यांना शाबासकी दिली तर त्याच विषयावर बरेच जण लिहायचे हा कृत्रिम पणा आता टाळायला हवा म्हणून लेखनाच्या कक्षा वाढविणे गरजेचे होते शब्दसाठ्याची कमतरता जाणवायची म्हणून

या समस्येवर इलाज काय करता यावा म्हणून बालवाचनालयातील पुस्तकं वाचने सुरू केले .वाचनकट्टावर ही मुलं वाचन टाकू लागली सर्वांकडून मिळणाऱ्या कौतुकाने त्यांचा उत्साह वाढू लागला.

कवितेत कमी शब्दात योग्य भावना गुंतवाव्या लागतात .शब्दात नीट मांडता येत नसल्याने पुढे पुढे बरेच जण लिहायचे टाळू लागले .जे सातत्याने लिहित होते त्यांना ही जे सांगायचे ते तंतोतंत पोहचत नव्हते पद्यासोबत गद्य लेखनाकडेही वळणे गरजेचे होते. पण कसे परत एक समस्या उभी राहिली .

तेव्हा इच्छा तेथे मार्ग निघतोच. आदरणीय नामदेव माळी साहेबांची लेखनकार्यशाळा औरंगाबादला आयोजित करण्यात आली होती. त्या कार्यशाळेत गद्य लेखनातून जे अनुभवतोय,जे जगतोय, ते व्यवस्थित मांडता येऊ शकते हा आत्मविश्वास निर्माण झाला.

लगेच शाळेत याची अंमलबजावणी सुरू केली निर्जीव वस्तूतही जीव टाकून आम्ही त्यांच्याशी संवाद सुरू केला नव्याचे नऊ दिवस परत पोरांनी टाळाटाळ सुरू केली .माळी साहेबांनी दैनंदिनी लेखनासंदर्भात सांगितलेच होते . दैनंदिनी लिहणे हा उपक्रमच सुरू केला.सर्वांसारखेच मुलांनीही दिवसभरातील घटनांचे वर्णन लिहिले मग हळूहळू त्यात बदल करत दिवसभरात येणाऱ्या भावभावनांचे गुंफण ही करायला सांगितले

सत्य ते मुलं मांडू लागली त्यात जिवंतपणा दिसू लागला त्यांचे आईबाबा, नातेवाईक ,मित्रमंडळी यांच्याशी असलेले नाते,त्यांच्या डोक्यात चालणारे विचार, इवन शिक्षकांनाही असलेल्या सुचना समजू लागल्या मुलं दैनंदिनी नित्य लिहू लागली.

त्यातूनच काही जणांचा लेख लिहिण्याचा ओढा वाढला व्यक्त कसे व्हावे हे त्यांना उमजू लागले. पुढे औरंगाबाद येथे साहित्य काव्यगंधच्या राज्यस्तरीय साहित्य संममेलनात दहा विद्यार्थांना सहभाग नोंदवला.उपस्थितांची मने जिंकून घेतली .कृतिशील शिक्षक महाराष्ट्राच्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनात चार विद्यार्थीनींचे प्रत्येकी 70 च्या वर कवितेच्या हस्तलिखितांचे ज्येष्ठ साहित्यीक मा. बाबा भांड सरांच्या हस्ते प्रकाशन झाले .आजघडीला त्यांच्याच गद्य लेखमालेचे पुस्तक तयार करण्याच्या प्रयत्नात विद्यार्थीनी आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य असल्याने आज आमचे विद्यार्थी अतिशय स्पष्टपणे मते मांडतात.

शब्दांची बाग फुलवतांना शिक्षक या माळ्याला काही काटे बोचतातच काट्यांमुळे माळी बाग फुलवायची थांबवत नाही . आपले विद्यार्थी पुढील वर्गात गेल्यानंतर इतर शिक्षकांच्या मानसिकतेचा बराचसा परिणाम निश्चित होतो ज्या त्या वर्गशिक्षकाचा कल ज्या बाजूने अधिक आहे तिकडे मुलं वळायला लागतात .या समस्येला तूम्ही आम्ही सर्वजण सामोरे जातो पण प्रबळ इच्छाशक्ती ने त्यावरही निश्चितच मात करता येते.लिहित्या मुलांच्या व्हाटस्अँप गृपवर लेखनासंदर्भात चर्चा सुरू असते .

## मॅडम काय भीताव हे तं भीवाड हाय !

कधी हसणारी, कधी रडणारी कल्पनेत रमणारी ,कधी क्षितिजाला स्पर्शू पाहणारी,अल्लडपणे बागडणारी,कधी नव्याचा शोध घेणारी अशी आपली मुलं नकळतपणे देतात जगण्याचा मंत्र , शिकून जातात

अशी काही तंत्र की आपल्यातला गुरु मात्र स्तब्ध होतो निशब्द होतो. निसर्गाने शृंगारलेल , विरळ मानवी वस्तीच व सर्व प्रकारच्या प्राणिमात्रांचं साम्राज्य असलेलं कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील एजीवडे हे छोटंसं गाव माझ्या नोकरी ची सुरुवात याच गावापासून!

विद्यामंदिर एजीवडे ही माझी छोटीशी शाळा ! गुलाब , जास्वंद ,मोगरा,विविध फुलांनी औषधी वनस्पतींनी, लोभसफुलांनी बहरलेली हिरवळीने नटलेली मेंहदीचे दाट कुंपण असलेली ! शाळेच्या पाठीमागे तर हिरडा, बेहडा ,पळस, पेरु, त्यांची दाट झाडी ,झऱ्याचे निर्मळ पाणी, गावाच्या पाठीमागे वाहणारी नदी, लांबवर पसरलेले सुंदर निळेशार तळे ,चौफेर दाजीपूर अभयारण्य, दाट झाडीने वेढलेली, निसर्गाच्या कुशीत वसलेली ही शाळा! शाळेचे अंगण शेणाने सारवलेले घरापेक्षा ही मुलं आपल्या शाळेची काळजी घेणारे. श्वापदं, गवे, रानडुकरे, सर्वप्राणीमात्रांचे स्वच्छंदी फिरणे येथे होते . त्यांचेच तर साम्राज्य ! त्यांच्याच साम्राज्यात मानवांचे अतिक्रमण, इथल्या सर्वांना मात्र त्यांची सवय झालेली पण आम्ही शहरातून तिथे गेलेलो आम्हांला सर्व नवीनच ना!

असंच एकदा शाळेच्या पाठीमागचा परिसर स्वच्छ करणे सुरू होते अचानक तिथे माझी नजर एका लांबलचक सापावर गेली मग काय विचारता, आपोआप पाय लटपटायला लागले . त्यातच सोबतच्या साळे मॅडम रजेवर गेलेल्या . आजूबाजूला फक्त शांतता ,उपस्थित मी व माझी लेकरंच! मुलांना समजावण्याचा माझा केविलवाणा प्रयत्न पाहून माझा एक तिसरीचा विद्यार्थी प्रवीण कसबले

याने माझी भावमुद्रा टिपली व म्हणाला , "मॅडम काय भिताव हे तर भिवाड हाय! ते काय करित नाय ते विषारी नसतं या " त्याचं हसणं पाहून बळबळं हसू कि आसू काढू क्षणभर समजले नाहीच त्याच्या बोलण्यातील आत्मविश्वास , इतर मुलांनी दिलेला दुजोरा व त्यांच्या चेहऱ्यावर भीतीचा भाव कोणताच नव्हता हे पाहून झुरळाला घाबरणारी मी! प्रथमता एवढा मोठा साप बघूनही मुलांसमोर नघाबरण्याची भूमिका वठवली. शाळेला रंगरंगोटी करत असताना मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्व काळजी आम्ही मात्र घेतली.

यानंतर बरेच दिवस झाले 26 जानेवारीचा दिवस होता .सकाळी झेंडा वंदन शालेय कार्यक्रम झाल्यानंतर मी व माझी चार वर्षाची कन्या ऋतु घरी आलो. तीला बाथरूमला जायचे होते .म्हणून तिला पाठीमागे बाथरूम मध्ये बसवून पाणी नसल्यामुळे पाणी घेण्यासाठी नळावर वर गेले. (तिकडे नळाला चावी म्हणतात ) ज्याच्या निर्मळ पाण्याचा 24 तास पुरवठा होता तेथे! पाणी घेऊन आल्यानंतर बघते तर काय घरात दरवाज्याजवळ पाच सहा फूट लांब असलेला मनगटाएवढा जाड साप ! विचारता काय माझी पाचावर धारण चढली . आरडाओरडा करून शेजारीपाजारी यांना बोलवाव तर माझी कन्या आत अडकलेली या गदारोळात हा साप जर मधल्या दरवाजाने आत गेला तर ...घाबरून ऋतू माझी बाहेर पळत आली तर ....काय होईल

हा विचार क्षणात मनाला स्पर्शून गेला.  तेवढ्यात माझा प्रविण कसबले  डोळ्यासमोर आला त्याने म्हटलेले वाक्य  "काय भीताव मॅडम  हे तं भीवाड हाय! " आठवले

मनाला घट्ट करून हिम्मत करून  घरात पळत गेले,  व माझ्या मुलीला  बाहेर घेऊन आले  . त्यानंतर शेजाऱ्यांना आवाज दिला . रोडवर उभा असलेले मुलं देखील पळत आले  तोपर्यंत साप घरातच होता. त्रिशूल सारखे असलेले टोकदार शस्त्र चव्हाण अण्णा घेऊन आले. जाधव सर , साळे मॅडम चे मिस्टर  शिंदे सर पण आले सर्वांनी मिळून  त्या सापाला मारले व  व उपस्थितांनी  सांगितले की "मॅडम हा  खूप विषारी नाग आहे." त्याला मारतांनी ही तो फना काढत होता फुसफुसत होता त्या नागाला बाहेर आणले त्यावेळी अंगावर काटे उभे राहिले. त्यावेळी  त्याक्षणी मी मात्र निशब्द झाले.  आलेलं मोठं संकट टळलं ते   केवळ माझ्या प्रविणमुळे !  याची मला जाणीव  झाली हा नाग आहे हे माहिति  असते तर मी आत जाण्याची हिंमत केली असती का?

शक्यतो नाहीच!आज ही  त्याचा हा मंत्र  पावलोपावली उपयोगात येत आहे .त्या नागाला   भिवाड समजल्यामुळे भीतीवर मात करता आली .माझ्या  लेकीला बाहेर काढता आले. आज मात्र ती शाळा  नाहीये मला लाभलेल्या या टुमदार गावाचे माझ्या अरण्यग्रस्त प्रेमळ  मनाने श्रीमंत असलेल्या  गावकऱ्यांचे  आता मात्र स्थलांतर करण्यात आले आहे  करवीरजवळच  !

आता मात्र ती श्वापदं आजूबाजूला दिसत   नाही  असं नाही बहुतांश वेळा भेटतात ती मानवी वेशात ! हे भिवाड आहे कि  विषारी मण्यार कळतं नाही  बहुतेकदा  पण  या मानवी नागांनाही  भिवाड समजून  संकटावर मात करू शकतो आपण . निश्चित  ध्येयापर्यंत पोहचू शकतो  बहुतेकदा पहुडलेले असतात, कधी मार्ग ही आडवतात ही श्वापदं पण आपण निश्चल पणे चालायचं  व मनाशीच म्हणायचं  काय भितावं हे तं भिवाड हाय.

जीवनाच्या शाळेतील एक  धडा मला माझ्या  विद्यार्थ्यांने शिकवला. गुरु या शब्दाची व्याप्ती शब्दात व नात्यात मावणारी नाही

म्हणूनच हा माझा  सत्यलेख  माझ्या  लहानग्या गुरूला समर्पित

मीनाक्षी प्रमोद राऊत

शिक्षिका  प्रा शाळा भिंदोन

ता.जि औरंगाबाद

# अशी धडपडली सुनिता..!



## सुनिता लहाने

'प्रेमाने जग जिंकता येते' हा सुविचार अगदी लहानपणापासून वाचला होता, बघूया म्हटलं या सुविचारात किती ताकद आहे.मग सुरु झाली माझी थेरेपी आणि अदितीचे शिक्षण .सर्वप्रथम 1 महिना आम्ही वर्गखोली स्वच्छ करण्याचेच काम केले.माझ्या शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या दोन्ही सहकारी कंटाळून गेल्या.मलाही समजत होते त्यांना सुद्धा अदिती शाळेत यायला नको आहे. मी मात्र अजूनही हिम्मत सोडली नव्हती.आता मीच वर्गखोली स्वच्छ करायला लागले अन सोबत मी माझे प्रयोग ही सुरु केले.

भारतातील प्रसिद्ध सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी वसलेला तालूका अचलपूर. .इंग्रजकाळा पासून प्रसिद्ध असलेल्या 'शंकुतला' या लोहपथगामिनी अर्थात रेल्वे लाईनवर (नॅरोगेज) वसलेले शिंदी हे माझं गावं. माझे वडील शालीग्रामजी लहाने हे शिक्षक होते. वडील शिक्षक असल्यामुळे लहानपणापासूनच घरात शालेय वातावरण होते. माझे नाव शाळेत प्रवेशित केलेले नव्हते तरीही  मी बाबांचे बोट धरून शाळेत जायची.आज बाबा नसले तरी शाळेत जाण्याची ती सवय अद्यापही कायम आहे. माझा दादा पण त्याच शाळेत शिकत होता , त्यामुळे  शाळा म्हणजे खूप छान ठिकाण असतं ही बाल्यावस्थेतच रुजलेली कल्पना. मला आजही आठवतं माझे बाबा अमरावतीला प्रशिक्षणाला गेले कि,तिकडून आल्यावर गाणी म्हणायचे,गाण्यावर ठेका धरायचे. आम्हीही त्यांच्यासोबत नाचायचो. मग ते सांगत असत,आमचे नंदकुमार साहेब आहेत ना ते आम्हाला छान छान गाणे शिकवतात.त्यावेळेस आयुष्यात पहिल्यांदा ऐकलेले नंदकुमार हे नाव. तेव्हाच वाटायचं असलं कसलं हे नाव? ज्याला नाही आडनाव. तेव्हा मी कोणत्या वर्गात होते हे पण नीट आता आठवत नाही पण याच नंदकुमार साहेबांचा कधीकाळी आपल्याला फोन येईल अशी स्वप्नात सुद्धा कल्पना केली नव्हती. त्या गाणी आणि गाण्यावर नाचण्याचे नाव म्हणजे  आनंददायी शिक्षण होते हे आत्ता समजतं.

**नोकरीचा पहिला दिवस**

साधारणतः ९० च्या दशकात शिक्षक म्हणून रुजू होण्यापूर्वीच शिक्षकांना प्रशिक्षण दिले जायचे. माझे हे पाच दिवसाचे आनंददायी प्रशिक्षण नुकतेच संपले होते आणि मला 'चिखलदरा' ही पंचायत समिती मिळाली.

चिखलदरा साधारणतः १५० किलोमीटर चा विस्तार असलेला विस्तीर्ण व दुर्गम भागातील तालूका.जवळपास एका जिल्हयाएवढा क्षेत्रफळ असलेला. सर्वात आधी पंचायत समिती ला जॉईन व्हायचे नंतर शाळा मिळणार असे कळले. दिनांक २९ जून१९९८ हा तो माझ्या आयुष्यातील सोनेरी दिवस.ज्या दिवशी मला शासकीय सेवेत शिक्षिका म्हणून शिक्कामोर्तब होणार होते.मला चिखलदरा येथे रुजू व्हायला जायचे होते.बाबांना म्हटले, ‘बाबा तुम्ही माझ्यासोबत चला’. तर त्यांनी म्हटलं ‘अग,बेटा माझी तर शाळा आहे’.कदाचित मी आता स्वबळावर (आत्मनिर्भर) स्वतःचे काम करावं हा पण त्यांचा उद्देश असावा. भाऊ सुद्धा नोकरीनिमित्य दुसऱ्या राज्यात होता.मग काय,मला एकटीलाच जाणे होते. शिंदीहून परतवाडा येथे गेले आणि तिथून लाल परीने माझा चिखलदऱ्याचा प्रवास सुरू झाला.खिडकीतुन छान सुंदर पर्वत,धुक्याने भरलेल्या दऱ्या, हिरववेगार वातावरण, छोटे–छोटे कोसळणारे धबधबे ,नयनमनोहर दृश्य दिसत होतं जणू दुसरं काश्मिरच, पण मला मात्र त्या दृश्याचे आता काही वाटत नव्हतं कारण माझ्या डोक्यात नुसतं चिखलदरा पंचायत समिती कधी येणार आणि मला कोणती शाळा मिळणार,हेच विचारचक्र सुरू होतं.त्यावेळी आपण शिक्षिका होणार ही भावनाच मुळी सुखदायी होती. आता माझे कान हळू हळू बंद व्हायला लागले. मला कळेना मला असं काय होतं.मला बसमधील प्रवाशांचे आवाज अतिशय हळू यायला लागले,कळतच नव्हतं काय होतंय ते.मग मी जोरात श्वास घेतला अन काय आश्चर्य एकदम कान मोकळे झाले,अतिशय थंड हवेमुळे मला असे होत होते हे नंतर कळले.

चिखलदरा पंचायत समितीत गेल्यावर पाहिले तर तिथे सगळ्या मैत्रिणी,तिथे त्यांच्या सोबत कुणाचे वडील,कुणाचा दादा, कुणाची ताई आणि मी मात्र एकटी. विचार केला की आपण सक्षम आहोत म्हणून आपल्या आईवडिलांनी आपल्याला एकटीला पाठवलं. मला त्यादिवशी माझ्या पहिल्या शाळेची ऑर्डर मिळाली. मला चिखलदरा पंचायत समितीमधील ‘बोराळा’ हे गाव मिळाले.त्यानंतर सलग तीन दिवसाची सुट्टी आली होती आणि २जुलैला मला शाळेवर रुजू व्हायचे होते. नेमके त्या दिवशीच माझ्या मावस बहिणीचे लग्न होते. मावस बहिणीचे पहिली पासून शिक्षण आमच्याच घरी झाले होते त्यामुळे लग्नाला जाणे अनिवार्य व अपरिहार्य होते.

घरचेच लग्न असल्याने दादा पण सुट्टी टाकून गावाला आला होता.मी दादासोबत त्याचे गाडीवर लग्नाला गेली, पण शाळेत सोडून देण्याच्या अटीवरच. त्यामुळे माझ्या मनात शाळेच्या पहिल्या दिवसाचा व रुजू होण्याचे विचारांचे काहूर माजलेले होते.अकरा वाजले . जसजसा घड्याळाचा काटा सरकायचा तसतसे माझे मन शाळेत जाण्यासाठी अधीर होत होते. तरी दादा काही लग्नातून निघत नव्हता. ११ वाजलेनंतर मी तर रडायलाच सुरुवात केली. आता सर्वजण माझ्याभोवती काय झाले ? काय झालं करत विचारमग्न झाले होते.तर मला शाळेत जाऊन रुजू व्हायचे होते कारण शाळेत रुजू व्हायला वेळ होत होता. माझी ती अवस्था बघून दादांनी गाडी काढली व आम्ही माझ्या पहिल्या शाळेच्या दिशेने निघालो. गाडीवर त्याचे बडबड सुरू झाले.बडबड

कसली प्रवचनच होते ते. मला धीर द्यावा म्हणून तो कसा पहिल्या दिवशी उशिरा रुजू झाला याचे दाखले द्यायला सुरुवात केली.काही होत नसतं थोडा उशीर झाला तर वगैरे वगैरे पण माझे कान उघडे असूनही बधीर झालेले.

मला फक्त माझी शाळा दिसत होती व १० च्या ठोक्याला रुजू व्हायचे होते.उशिर झाला म्हणून माझ्या डोक्यात राग होता.पण पोहचली एकदाची.तिथे माझ्या पूर्वीच मैत्रिणी रुजू झालेल्या होत्या.मुख्याध्यापिका बाईने मला पण रुजू करून घेतले व तेंव्हाच म्हटले 'तुमचं बी.ए.सुरु आहे न,त्यामुळे तुम्ही सातवा वर्ग घ्यावा'. आजपासून तुम्ही सातवीच्या वर्गशिक्षिका.दादा त्यांना म्हणाला 'अहो मॅडम,ती अजून खूप लहान आहे.तीला पहिला वर्ग द्या'. पण मुख्याध्यापिका बाईचा विजय झाला.आणि पहिल्याच दिवशी माझे सातव्या वर्गात प्रमोशन झाले म्हणजे मी सातवीची वर्गशिक्षिका झाले.

**माझी पहिली सहल**

मी इयत्ता सातवी च्या वर्गासोबत पाचवी ते सातवी वर्गावर मराठी शिकवायचे असा फतवा काढला गेला.माझ्या वर्गात जाऊन बघितले तर माझे विद्यार्थी माझ्यापेक्षा मोठे होते.पण मला ते माझे बालमित्रच वाटायचे.मला आजही त्यांचे नाव आठवतं. हिरकणी, हिरू,बालाजी,रोशनी.मला मुलांना शिकवायला खूप मजा यायची.एकदा काय झालं सातवीच्या मराठीच्या पुस्तकातील चुडीवाले बाबा नावाचा धडा होता.तो मी शिकवीत होती.त्यात 'तपोवन' ह्या संस्थेचा उल्लेख होता.पद्मश्री शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची ती कुष्ठरोगी बांधवांसाठी काम करणारी'विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन'संस्था.माझ्या मनात आलं आपले विद्यार्थी आदिवासी समाजातील त्यांनी कधी गावाबाहेरच जग अनुभवलेलं नाही.जर यांना प्रत्यक्षात पाठातील स्थळ दाखविले तर.म्हणजे पाठ पण समजेल शिवाय कृष्ठरोग्याचं आयुष्य कसं असतं हे पण जवळून बघता येईल.शिवाय गावाबाहेरील जग मुलांना अनुभवता येईल.मग ठरवलं मुलांना चुडीवाला बाबा कसा तपोवनात जायचा हे प्रत्यक्ष तिथे जाऊन प्रत्यक्षात दाखवायचे. रविवार हा सुट्टीचा दिवस आमचा पहिल्यावहिल्या सहल कम अभ्यासभेटीचा निश्चित झाला.मुलांना शाळेबाहेर नेताना काय नियम असतात याची काही कल्पना नव्हती.परंतु मुख्याध्यापिकेची परवानगी घ्यायची एवढं समजत होते. त्या त्याच गावच्या रहिवासी होत्या.आदिवासी भागातील असल्याने शिड्डू घ्यायच्या.( शिड्डू म्हणजे मोहाचे पेय.ते पिल्याने व्यक्तीला झिंग चढते) ते प्राशन केल्यावर आमच्या बाई कशावरही सही करायच्या.रविवार असल्यामुळे त्या घरीच असणार याची खात्री असल्याने मी त्यांच्या ह्या गोष्टीचा सहलीसाठी फायदा मिळवला.

शिंदी गावातील माझा एक दादा होता ज्याचे सवारी गाडीत मी नेहमी शाळेत जाणे येणे करायची.तो बिचारा पण लहान बहिण शिक्षिका असल्याने हक्काने ऐकायचा.त्याच्या गाडीतून अमरावती जाण्याचा बेत

ठरला.रविवारी सकाळीच तो ठरल्याप्रमाणे हजर झाला.मुलांना प्रवास करायला मिळणार असल्याने ते सर्व आनंदित झाली होती. आमचा रोमांचक प्रवासाला सुरुवात झाली.त्यातील कित्येक मुलांचा तो पहिल्यांदा गाडीत बसण्याचा अनुभव.त्यांच्या चेहऱ्यावरील तो आनंद ओसंडून वाहत होता. प्रवासादरम्यान एक मुलगा तर सतत खिडकीबाहेर डोकावत होता.त्यांचा आनंद हीच माझी मोठी कमाई होती. मलाही आपण केलेल्या धाडसाचं चीज झालं असं वाटायला लागलं. मी मुलांसोबत एकटीच होती.अमरावतीला गेल्यावर तिथली मैत्रीण जुळणार होती.तीच्या घरी सर्व मुलांना जेवण होते. आम्ही मग अमरावती पोहचलो.मैत्रिणी कडे जेवण झाले नी तपोवनात प्रवेश केला.तिथे कुष्ठरोगी बांधवासोबत संवाद साधला.दाजीसाहेब पटवर्धन यांचे बाबत माहिती करून घेतली.तिथे एक दाढी असलेलं सेवेकरी भेटले.पंजाब मधील रहिवासी सिख समाजाचे.पण अस्सल मराठीत बोलायचे.त्यांनी आम्हाला सर्व परिसर दाखवला.मग आम्ही मुलांसोबत तो चुडीवाला बाबा इथे कसा येत असणार,इथे कुठे कुठे जात होता याचा अंदाज बांधत होतो.सर्व माहिती घेतल्यावर आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो.तेंव्हा गाडीवाला दादा गाडी जोराने चालवत होता.तो म्हणाला 'ताई,आपल्या मागे पोलिसांची गाडी आहे'.मी म्हटलं.तू घाबरू नकोस.मी बोलेल त्यांचेशी.एकदाची पोलिसांनी गाडी ओव्हरटेक करून थांबविली.तशी मीच खाली उतरून त्यांचेशी बोलायला गेली.सर,ही माझीच मुले आहेत.बोराळा येथील आदिवासी भागातील मुले.मी त्यांना पुस्तकातील तपोवन प्रत्यक्षातदाखवायला आणले होते.त्यांनी माझ्याकडे पाहिलं,पोरी तुझ्यापेक्षा तर ही मुले मोठी आहेत म्हणून हसले सुद्धा.पण तुझा उद्देश चांगला आहे.वेळ सांगून येत नाही. आता सावकाश जा बेटा पुन्हा असं करू नकोस असे म्हटले नी आम्ही पुढील प्रवासाला निघालो,गाडीवाल्या दादांनीही सुटकेचा श्वास सोडला नि आम्ही अवघे सुखरूप घरी पोहचलो.

शाळेतील कुणाला आमच्या या ट्रिपचा काही थांगपत्ता नव्हता. शाळेत सगळ्यांना सांगावं लागतंय हे सुद्धा समजत नव्हतं. माझ्या मनात फक्त एक आणि एकच प्रामाणिक गोष्ट की आपल्या मुलांना पाठातील गोष्टी प्रत्यक्ष दाखवायच्या आणि इथेच माझ्यातील कोणत्या शिक्षणातून परिणाम साधता येतील या विचारांचे बीज पेरले गेले असावे.दुसऱ्या दिवशी शाळेत हाहाकार उडाला.शाब्दिक चकमकी उडायला लागल्या. `बाप्पा` म्हणजे उद्या पाठात अंदमान आले तर ह्या काय मुलांना अंदमान ला नेणार? मला काहीही वाटत नव्हते कारण माझा प्रामाणिक हेतू साध्य झाला होता.बाबांना जेंव्हा समजले मी कोणत्याही परवानगी शिवाय खाजगी वाहनाने एकटीच घेऊन गेले होते तेंव्हा त्यांनी मला समजावून सांगितले यापुढे असे करायचे नाही.

तर अशी पहिल्या वहिल्या शाळेची हकीकत.पुढे मी बोराळा नंतर अजून दोन शाळेत होते. अमरावती पंचायत समिती मधील धानोरा कोकाटे व बुधवारा या शाळेत,आतापर्यंत माझ्या तीनही ही शाळा मोठ्या पटसंख्येच्या,उच्च प्राथमिक.पण माझ्यातील नाविण्याला जिथे जास्त खतपाणी मिळालं ते म्हणजे माझी

गोपाळपूर ची दोन शिक्षकी शाळा.या शाळेतील माझे अनुभव अतिशय भन्नाट आहेत.प्रत्येक विद्यार्थ्यांचे किमान एक पान लिहिते म्हटलं तर ३६ पाने होतील इतका समृद्ध करणारा प्रवास या शाळेसोबत घडला

**माझी प्रगत शाळा – गोपाळपूर**

चला जाऊया माझ्या गोपाळपूर येथील शाळेत.सर्वप्रथम मी माझ्या अतिशय लाडक्या विद्यार्थिनीची ओळख तुम्हाला करून देते.अदिती तिचे नाव.जेंव्हा ती इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित झाली तेंव्हा सर्वजण तिच्यावर हसत होते. माझी ही अदिती दिव्यांग बालक होती.आम्ही तिला पहिलीत दाखल केले होते आणि आता ही काय शिकणार म्हणून सर्व हसत होते.अदितीला तिची आई शाळेत कडेवर घेवून यायची. तिला नीट बसता ही येत नव्हते.ती जागेवरच 'शी' व 'सु' करायची .तीच्या तोंडातून सतत लाळ गळत असल्यामुळे सारख्या माशा बसायच्या.अदिती कुणालाच शाळेत नको होती, मुलांना तर नाहीच नाही त्याला कारण ही तसेच होते,अदिती आक्रमक झाली कि त्यांना मारायची,चावायची.पण ज्यांनी तिला त्रास दिला त्यांनाच.एक मात्र होते अदिती ने मला स्वीकारले होते तसे तिच्या हालचालीतून दिसत होते.मला का बर विश्वास होता कोण जाणे कि अदिती शिकणार. 'प्रेमाने जग जिंकता येते' हा सुविचार अगदी लहानपणापासून वाचला होता, बघूया म्हटलं या सुविचारात किती ताकद आहे.मग सुरु झाली माझी थेरेपी आणि अदितीचे शिक्षण .सर्वप्रथम १ महिना आम्ही वर्गखोली स्वच्छ करण्याचेच काम केले.माझ्या शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या दोन्ही सहकारी कंटाळून गेल्या.मलाही समजत होते त्यांना सुद्धा अदिती शाळेत यायला नको आहे. मी मात्र अजूनही हिम्मत सोडली नव्हती.आता मीच वर्गखोली स्वच्छ करायला लागले अन सोबत मी माझे प्रयोग ही सुरु केलेत. मी दिवसभरात अदिती चे नाव इतक्या वेळेस घ्यायचे कदाचित कधी देवाचा जप करणारे ही तेवढ्या वेळेस देवाचे नाव घेत नसतील. माझ्या घरीसुद्धा आवर्जून विचारले जायचे 'काय म्हणते तुमची लाडकी अदिती'. सतत तिला प्रेमाने विचारायचे अदिती तुला 'शी' आली का ? 'सु' आली का? चल जाऊया. अदिती आता मला प्रतिसाद द्यायला लागली आणि १ महिन्यात ती माझा आधार घेवून शौचालयाचा वापर करायला लागली. माझ्यासाठी ही खूप मोठी गोष्ट होती.यावर्षी नुसते अदिती हेच शिकली तरी तिचे १ ली चे पूर्ण शिक्षण असेल असे मला वाटले.तिचे लाळ गळणे हळूहळू कमी झाले होते.आता तिची आई तिच्या गणवेशासोबत रुमाल पण देत होती.मी काय बोलते हे अदितीला समजत होते अन मलाही तिचे .आता मुलांनीही तिला स्वीकारलं होत आता अदिती चे शाळेत येण्याचे कुणालाही अप्रूप वाटत नव्हते.मी तिला कधीच वेगळं मुल म्हणून वागणूक देत नव्हते. माझी अदितीलाच काय, पण सगळ्यांना सुलभन करण्याची एकच पद्धत होती 'प्रेम' आणि 'शाबासकी'.जेंव्हा मी इयत्ता पहिलीला शिकवायचे तेंव्हा आम्ही सर्व जण अदितीला घेवून गोल बनवायचो.अदिती नेहमी माझ्या जवळ असायची.अदितीचे बोट पकडून मी पुस्तकातील शब्द वाचायचे,चित्रवाचन घ्यायचे तेंव्हा तिला खूप

मजा वाटायची,सन्मान वाटायचा.मला माहित होते सध्या ही पुस्तकातील काहीही वाचू शकणार नाही पण आपण स्वीकारले गेलो ते सुद्धा सन्मानाने ही भावना च मुली आशादायी.आता अदितीला पेन कुठे आहे? खडू कुठे आहे? वर्गमित्र प्रतिक कुठे आहे? अशा प्रश्नाची उत्तरे उंगलीनिर्देश करून देता यायला लागली होती.

यानंतरचा अदितीचा प्रवास अतिशय आनंददायी होता.शाळेतील सर्वात स्वच्छ विद्यार्थी हा बहुमान तिला मिळाला.आता अदिती फक्त 'अ' अक्षर गिरवू शकत होती,ते पण महत्प्रयासाने. रांगोळी,माती,अक्षरांचे विविध आकार असा खूप सराव घेतल्यानंतर.आता तिला बोबडे बोलता यायला लागले त्यासाठी मीच तिला स्पीच थेरपी देत होते.प्रत्येक शब्द बोलताना तिला मी म्हणायचे ," तू माझ्याकडे बघ "अन तसेच म्हण.मी तो शब्द उच्चारताना माझ्या ओठ व जिभेची हालचाल तिला पूर्ण दिसेल याप्रमाणे कृती करायचे.अशाप्रकारे आता ती बरेच शब्द शिकली होती.एकदा मी शाळेचे अहवाल तयार करीत होते त्यामुळे कार्यालयात बसून लिहित होते.अदिती आली व मला म्हणाली,"म्यादम मी तल्ला तर्नार्यांचे नाव लिहू ताय?". मला गंमतच वाटली ,बघूया म्हटल ही काय करते? वर्गात जावून पहिले तर अदितीने फलकावर 'अ' काढून ठेवला होता,तो पण वेगवेगळ्या ठिकाणी. आणि मग तिने एका 'अ' कडे पाहून सांगितले हे नाव सिद्धार्थ चे ,दुसरा 'अ' दाखवून हे अंजू चे.मला आता हे समजले होते कि 'तिचे लेखन जरी अर्थपूर्ण नसले तरी वाचन मात्र समजपूर्वक होतं '.

**सावित्रामाई व अदिती**

अदिती नेहमी माझ्या अवतीभवती राहायची.माझ्या कार्यालयात सावित्रीमाई फुले यांची प्रतिमा होती.मी तिथे असले कि ती नेहमी त्यांच्या प्रतिमेकडे बघून मला विचारायची,"ह्या तोन हायेत?" मी सांगायचे ,"अग अदिती ह्या सावित्रीमाई फुले आहेत".असे तिने मला किमान 100 वेळा तरी विचारले असणार आणि मीही तिला प्रत्येक वेळी नव्यानेच सांगते आहे असेच उत्तर दिले.एक दिवस अतिशय आनंदी,लकाकणारा चेहरा आणि इयत्ता 2 री चे पाठ्यपुस्तक घेवून अदितीची स्वारी आमच्याकडे आली.तिच्याकडे पाहून वाटलेच आज हिला काहीतरी गवसले आहे.ती मला कार्यालयात घेवून गेली आणि सावित्रीमाई यांच्या प्रतिमेकडे बोट दाखवू लागली.नंतर हातातील पुस्तकातील सावित्रीमाई ची प्रतिमा दाखवून ,हे दोन्ही एकच आहे,मी शोधून काढले असा काहीसा भाव तिच्या चेहऱ्यावर दिसत होता.मी तिला एकदम जवळ घेतले अन शाबासकी दिली आणि माझ्या 100 वेळेसच्या सांगण्याचे फळ आज मला मिळाले होते.

अदिती ला मी प्रत्येक उपक्रमात सहभागी करून घ्यायचे मग ते दोरीवर चढणे असेल तरीही.तू चढू शकतेस असे आश्वस्त करण्यासाठी मी तिच्या सोबत असायचेच.सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेतील प्रत्येक मुल सहभागी असायचे ज्याला जे जमेल ती कला सादर करायची ,नृत्य,गाणे,नक्कल,नाटुकले अशी धमाल मज्जा असायची.मला मनातून वाटायचे अदितीला सामावून घ्यायचे पण कसे कारण हिचे काही सांगता येत

नाही .मला एक कल्पना सुचली , आम्हा गावकर्यांचे .......देवा तुझे देवूळ, असे बोल असलेले गीत आमच्या गावात लोक खूप ऐकायचे. मी ठरवले कि या गाण्यावर नृत्य बसवायचे आणि अदिती ला रुख्मिणी करायचे,सिद्धार्थ ला विठ्ठल बनवले कारण तो अदितीला सांभाळून घेईल अशी खात्री होईल.आणि सांस्कृतिक कायर्क्रमाचा दिवस उजाडला सगळ्यांची लगबग,आधीच अदितीच्या आईला समजावून सांगितले होते.मुकुट आम्ही शाळेतच बनवले होते.जशी मला अदिती तिच्या आईबरोबर दिसली मी पाहतच राहिले.सुंदर रूप आणि चेहऱ्यावरील आनंदाचे भाव [ मी पण करू शकते ] आणि आत्मविश्वास. अदितीला कमरेवर हात ठेवून फक्त उभे राहायचे होते. ती गाणे पण गुणगुणत होती आणि बाकी मुलांसारखे हात पण वर करण्याचा पर्यंत करीत होती.तिला नृत्य करताना बघून तिच्या पालकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू यायला लागले.आणि त्या दोघांनीही सर्व गावकर्यांसमोर मला कृतकृत्य होत हात जोडले. हा माझ्या जीवनातील सर्वोच्च पुरस्कार होता.सर्व गावकरी नवल करीत होते.आजही ते अदितीला बघून हसत  होते परंतु या हसण्यात कौतुकाचे भाव  होते. **अन फुलांमध्ये दिसले अपूर्णांक ......**

२७ जून २०१६ माझा या वर्षातील शैक्षणिक सत्रातील पहिला दिवस. नवीन शैक्षणिक सत्र,नवीन उत्साह नवीन विद्यार्थी.शाळा सुरु होण्यापूर्वी उन्हाळ्यात सुट्यांमध्ये गणित संबोध कार्यशाळाच्या माध्यमातून गणितातील नवीन गमतीजमती शिकायला मिळाल्या नव्हे तर गणित नव्या अंगाने अनुभवाला मिळाले. केवळ अनुभव नव्हे तर जसे आहे तसे दाखविता यायला लागले गणिताची नवीन शिदोरी हळूहळू मी माझ्या .जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील बालगोपालांना वाटू लागली.याची फलश्रुती म्हणजे शनिवारचा  दिवस होता. इयत्ता चौथी मधील रोहित मोठ्या हर्षउल्हासाने धावत माझ्याकडे आला, धावल्यामुळे त्याला दम लागला होता. माझ्या जवळ येवून म्हणाला, “मैडम मला सदाफुलीच्या फुलांमध्ये अपूर्णांक दिसला”.मी पण त्याचा तो . नवसंशोधनाचा आनंद पाहून गहिवरून गेले व  म्हणाले, “रोहित बेटा, कसा दिसला ते दाखव मला”. मग त्याने ते सदाफुलीचे फुल हातावर घेवून म्हणाला हा माझा ५ चा पूर्ण आहे.५ पाकळी पैकी १  पाकळी एका हातावर काढून म्हणाला,आता हा झाला १/५ [एक अंश छेद पाच] तर दुसऱ्या हातावरील पाकळ्या म्हणजे ४/५[चार अंश छेद पाच] आणि आता या दोघांची बेरीज केली तर १/५+४/५=५/५ म्हणजे परत माझा पूर्ण १. रोहित चा तो आत्मविश्वास बघून आणि विविध विद्यार्थ्यांचे गणितातील संबोध स्पष्ट झाल्याचे पाहून मला आयुष्यात शिक्षिका झाल्याचे धन्य वाटले. आमच्या या रोहित ला कोणताही पाढा तयार करता येत होता. आमच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा.सुनील पाटील सर यांच्या भेटीत त्याने ९ च्या पाढ्यात जादू आहे म्हणून तो पाढा तयार करून दाखविला होता. तो नेहमी आव्हान द्यायचा तुम्ही मला कोणतीही संख्या सांगा मी पाढा तयार केऊन दाखवितो मग ती संख्या १ लाख असली तरी तो बिनधास्त पाढा बनवायचा.

**शाळेची पूर्वस्थिती**

**सन** २००८ माझा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोपाळपूर येथे स्थानांतर होवून रुजू झाले ०९– होते.द्विशिक्षकी शाळा जेमतेम ५५ विद्यार्थीविद्यार्थी अनुपस्थिती आणि , शालेय वातावरण अनाकर्षक. स्थानांतर सोबत बोनस म्हणून मला मुख्याध्यापिकाचा .याचाच परिपाक म्हणजे असमाधानकारक गुणवत्ता कारण .भार न समजता एक संधी म्हणू पाहू लागले–पण या बाबीला मी प्र .अतिरिक्त प्रभार स्वीकारावा लागला हळूहळू शाळेचा परिसर आकर्षक करण्यावर भर . मला माझ्या मनाप्रमाणे शाळांमध्ये बदल करणे शक्य होते पाहता .दिला त्याकरिता गावातील शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांची भावनिक साद मिळू लागली फरश्या रंगीबेर. वर्ग बोलू लागले. पाहता शालेय वातावरण बोलके व रमणीय होवूंगी होवू लागले बगीचा . शौचाल. खुलू लागलायापासून ते पिण्याच्या टाकी पर्यंत सर्वच वस्तू माझ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधू लागल्या पाहता पाहता माझे चिमुकले व्यक्त व्हायला लागले.

**यशाचे गुपित**

ग्रामीण भागातील विद्यार्थी म्हटले की त्यांना हवे प्रेम आपुलकी आणि,पाठीवर शाबासकीची थाप या त्रि सुत्रीचा वापर करीत शाळेवर नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यास सुरुवात केलीमुलांचा उत्साह वाढविण्यासाठी . तसेच दैनंदिन व्यवहार सुलभ होण्यासाठी बचत ,विद्यार्थ्यांचे गणितीय संबोध,परिसरातील पक्षांसाठी पानेरी आठवडी बाजार त्यांना आपलेसे,बँकवाटणारे उपक्रम शाळांमध्ये आयोजित करू लागले किलबिल . विचारा तुम्ही , प्रतिबिंब आम्ही वंदनियांचे,अक्षर हंडी,अंक हंडी,सणसमारंभ,विज्ञान जत्रा,बालमेळावा,मंच शब्दसम्राट सारखे नवोपक्रमाच्या माध्यमातून ,आजचा लय भारी विद्यार्थी,घडयाळ खेळ,सांगतो आम्ही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधल्या जाऊ लागलाआधुनिक तंत्रज्ञानाची म्हणजे याला जोड मिळाली ती. शाळेवरील नवनविन उपक्रम व्हात्स अप च्या माध्यमातून आपल्या मित्रपरिवारामध्ये शेयर होवू .मोबाईल ची विद्यार्थांमध्ये वावरतांना मला आ.लागल्याने विद्यार्थ्यासह मला नवीन ओळख मिळू लागलीणखी एक पारितोषिक मिळाले ते म्हणजे आदितीच्या रुपानेप्रत्येक मुल शिकू शकते हा .नीटनेटकी राहायला शिकली .. आत्मविश्वास माझ्या आदींती मध्ये होणारे बदल मोबाईल च्या साह्याने टिपू लागले आणि ते क्षण .आला .मी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने गुगल वर टाकू लागलीअदिती अल्पावधीतच युटूब वर प्रसिद्ध होवू – . लागली

**राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त दया टाळी नवोपक्रम**

माझ्या शाळेत नवोपक्रम भरपूर राबविले पण या मध्ये शाळा प्रगत करण्यासाठी दया टाळी हा उपक्रम सर्वाधिक सहकार्याचा ठरला कारण कुठलाही अधिकचा खर्च ना करता फावल्या वेळ.ात खेळला जाणारा हा खेळ माझ्या विद्यार्थांना सर्वच विषयाची माहिती देण्यासाठी मदतगार ठरला परिसर ,इंग्रजी, गणित,भाषा. सामाजिक शास्त्रकिंवा सामान्य ज्ञान असे विविधांगी विषयाचे ज्ञान य खेळाच्या माध्यमातून ,अभ्यास शारीरिक आरोग्य सोबत .विद्यार्थांना सहज होवू लागलेदृढ आत्मविश्वास या खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये येवू लागलाविशेष म्हणजे सायंकाळच्या खेळाच्या तासिकेदरम्यान या खेळाचे नियोजन असल्यामुळे मुले हळू हळू . केवळ एका वर्गातील विद्यार्थ्याकरिता हा खेळ मर्यादित ण राहता शाळेतील सर्वच .या मध्ये प्रवीण होत गेली इयत्तामधील विद्यार्थी एकत्र खेळू लागलेयामुळे मोठ्या इयत्तेतील मुले छोट्या मुलांना सोबत घेवून त्यांनाही . या खेळातील यशामुळेच मी हा खेळ नवोपक्रम करिता जिल्हा .चुकले तर त्यांची चूक दुरुस्त करू लागली .तिथे त्याची निवड होवून परिषद स्तरासाठी पात्र ठरला. स्तरावर मांडलाआणि परिषद स्तरावर त्याचे विशेष कौतुक होवून राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त म्हणून त्याला ख्याती मिळाली.

**ती भेट प्रेरणादायी**

साधारण २०१७ फेब्रुवारी महिंना ची १६ तारीख च्या सुमारास अचानक माझे शाळेवर ४ या दिवशी सायंकाळी. आमच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा मा,शिक्षणाधिकारी. मा, सुनिल पाटील सर. या भेटीदरम्यान .मा गटशिक्षणाधिकारी आदी अधिकाऱ्यांची अचानक भेट दिली,उपशिक्षणाधिकारी. विद्यार्थ्यांनी कुठलीही .अधिकाऱ्यांनी कुठलेही प्रशासकीय प्रश्न न विचारता थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधला भीती न बाळगता गणिताची जादू माराज्याच्या नकाशात जिल्ह्यांची .मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दाखविली. दक्षता ला तर साहेबांनी त्यावेळी . जोडणी असो किंवा कुठलेही पाढे असो मुलांनी आत्मविश्वासाने उत्तरे दिले आदितीच्या बोबड्या बोलातील उत्तरे ऐकून उपस्थित.स्क्रेयर गर्ल चा किताब देवून टाकलाअधिकारी अवाक झाले.

**संधी चे केले सोने**

या सर्व प्रवासामधून शाळांची प्रसिद्धी प्रसारमाध्यमांमध्ये होवू लागल्याने हळू हळू परिसरातील जिल्हा परिषद शाळा व तदनंतर अमरावती शहरातील गणमान्य खाजगी व्यवस्थापनातील शाळा गोपाळपूर च्या शाळांकडे वळू लागल्याजिल्हा परिषद गो.पाळपूर मधील प्रगत चा मैलाचा दगड ठरलेला दया टाळी खेळ हळूहळू जिल्हा सह राज्यात पोहचू लागलाच्या उळ्याल्यात गणित संबोध कार्यशाळा २०१६. या मुळेच मला विविध संधी मिळाली. करिता निवड होवून राज्यस्तरीय गणित मार्गदर्शक म्हणून काम करण्याची संधी मिळाली.या मधून गणितातील सहा भाषा अवगत करून शिक्षणाच्या वारीचे वारकरी होण्याची संधी प्राप्त झाली औरंगाबाद आणि,पूणे .

नागपुर च्या वारीच्या साह्याने राज्यातील असंख्य वारकऱ्यांना भेटण्याचे व त्यांचे गणितीय विचार ऐकण्याची भरासाठी का या सर्व मधून मला जिल्हा. संधी मला या वारीतून मिळालीम करण्याची नवीन संधी गणित विषय सहाय्यक म्हणून जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण विकास संस्था अमरावती येथे मिळालीया माध्यमातूनच आता . गणिताच्या प्रशिक्षणातून .प्रशिक्षणाचे व्यवस्थापन या विषयाकरिता काम करण्याची संधी प्राप्त झाली माझ्या मिळालेल्या या संधीतून मला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता भरीव कार्य करून दाखवायचे आहे त्याकरिता मला साथ हवी आपल्या सारख्या शिक्षण प्रेमीची व शिक्षणासाठी भरभरून साथ देण्याऱ्या माझ्या शिक्षण क्षेत्रातील बंधू आणि भगिनींची .

**माझे सर्वोच प्रेरणास्थान**

या सर्व सुनीताच्या धडपडण्यामध्ये जर सकारात्मक लहरी कुठून आल्या असतील तर त्या नंदकुमार या नावाकडून. सर शिक्षण सचिव असताना आम्हा शिक्षकांना कितीतरी स्वातंत्र्य मिळाले मग ते व्हात्स अप वापरणे असो, कि दैनिक टाचण काढणे असो.त्यामागे सरांची खूप मोठी पेडॉगोगी होती.तो काळ म्हणजे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचा सुवर्णकाळच म्हणूया. सर जेंव्हा अमरावती आले तर सरांनी माझ्या शाळेला भेट द्यावी असे मलाच काय पण राज्यातील प्रत्येक धडपड करणाऱ्या शिक्षकांना वाटत होते.मी सरांना जेंव्हा फोन केला तेंव्हा सरांनी ,"मला विचारले मी तुझ्या शाळेत का यावे"? पहिल्या प्रश्नात च मी आउट.मग मी म्हटले, "सर माझ्या मुलांना मी सांगितले आहे आमचे सर्वात मोठे साहेब तुम्हाला भेटायला येणार आहेत". म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का कि तू मुलांना शिकवले आणि ते पाहायला मी यावे ,परत सरांचा बाउंसर ,मी क्लीन बोल्ड होता होता वाचले.माझे उत्तर नाही सर मी त्यांना शिकण्यासाठी वातावरण तयार केले.सरांचा अतिशय व्यस्त कार्यक्रम असल्यामुळे सर माझ्या शाळेत येवू शकले नाहीत.प्रत्येक मूल शिकू शकत हा विश्वास फक्त अन फक्त सरांमुळे माझ्यात निर्माण झाला होता.सरांची जेंव्हा बदली झाली तेंव्हा मला इतके दुख झाले होते जेवढे मी ऑनलाईन बदलीत विस्थापित झाल्यावरही झाले नव्हते.महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला पडलेले सुखद स्वप्न म्हणजे आमचे आदरणीय नंदकुमार साहेब.

**सुनीता लहाने**

विषय सहाय्यक (गणित )

जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण विकास संस्था अमरावती

# PSM ते वेध व्हाया DIET गडचिरोली

## सुचरिता काळे



आदरणीय नंदकुमार साहेबांनी शिक्षकांसमोर आव्हान ठेवलं 'I WANT CHALLENGE' मूल शिकण्यासाठी तळमळीनी प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांसाठी आदिवासी भागात काम करण्यासाठी नंदकुमार साहेबांनी आवाहन केलं होतं. मी पण ती link भरली आणि माझी स्वतःची मुलं मोठी आणि समजदार झालेली असल्यामुळे गडचिरोली या आदिवासी आणि नक्षलग्रस्त जिल्ह्यात काम करण्याची इच्छा साहेबांकडे व्यक्त केली

सन २०१५ सगळीकडे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचं वारं पसरलेला. जोतो १००% मूल शिकण्याच्या ध्यासाने वेडावलेला. सन २००९ शिक्षण क्षेत्रासाठी महत्त्वाचं वर्ष ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांचे मोफत व सक्तीचे शिक्षण हा कायदा(RTE २००९) ह्या वर्षी आला. तसं स्वातंत्र्यापूर्वी पासूनच अनेक समाज सुधारकांनी सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केलाच होता पण त्याचं कायद्यात रूपांतर व्हायला सन २००९ उजाडलं. आणि हा कायदा एप्रिल २०१० पासून अमलात आला. समाजातील प्रत्येक घटकातील मूल शाळेत येऊ लागलं. वयानी मोठी असलेली मुले शाळेत प्रवेश करण्यास संकोचतात हे लक्षात घेऊन अगदी कधीच शाळेत दाखल न झालेल्या मुलांसाठी सुद्धा वयानुरूप इयत्तेत दाखल करून घेण्याचा एक धाडसी म्हणावा असाच शासन निर्णय काढण्यात आला. किती विचार पुर्वक घेतलेला निर्णय. पण आम्हा काही शिक्षकांकडून ओरड सुरू झालीच. तो कधीच शाळेत गेलाच नाही अ,आ,इ,ईच येत नाही म त्याला पुढे कसं शिकवायचं? पण विचार केला तर एक नक्कीच लक्षात येतं की उलट त्याला पुढचच पुष्कळसं येत असतं फक्त प्रश्न असतो तो म्हणजे मुळाक्षरे शिकवण्याचाच. आणि तेही वयानुरुप त्याची आकलनशक्ती वाढलेली असल्यामुळे खरंतर इयत्ता पहिलीच्या तुलनेने त्याला लिहिता,वाचता यायला नक्कीच कमी वेळ लागतो. पण असा एक गट जो फक्त आपल्या काही धोरणांमुळे म्हणा किंवा कागदपत्रांची पूर्तता म्हणा जर शिक्षणापासून वंचित राहत असेल तर अशा प्रकारचे प्रयोग करून पाहायला काय हरकत आहे. आणि खरच हाही प्रयोग खूप यशस्वी झाला आणि शाळाबाह्य मुलांचा तसेच ज्यांच्या जवळ कागदपत्रे नाहीत जन्मदाखले नाहीत

त्यांच्यासाठी सुद्धा पालकांचे स्वसाक्षांकीत प्रमाणपत्रे वगैरे उपाय काढून असा एक मोठा गट शिक्षणाच्या प्रवाहात आला.

NCF 2005 व SCF 2010 तयार झाला ज्यामध्ये ज्ञानरचनावादावर भर देण्यात आला आणि त्यानुसारच परीक्षापद्धती बदलून CCE सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन आलं. आणि परत आमच्या शिक्षकांची डोकी जरा फिरली. आता आणखी काय हे नवीन आणि ह्यात तर मुलांना आठवीपर्यंत नापास करायचं नाही, मारायचं नाही शिक्षा करायचीच नाही असे नियम ,काही शिक्षकांना तर हे नियम अगदी जाचक वाटले. मुलांना मारल्याशिवाय मूल शिकत नाही, मुलांना शिस्त लागत नाही असाच काहींचा ठाम समज. मुलांना नापास च करायचं नाही त्यामुळे मुलं अभ्यासच करणार नाही असच आम्हाला वाटायला लागलं आणि ह्यातून आम्हीच कबूल करू लागलो की शिकायचं कशासाठी, कशासाठी अभ्यास करायचा तर परीक्षेत पास होण्यासाठी आणि परीक्षेत नापास करणारच नाही म्हंटल्यावर मुलं कशाला शिकतील कशाला अभ्यास करतील असेच आमचे विचार. कारण त्यावेळी आमच्या डोळ्यासमोर आमचं स्वतःचं मूल नसायचं नं, एकदा आपण आपलं स्वतःच्या मुलाला डोळ्यासमोर ठेवून जर या निर्णयाचा विचार केला तर खरच लक्षात येईल की हा निर्णय सुद्धा किती योग्य होता आणि आहे. ह्या निर्णयामुळे मुलांच्या गळतीचे प्रमाण नक्कीच कमी झाले. जी मुले नापास झाली की लगेच शाळा सोडून देत, शिक्षणापासून दूर जात ती मुलं किमान प्राथमिक शिक्षण घेऊन साक्षर झाले.

समाजातल्या प्रत्येक घटकातील मुले उदाहरणार्थ ज्यांच्या घरी शिक्षणाचं वातावरण नाही शिक्षणाचं महत्त्व नाही. ज्यांचं हातावर पोट, कामाला गेलं नाही तर खायचं काय, काही ठिकाणी तर शाळेतील मुलं सुध्दा कुठे धुणीभांडी, पंचरच्या दुकानात, चक्क खाटिकाच्या दुकानात काम करून कधीतरी शाळेत येणारे अशी निरागस बालके  शिक्षणाकडे वळू लागल्यावर मूल्यमापन हे फक्त लेखी परीक्षांवर आधारित ठेवून आणि तेही फक्त सत्रांच्या शेवटच्या तीन तासाच्या परीक्षेत लिहिल्या गेलेल्या प्रश्नोत्तरांवर आधारित ठेवून कसं चालेल? हा विचार लक्षात घेऊनच मुलांच्या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.RTE मध्ये सांगितलेल्या ज्ञानरचनावादावर तर उलटसुलट प्रतिक्रिया उमटतच होत्या पटत होतं, पण नेमकं करायचं कसं? योग्य दिशाच मिळत नव्हती आणि आम्ही आमच्या पारंपारिक पद्धती सोडायलाही तयार होत नव्हतो कारण आम्हाला जसं शिकवल्या गेलं आम्हीही  तसंच शिकवणार ,आम्ही नाही का शिकलो? तेव्हा कुठे होता ज्ञानरचनावाद असे आमचे त्या ज्ञानरचनावादावरचे युक्तिवाद. पण खरच खोलात जाऊन जर विचार केला तर खरच आपल्या बरोबर शिकणारे आपले किती वर्गमित्र मैत्रीणी शेवटपर्यंत शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहिले हा प्रश्न उरतोच. आणि म्हणून मग गिजुभाईंचं दिवास्वप्न, पानसे सरांची ज्ञानरचनावादावरची पुस्तकं वाचल्यावर लक्षात आलं की खरच मूल स्वतःचं स्वतः च शिकत असतो आपल्याला त्याला तशा संधी उपलब्ध करून द्यायला लागतात, आव्हानं द्यावी लागतात. त्याच दरम्यान कुमठे बिटात श्रीमती प्रतिभाताई भराडे यांचे निरनिराळे प्रयोग सुरू असलले ऐकू येऊ लागले आणि त्या प्रयोगातून प्रत्येक मूल शिकू शकते हा विश्वास

महाराष्ट्रातल्या प्रत्येक शिक्षकामध्ये निर्माण झाला. प्रत्येक मूल एकमेव आहे आणि आवडीनुसार त्याच्या क्षमतेनुसार प्रत्येकाची शिकण्याची पद्धत, गती वेगवेगळी असते.

मग काय हे पाह्यला सगळ्या शिक्षणप्रेमी भक्तांच्या विठोबाच्या वारीप्रमाणे कुमठे बिटाच्या वार्या सुरू झाल्या. कुमठे बिटाला खरच एखाद्या देवस्थानाचं रूप आलं, जसं दर्शनाला रांगा लागाव्या तसं कुमठे बिटातील १००% मुलांचं ज्ञानरचनावादी शिक्षण पाहण्यासाठी शिक्षकांच्या रांगा लागल्या. आमच्या चंद्रपूर च्या ताडाळी बिटाचे नवनवीन प्रयोग करणारे मुलांच्या शिक्षणाची अतोनात तळमळ असणारे शिक्षण विस्तार अधिकारी श्री.धनपाल फटींग यांनी आपल्या बिटातील शिक्षकांना घेऊन कुमठे बिटाचा अभ्यासदौरा केला. शिक्षक अक्षरशः शिक्षक भारावून गेले. आणि परत आल्यावर जोमाने ज्ञानरचनावादी पद्धतीने कामाला लागले. तळफळे, शब्दांचे डोंगर, बिया, चिंचोके, आईसक्रीमच्या काड्या जे मिळेल ते घेऊन मूल मूलभूत क्रिया शिकू लागलं, पालक सहभागांतून शाळा रंगरंगोटी करून भिंती बोलक्या झाल्या. तीन शब्दांवरून कथा, कविता करू लागले, प्रश्न विचारू लागले आणि राज्यात तिसरी पंढरी तयार झाली. पहिली विठोबाची दुसरी प्रतिभाताईंच्या कुमठेची आणि तिसरी फटींग सरांच्या ताडाळीची. राज्यभरातून ज्याप्रमाणे लोक ताडोबा अभयारण्य पाहण्यासाठी येत त्याप्रमाणेच शिक्षकवर्ग ताडाळी बिटातील ज्ञानरचनावादी शिक्षण पाह्यला येऊ लागले.

सुरुवातीला मलाही काम करताना कितीही काम करण्याचा आवेग असला तरी इतरांप्रमाणेच कधीतरी हा विचार मनात डोकावून जायचा की `काय खूप काम केल्यानी काय आपला पगार वाढणार आहे? की, आपल्याला जास्त पैसे मिळणार आहेत?` त्यामुळे कधीकधी पठारावस्था यायची आणि चाललेल्या प्रयत्नांमध्ये कुठे तरी खंड पडायचा. पण तात्कालीन शिक्षण सचिव आदरणीय नंदकुमार साहेब सबंध राज्यातील खेड्यापाड्यात फिरून तळागाळातील शिक्षकांपर्यंत पोचले. आणि त्यातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना हेरून काढले. आणि मिडीयाचा प्रसार झालेलाच होता त्या माध्यमाचा उपयोग करून राज्यभरातील शिक्षकांचे whatsapp group तयार केले. त्याद्वारे मूल शिकण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांना कौतुकाची थाप दिली. आणि खरं काम करणाऱ्या व्यक्तीला पैशापेक्षा अशी कौतुकाची थाप लाखमोलाची वाटते आणि आणखी जोमाने काम करू लागतो. राज्यभरात ठिकठिकाणी साहेबांच्या प्रेरणेने शिक्षण परिषदा आयोजित होऊ लागल्या. मे २०१६ मध्ये सृजन शिक्षण संस्था सांगली आयोजित अशाच एका परिषदेला आवर्जून गेले आणि आदरणीय नामदेव माळी सरांना भेटून अक्षरशः भारावून गेले. अशाप्रकारे मूल शिकण्यासाठी वाहून घेतलेल्या महान व्यक्तींना भेटून खरच नतमस्तक झाले.

आणि अशातच आदरणीय नंदकुमार साहेबांनी शिक्षकांसमोर आव्हान ठेवलं `I WANT CHALLENGE` मूल शिकण्यासाठी तळमळीनी प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांसाठी आदिवासी भागात काम करण्यासाठी नंदकुमार साहेबांनी आवाहन केलं होतं. मी पण ती link भरली आणि माझी स्वतःची मुलं मोठी आणि समजदार झालेली असल्यामुळे गडचिरोली या आदिवासी आणि नक्षलग्रस्त जिल्ह्यात काम करण्याची

इच्छा साहेबांकडे व्यक्त केली. मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणारे, नवीन प्रयोग करणारे उपक्रमशील शिक्षकांमधून पूर्ण जिल्ह्याला सहाय्यक ठरावे अशासाठी प्रत्येक विषयासाठी DIET मध्ये विषय सहाय्यक म्हणून नेमणूक हीसुद्धा साहेबांची एक अभिनव कल्पना आणि त्याद्वारे मला चंद्रपूर जिल्ह्याची असून गडचिरोली जिल्ह्यात काम करण्याची संधी मिळाली. आणि खरच काम करण्यासाठी मोठ्ठं व्यासपीठ मिळालं. ह्यातूनच वेध परिवाराची माहिती मिळाली आणि त्यातून नंदकुमार साहेबांनी प्रत्येक मुलाला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिक्षणाचा विचार मनाला भावून गेला आणि त्याचं प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे वाबळेवाडीची शाळा. वाबळेवाडी ची शाळा पाहून तर खरच 'प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे' ह्याची प्रचिती करून दिली. दत्तात्रय वारे बस नामही काफी है, खरच ह्या व्यक्तीला आधुनिक काळातील संत म्हणावं? रीयल हिरो म्हणावं? आणि तितकच शांत आणि निग्रही व्यक्तीमत्व खरच सलाम त्यांच्या सेवेला.

हे सगळं पाहून खरच आपण फूल ना फुलाची पाकळी एवढं जरी गुणवत्तेसाठी केलं तरी जीवन सार्थकी लागेल असं वाटतं. वेध कार्यशाळा आणि वाबळेवाडी शाळेतून घेतलेले आदर्श शाळा आणि आतंरराष्ट्रीय दर्जाच्या शिक्षणाचं बिज गडचिरोली जिल्ह्यात शक्य तितक्या जास्तीत जास्त पेरण्यासाठी आमचे प्राचार्य आदरणीय श्री.शरदचंद्र पाटील यांच्या संमतीने ठिकठिकाणी आंतरराष्ट्रीय शिक्षण कार्यशाळा घेऊन शिक्षकांना प्रेरित केले. एटापल्ली सारख्या अतिदुर्गम भागातील शिक्षक सुद्धा भौगोलिक अडचणींवर मात करून आदिवासी मुलांना उत्तम दर्जाचं शिक्षण देण्यासाठी उत्सुक झालेले पाहिले की वाटतं हे असच थोडंथोडं विरजण लागत जाईल आणि एक पाऊल प्रगतीकडे पाहून मनाला खूप समाधान वाटतं. कारण समस्या नाही माणूस नाही आणि उपाय नाही अशी कोणतीच समस्या नाही आणि किमान को मर्यादा हो सकती है कमाल को नहीं.

सुचरिता चिंतामण काळे

विषय सहाय्यक

DIET , गडचिरोली

# प्रवास गुणवत्तेचा

## सुवर्णा सुतार



जिथे प्रेरणा असते तेथे कल्पनांची टंचाई नसते कल्पना मनात येतात आणि ते प्रत्यक्षात हातून सहजपणे रुजविल्या जातात अशी प्रेरणा मला सर्वांकडून मिळत राहिली. समृद्ध, संवेदनशील व सामाजिक भान असणारे भावी पिढी निर्माण करण्यासाठी अतिशय मजबूत अशी पायाभरणी निर्माण होणे आवश्यक असते. याच दिशेने माझे पाऊल पडत आहे असा विश्वास मला मिळत आहे. आणि समाजाला एक नवी दिशा देणारे मार्ग निर्माण करण्यात माझा वाटा असेल याचा मला प्रचंड अभिमान आहे .

**"प्रवास ध्यासाचा, प्रवास प्रगतीचा ,प्रवास गुणवत्तेचा ,प्रवास श्वासाचा, सृजनाचा प्रवास, त्यागाचा, प्रवास नवउन्मेषचा ,प्रवास क्रांतीचा, प्रवास परिवर्तनाचा ,प्रवास प्रगल्भतेचा ,प्रवास नम्रतेचा , प्रवास विनयशीलतेचा, प्रवास अध्यात्मतेचा, प्रवास अनंततेचा".**

### 1)शिदोड

2014 **मध्ये मी जि. प.शाळा शिदोड जिल्हा बीड या शाळेत जॉईन झाले तसं माझं माहेर उस्मानाबाद माझी** first appointment 2001 **ची त्या जिल्ह्यात मी** 5 **वर्ष काम केलं आणि बीड जिल्ह्यात मी** 2007 **मध्ये आले .शिदोड ही शाळा माझी बीड मधील** 3 **नंबर ची शाळा होती.**

**त्या शाळेत सर्वांना वाटायच मी काही वेगळंच करते.खाली बसून शिकवायचे, मुलांसोबतच जेवण करायचे ,मुलांसोबतच गप्पा, खेळ इ.बाकी शिक्षकांना माझं बोलणं थोडंच व्हायचं,माझं असं वेगळं राहणं सर्वांच्या लक्ष्यात आलं आणि त्यामुळं मुलांमधील झालेली प्रगती दिसू लागली. मूल सतत काही न काही करत असलेली सर्वांनाच दिसून आलं. सतत छोटे छोटे उपक्रम मुलांना जे आवडेल तेच करायचं कधी भेळ पार्टी कधी शेतात तिथं असतानाच,**

मी शिदोड ला असतानाच बिना दप्तर शाळा सुरू केली होती.शनिवारचा एक दिवस मुलांनी रिकामे यायचं फक्त डबे आणायचे .तो उपक्रम मुलांना खूप आवडायला लागला. मग त्यादिवशी मुलांचे छान छान डबे असायचे,नवीन ड्रेस असायचा आणि मनसोक्त खेळणं असायचं एकमेकांचे डबे खायचे.सगळे पदार्थ मिक्स करायचे सगळं खाऊन खाऊन आमचं पोट फुगायचं आणि मग खेळताना हसून- हसून पोट ही दुखायचं.त्यामुळं पुढील 6 दिवस मुलं मनापासून अभ्यासही करायची.पुन्हा बिना दप्तरची शाळा कधी येईल? याची आम्ही वाट ही बघायचो.असा माझा शोदोड चा आठवडा असायचा.




तेव्हा शिदोड-2 री वर्गातील MTSE परीक्षेत 9 विद्यार्थी उत्तीर्ण ही झाले.

## 2) ज्ञानरचनावाद

2014-15 मधेच ज्ञानरचनावाद आले. जणू काय हा उपक्रम माझ्या मनातलाच ओळखला अस वाटलं. कारण यापैकी बऱ्याच गोष्टी करत होते. मुलं मला समजलेली होती. मुलांच्या भावनेचा माझा छान अभ्यास झाला होता.मग मी असे साहित्य बनवायचं ठरवलं की ते ज्ञानरचनावाद असावं,टिकाऊ असावं,कुठेही उचलता येईल असं ही असावं आणि गृप मध्ये मुलांनी कुठेही बसावे. असं साहित्य मी माझ्या कल्पने नुसार प्लायवूडचे ज्ञानरचनावाद रंगकाम करून मजबूत साहित्य तयार केलं. ते खूप आकर्षक वाटू लागलं त्याचा फायदा मला खूप झाला .

## 3)आठवण अर्जुनची

एक गोष्ट सांगावीशी वाटते तिथं एक चौथीच्या मुलाचं ऍडमिशन आलं पण माझा वर्ग होता 2 री चा,त्या मुलाच्या घरची अपेक्षा त्या मुलाला माझ्याच वर्गात बसवायचं त्याच नाव अर्जुन होतं.दिसायला शांत म्हणजे तो मूकबधिर होता. त्याला फक्त आपल्या

हालचालीवरून expression वरून भाषा समजायची.असा मुलगा माझ्या वर्गात पालकांच्या इच्छेमुळे बसवण्यात आला.मी पालकांना बोलले,

"बसवण्याचा प्रश्न नाही मी याला ओळखून घेतल तर मला याचाच खूप जीव लागेल"आणि तसेच झाले. थोडे दिवस अर्जुन मुळे वर्ग विचलित व्हायचा. बाकी मुलं हसायची,भांडायची पण माझा वर्ग मी खूप छान हाताळला.याला माझं मन खूप साक्षी आहे. मी सर्व मुलामध्ये एवढा बदल केला की,त्या अर्जुनला कोणी रागवत , मारत असलं तरी मुलं मी कुठं आहे ती बघायचे. मॅडमचा `अर्जुन` असच नाव पडलं त्याचं.आजही

माझ्या डोळ्यात पाणी येतं त्या अर्जुनने मला खरच खूप जीव लावला.सतत माझ्या आजूबाजूला फिरायचा, माझ्या जवळ उभा राहायचा.आम्ही ठरवलं होतं अर्जुन काही करत असेल तर त्याला बघायचं नाही. दुर्लक्ष करायचं कारण त्याला आम्ही बघितलं की तो लगेच वर्गाबाहेर पळायचा. हळूहळू तो वर्गातील सगळी कामं करायला लागला. साहित्य नीट लावायचा,पुस्तकं फक्त बघत बसायचा, ती ओळीत लावायचा, फळा पुसायचा, मी काही मागितले की पटकन द्यायचा,मी कामात असले की फळ्यावर काहीही लिहायचा आणि स्वत:च हसायचा आणि चक्क त्याने एक दिवस 1 ते 10 पर्यंत ची उजळणी लिहून काढली. आम्ही बघतच राहिलो मी गाडीवर निघाले की जवळ यायचा फक्त हसायचा.कारण त्याला माझ्या गाडीवर बसावं वाटायचं कारण त्याचं घर वाटेत होतं आणि त्याला मग मी रोज येता जाता सोडू लागले. सर्वांना राग येणारा अर्जुन पुन्हा आवडायला लागला. मुलं विश्वासातून बदलतात. मूल समजून घेतलं की बदलतात.मुलांसोबत आपण लहान झालं की मुलं आनंदी होतात आणि अधिक आपल्या जवळ येतात .

शिदोड ला असतानाच श्री सतीश वराट सरांची माझी ओळख झाली. आणि मुलांना रचनावाददवारे ज्ञान कसं दिलं पाहिजे. हे मला सतीश सरच्या प्रभावी गणित प्रशिक्षणातून अधिक समजलं आणि तिथंच मला भागाकार समजून घेता आला आणि मुलांना समजावता ही आला .

## 4) आदरणीय हिंगोणीकर साहेबांची भेट

माझं ज्ञानरचनावादी साहित्याचे फोटो जिल्हयाच्या बाहेर गेले आणि मग `आदरणीय शिक्षणाधिकारी हिंगोणीकर` साहेब यांचा अचानक मला फोन आला आणि `तुझी शाळा मी बघायला येतोय`असं मलाबोलले.तिथंच मी थक्क झाले आणि घाबरून ही गेले. कारण हेडमास्टर सर यांना बोलताना ही मी घाबरून जायचे आणि चक्क शिक्षणाधिकारी साहेब माझ्या शाळेत येतात .आणि तिथून खरी या सुवर्णा ची ओळख सर्वांना झाली. 6 वर्षात मी कुणाला माहीत नव्हते पण माझ्या या कामामुळे पूर्ण तालुका मला ओळखायला लागला कारण हिंगोणीकर साहेबांनी मला मानस कन्या मानलं होतं आणि सगळीकडे माझं कौतुक करायला लागले. मला वाटायचं मी एवढी कौतुकास्पद नाही. उगाच हे फोटो व्हायरल झाले अस वाटू लागलं .पण ही ओळख मला बसू देत नव्हती .

## 5)सामाजिक कार्य विधवा /विधुर पुनर्विवाह

सुतार समाज पुनर्विवाह मंच ,महाराष्ट्र राज्य या मंचची मी सचिव या नात्याने सांगू इच्छिते की, हा एक 200 लोकांचा आमचा व्हाट्सएप गृप आहे. या गृप मध्ये महाराष्ट्रातील कामगार,नोकरदार,आणि विधवा,विधुर ,घटस्फोटित सदस्य हीआहेत. हे सामाजिक कार्य फक्त सुतार समजालाच नाही तर आज प्रत्येक समाजाला अभिमानास्पद ठरले आहे कारण या मंच च्या माध्यमातून विधवा विधुर आणि घटस्फोटित 40 जणांचे पुनर्विवाह

यशस्वी झालेली आहेत . प्रत्येक समाजात विधवा ,विधुर घटस्फोटित स्त्री पुरुष आहेत ते आजही जाचक कुविचार अंधश्रद्धा याला सामोरं जात आहेत .त्यांच्या कलागुणांचा व कार्यशक्तीची थट्टा केली जाऊ नये, स्त्रियांवरील अपमानित व तुच्छ जीवनाचा कलंक पुसून काढण्यासाठी व विधवा स्त्रियांच्या उज्वल भविष्यासाठी स्त्रियांवर लादलेली सर्व बंधने झुगारून देण्याचा प्रयत्न हा आमचा मंच करीत आहे .या मंच चे अध्यक्ष राजेशजी भालेकर जालना हे या सत्कार्यात महत्वाची भूमिका बजावत आहेत. तसेच मला सातारा याठिकाणी खासदार आदरणीय श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले . मला या कार्याचा खूप अभिमान वाटतो.

## 6) शाळा मोरवड

वडवणी तालुक्यात पहिले कब बुलबुल स्थापन केले.

"परिस्थिती वर मात करणं खूप अवघड असत परंतु परिस्थिती कधीही विपरीत नसते तर ती आपल्याला सुपरिचित करावी लागते ". हे मला आदरणीय काळम पाटील साहेबांच्या मार्गदर्शनातून समजलं अर्थात कोणत्याही परिस्थिती वर शिक्षकाला मात करता येते हे मी त्यांच्या विचारातून शिकले .

वडवणी तालुक्यात येऊन 2 वर्ष झाले पण का कुणास ठाऊक मानवतेवर, माणुसकीवर स्वत:पेक्षा ही जास्त विश्वास बसला. जेव्हा आपले कार्य ,आपले विचार समोरच्याला पटतात आणि आपल्यातला विश्वास उत्साह नव्याने निर्माण होतो. ते समाधान आणि तुम्ही लढा आम्ही तुमच्या पाठीशी आहोत अशी थाप जेव्हा काळम पाटील साहेबांची विचारातून पाठीवर पडते. खरच हा आनंद आणि ही दिलेली विचारांची शिदोरी आणि प्रोत्साहन,हिम्मत आयुष्यात मिळणं महत्वाचे असते. अश्या वळणावर अशी व्यक्ती मिळणे की जी प्रत्येक अनुभव आपल्याला देत राहते. कार्यशाळा उपलब्ध करून देणे, शाळेत स्वत:चा सहभाग असणे, समोरचा दुखावणार नाही अशी भाषा शैली ठेवून संवाद साधणे. खरच मी नशीबवान आहे की आशा महान व्यक्तीमुळे मी आज इथपर्यंत आले.कृती गुणवत्तेमागचा आत्मा असतो पण कृतीपेक्षा महत्वाचा असतो त्या मागचा विचार हे मलासमजले.मला आवड तर आहे कामाची पण मला कृतीतुन करून दाखवणं जास्त महत्वाचं होतं.जीवनातआनंदासाठी आनंद मानने महत्वाचे असते परंतु आज कळतंय की आनंदासाठी आनंद वाटणे महत्वाचे असते.मुलांच्या समोर उभं राहिल्यानंतर मला पूर्णपणे याची जाणीव झाली की,आपण त्यांना शिकवायला आलो नाही तर आपण त्यांना समजून घ्यायला आलो आहोत .आनंददायी शिक्षणासाठी शिक्षकांचे मन आनंदी आणि उत्साही असायला नको का?

मुलावर भूतकाळाचे,भविष्याचे ओझे नसते. म्हणून ते पूर्णपणे वर्तमानकाळात हजर असतो. म्हणून तो पटकन निर्णय घेतो आणि कृती करतो.मग हे आपल्यात का होत नाही? कारण आपण स्वत:ला खूप अनुभवाने, वयाने मोठे समजत असतो.पण मला तर वाटतं आपण सतत लहानच राहिलो तर आपल्याला कृती करायला काहीच अशक्य नाही वाटणार.

## 7) पाणशेत वेध कार्यशाळा पहिली -

या कार्यशाळेत येण्याचा योग ही मला काळम पाटील साहेबांमुळे च आला आणि सतीश सर मुळे हिम्मत.कधीच माहीत नव्हतं बाहेर जाऊन अशी कार्यशाळा करणं पहिल्यांदा मी घर सोडलं होतं एवढ्या लांब जाण्यासाठी ते ही खास नंदकुमार साहेबांचे मार्गदर्शन घेण्यासाठी ,खूप उत्सुक होते नवीन शिकण्यास ,मला माझ्यातील ability वाढवायची होती सर्वांचे विचार ऐकायचे होते म्हणून त्या कार्यशाळेत आले खरी पण मूक राहून फक्त निरीक्षण करत राहिले. कारण व्यक्त होता येतं नव्हतं. इथपर्यंत आले हेच खूप होतं माझ्यासाठी हा योग मला साहेबांमुळेच आला .हे सगळं विचारांच गाठोडं घेऊन मी जून 2018 ला मोरवड शाळेत आले .शाळा मोरवड माझ्या प्रगतीची वाटचाल ठरली.

## 8) मोरवडचा लोकसहभाग

मोरवड ग्रामस्थांचे लोकसहभागातून शाळा प्रगतीच्या दिशेने पहिले पाऊल यशस्वी ठरले "………

ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेला लोकसहभाग मिळवणे एक दिव्यच. पण एकदा गावाचा विश्वास संपादन केला की हेच दिव्य अगदी सहज शक्य होताना मी अनुभवलेले आहे. जून 2018 ला जिल्हा परिषद शाळा मोरवड या गावात माझे पहिले पाऊल पडले शाळेत जाताच शाळेच्या मध्यभागी उभा राहून मी चहूबाजूने पाहिले सगळं तर छान आहे खोल्या आहेत भव्य मैदान आहे . फक्त त्या शाळेला जिवंत करायचं होतं उदास ,शांत वाटत होती.कारण परिसर असून झाडं नव्हती , मुलं असून बोलकी नव्हती , बिल्डिंग असून चैतन्य नव्हतं हा बदल कसा करता येईल हा विचार करून एकच ध्येय उराशी बाळगलं शाळा नक्कीच डिजिटल ई लर्निंग होणार यासाठी प्रथम भौतिक सुविधा वर खूप काम करावे लागेल सर्वांसाठी पुरेशा पाण्याची व्यवस्था, अद्ययावत स्वच्छता गृह, विद्युतीकरण ह्या मूलभूत बाबी पूर्ण करणे माझे प्रथम ध्येय. त्यासाठी मला पाहिजे होतं फक्त गावचे सहकार्य आणि माझ्यावरचा विश्वास आणि त्या दृष्टीने माझी कार्यवाही सुरु झाली .जून 2018 या कालावधीत माझ्या उपक्रमाने मी सर्वांचे मन जिंकले आणि पालकांचा विद्यार्थ्यांचा आणि सहकारी यांचा माझ्यावरील विश्वास अधिक दृढ झाला आणि मी आणि सहकारी झपाट्याने कामाला लागलो.

आणि एक दिवस मी काळम पाटील साहेबांना कॉल केला

आणि बोलले मला माझ्या शाळेत बदल करायचा जिवंतपणा आणायचा आहे. त्यासाठी मला तुमचं मार्गदर्शन पाहिजे. यावर शाळेत काय काय आहे? यावर चर्चा झाली आणि जे नाही त्यासाठी मार्ग काढण्यात आले पहिल्यांदा जवळची एक आदर्श iso शाळा बघण्याचा सल्ला साहेबांनी दिला त्यासाठी पालकांना तुम्हाला तयार करावं लागेल  ही जबाबदारी माझ्यावर टाकली मला प्रश्न पडला सुरुवात कशी करावी.

शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष यांना बोलले आपल्याला गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन या शाळेला भेट द्यायला जायचं ती शाळा बघायची तिथं काय काय प्रयत्न केले जातात ते बघायचे आहेत तेव्हा अध्यक्ष मला म्हणाले," मॅडम काही उपयोग नाही इथले लोकं ऐकत नाहीत येणार नाहीत जायचा यायचा खर्च पण करणार नाहीत". त्यांना म्हणलं ,"आम्ही खर्च करू पण जाऊयात फक्त एवढ्या वेळच प्रयत्न करू .तुम्हाला ती शाळा नाही आवडली तर आपण पुढचं पाऊल नाही उचलायचे फक्त एकदाच हा प्रयत्न करू ." अध्यक्ष ठीक म्हणाले,प्रयत्न करतो आणि आम्ही 4 जणी आणि पालक 11 जण असे 15 जण आम्ही एप्रिल 2019 मध्ये एक दिवस ठरवला आणि 'राक्षसभुवन' च्या शाळेत निघालो .

शाळेत जाताच आमचे पालक राक्षभुवनची शाळा निरीक्षण करू लागले शिस्त, टापटीप पणा स्वछता,ऑफिस, किचन ,शौचालय इ.बघून खुश तर झाले पण जास्त आनंदी आणि आश्चर्य चकित झाले ते वर्गातील चुनचुणीत मुलांची गुणवत्ता बघून आणि अशीच मुलं आपली मोरवडची झाली पाहिजेत असा हट्ट त्यांनी धरला .मोरवडची गुणवत्ता म्हटलं तर आम्ही त्या शाळेत गेल्यापासून गुणवत्ता बऱ्यापैकी वाढली होती .पालकांना ही समजलं होतं लेडीज आहेत चिकाटीने शिकवतात मुलं ही बोलकी झाली पण त्यांना मुलं राक्षसभुवन शाळेतल्यासारखीच पाहिजे होती पण हळूहळू पालकांना समजवण्यात आले भौतिक सुविधाही तेवढ्याच महत्वाच्या आहेत व वातावरण प्रसन्न राहणं ही आवश्यक आहे त्यासाठी पालक म्हणाले आर्थिक मदत करायची असेल तर अगोदर महिलांची मिटिंग घ्या. ठिकय म्हणलं आणि मी 3 मे यादिवशी 50 महिलांची मिटिंग एकटीने घेतली. मी बोलू शकेल का नाही वाटत होतं पण एक वेगळीच हिम्मत आली होती.आता मागे सरकायचे नाही असं मनाने ठरवलं होतं आणि बिनधास्त मैत्रिणीसारखं सर्व महिलांना बोलले.नक्कीच त्या घरातील पुरुषांना तयार करतील हा विश्वास आला होता .आणि मग पुन्हा सर्वांची मोठी मिटिंग घेऊ म्हणाले पण माझ्या मनात एक विचार येत होता पालकांना बोलायला मी कमी पडेल मग मी पुन्हा पाटील साहेबांना कॉल केला आणि सगळं सविस्तर सांगितले असं कुणाला बोलवावं की ज्यांनी काम केलं आणि त्यांचा प्रभाव ही पडेल ,मग साहेबांनीच नावं सुचवली

1 मेघारे सर 2 किरण गायकवाड सर 3 ठाकूर सर हे 3 व्यक्ती खरोखरच आमच्या मोरवडच्या चळवळीचे द्योतक ठरले आणि जणू काही यांच्या हातून 'श्रीगणेशा' च झाला मिटिंग खूप प्रभावी ठरली मस्त मुद्देसूद तिघांनी आपापल्या कार्याचा आलेख सादर केला आणि मेघारे सर यांनी खूप चांगल्या पद्धतीने लोकांचे विचार का बदलले पाहिजे काय गरज आहे ? हे उदाहरण सह पटवून दिले.पण मला जेवढे अपेक्षित होते तेवढे ग्रामस्थ उपस्थित नव्हते पण या तिघांनी आणि आमचे 'वडवणी तालुक्याचे विस्तारअधिकारी आदरणीय श्री उजगरे साहेब' यांनी आमचं कौतुक आमचा उत्साह वाढवला आम्हाला प्रोत्साहन दिले."खूप महत्वाचं पाऊल लेडीज असून उचलत आहेत यांना गरज आहे तुमच्या सहकार्याची आणि तुमच्या गावाची.शाळेची प्रगती करण्यासाठी या 'रणरागिणी' 'सावित्री' कम्बर खचून तयार आहेत तुम्ही त्यांची साथ द्या." असे उदगार ऐकून माझी पुन्हा

हिम्मत वाढली आणि आपण आता थांबायचं नाही कारण मी आता एकटी नव्हते एवढे लोक माझ्या पाठीमागे होते  प्रवास खूप मोठा आणि खडतर आहे हे माहीत होतं पण तरी मी पुढचे पाऊल टाकत राहिले आणि बघता बघता आमच्या शाळेला सर्वांच्या मदतीचा पाऊस पडू लागला. मिटिंग झाली की एकच महिन्यात आर्थिक आणि वस्तू स्वरूपात 3 लाख जमा झाले  पुन्हा एक प्रयत्न म्हणून आणि देणगीदार व्यक्तींचे आभार म्हणून आम्ही 6 जुलै 2019 ला पालक मेळावा ठेवला तो मेळावा आमचा अपेक्षेपेक्षा मोठा ठरला. महिलांचा सहभाग ही झाला आणि मोरवडचा परिसर जणू काही एक आनंदमेळावा च साजरा करतोय अस वाटू लागलं . 500 रु पासून सुरुवात झाली ते 51 हजार पर्यंत देणगीदार झाले , हो खरंच त्याच गावातील एक दानशूर जे कामानिमित्त पुण्याला राहतात त्यांनी ही आमची धडपड बघून आणि स्वतः च्या गावासाठी काही तरी करण्याची तळमळ म्हणून चक्क शाळेला त्यांनी रंगकाम करण्यासाठी रु 51000 /  दिले , 4 led ,टेबल खुर्च्या ,पत्रे ,वृक्षारोपण ,साऊंड ,नळ फिटिंग ही सगळी कामं टप्प्या टप्प्या ने होऊ लागली आणि सगळा गाव आणि वडवणी तालुका आश्चर्य करू लागला हा सगळा बदल एवढ्या लवकर कसा काय झाला  त्या लेडीज असून एवढं करू शकतात आणि मग आपण का मागे राहायचे असं म्हणून तालुक्यातील बऱ्याच  शाळेत गावात बदल होऊ लागला लोकसहभाग मिळवण्यासाठी. सर्व शिक्षक प्रयत्न करू लागले मला कॉल आले मॅडम तुम्ही काय काय आणि कसं कसं केलं आम्हाला ही सांगा तुमच्यासारख आम्हाला जमेल का ? अशी चर्चा आणि विचार ऐकायला मिळू लागले ,त्या तालुक्यातील माझं हे सामाजिक कार्य बघून मला वडवणी तालुक्यातील सामाजिक गृप ने पुरस्कार देऊन पुरस्कृतही केले .


मोरवड 2 री वर्गातील MTSE परीक्षेत 9 विद्यार्थी पास झाले .

## 9)आंतरराष्ट्रीय शाळा वाबळेवाडीची भेट

दिवाळी पर्यंत पुन्हा वातावरण शांत जाणवायला लागलं अजून प्रयत्न कमी पडत आहेत असं वाटायला लागलं आता मोठं पाऊल उचलावे लागेल तरच पालक अधिक जागरूक होतील हा विचार पाटील साहेबांना सांगितला आणि त्यांनी सुचवलं वाबळेवाडीला आपण मोरवडच्या पालकांना घेऊन जाऊ.  खूप शाळा जाणार आहेत तुम्ही चला. आणि

7 डिसेंबर 2019 हा दिवस माझ्या जीवनाला नवीन मार्ग दाखवणारा ठरला कारण या दिवशी माझ्या स्वप्नातील शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाबळेवाडी जिल्हा पुणे ही शाळा पाहण्यात आली शाळेचे माझे सहकारी मोरवड गाव चे सरपंच अध्यक्ष सर्व ग्रामस्थ मिळून आम्ही 40 जणांची टीम वाबळेवाडी ला जाण्यास सज्ज झाली .ग्रामस्थांनी शाळेबद्दल खूप ऐकलं होतं त्यामुळे त्यांची उत्सुकता वाढली होती आंतरराष्ट्रीय शाळा कशी असेल बघण्याची खरच तिथं पाऊल टाकले आणि आम्ही थक्क झालो . जिल्हा परिषद शाळा अशी पण असू शकते हे उद्गार सहज आले. या शाळेतील भिंतीला ना मर्यादां ,ना वर्गाला, ना वेळेचे कसलं बंधन ,नाही कसलं

वेळापत्रक तरीही विद्यार्थ्यांची गुणवत्ता परिपूर्ण हे सर्व अद्भुत होतं .वर्गखोल्या पारदर्शक विज्ञान लॅब,संगीत क्लास ,ग्रंथालय, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू पण पाहिले. हे पाहत असतानाच आमचे मोरवड च्या ग्रामस्थांची तहान–भूक हरवली अरे बापरे! "एवढी सुंदर शाळा मुलांना तर इथून जावस वाटत नसेल घरी, मुलांना स्वतःच घर ही आवडत नसेल" असे उद्गार मला ऐकू आले आणि ग्रामस्थांशी या मैदानावरच भविष्याचा वेध घेणारा आमचा संवाद झाला "चला तर मग लागूया कामाला" अस म्हणत आम्ही वाबळेवाडी सोडली.. ग्रामस्थांसोबत प्रेरणा व जाणिवा करणारा संवाद आमचा वापस येताना बस मध्ये झाला .मुलांकडून शिकण्याचे सौजन्य ठेवले की ती मुले



आपला अभिमान ठरतात.ग्रामीण भागातील मुले रान फुलासारखी असतात त्यांना योग्य खतपाणी मिळाले किती प्रचंड बहरतात सर्वत्र सुगंधाची दरवळ करतात. भविष्यात आणखी सृजनाच्या वाटा शोधण्यासाठी ही बालमने मला प्रेरणा देत आहेत असं वाटू लागलं खरच मी सदैव ऋणी राहील या लेकरांची...

"सामर्थ्य आहे तुझ्यात ,

पेटू दे आता वणवा

कळू दे सर्व जगाला ,

माझा स्त्री जन्म महान झाला ."

## 10) उपक्रम हाक तुमची साथ आमची

दर महिन्याचा आमचा हा उपक्रम आहे या उपक्रमाची संकल्पना जेव्हा मी मांडली तेव्हा या कामासाठी 15 शिक्षक आम्ही तयार झालो, आणि शाळेला गरजू वस्तू आपण देऊ हे ठरलं. आम्ही दर महिन्याला प्रत्येकी 200 रु जमा करतो alphabetical प्रमाणे ज्याचा नंबर येईल त्याच्या शाळेला आवश्यक वस्तू घेऊन देतो हा उपक्रम आज(जुलै2020)ही चालू आहे. यामुळे माझ्या शाळेला 2 डायस व क्रीडा साहित्य मिळाले .अश्याप्रकारे आपल्या आणि इतरही शाळेला सहकार्य कसे होईल याचा विचार केला मी.शाळेला रंगकाम ही अश्या व्यक्तीने करावं की



त्या व्यक्तीला शाळेचा अभ्यास असावा ही पण माझी इच्छा पूर्ण झाली आणि रंगकाम करण्याची जबाबदारी मी आपलेच ॲक्टिव्ह शिक्षक उद्धव बडे (गेवराई तालुका) सर यांना दिली.

"आपण शब्दांना स्पर्श करू शकत नाहीत मात्र आपल्या मनालाही स्पर्श करण्याची ताकद शब्दात आहे"असे किरण गायकवाड यांचे विचार माझ्या लक्षात होते खरंच आपल्या चांगल्या बोलण्याने एवढा फरक पडू शकतो .2 वर्षा पूर्वीचे भट्टी साहेबांचे वाक्य मला आज ही आठवतं "मॅडम तुम्ही जिथं जाल तिथं नंदनवन कराल." आज मोरवडचा परिसर बघून वाटतंय हे वाक्य खरंच खरं ठरतंय. तंत्रज्ञान विषयी विचारायचं झालं की मी आवर्जून सोमनाथ वाळके सर आणि विशाल घोलप सर यांचा सल्ला घेत होते .

सुसंस्कृत माणसांची संगत आणि यशस्वी लोकांचे मार्गदर्शन आपल्या जीवनात नक्कीच चांगले बदल घडवू शकते हे धर्मराज करपे सर व जग्गु जाधव सर चे विचार मला उपयोगी ठरले.

"तुमच्या स्वप्नांना सांगू नका की तुम्हाला अडचणी येतात पण तुमच्या अडचणींना नक्की सांगा की मला स्वप्न आहेत " स्वप्न बघण्याची हिम्मत मला सतीश ( वराट)सरांनी दिली आणि स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी चा विश्वास ही दिला .अजून खूप काही करायचं .माझ्या स्वप्नातील शाळा मला तयार कारायच्याआहेत हे माझे स्वप्न पूर्ण होईल का ? असेच मार्गदर्शन करणारे आणि हिम्मत वाढवणारे महान व्यक्ती आपल्या आजूबाजूला असतील तर नक्कीच हा बदल सगळीकडे होईल असं मला वाटतं. आपल्याला inspire करणारे सतत आपल्या आसपास असावेत नक्कीच आपण यशस्वी होऊ शकतो.

जिथे प्रेरणा असते तेथे कल्पनांची टंचाई नसते कल्पना मनात येतात आणि ते प्रत्यक्षात हातून सहजपणे रुजविल्या जातात अशी प्रेरणा मला सर्वांकडून मिळत राहिली. समृद्ध, संवेदनशील व सामाजिक भान असणारे भावी पिढी निर्माण करण्यासाठी अतिशय मजबूत अशी पायाभरणी निर्माण होणे आवश्यक असते. याच दिशेने माझे पाऊल पडत आहे असा विश्वास मला मिळत आहे. आणि समाजाला एक नवी दिशा देणारे मार्ग निर्माण करण्यात माझा वाटा असेल याचा मला प्रचंड अभिमान आहे .लोकसहभागातून शाळेच्या उज्वल यशामध्ये गेल्या काही महिन्याभरात ग्रामस्थ व शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचा ध्यासाचा सिंहाचा वाटा आहे.




Devotion, Dedication, Discipline

अरे वा ! "किती छान शाळा" हेच वाक्य हजारो माणसांच्या समोर एखाद्या लेकरांसाठी, शाळेसाठी आपसूक ओठांमधुन जेव्हा बाहेर येते तेव्हा वाक्यामध्ये दडलेलं सामर्थ्य "सहकार्य "एक नवी दिशा देण्याचे काम करतो .

"दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती"

श्रीमतीसुवर्णा सुतार

(सहशिक्षिका)

शाळा मोरवड,तालुका वडवणी जिल्हा बीड.

9822984647

# अनियमित मुलांची 100 % नियमित उपस्थिती ठेवणारी शाळा ठाकरवाडी



किरण गायकवाड

शाळेला जायला रस्ताच नाही पावसाळ्यात एक किलोमीटर चिखलातून जाणारा रस्ता. शाळेत गेल्यावर दोन वर्ग खोल्यांचे पत्रे उडून गेलेले. एकच वर्ग खोली उपलब्ध. त्या वर्गखोलीचा दरवाजाही तुटलेला..एकाच वर्गात एक मोडके कपाट, दोन खुर्च्या, पायाखालच्या फरशीनेही साथ सोडलेली... शाळेचा पट 27 तोही अनियमित. शालेय परिसरामध्ये दोन तीन झाडे अनाथासारखी शाळेची शोभा वाढवण्याचा प्रयत्न करत होते.

जून 2016 मध्ये माझी नेमणूक जि.प.प्रा.शाळा ठाकरवाडी ता.गेवराई जि.बीड येथे झाली.

शाळेला जायला रस्ताच नाही पावसाळ्यात एक किलोमीटर चिखलातून जाणारा रस्ता. शाळेत गेल्यावर दोन वर्ग खोल्यांचे पत्रे उडून गेलेले. एकच वर्ग खोली उपलब्ध. त्या वर्गखोलीचा दरवाजाही तुटलेला..एकाच वर्गात एक मोडके कपाट, दोन खुर्च्या, पायाखालच्या फरशीनेही साथ सोडलेली... शाळेचा पट 27 तोही अनियमित. शालेय परिसरामध्ये दोन तीन झाडे अनाथासारखी शाळेची शोभा वाढवण्याचा प्रयत्न करत होते. अशा परिस्थितीमध्ये शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थं यांना सोबत घेऊन शुन्यातून विश्व निर्माण करण्याचा मनाशी संकल्प केला.

पहिल्याच वर्षी माझ्या समोर स्थलांतराचा ज्वलंत प्रश्न समोर आला तो म्हणजे जेव्हा पालक ऊसतोडीला विद्यार्थ्यांना सोबत घेऊन जाऊ लागले. प्रत्येक पालकांच्या घरी, शेताच्या बांधावर, ऊसाच्या फडावर जाऊन पालकांचे प्रबोधन केले. संपूर्ण मजूर तांडा असल्याने पालकांच्या समस्या समोर आल्या. आमच्या मुलांना सांभाळणार कोण?

आम्ही ऊसतोडीला गेल्यावर त्यांना शैक्षणिक साहित्य कोण देणार?

आजारी पडल्यावर दवाखान्यात कोण नेणार?

आमच्या मुलांना आईवडिलांच प्रेम कोण देणार? या समस्या मांडल्यानंतर त्यांच्या मुलांची

जबाबदारी मी स्विकारली. व काही प्रमाणात स्थलांतर रोखण्यात पहिल्याच वर्षी यश मिळाले. शाळेतील विद्यार्थ्यांना उसाच्या फडापेक्षा, शेताच्या बांधापेक्षा, स्वतःच्या घरापेक्षा शाळेत आनंदी राहू लागले. प्रत्येक उपक्रमात मुलांना सहभागी करून घेतले.

"स्वप्न आणि सत्य" यामध्ये जे अंतर असते ते म्हणजे प्रयत्न.

माझ 100% स्थलांतर रोखण्याच स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी विडाच उचलला आणि एका ध्येयवेड्या प्रवासाला सुरुवात झाली..

शालेय व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थं यांच्या सभा आयोजित करुन पालकांच प्रबोधन व समुपदेशन करण्यात येऊ लागले. 95% उसतोड मजुर तांडा असल्याने स्थलांतराचा प्रश्न गंभीर होता. विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित बदल पाहून पालकांनी माझ्यावर विश्वास ठेवून स्वतःची मुले ऊसतोडीला नेली नाही. काही पालकांनी मुले ताड्यांवरील आजी आजोबा, शेजारी, पाहुणे यांच्या कडे ठेऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडून दिला नाही. पालकांना खऱ्या अर्थाने "माझ गाव माझी शाळा" वाटू लागली.



शाळा म्हणजे समाजाची प्रतीकृती.

"आयुष्यात मोठ होण्याची जागा मंदिर नसून विद्यामंदिर आहे".

हे जेव्हा पालकांच्या मनावर बिंबवले.तेव्हा पालकांनी आपल्या मुलांना ऊसतोडीला सोबत नेण्याच बंदच केले. ऊसतोडीला जाऊन आपल्या घामाचे पैसे चार वर्षांत रोख व वस्तू स्वरूपात पंधरा लाखाच्या वर शाळेतील लेकरांसाठी दिले.

विद्यार्थ्यांना वर्षभर लागणार शैक्षणिक साहित्य (वही, पेन, पाटी, पेन्सिल, खोडरबर,पट्टी, दप्तर, चित्रकला वही, रंगीत खडू, आयकार्ड, टाय बेल्ट, स्पोर्टस् ड्रेस, बुट) लोकसहभागातून शाळेतच उपलब्ध करून देण्यात येऊ लागले.

"शाळेला गावाचा आधार मिळाला,गावाला शाळेचा अभिमान वाटावा" अशी डिजिटल शाळा निर्माण केली.

विद्यार्थ्यांना शाळा आपले घर वाटावे असे शाळा व वर्ग वातावरण निर्माण केले.

प्रत्येक विद्यार्थी शाळेत आला पाहिजे. आलेला विद्यार्थी टिकला पाहिजे. टिकलेला विद्यार्थी शिकला पाहिजे यासाठी शाळेत कमांडो पथक , बंजारा संस्कृती पथक, कब बुलबुल पथक, वृक्षवल्ली आम्हा सोयरे उपक्रम, विद्यार्थी अभिव्यक्ती उपक्रम, पक्षी थांबा उपक्रम, मेक अप बॉक्स उपक्रम, माझ गाव माझी शाळा उपक्रम, माझी परसबाग, स्वच्छता ही एक सेवा उपक्रम, माझी शाळा शिवीमुक्त शाळा उपक्रम, आरोग्याचा बादशाह उपक्रम, चालता बोलता, बालसभा, माझी शाळा तंबाखू मुक्त शाळा, लोकसहभागातून शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रम, पाच हजार पुस्तकांचे वाचनालय उपक्रम अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण झाली. पालकांना शाळेतील उपक्रमांतर्गत आपल्या मुलांमध्ये अमुलाग्र बदल झालेला दिसला. विद्यार्थी विविध सांस्कृतिक स्पर्धेत, चित्रकला स्पर्धेत, क्रिडा स्पर्धेत बक्षीस मिळवू लागले याचे फलित 100% स्थलांतर रोखण्यात यश मिळविले.

वंचित घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या मोठ्या आव्हानास सामोरे जाऊन 100 %ऊसतोड मजूर तांडा असुनही बोलीभाषा समस्याला भेदून आमच्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून 100 % स्थलांतर रोखण्यात यश मिळविले .

चार वर्षांत 39 विद्यार्थ्यांनी इंग्लिश स्कूल मधुन आमच्या शाळेत प्रवेश घेतला.

एक दोन झाडे असणारी शाळा आज 55 झाडे असणारी शाळा झाली. तांड्यावर चार वर्षांत 1689 झाडांचे वृक्षारोपण तर 600 पेक्षा जास्त झाडांचे वृक्षसंवर्धन.

27 पट असणारी शाळा आज सीसीटीव्ही च्या निगराणी खाली 114 पट असणारी शाळा झाली.


किरण गायकवाड

जि.प.प्रा.शाळा. ठाकरवाडी ता.गेवराई जि.बीड

9421556585

# माझं शिकणं

वैशाली साबदे



माझ्या शिकण्याचा प्रवास मी शिक्षक म्हणून जेव्हा पाहते तेव्हा लहान वर्गातील वातावरण कस असावं याचा विचार येतो. वर्ग असा असावा की मुलांना हवाहवासा वाटावा. भीतीचं कुठलाही वातावरण वर्गात नको. शिक्षक म्हणून मुलांना भावनिक आधारही देता आला पाहिजे. म्हणून मी माझ्या मुलांसोबत असं भावनिक नाते ठेवून असते. याचा फायदा मुलं मनमोकळा संवाद करतात.मनातलं सांगतात.

**मूल हे जन्माला येण्याच्या आधीपासून शिकत असते. नंतरही शिकणे सुरू असते. हा विचार मनात असताना माझं शिक्षण कसं झालं याचा विचार मनात येऊ लागला. अन सुरू झाला हा लेखनप्रपंच.....**

**मनाने नोंद घेतलेल्या घटना, प्रसंग, व्यक्ती इथे मांडणार आहे त्यातून सहजच लक्षात येईल की मी कशी शिकले.माझ्या घरी आजी, आई, पप्पा, मी आणि माझा भाऊ राहायचो. माझी मोठी बहीण मामाकडे राहायची. तिला तिथेच केशवराज शाळेत घातले होते. ताई आणि माझ्यात तीन वर्षाचा अंतर होतं. भाऊ माझ्यापेक्षा चार वर्षांनी लहान होता. घरी रॉकेलचा दुकान होतं. घरी आई रॉकेल विकायची. पप्पा दुसऱ्या दुकानात जायचे. आमचं घर गोलाई जवळ हत्ते नगर येथे होतं. मला आमच्या घराजवळच्या बालवाडीत प्रवेश घेतला होता. मला अंधुकसं आठवतंय.ती बालवाडी बाईंच्या घरातच भरायची. अंधारी खोली होती. दारात सुरूवातीलाच पाण्याचा भलामोठा होता. बालवाडीत मुलं रडू नये म्हणून रूपाबाई मुलांना हौदात कोंडवेन म्हणायच्या. त्यामुळे मला बालवाडी जायला भीती वाटायची. त्या बालवाडीत आवडीचं असं काहीच नव्हतं.**

**त्यादिवशी आमच्या बालवाडी समोरच्या दुकानाच्या ओट्यावर भजे ठेवलेले होते. त्यातला एक भजा मी खाल्ला. त्याचं निमित्त होऊन मी खूप आजारी पडले. खूप दिवस आजारी होते. अशा आजारपणापच मी घागरा ओढणी घेण्याचा हट्ट केलेला. आजीला वाटलं," या पोरीचं काही खरं नाही. तिची हौस राहून जायची. " म्हणून तिने नवीन घागरा ओढणी आणायला सांगितली. पप्पा घागरा ओढणी घेऊन आले. घागरा ओढणी घातली आणि हळूहळू मी बरी झाले. पण या सगळ्यात माझी बालवाडी बंद झाली. मला तर खूप बरं वाटलं. औपचारिक शिक्षणाची सुरुवात झाली ती अशा पद्धतीने. पुढच्या वर्षी मला गोदावरी शाळेत पहिली दाखल**

करायचं घरच्यांनी ठरवलं.  वय कमी म्हणून शाळेत दाखल करून घेत नव्हते. शेवटी सहा महिने वय वाढवून पहिलीत प्रवेश घेतला.

शाळेचा पहिला दिवस मला अजूनही आठवतो. मी शाळेत जाणार आहे याचा घरी कौतुक होतं. आजीने मला डब्यात सप्पक वरण,चटणी,पोळी डब्यात दिली होती.गोदावरी शाळा मोठी होती .पहिली ते चौथीपर्यंत मुलामुलींची होती.पाचवीपासुन मात्र फक्त मुलींची शाळा होती.मला पहिलीला शिकवायला व्यास बाई होत्या.आम्हाला वर्गात बसायला लाकडी बाकडे होते.मला आठवतयं माझ्या शेजारी नरेश हंचाटे बसायचा.खूप भांडण करायचो आम्ही.बाई कशा शिकवायच्या ते तितकस आठवत नाही.पण मला सहा काढता येत नव्हते.त्यासाठी मी खूप मार खाल्लाय हे आई सांगते.जेंव्हाही मी माझ्या पोरांना काही बोलणार तेंव्हा.पहिलीत मी शाळेत पुर्णवेळ थांबत नव्हते.आमच्या शेजारची मुन्नी त्याच शाळेत दुसरीत होती.दुपारच्या सुट्टीत ती खुपदा खेळण्यासाठी मला तिच्यासोबत दयाराममध्ये घेऊन जायची.तिथे नारळाची बाग होती.सहसा तिथे कुणी दुसर नसायचं.शाळेतच दप्तर,डबा ठेऊन मी तिच्यासोबत जायचे.यामुळे माझे कितीतरी डबे,वा ॅटरबॅग हरवायच्या अन् आईचा मारही बसायचा. एक वेळेस तर खेळण्याच्या नादात वेळेचं भान राहिलं नाही. घरच्यांची शोधमोहीम पूर्ण झाली. शेवटी घरच्यांनी पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवली. खेळून झाल्यावर आम्ही दोघे घरी आलो. घरी आल्यावर आमची चांगलीच पुजा केली. मुन्नीच्या नादाला लागून मी बिघडतेय अस घरच्यांना वाटत होतं.  अशातच मी पहिली पास झाले तेही 300 पैकी 300 मार्क घेऊन. सुट्टीत मामाकडे सगळे विचारायचे," वैशू किती मार्क पडले" आणि सांगायचे तीनशे पैकी 300.

दुसरी ला गेल्यावर मुली सोबत राहू देत नव्हते.  गल्लीत आम्ही बोलायचं नाही. पण शाळेत गेल्यावर आम्ही बोलायचं. अन्  पुन्हा शाळा चुकवुन  दयाराम मध्ये. तेही वर्ष असे मजेने सुरू होते. मनाला वाटेल तेव्हा शाळा मनाला वाटेल तेव्हा खेळायला. यावर्षी वार्षिक परीक्षेच्या वेळेस नेमकी मी आजारी पडले. आई मला परीक्षेला घेऊन गेली होती. बाईंनी एकाच दिवशी माझ्याकडून सर्व पेपर लिहून घेतले होते.  मी पेपर लिहीत असताना आईच्या डोळ्यात मात्र कौतुक होतं. पण या सगळ्यात शाळा सोडून बाहेर खेळायला जायची माझी सवय काही सुटली नव्हती. म्हणून घरच्यांनी माझी शाळा बदलायचे ठरवले. आणि तिसरी ला मला व्यंकटेश शाळेत दाखल केले.

तिसरीला नवीन शाळा, नवा वर्ग, नव्या बाई सगळं काही नवीन होतं. तुझ्या सोल्पुरे बाई  कडक होत्या. मला त्यांचे डोळे अजून आठवतात. त्या वर्षीचं काही आठवत नाही.  शाळा बदलल्यामुळे माझे शाळा सोडून बाहेर फिरणे बंद झाले. आमच्या गल्लीतल्या इतर मुली"अ" तुकडीत अन् मी "क"मध्ये असल्याने मला नवीन शाळेत मैत्रीणी नव्हत्या.चौथीची एक मैत्रीण आठवते हाके.आम्ही एका बाकड्यावर बसत असु.सोबत दप्तर आवरत असु.तिला अक्षर अक्षर अस वाचयला जमायचं.पण पुढे ती पाचवीला आलीच नाही.

छोटी व्यंकटेश शाळा खडक हनुमान कडेपहिली ते चौथीपर्यंत होती. पाचवीपासुन पुढे ती बसस्टँडच्या मागे होती. शाळेच आवार भव्य होतं.भलमोठ मैदान,हाॅल,इमारतही मोठी होती.शाळेला मोठ्ठ गेट होतं.शाळेत कॅन्टीन होती.महादेवाच मंदीर होतं.एक विहीरही होती.इथे ग्रंथालय होत,प्रयोगशाळा होती. शाळेचे विद्यार्थी संख्याही खूप होती. एका एका वर्गात साठ–पासष्ट मुलं असायची. आठवी ते दहावी ची सकाळी साडेसात ते साडेबारा अशी वेळ होती. पाचवी ते सातवी ची साडेबारा ते साडेपाच अशी वेळ होती. पाचवीपासून मुलीची एक तुकडी होती"अ"मध्ये मुली ब, क,ड,ई,फ मुलांच्या अन् "ग"ही मुला–मुलींचे तुकडे होती. आता मात्र गल्लीतल्या सगळ्या आम्ही एकत्र आलो होतो. येथे विषयाला वेगळे शिक्षक होते. खेळाला वेगळे सर होते.संगीत,चित्रकलेलाही वेगळे सर होते.

पाचवी ते सातवीतही मी साधारणच होते.साधारण अभ्यास.इथे आता प्रत्येक विषयाचे गृहपाठ सुरी णाले होते.प्रत्येक गृहपाठाला दहा गुण असायचे.पण मला मात्र हे गृहपाठ पुर्ण करायचा कंटाळा यायचा.मी कधी गृहपाठ पुर्ण करायचे नाही.खेळायला मात्र खूप मजा यायची.कुंभारे सर आमच्या कवायतीही बसवायचे.मला मराठीच पुस्तक खुप आवडायचं....पाचवी ते सातवी ची एक खासियत म्हणजे तीनही वर्षी मला 57.54% इतके गुण मिळाले. पॉईंट्स सुद्धा फरक झाला नाही.आठवीला आमच्या शाळेत संस्कृत हा विषय देखील होता.काय असतं कशासाठी घ्यायच हे काही माहित नव्हतं.फक्त मैत्रीणी आणि मी एका वर्गात यासाठी संस्कृत घेतलं.आणि खऱ्याअर्थाने माझी जडणघडण सुरु झाली.......

आठवी "फ" पासुन न विसरणारा असा शिकण्याचा प्रवास सुरु झाला.आठवीला घुगे मॅडम आम्हाला वर्ग शिक्षीका होत्या.घुगेबाई अंत्यत कडक व प्रेमळ होत्या.त्यांना अभ्यास लागायचा.आठवीत आम्ही मुलं,मुली एकत्र होतो.आम्हाला संस्कृत शिकवायला नवीन कदम मॅडम आल्या होत्या.त्या खुप छान होत्या,त्यांनी त्यावर्षी आमच संस्कृत नाटक बसवलं"वयम् सर्वे भारतीया।" यात मी राजस्थानी मुलीचं पात्र केले होते.फक्त एका मिनीटासाठी स्टेजवर गेले.माझ नाव....मी राजस्थानी तरीही सगळे भारतीय अशा आशयाच वाक्य.पण त्या एका मिनीटाने शिकण्याला एक नवी दिशा मिळाली.स्वत:वरचा विश्वास वाढवला.वर्गातपण मजा येत होती.मैत्रीही घट्ट होत होती.इथे गुणांचीही गाडीही पुढे सरकली.67% पडले.

शाळेत वर्गाचा मॉनीटर निवडणुक पध्दतीने निवडायचे.नववीला मी निवडणुकीसाठी उभी राहिले.अन् वर्गाची पहिली CR झाले. त्या वर्षी शाळेत नवीन शिक्षक घेण्यासाठी डेमोपाठ आमच्या वर्गावर घेतले. आम्हाला सर्वांना संस्कृतला कदम मॅडमचा हव्या होत्या. त्यासाठी आम्ही ठरवून सर्वांनी दुसऱ्या सरांच्या तासात चुकीची उत्तरे दिली. तरीही त्या सरांची नेमणूक झाली. त्यावेळेस आरक्षण वगैरे भानगडी माहित नव्हत्या. आम्ही मुख्याध्यापकांच्या नावाने एक अर्ज लिहिला. त्यात आम्हाला सर नको कदम मॅडमचा हव्यात असा आशय लिहिला. अर्जावर आमच्या वर्गातील सर्व मुलांच्या आणि"ई" तुकडीतील सर्व मुलांच्या सह्या घेतल्या.मी आणि दुसरा CR ऑफिसमध्ये गेलो.मुख्याध्यापकांना तो अर्ज दिला.

दुसऱ्या दिवशी गणिताचे हुच्चे सर वर्गावर आले.ते अतिशय कडक होते.पण गणित छान शिकवायचे.त्यांनी आल्यावर आम्हाला रागावलं.अस काही करायच तर सांगायच तरी.यानंतर शाळेचे शिपाईही हसायचे,"साबदे ऑफिसमध्ये आली म्हणजे भितीच वाटते कुणाची तक्रार घेऊन येते की."

एवढ होऊनही मला कोणी रागावलं नाही.इथ मला स्वातंत्र्य मिळालं.व्यक्त होता येऊ लागलं.अभ्यासात गती आली.प्रत्येक स्पर्धेत सहभागी होऊ लागले.यावर्षी पटणे सर शिवराज्याभिषेकाचा प्रसंग बसवत होते.त्यांनी मला जिजामाता म्हणुन निवडलं.त्यावर्षी मीही नाटक बसवलं "मला शिकायचयं"अस नाटक होतं.पटणे सरांनाही नाटक आवडलं.ते नाटक गॅदरिंगमध्ये सादर झालं.

आमच्या काळी दहावीला खूप महत्त्वाचं. दहावी म्हणजे गंभीर वातावरण, सतत अभ्यास करणं, ट्युशन वगैरे वगैरे..... पण आम्ही नंतर खेळायला भेटणार नाही म्हणून भांडण खेळायला जायचो. खेळाच्या तासात खेळायचो. दहावीला होनराव सर क्लास टीचर होते. त्यांचं आणि आमचं नातं खूप घट्ट झालेलं. कोणतीही गोष्ट त्यांना सहज सांगता यायची.

माझी इंग्रजी ची ट्युशन रात्री साडेआठ ते साडेनऊ होती. मी आणि शेजारचा भैया सायकलवर जायचो. एके दिवशी भैय्या पुढे गेला.अन् एका मुलाची आणि माझ्या सायकलची धडक झाली. त्यावेळी कोणत्याही मुलाला भैय्या म्हणायचं असामी ठरवलेलं. म्हणून त्यालाही भैया जाऊ दे म्हणून निघून गेले. दुसऱ्या दिवशी त्या मुलाने मला थांबवलं आणि माझ्या मैत्रिणी साठी एक चिठ्ठी दिली. मला तर काहीच सुचत नव्हतं. कोणाला सांगावं हेही समजत नव्हतं. दुसऱ्या दिवशी ही गोष्ट मी होनराव सरांना सांगायची ठरवली. सरांनी सरळ सांगितलं," मी असं काही करणार नाही असं सांग. आणि त्यांनी नाही ऐकलं तर मी येईल." सरांच्या एका वाक्याने मला खूप धीर मिळाला. असा भावनिक आधारही विद्यार्थ्याला शिक्षकांकडून हवाच असतो की. दहावीला प्रत्येक उपक्रमात सहभागी होत होते. स्वतः प्रयोग करत होते. समजून अभ्यास करता येत होता. वर्गाची जबाबदारी सांभाळत होते. बोर्डाची परिक्षा दिली. दहावीला 63.33%मिळाले.

टक्केवारी चे महत्व तेव्हा कळलं नाही. पण मला त्या दहावी "फ"च्या वर्गाने विद्यार्थी म्हणून समृद्ध केलं. आत्मविश्वास असलेली मी शाळेतून बाहेर पडत होते. शाळेत अशा कितीतरी आठवणींची शिदोरी मिळाली. शाळेने मला वाचनाची गोडी लावली. माझ्या अभिनयाची आवड मला समजली. गाण्याचं शास्त्रीय शिक्षण सुरू केलं. नेतृत्वगुणाचा विकास होण्यासाठी पदोपदी संधी मिळत होती.

माझ्या शिकण्याचा प्रवास मी शिक्षक म्हणून जेव्हा पाहते तेव्हा लहान वर्गातील वातावरण कस असावं याचा विचार येतो. वर्ग असा असावा की मुलांना हवाहवासा वाटावा. भीतीचं कुठलाही वातावरण वर्गात नको. शिक्षक म्हणून मुलांना भावनिक आधारही देता आला पाहिजे. म्हणून मी माझ्या मुलांसोबत असं भावनिक नाते ठेवून असते. याचा फायदा मुलं मनमोकळा संवाद करतात.मनातलं सांगतात.

शिकण हे आजन्म सुरूच असतं. विद्यार्थी दशेतील शिकणं, शिक्षक म्हणून सातत्याने नवनवीन गोष्टी शिकणे...... एक स्वतःच्या समृद्धीसाठी तर शिक्षक म्हणून स्वतःसोबत विद्यार्थ्यांच्या समृद्धीसाठी...........

**वैशाली साबदे**

# माझ्यातील शिक्षकाची घडण


## सौदागर कांबळे




प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे वारे वहायला सुरुवात झाली. नंदकुमार साहेबांचे नाव कानी पडू लागले. पण आमचं काम भारी होतं. ( आमच्या मते) आम्हाला इतर कशाची गरज वाटत नव्हती. यामुळे या वाऱ्याच्या प्रवाहापासून मी दूरच होतो . पण आमचे विस्तार अधिकारी श्री. प्रविण काळम पाटील साहेब म्हणजे एक भन्नाट व्यक्ती. एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की तो पुर्ण करणारच तेही कागदी घोड्यांच्या भितीविना. जे,जे नवं ते अगोदर गेवराईला हवं, हा त्यांचा अट्टाहास. त्यांनी आम्हाला शिक्षणाच्या या नविन प्रवाहात ओढलं.

बाविसाव्या वर्षी शिक्षक झालो पण अठराव्या वर्षीच क्लासेसच्या माध्यमातून शिकवायला सुरुवात केली होती. दहावी– बारावीची मुलं शिकवण खूप सोप. समोर उभ राहायच आणि मस्त व्याख्यान द्यायच. कितीजणांना समजायचं देव जाणे पण चुळबूळ केली तर सर्वांसमोर अपमान नको म्हणून बिचारी मुलं सहन करायची. मोठ्या मुलांना शांत बसवणही सोप असत कारण मान– अपमानाची भावना एव्हाना मनात रुजल्यामुळे निरागसता लोप पावलेलीच असते. गोंधळ केला की बाहेर हाकलणं. अभ्यास केला नाही म्हणून अंगठे धरायला लावणं. अक्षर आवडल नाही म्हणून वहीची पानं फाडणं. असे अनेक प्रकार त्यावेळी माझ्याकडून व्हायचे. एवढे अत्याचार सहन करूनही मुलांची गर्दी काही कमी व्हायची नाही. हॉल विद्यार्थ्यांनी नेहमी गच्च भरलेला. जागेअभावी कित्येकांना प्रवेश नाकारला. कमी वयातच हातात पैसा येऊ लागल्यामुळे नोकरीची काही आस नव्हती. यामुळे शिक्षक भरतीच्या परीक्षेची तयारी काही केलीच नव्हती. त्याकाळी बाजारात परीक्षेच्या तयारीसाठी पुस्तकांचा व शिकवणींचा ऊत आला होता. मी मात्र एकही पुस्तक घेतल नव्हत ना कोणता क्लास केला होता. रोजची पेपर वाचण्याची सवय व दहावीच्या गणित, इंग्रजीच्या शिकवण्यामुळे परीक्षा माझ्यासाठी सोपी ठरली व मी प्राथमिक शिक्षक झालो.

शिकवण ही माझी पुर्वीपासूनच आवड. आता अधिकृतरीत्या शिक्षक झालो. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील भगवाननगर ही कर्मभूमी. चौथीपर्यंतची शाळा. ७५ पट. दोन शिक्षक. तिसरी– चौथीचा वर्ग माझ्याकडे. कामाला सुरुवात झाली. मोठ्या वर्गाला शिकवण्याचा अनुभव गाठिशी होता. त्याच थाटात या चिमुकल्यांना शिकवण्याला सुरुवात केली.

काळा फळा. फळ्याच्या बाजूला खुर्ची ठेवलेली. भिंतीवर खिळा ठोकून दोरीला अडकावून डस्टरची जागा फिक्स केलेली. मुलांच्या अचूक रांगा. आडव्या – उभ्या एका रेषेमध्ये. रांगेच्या बाहेर बसलेलं सरांना आवडायच नाही ना. सर म्हणजे माझा वर्गात प्रवेश होताच वर्गात विखुरलेली मुलं, मी ठरवून दिलेल्या जागेवर धावत येऊन स्वतःला जखडून टाकायची. मग एका सुरात Good morning sir म्हणत मला अभिवादन करायची. तेही कस, तर एक हात कपाळाला लावून. माझा दरारा पाहून मीही मनोमन खुश व्हायचो. आता हजेरीला सुरूवात. मी हजेरी क्रमांक मोठ्याने पुकारायचा आणि संबंधित मुलाने yes sir म्हणून प्रतिसाद द्यायचा. एखादा मुलगा हजेरी द्यायचा विसरला की त्याला शिक्षा. सगळ कस शिस्तीत झालं पाहिजे.

पुस्तकातील अमुक अमुक पाठ काढा अस सांगत शिकवायला सुरुवात व्हायची. मी वाचून दाखवतो, तुम्ही बोट ठेवा हा सोबत दिलेला आदेश. वाचनातलं प्रभुत्व दाखवत माझं वाचन सुरू व्हायचं. आजूबाजूच्या चार घरांना सहज ऐकता येईल , इतका आवाज हमखास असायचा. वाचत– वाचत बंदोबस्ताला तैनात असलेल्या पोलिसाप्रमाणे मध्येच मुलांमध्ये फेरफटका मारत सावजाची शिकारही केली जायची. वाचन झाल की मग खुर्चीवर मस्त पाय दुमडून बसायच व पाठाच्या प्रवचनाला सुरुवात करायची. नजर सर्व मुलांवर फिरणारी त्यामुळे हाताची घडी घालून डोळ्यातली बुबुळे स्थिर माझ्याकडे ठेवण्याशिवाय मुलांना पर्याय न०हता. अस हे शिकवणं. घरी करण्यासाठी पोरांचं कंबरड मोडण्याइतपत अभ्यास द्यायचो. शाळा सुटली की अभ्यास करण्याशिवाय मुलांसमोर पर्यायच राहायचा नाही. पालकही जाम खुश. `नविन सर लै भारी शिकवतेत.( सरांचा आवाज लांबवर जायचा ना) पोर पण लै घाबरतेत सरांना. घरी आलं की नुस्ता अभ्यास करतेत. ` पालकांच्या प्रतिक्रियेन माझं वरच शिकवणं दुपटीनं वाढायचं. स्वतःच स्वतःला आदर्श शिक्षक म्हणून नावाजायचं.

अस हे माझ शिकवणं जोरात सुरू होतं. माझ्या लेखी मुलांच शिकणं हे त्यांच्या घरी अभ्यास करण्यावर अवलंबून होतं. वर्गातली हुशार पोरं हे माझ्या शिकवण्याचं यश होतं . तर `ढ ` असणाऱ्या मुलांमागे `मला ` सोडून इतर अनेकजण जबाबदार होते. त्या मुलांचा मुळात बुद्ध्यांकच कमी होता. त्यांचा पहिलीपासूनच पाया हुकला होता. ते लाडानं वेडे झाले होते. अशी असंख्य कारणं माझ्या समर्थनार्थ असायची. कधी– कधी त्या मुलांच्या बापाचा IQ हाच ` ढ ` मागे असावा, असा साक्षात्कारही मला व्हायचा. अस हे मजेत सुरू होतं. वर्गातली दोन– चार हुशार पोरं स्वातंत्र्यदिनी दणक्यात भाषण करून माझं नाव गावात करत होती. माझ्या एका शब्दावर लोक हजारोंचा लोकसहभाग जमा करत होती. याच पैशातून शाळेला संगणक घेतला. रंगरंगोटी केली. शाळेचं रूपडं पालटलं पण शिकवणं मात्र तेच होतं.मी त्या डबक्यात खुश होतो. आजूबाजूला बघावं तर थोड्याफार फरकानं हीच परिस्थिती होती.

अशातच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे वारे वहायला सुरुवात झाली. नंदकुमार साहेबांचे नाव कानी पडू लागले. पण आमचं काम भारी होतं. ( आमच्या मते) आम्हाला इतर कशाची गरज वाटत नव्हती. यामुळे या वाऱ्याच्या प्रवाहापासून मी दूरच होतो . पण आमचे विस्तार अधिकारी श्री. प्रविण काळम पाटील साहेब म्हणजे

एक भन्नाट व्यक्ती. एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की तो पुर्ण करणारच तेही कागदी घोड्यांच्या भितीविना. जे,जे नवं ते अगोदर गेवराईला हवं, हा त्यांचा अट्टाहास. त्यांनी आम्हाला शिक्षणाच्या या नविन प्रवाहात ओढलं.

महाबळेश्वर, पाचगणी सहलीचं साहेबांनी निमित्त केलं. सोबत वाटेतल्या एक– दोन शाळा पाहू म्हणून सांगितलं. प्रवासाला सुरूवात झाली. शिक्षण क्षेत्रातल्या नविन वाटा दाखवणाऱ्या प्रवासाला. ठरल्याप्रमाणं महाबळेश्वर, पाचगणी, ठोसेघर झालं पण मनात मात्र कुमठे, अतकरवाडी, निकमवाडी, मांडवी बिंबल. आजही सायंकाळच्या वेळी प्रतिभाताई सोबत सभागृहात झालेली चर्चा आठवते. महाबळेश्वरमधल्या गारव्यानं नाही तर शाळेतल्या मुलांच्या अकल्पित गुणवत्तेनं माझ्यातल्या ` मी ` ला गार केलं. मुलांच शिकणं पहायला मिळालं. माझं शिकवणं तिथं कुठ दिसतच न०हतं. मुलं त्यांना हव तस , हव तिथ बसत होती. स्वतःहुन साहित्य घेऊन , स्वतः शिकत होती. मोकळेपणानं बोलत होती. ना कसला नाटकीपणा ना पोकळ अभिवादनाचा फार्स. भेट झाली की सहजच Good morning म्हणून पुढं निघून जात होती.आमचं शैक्षणिक साहित्य वर्षानुवर्षे भिंतीवर टांगल होतं. इथ मात्र ते मुलांच्या हातात मस्त बागडत होतं. गणित सर्वांसमोर फळ्यावर सोडवून मुलांचा हशा ओढवून आत्मविश्वास खचण्याची भिती येथे नव्हती. इथे तळफळे होते. आपण आपलं गणित घ्यायच , आपणच सोडवायच आणि आपणच तपासायच. भारी होत सगळ. लेझीम, मल्लखांब, परसबाग , ABL असे एकापेक्षा एक भारी उपक्रम अनुभवायला मिळाले. मुलांची शिकण्याची अफाट शक्ती व वेग पहायला मिळाला.

मिळालेली सर्व शिदोरी गाठीशी बांधून उलट प्रवासाला सुरुवात झाली. शिकवणं वाटेतल्या घाटात गळून पडलं होतं. आता `शिकणं ` सुरू झालं होतं. मुलांच व स्वतःचही. जे नविन दिसेल ते जाणून घ्यायची उत्कंठा निर्माण झाली होती. नविन प्रवाहापासून स्वतःला दूर ठेवणारा मी, आता नविन प्रवाहात सहभागी होत होतो. याच परिवर्तनातून लातूरच्या शिक्षणाच्या वारीत सहभागी झालो. शिक्षणाचे नविन रूपडे पहायला मिळाले. तत्कालीन शिक्षण सचिव नंदकुमार साहेबांनी गंगापूरच्या एका शिक्षक भगिनीचा केलेला गौरव डोळ्याचे पारणे फेडणारा होता. या सर्व बाबी कामास प्रेरक ठरत होत्या.

शाळेवर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. मुल समजून घेऊ लागलो. शिक्षण अनौपचारिक झालं. फरशी रंगान नटली. माझं बोलण कमी करून मुलांच बोलणं वाढवलं. पुर्वी असह्य वाटणारा मुलांचा गोंधळ आता आनंद देऊ लागला. `ढ ` चा शिक्का मारलेल्या मुलांतही विविध गुण दिसू लागले. खुर्चीवरची मांड आता जमिनीवर मांडी झाली. पोरं अंगाशी खेळू लागली. आपल्या अडचणी बिनधास्त सांगू लागली. पोरं चुरुचुरू बोलताना पाहून जगण्याचा खरा आनंद मिळाला. मजेत जगण्यासाठी दिवसभर ७५ मित्र– मैत्रिणींची साथ मिळाली. शाळा सुटण्याची ओढ जाऊन , शाळा भरण्याची आस लागली.

याचे परिणामही दिसू लागले. पुर्वी पहिलीच्या वर्गात बाराखडीवर रेंगाळणारी मुलं आज पुस्तक वाचू लागली आहेत. स्वतःचे अनुभव लिहू लागली आहेत. दुसरीच्या वर्गातच इंग्रजी वाचनाला सुरुवात होत आहे. चौथीतून बाहेर पडताना मुलं अस्खलितपणे इंग्रजी वाचत आहेत. खेळ, नृत्य अशा अनेक क्षेत्रात मुलं आपली गुणवत्ता सिद्ध करत आहेत. हे सर्व घडतय आनंदान.

माझ्यातला शिक्षक म्हणून आलेला जडपणा जाऊन खऱ्या अर्थाने शिक्षक म्हणून माझी घडण होत आहे.


सौदागर अंकुश कांबळे

जि.प.प्रा.शा., भगवाननगर

कें.– गुळज ता. गेवराई

# अंधाराकडून प्रकाशाकडे


## रोहिणी विद्यासागर




प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शिक्षण चळवळीने शिक्षक म्हणून माझ्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवून आणला. यानंतरची माझी वाटचाल ही अखंड महाराष्ट्राच्या सोबत प्रगतीच्या दिशेने कशी होत गेली हा प्रवास खूप थक्क करणारा आहे. याच काळात आपण फक्त उत्कृष्ट शिक्षक होण्यासाठी जन्माला आलेलो आहोत या विचारावर मी अधिक अधिक ठाम होत गेले आणि अनेक आल्हाददायक अनुभव याच काळात मला आले.

1998 ला डी एड पास झाले.पण शाळेत शिकवण्याची सुरुवात त्या आधीच झाली होती.सेकंड ईयर ची परीक्षा दिली आणि आद

रणीय शोभाताई देशमुख यांच्या आदेशा वरुन त्यांच्याच राजाराम प्राथमिक शाळेत काही दिवस नोकरी केली.विद्यार्थी संख्येचा त्याकाळी अगदी सुवर्णकाळ होता.त्यामुळे प्रत्येक वर्गाची पटसंख्या 150 च्या वर सहज जायची.तबस्सुम पठाण मॅडम तेव्हाच्या माझ्या पार्टनर होत्या।शिकवण्याचा अनुभव अजिबात नाही.त्यात विद्यार्थी संख्या प्रचंड आणि वर्ग पहिलीचा!ब्रेक नसलेली गाड़ी चालवायला दिल्यासारखी माझी अवस्था झाली होती.त्यात पार्टनर रजेवर असेल त्या दिवशी तर माझा पार अभिमन्यू व्हायचा.

अशावेळी तळ घरातल्या मोठ्या हॉल मध्ये त्या मुलांना बसवुन फक्त गाणी गोष्टी घेणे आंणि मुलांना बाथरूम ला सोडणे एवढेच काम मला करता येत असे.थोड्याच दिवसांत मला या सर्व प्रकारांचा कंटाळा आला आणि शिक्षक होणे हे जगातले सर्वात बोरिंग काम आहे ही माझ्या मनाची पक्की समजूत झाली.

मग मी हळू हळू त्यातून पळवाटा शोधू लागले.शेजारी बालवाड़ी चा वर्ग भरत असे.तो 3 वाजता सुटायचा.ती मुले घरी चालली की मी मुद्दाम माझ्या मुलांना दाखवत असे.मग काय माझी मुलेही घरी जाण्यासाठी रडू लागत.मला मनातून एकदम बरे वाटे.पण वरवर रागावून "आजच्या दिवस जा!ऊदया मात्र अजिबात सोडणार नाही!"असे म्हणून मी मुलांना घरी सोडत असे.वर्गातली पाच दहा पोरं कमी झाली की तेवढेच बरे वाटायचे!

असे दिवस चालले होते.थोडी गाणी,गोष्टी गप्पा,डबा खाणे खेळ आणि जमलेच शिकवायला तर थोड़ी फार अक्षरे शिकवणे यात बराच वेळ जायचा.काही हुशार मुले लिहून वाचून दाखवायची.बाकी तशीच बसून राहायची।"100%मुलांनी शिकणं" हे माझ्या डोक्यात सुद्धा नव्हतं!

वर्गातील मुलांच अर्ध लक्ष घरीच असायचं.काही मुलं शाळेत येताच त्यांच्या आया घरी आता काय करत असतील हे सांगत बसायची!

"बाजी,हमारे मम्मी अब घरमे मजेमे टीवी देख रहे होंगे!और हमे भेज दिया स्कूल में!"असं म्हणून मोठमोठ्याने रडायला लागायची.त्यांना शांत करता करता नाकी नऊ यायचे.त्यामुळे वर्गात मला एकदम अस्वस्थ वाटायचे.कुठून 1ली चा वर्ग नशिबी आला असे वाटायचे.

2000 साली कलेक्टर ऑफिस मध्ये माझी शिक्षण सेवक पदासाठी मुलाखत झाली होती.त्यावेळी मा सलगरे साहेब मुलाखत घ्यायला होते.त्यांनी मला एक गोष्ट सांगायला सांगितली.मी बोलक्या पोपटाची "हं तस्सच होईल!"ही गोष्ट सांगितली.ते ख़ुप खुश झाले।तुमच्या मुलांना देखील असेच शिकवून आनंदी करा!अशा शुभेच्छा त्यांनी मला दिल्या होत्या.त्यांचे हे शब्द खरे करून दाखवण्याची संधी लवकरात लवकर मिळावी अशी प्रार्थना मी रोज देवा जवळ करत असे.अखेर 17 जुलै 2000 रोजी एकदाची आर्डर मिळाली. तो दिवस अजूनही जसाच्या तसा आठवतो.

जिल्हा परिषदे तून ऑर्डर घेऊन मोठ्या भावा सोबत शेंदुरवादा गाठले.कारण आर्डर वर शेंदुरवादा केंद्रातील मांगेगाव ची शाळा मिळाल्याचा उल्लेख होता.पण तिथे गेल्या वर कळले की मांगेगाव सावखेड़ा केंद्रात आहे.तिथुन आम्ही सावखेड्याला गेलो.सावखेड्या पासून मांगेगाव 5–6किलोमीटर वर होते.डोक्यापेक्षा उंच वाढलेल्या उसाच्या शेतातून पायी चालत आम्ही मांगेगाव गाठले.तिथे गेल्यावर कळले की तिथे जागाच रिक्त नाही.इतकी पाय पिट करून शेवटी निराशा पदरी पडली.त्या ठिकाणी उपस्थित विष्णु गुरुजींनी आम्हाला zp ला जाऊन ऑर्डर बदलून घ्यायला सांगितले.तिथुन निघुन औरंगाबाद गाठायला 6 वाजले।त्यामुळे zp ला सकाळी जायचे ठरवले.ऊदया आपल्याला गांव बदलून भेटेल ना?या विचारांनी रात्री झोप च आली नाही.सकाळी 11 वाजता zp ला जाऊन समस्या सांगितली.त्यांनी सावखेड़ा केंद्र शाळेची ऑर्डर बदलून दिली.तिथुन पुढे वहिनी सोबत जाऊन शाळेत रुजू झाले.

औरंगाबाद हुन सकाळी साडे आठ ला सावखेड़ा बस होती.रोजचा प्रवास सुरु झाला.1ली ते 4 थी ची ती केंद्र शाळा होती.

या गावात मी पहिलीच स्त्री शिक्षिका होते.त्यामुळे ती मुले सारखी माझ्या अवती भवती करत असायची.माझा पहिली चा अनुभव फारसा बरा नव्हता.म्हणून मी विनंती करून दूसरी चा वर्ग घेतला.आणि

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षण प्रवास सुरु झाला.या शाळेची एक खास गोष्ट म्हणजे इथले सर्व शिक्षक परिपाठात सक्रिय सहभागी होत असत.प्रार्थना,राष्ट्र गीत ते पसायदान मुलांसोबत रांगेत उभे राहून आणि दोन शिक्षक मुलांसोबत स्टेज वर उभे राहून म्हणत असत.मुलांसोबत मुल होऊन राहण्याचा पहिला धडा मी या सावखेड्याच्या शाळेत गिरवला.इथले शिक्षक मुलांसोबत खेळणे, नाचने,वाचने अशा सर्व क्रिया करतांना पाहून ख़ुप कौतुक वाटायचे.पण सर्व जेंट्स शिक्षक आणि मी एकटी लेडीज!त्यामुळे या सर्व क्रिया करतांना मला संकोच वाटत असे.मग मी ठरवले की हे सर्व आपण करायचे,पण वर्ग बंद करून.मग आमच्यादूसरीच्या वर्गाचे सर्व खेळ, rhymes with action बंद वर्गात घ्यायला लागले.मुलां मध्ये आणि माझ्यामध्ये मैत्रीचे एक छान नाते फुलत होते.ते इतके जवळ आले होते की शाळा सुटल्यावर देखील ही मुले माझ्या रूम वर येऊन खेळत असत आणि अभ्यास देखील करत असत.कित्येकदा मी या मुलांचेआणि माझे जेवण रूम वर बनवत असे.इतका त्यांचा मला लळा लागला होता.

## इंग्रजीत कशाला काय म्हणतात?

2000 साली इंग्रजी विषय पहिली पासून सुरु झाला होता.त्यामुळे मुलांचा इंग्रजी शब्द संग्रह वाढवण्या साठी मी एक खेळ घेत असे.त्यातून अनेक गमती जमती घडत.आणि मलाच वेगवेगळे धड़े शिकायला मिळत.

एकदा मी मुलांना म्हंटले, "तूम्हाला एखाद्या शब्दाला इंग्रजीत काय म्हणतात हे माहित नसेल तर मला विचारा.मी तूम्हाला सांगेन. "मुलं विचारु लागली.पाटी, पुस्तक, वही, बांगड़ी,गुंडी,असे अनेक शब्द मुलांनी विचारले.एक मुलगी उठली आणि तिने विचारले, "मॅडम टिकली ला इंग्लिश मध्ये काय म्हणतात?"

मला काही सांगता येईना!पण उत्तर तर दिलेच पाहिजे.शेवटी मी ठोकून दिले, "इंग्रज बायका टिकली लावत नाहीत म्हणून टिकली ला अजुन इंग्लिश शब्दच आला नाही!"

असेच एकदा पुस्तकातील काही शब्द चित्र आम्ही वाचत होतो.त्यात snake हा शब्द होता.आणि पुढे 2 पाने सोडून snacks हा शब्द आला होता.मी मुलांना विचारले स्नेक म्हणजे काय?मुले म्हणाली, "साप".मग मी त्यांना विचारले snacks म्हणजे काय?मग मुलं लाजू लागली.तोंडाला हात लावून हसू लागली.मी पुन्हा पुन्हा विचारल्यावर एक मुलगी हळूच म्हणाली, "snacks म्हणजे सापाची बायको!"आणि सगळा वर्ग जोरजोरात हसू लागला.सुरुवातीच्या माझ्या या काळात मी मुलांना काय शिकवले हे मला सांगता येणार नाही.मात्र या मुलांकडून मी बरेच काही शिकले.धरण क्षेत्र जवळ असल्याने तिथे अनेक पक्षी दिसायचे।त्यांची माहिती इथले मुलं मला आवर्जून सांगायचे.विशेष म्हणजे बद्री नावाचा एक गोड पोरगा अगदी 1ली तला होता.तो तर कुठलाही पक्षी दिसला की मला आवाज देऊन दाखवत असे आणि "मॅडम पक्षी दिसला की त्याच्या पाया पडत जा बरं का!माझी मम्मी म्हणती त्याच्यात देव असतो!"असे आवर्जून सांगत असे.त्याच्यातले ते निरागस बाल्य मला आजही आठवत राहते.

यात एक वर्ष कसे गेले कळले नाही.आमची 10 महिन्यांची ऑर्डर होती.ती संपली आणि 30 एप्रिल 2001 ला मला शाळेने कार्यमुक्त केले.ख़ुप वाइट वाटले.आता पुन्हा पुढच्या वर्षी ही मुले दिसतील का?असा विचार करत मी ते गांव सोडले.गावातील लोकांचे सहकार्य,तिथल्या शिक्षकांनी वेळोवेळी केलेली मदत आजही जशीच्या तशी आठवते.एक स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणून देखील मी इथेच घडले.निर्णय क्षमता,सामाजिक भान, स्वसंरक्षण अशा अनेक गोष्टी इथे राहून शिकले.माझ्या स्वतंत्र आयुष्यातला हा पहिला अध्याय आज समाप्त झाला होता.आणि दूसरा अध्याय कधी सुरु होईल हे निश्चित नव्हते...

## बदली

मे जून हे दोन महीने असेच गेले.आणि जुलै मध्ये आम्हा शिक्षण सेवकांना पुन्हा नवीन आर्डर मिळाल्या.बहुतेकांना तीच गावे मिळाली होती.मला मात्र गंगापुर तालुक्यातील शीरे सायगांव हे गांव मिळाले.तालुक्याच्या नकाशात सुद्धा हे गांव सापडायला त्रास होत होता.प्रत्यक्षात देखील हे गाव तितकेच दुर्गम होते.लासुर स्टेशन पासून 16 कि मी अंतरावर असूनही गावात जाण्या येण्यासाठी एक दोन वाहने सोडली तर अन्य सोय नव्हती.विशेष म्हणजे दुपारी 3 नन्तर गावातून एकही वाहन लासुर कडे येत नसे.वयोवृद्ध आईला घेऊन इथे राहणे देखील शक्य नव्हते.अशा गावात मी रुजू झाले.त्यावेळी तिथे शर्मा नावाचे एक शिक्षक भेटले.त्यांनी इथे न राहता रोज अप डाउन करा.आम्ही तूम्हाला अडचण येऊ देणार नाही असे सांगितले.तसेच हा जमाना घाबरून राहण्याचा नाही.स्त्रियांनी पुन्हा झाशीची राणी बनले पाहिजे असेही सांगितले.त्यांच्या वाक्याने हिम्मत मिळाली.गावातील सेवानिवृत्त सैनिक नंदू जगताप यांनी त्यांच्या टेम्पो तून लासुर पर्यन्त प्रवासाची सोय करून दिली.आणि शाळा सुरु झाली.ट्रेन ने लासुर,लासुर हुन शिरे साय गांव असा प्रवास रोज सुरु झाला.मुख्याध्यापक थोडाफार झालेला उशीर समजून घेऊ लागले.आणि मी देखील सर्व अवघड विषयांची जबाबदारी घेऊन माझ्या परीने त्यांना सहकार्य करू लागले.तिथे असेपर्यंत माझ्या कड़े 5 ते 7 चे गणित, इंग्रजी आणि 6वी,7वी वर्गाची क्लास टीचर शिप होती.मुलं देखील अतिशय समंजस होती.

माझ्या सातवी च्या वर्गात भारत नावाचा एक मुलगा होता.त्याचं गणित ख़ुप उत्कृष्ट होतं.मी शाळेत पोहोंचे पर्यन्त तो सातवी च्या वर्गाला गणित शिकवत असे. हा माझ्या आयुष्यात आलेला पहिला विषय मित्र होता.अतिशय कुशाग्र बुद्धिमत्ता असलेला हा भारत आज या जगात नाही.अगदी मागच्या महिन्यात मला ही बातमी समजली आणि ख़ुप धक्का बसला.आयुष्याच समीकरण त्याला का सोडवता आलं नसेल? हे मला समजलं नाही.बाकी सर्व मुले योग्य मार्गाला लागली आहेत.संदीप जगताप नावाचा एक विद्यार्थी असाच माझ्या मनात घर करून बसलेला आहे.हा शाळेत असतांना ख़ुप वेगळा च होता.त्याला कोणत्याही चुकी साठी रागवले तर तो क्षणाचाही विलंब न करता,"एवढी बार माफ़ करा मॅडम, पुन्हा चुक होणार नाही!"असे म्हणत असे.माझ्या रागाचा पारा क्षणात खाली आणण्याची क्षमता या मुला मध्ये होती. इथले 4 वर्ष मला ख़ुप समृध्द

करणारे होते.या काळात 4 ही वर्ष इंग्रजी विषयाची मास्टर ट्रेनर म्हणून संपूर्ण तालुक्याला प्रशिक्षण देण्याची संधी मला मिळाली.अनेक नवनवीन संकल्पना सुचायला सुरुवात झाली होती.शिक्षणाच्या नव्या वाटा समजू लागल्या होत्या.विषय अधिक सोपा कसा करावा यासाठी देखील मी धडपड करत होते.काही योजना यशस्वी होत तर काही पूर्ण फसत.पण उमेद कायम राहत असे.

शाळेत काही अपंग, मतिमंद मुलेही होती.त्यांच्यासाठी जनार्थ नावाची एक स्वयंसेवी संस्था काम करत असे.त्या संस्थेने गंगापुर येथे मेळावा ठेवला होता.आम्ही या मुलांचे एक गीत बसवले होते.मुले छान करायची.मात्र अनीता नावाची एक मुलगी मात्र सारखी तिची चप्पल घेण्यासाठी बाहेर जायची.पुन्हा चप्पल घालून यायची.पुन्हा बाहेर जायची.त्यामुळे बाकीची मुले नाच सोडून ऊभी राहायची.शेवटी एक कल्पना सूचली.सुरुवातीला मी सर्व मुलांना चप्पल घालून उभे रहायला सांगितले.आणि गाणे सुरु होताच सर्वांनी चप्पल बाजूला काढून यायची आणि पुढचा dance करायचा.अशी स्टेप टाकली.आणि विशेष म्हणजे माझ्या सोबत सर्वांच्या चपला बाजूला आहेत आणि त्या कोणीही नेणार नाही याची खात्री झाल्यावर अनिताही निश्चिन्त झाल्याचे दिसले.या प्रयोगातून मुल चिंतामुक्त आणि निर्भय झाल्याशिवाय मुलांचे शिकण्यात लक्ष लागत नाही ही एक गोष्ट माझ्या लक्षात आली.याच काळात किशोर वयीन मुलींच्या समस्यावर देखील काम करायला मिळाले.शिक्षक म्हणून स्थिरावण्याचा हा काळ होता.अप डाउन सोडले तर बाकी कोणताही त्रास नव्हता.लग्ना नंतर कौटुंबिक जबाब दारी वाढल्याने मी या तालुक्यातुन औरंगाबाद तालुक्यात 2004 साली विनंती बदली करून घेतली.

## पिंपळखूंटा

2004 च्या 5 july ला मी लाड सावंगी केंद्रात पिंपळ खुंटा येथे बदली ने रुजू झाले. इथेही 5 ते 7 चे इंग्रजी आणि हिंदी विषय होते.इथे सर्व मुलं सुरुवातीला मला घाबरून च राहायची.एक तर इंग्रजीचे शिक्षक म्हणून त्यांच्या मनात विनाकारण भीती बसलेली होती.आणि दूसरे कारण म्हणजे माझी अभ्यास देण्याची अतिरेकी पद्धत होती.जास्तीत जास्त लेखनकाम मी मुलांना देऊन टाकत असे.आणि एवढीशी चुक दुरुस्त करण्यासाठी तो शब्द पान भरून लिहिण्याची सक्ती करत असे.मुलं त्यामुळे वैतागुन जायची.मग सुरुवातीला छान अक्षर काढणारी मुले नन्तर वैतागुन कसेही अक्षर काढायची.ही गोष्ट वेळीच लक्षात आली आणि मी मुलांना मोजके लेखन देत त्यासोबतच वाचन, कविता गायन,speech देणे, इंग्रजीतील समुहगीते इत्यादी च्या मदतीने देखील शिकवायला सुरुवात केली.फिंगर पपेट,स्वयं निर्मित शैक्षणिक साहित्य इत्यादि च्या माध्यमातून मी स्वत: समृद्ध झाले आणि मुलांना देखील पुढे घेऊन जाऊ लागले.आमचे कल्पक केंद्रप्रमुख श्री वैष्णव सर यांचा देखील मला उपक्रमशील शिक्षक बनवण्यात सिंहाचा वाटा आहे.ते केंद्रातील शिक्षकांना दर महिन्याला काही विषय देत असत आणि गट सम्मेलनात इतर शिक्षकां समोर आपले मत मांडायला सांगत असत.त्यांच्या या उपक्रमा मुळे

मला समूहा समोर येऊन आपले म्हणणे मुद्देसुद पणे मांडण्याची सवय लागली.एखादी समस्या निवडून त्याचा शोध निबंध कसा लिहावा?शोधलेले उपाय वर्गात लागू कसे करावेत या गोष्टी समजू लागल्या. विशेष म्हणजे या सर्व गोष्टी मी स्वतःहून शिकत होते . मात्र मूल स्वतःहून शिकू शकते हे समजण्यासाठी 2018 साल उजाडावे लागले .पर्यावरण,अपंग समावेशित शिक्षण या विषयावर शहरातील काही शाळां मध्ये व्याख्याने देण्याची संधी त्यांनीच मला उपलब्ध करून दिली.

पिंपळ खुंटा शाळेतील 10 वर्षे ही माझ्या वैयक्तिक आयुष्यातील किंवा एकन्दर व्यक्तिमत्व विकासातील अत्यंत महत्वाची मानावी लागतील.या काळातच एका इंग्रजी प्रशिक्षणात दादा नवपुते या एका धडपड्या शिक्षकाला मी ऐकले.8 दिवसांत मुले इंग्रजी वाचन कसे करू शकतात?या बद्दल ते बोलत होते.त्यांनी सांगितलेल्या ट्रिक्स म्हणजे फोनेटिक्स वर आधारित होत्या.तो प्रयोग शाळेत राबवला असता मुले छान वाचू लागली.यातून मला वेगवेगळ्या कल्पना राबवत आपल्या मुलांना शिकतं करणाऱ्या शिक्षकांचा शोध घेणे आणि त्यांचे उपक्रम शाळेत राबवण्या चा छंदच लागला.त्या काळात डी पी जाधव,सुषमा राऊतमारे,मनिषा कुलकर्णी असे अनेक शिक्षक विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून आम्हा शिक्षकांना प्रशिक्षित करत होते त्याचाही फायदा होत होता.पण एवढं सगळं होऊन ही मी समाधानी नव्हते.कुठे तरी काहीतरी राहून जातं आहे,त्यामुळे आपण 100 %यशाच्या जवळ जाऊ शकत नाही असे राहून राहून वाटत असे. त्या अधुरे पणाचा शोध घेण्यासाठी स्वतःशीच विचार करत बसत असे. माझ्यातील उपक्रम शिक्षक घडण्यास या काळातच सुरुवात झाली असेल कदाचित.....

## कुंभेफळ

2013 साली प्रशासकीय बाब म्हणून माझी बदली कें प्रा शा कुंभेफळ येथे झाली.आयुष्यात शहरा जवळ ची शाळा मिळाली म्हणून जीव अगदी हरकुन गेला होता.329 विद्यार्थी संख्या 14 शिक्षक,ओळखीचे आणि आवडते मुख्याध्यापक,घरा पासून फक्त 17 कि मी अंतर.या सर्व गोष्टी अगदी मना सारख्या झाल्या होत्या.त्यामुळे उत्साहाने शाळेत जायला सुरुवात केली.पण इथे स्थिर व्हायला थोड़ा वेळ लागला.सुरुवातीच्या काळात अनेकदा वर्ग बदलला गेला.कधी पहिली,कधी 4थी असे करत शेवटी 5 ते 7 चे गणित विज्ञान हे दोन विषय मला सोपवण्यात आले. हे दोन विषय शिकवण्या साठी मी अगदी मना पासून प्रयत्न केले.मुलांनाही हे विषय ख़ुप आवडू लागले होते.दरम्यान च्या काळात रचना वादा चे वारे सर्वत्र वाहू लागले होते.मुल स्वतः शिकते वगैरे शब्द दूर वरुन कानावर येत होते.मनाशी विचार करतांना हे खरं असल्याचे अनेक दाखले मला भेटायचे.मग मी स्वतः च काही प्रयोग मुलांवर करून पाहिले.

ते असे

2014 साली माझ्या कड़े पाचवी चा वर्ग होता.या वर्गाला मी जमीनी वरील रेखाटना च्या मदतीने अनेक गणिती संकल्पना स्पष्ट करून सांगितल्या.त्यातून मुल गणितातिल संकल्पना आजू बाजूला पहायला शिकली.आणि त्यातून गणित च नाही तर बुद्धिमत्ता,भाषा विषयक कौशल्येही आपोआप शिकली.पहिल्यांदा पाठ्यपुस्तका बाहेर च्या गोष्टी शिकुन मुले पुस्तकातील ज्ञानात पारंगत झाली होती.

## बँकेची स्लिप आणि संख्या लेखन.

मुलांना संख्या अंकात अक्षरात लिहिता याव्यात म्हणून घरात पडलेल्या बँकेच्या स्लिप मी मुलांना वाटल्या.त्यात वाटेल ती रक्कम भरा ती अक्षरात लिहा.त्या रकमेचे विवरण लिहा म्हणजे समजा 2575 या रकमेत 1000 च्या,500,च्या,100 च्या 50,10,5 इत्यादि किती नोटा असतील ते लिहा.अशा कृतीने मुले संख्या अंकात,अक्षरात,संख्या विस्तार, शिकली होती.त्याच बरोबर प्रत्येकाचे नोटांचे विवरण देखिल वेगवेगळे येत असे.मुलांना मज्जा पण ख़ुप यायची. प्लास्टिकचे मॅग्नेटिक अंक वापरून मी मुलांना असंख्य बेरजा वजाबाकी गुणाकाराची उदाहरणे स्वतःहून कशी घेता येतील हे शिकवले होते. मुले हे अंक पत्र्याच्या दरवाजावर चिकटवून आणि त्यातील अंकांची अदलाबदल करून अनेक उदाहरणे स्वतः घेत असत आणि तासंतास गणिताचा सराव करत असतात हे पाहून माझे मन आनंदून जात असे.

## 1ते 100 संख्या तक्ता आणि गणितीय क्रिया.

जमीनी वर या संख्या लिहून घेतल्या होत्या.त्यात संख्यांची बेरीज वजाबाकी,सम संख्या विषम संख्या,कसोटया, असे अनेक घटक मुलांनी समजून घेतले होते.दरवाजा उघड़तांना किती अंशाचा कोन झाला हे मुलांना समजण्यासाठी मी दरवाजात कोन मापक काढून ठेवले होते.मैग्नेटिक अक्षरे, अंक यांचा वापर करून मुले शब्दांचे स्पेलिंग,गणितातिल उदाहरणे एकमेकांना देत सोडवत राहायची।थोडक्यात त्यांना अशा अनेक गोष्टी सुचाव्यात अशी वातावरण निर्मिती करता आली म्हणून मी ख़ुप खुश होते.

## दिपक

याच वर्षी दीपक नावाचा एक शाळा बाह्य विद्यार्थी माझ्या वर्गात आला.आई नव्हती आणि वडील विचारत नव्हते.याला काही येत नाही.क् पासून सुरुवात करावी लागेल असे कुरबुर युक्त भजन आम्ही गाऊ लागलो.त्याला देखील शाळा, मुलांचा गोंगाट याची सवय नव्हती.त्यामुळे तुम्ही काही शिकवु नका.माझं डोकं दुखतं शिकताना अशी तक्रार करायचा.पण एक दिवस अपूर्णांक शिकवतांना लक्षात आले की एखाद्या संखेचा 1/2,1/3 किती आहे हे तो तोंडी सांगू शकतो.मी त्याला अशा 4 ते 5 संख्या सांगून उत्तरे विचारली.त्याने अचूक सांगितली.आम्ही दोघेही खुश झालो.विशेष म्हणजे वर्गातील हुशार मुले ही त्याला उत्तरे विचारु लागली.यातून तो ख़ुप सुखावला आणि नन्तर त्याच्या शिकण्याचा वेग वाढला.

असे अनेक सुखद धक्के मला या वर्गातील मुलांनी दिले.ते दिवस खरच अविस्मरणीय आहेत. मात्र अनेक प्रशिक्षणे घेऊन मुलांना बेसिक गणिते बेसिक वाचन शिकवण्यात वर्षातला अधिक अधिक काळ घालवण्याचा हा काळ होता. वाचन लेखन,पूरक वाचन प्रकल्प असे अनेक प्रकल्प सतत आम्हाला शिक्षकांच्या मागे लागलेले असत. यातून यश कमी मिळत होते आणि नैराश्य मात्र पदरी पडत होते. परंतु याच काळात आलेल्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शिक्षण चळवळीने शिक्षक म्हणून माझ्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवून आणला. यानंतरची माझी वाटचाल ही अखंड महाराष्ट्राच्या सोबत प्रगतीच्या दिशेने कशी होत गेली हा प्रवास खूप थक्क करणारा आहे. याच काळात आपण फक्त उत्कृष्ट शिक्षक होण्यासाठी जन्माला आलेलो आहोत या विचारावर मी अधिक अधिक ठाम होत गेले आणि अनेक आल्हाददायक अनुभव याच काळात मला आले.

## इयत्ता 3री

2016 साली बदल्या झाल्याने सर्व समिकरण पुन्हा बदलले.आणि 5 ते 7 चे वर्ग जाऊन "कमी तिथे आम्ही" या उक्ती प्रमाणे पुन्हा एकदा बेवारस झालेला 3री चा वर्ग माझ्याकडे आला. उड्या मारणे, धिंगाना करणे, शाळा बुड़वणे या गोष्टिंची एजन्सी या वर्गा कड़े होती असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही.अमाप उत्साह,प्रचंड एनर्जी पण ती कुठे वापरावी हे न समजल्यामुळे ही वानरसेना अशा कार्यात आपला वेळ घालवित असे.या वर्गात मी जेव्हा पहिल्यांदा प्रवेश केला तेव्हा सिलवान नावाचा विद्यार्थी आपल्या गुड़घ्या वर बसून शाहरुख़ खान सारखा घसरत समोर आला आणि good morning miss असे ओरडला.मी एकदम घाबरून मागे आले.अशा या वर्गाची माझी गांठ पडली.पण याच गाठी ने पुढे माझ्या व्यक्तिमत्वतिल अनेक पदर उलगडले हे मान्य करावेच लागेल.अतिशय बिलिंदर प्रकारात मोड़णारी ही मुले अतिशय हुशार होती.आणि विशेष म्हणजे माझा शब्द न शब्द झेलणारी होती.गोष्टी वेल्हाळ सिलवान,उत्तम वक्ता ऋषिकेश,अष्टपैलू जीवन,विनोदी नितिन,स्मार्ट ओंकार,dashing मोनिका आणि प्रीती,मला मनानेच कसं काय वाचता येऊ लागलं म्हणून खुश झालेला राहुल,सदैव confuse असलेला आनंद,शून्यात नजर लावलेला तानाजी एक ना दोन! भयंकर variety होती वर्गात.आणि या सर्वांना एकाच बोटीत बसवुन न्यायचे होते मला!पण आमची लवकरच चांगली गट्टी झाली आणि अख्खा वर्ग कामाला लागला होता.आपल्या कामात एकही चुक होऊ नये म्हणून ही मुले खुप दक्ष असायची.मला अजुन आठवते.एक दिवस या मुलांचा परिपाठ सुरु होता.आणि कविता गातांना सिलवान ने शेवटचे कड़वे रिपीट केले म्हणून आर्यन ने सरळ त्याच्या डोक्यात एक चापट मारली होती.अचानक झालेल्या या प्रकाराने सर्व अवाक् झाले.नंतर सगळेच हसू लागले.जीवन नावाचा मुलगा तर

तिसरीत असतांना अतिशय उत्तम गोष्टी,कविता आणि जोक लिहीत असे.असा हा वर्ग 4थी पर्यन्त माझ्याकडेच होता.4थी मध्ये तो अधिक प्रगल्भ झाला होता.हजरजबाबी पणा तर खुप आला होता या मुलांमध्ये.

एकदा आम्ही वर्गात बाजी प्रभुचा पावन खिंडीतील पराक्रम हा पाठ शिकत होतो.त्यावेळी सिलवान ची आई त्याला घरी घेऊन जायला आली.हा पठ्या रडू लागला.मी आता नाही येणार घरी म्हणून.त्याची आई म्हणाली मग कधी येशील?तर तो म्हणाला,"महाराज गडावर पोहोचले की येतो!" असे अवलिया!

मापन सारखा विषय शिकताना कान, नाक, हात, पाऊल इत्यादि गोष्टीन्ची मापे घेणारा,बिस्किट,चपात्या इत्यादि वापरून जीव,व्यास,त्रिज्या,अपूर्णांक समजून घेणारा, माझ्या प्रत्येक कृतिवर निबंध आणि कविता लिहिणारा,तानाजी सारख्या मुलाच्या व्यंगावर बोट न ठेवता त्याचे बोट धरुन त्याला शिकवणारा,आई विना पोरक्या प्रीती चे दुःख समजून घेणारा, तुम्ही तानाजी आणि आनंद ची गोष्ट वाचता ना तेव्हा पोटात कसं तरी होतं मॅडम अशी प्रतिक्रिया देणारा आणि वर्गातील प्रत्येक मुलाची गोष्ट लिहा ना मॅडम असा हट्ट करणारा हा माझा अत्यंत लाडका वर्ग!विशेष म्हणजे या मुलां मुळे आणि काही त्रास दायक घटना मुळे मी लिहायला लागले.माझ्यातील लेखन क्षमतेचा शोध देखील मला याच काळात लागला. याच काळात आमच्या शाळेला तत्कालीन शिक्षण सचिव आदरणीय नंदकुमार साहेब यांनी देखील भेट दिली होती. या भेटीत त्यांनी आमची शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाची होऊ शकते हा विचार बोलून दाखवला होता. नंदकुमार साहेबांनी आमच्या शाळेला जाताजाता एक स्वप्न दिले होते. जे स्वप्न आम्हाला जागे करून गेले आणि त्या स्वप्नाच्या पूर्तीसाठी आमची शाळा तन-मन-धनाने धडपडू लागली होती. आमचे मुख्याध्यापक शहा सर आणि आम्ही सर्व शिक्षक यांच्या धडपडी मुळे कुंबेफळ शाळेचा लौकिक सर्वत्र पसरू लागला होता आणि आमच्या शाळेची विद्यार्थी संख्या देखील दिवसेंदिवस वाढत होती.

## आणि मी लिहू लागले...

कुमठे बीट दौरा करून आल्यावर तिथल्या अनेक संकल्पना मी प्रत्यक्षात राबवायला सुरुवात केली.त्याचे परिणाम दिसू लागले.अनेक शिक्षक मित्र मैत्रिणीना देखील ते आवडू लागले.त्यातून मी अनेक प्रकारचे शैक्षणिक साहित्य निर्माण केले.जे औरंगाबाद जिल्हा च नाही तर जालना, धुळे, नंदुरबार अशा काही जिल्ह्यातील शिक्षकांनी देखील आवर्जून वापरले.त्यांचा feedback देखील चांगला मिळू लागला.त्याच बरोबर रचनावाद विषयक वेगवेगळी प्रशिक्षणे घेणे आणि ती बीट केंद्रात देणे हे सत्र सुरु झाले.त्यातून माझे शाळे बाहेर राहण्याचे प्रमाण वाढले.परिणामी वर्गातील पालकांच्या तक्रारी आणि सहकारी शिक्षकां वरील ताण वाढू लागला.त्यातच माझी वाचन प्रशिक्षणा साठी सुलभक म्हणून निवड झाली आणि सलग एक महीना प्रशिक्षण देण्यासाठी मला शाळे बाहेर रहावे लागले.परिणाम जो व्हायचा तोच झाला.अतिशय वाइट अनुभवांचा तो कालखंड होता.प्रशिक्षणांची उपयुक्तता मला कळत होती.त्याचा वर्गाला होणारा फायदा दिसत होता.पण त्याचे महत्व

पालकांना माहित नव्हते.त्यांची मुले वर्गात काय काय कृती आणि उपक्रम करतात हे त्यांच्या पर्यन्त पोहोचत होते.पण तक्रारी घेऊन येणाऱ्या लोकां पर्यन्त ते पोहोचत नव्हते.यावर उपाय म्हणून शेवटी मी या सर्व गोष्टी लिहून whats app, face book वर टाकू लागले.

मला अजुन आठवते की तानाजी वर चे लिखाण वाचून आदरणीय नूतन मघाड़े मॅडम यांनी स्वतः त्याची दखल घेतली.आणि त्यांच्या च मुळे समता शिक्षा च्या वेबसाइट वर आणि तेथून यूनिसेफ च्या फेसबुक वॉल पर्यन्त ती स्टोरी पोहोचली.या लिखाना मुळे मला झालेले फायदे लोकां पर्यन्त पोहोचले आणि अनेकांनी त्या कृतीचे प्रयोग आपल्या मुलांवर देखील करून पाहिले.ज्याचे ख़ुप चांगले परिणाम त्यांना देखील मिळाले आहेत.

शेवटी जे होतं ते चांगल्या साठी च! या गोष्टीवर माझा ठाम विश्वास बसला.कारण जर विरोध झाला नसता तर मी पेटुन उठले नसते.आणि स्वतः पेटल्या शिवाय जगाला प्रकाश देता येत नाही.हे सूर्यप्रकाशा इतके लख्ख सत्य आहे. वाचन विकास प्रशिक्षणातून एक शिक्षक म्हणून स्वयंभू आणि स्वयंप्रकाशित होण्याचे 'वेध' मला लागलेच होते. आत्तापर्यंत आयुष्याला लागलेले ग्रहण सुटायचा हा काळ होता. अंधाराला दूर लोटून प्रकाशाकडे वाटचाल करायला मी सुरुवात केली होती. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचा वाटा उजळून टाकण्यासाठी मी माझ्या हाती उपक्रमांची मशाल घेतली होती.....

रोहिणी विद्यासागर–पिम्परखेड़कर

जि प कें प्रा शा कुंभेफळ,

बीट करमाड,ता जि औरंगाबाद.

# बार बार हाँ

अलका झरवाल



सर्व शिक्षकांच्या शरीरात वारं भरल्यासारखं या गाण्याचा संचार ,प्रभाव प्रत्येकाच्या चेहर्यावर प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचा ठसा उमटून दिसू लागला. जणू सर्वानी त्या दिवशी एक शपथ घेतली असावी, प्रत्येक मूल शिकणारच! घडणारच! आणि खरंच छोट्या छोट्या उपक्रमानी गारखेडा नगरी दूमदूमू लागली. एकप्रकारे उपक्रमांची रेलचेल सूरु झाली. जो नं तो ...एकच ध्यास ,गुणवत्ता विकास!

खरंच लहान पण हि आपल्या आयूष्याला ,जीवनाला वळण देणारी पहिली पायरी .संस्कारक्षम जीवन फुलवणारी एक फांदीच म्हणूया. माणसामध्ये जिद्द आणि चिकाटी असेल तर मनुष्य आपल्या ध्येया पर्यंत निश्चितच पोहचू शकतो.

तसं माझ्या आयुष्याला वळण मिळत गेलं.

मी लहानपणी सारखी शाळा भरवायची. माझ्यासमोर असलेली मित्र,मैत्रिण माझे विद्यार्थी.व मी शिक्षक. यावरून आमचे आपसात वाद व्हायचे,ते म्हणायचे आज मी शिकवणार,तू विद्यार्थी हो. पण मी कुणाला ऐकत नव्हते. मी म्हणायचे ,नाही मीच शिकवणार! आणि खरंच तात्विक वाद असणारे मित्र ,मैत्रीण शिकायला बसायचे. माझ्या हातात काठी पण असायची. अशी माझी शाळा रौज भरायची. असे खेळत खेळत डि एड एकदाचं झालं अन् निवड मंडळाची परीक्षा देऊन एकदाची शिक्षिका झालेच.

माझी पहिली शाळा पहिली ते सातवी पर्यंतची.

जि. प शाळा म्हंटलं कि थोडं खेड्यातलं वातावरण जिथे शाळेच्या अवतीभवती घाणच घाण. कसं बसं नाकतोंड मुरडून ,काय बाई हि घाण,काय बाई हि माणसं,कशी राहात असतील. असं म्हणत तोंडाला रुमाल लावून शाळेत यायचं अन् घरी जायचं. पण एक दिवस राहवेना ,या घाणीचं काहीतरी करायचंच. कठिण परिश्रमातून कसंबसं हे वातावरण चांगलं केलं. गावात वाह वा मिळवली. अन् बदलीचा वारा सुटला. माझी बदली होणार म्हणून गावकरी परेशान ,कि मॅडम इथून जायला नको. पण नाईलाज....

इथून पूढे दुसरी शाळा.तिथेहि असंच घाणीचं साम्राज्य. आता गुणवत्ता अन् भोतिक सुविधा.काम वाढलं.पण खचायचं नाही ,करत राहायचं .इथे देखील गावकर्यांच्या मदतीने, शाळेचा आजूबाजूचा परिसर स्वच्छ करून घेतला. थोडंस मैदान मुलाना खेळायला मिळालं. मग काय ? मुलांचे खेळ, उपक्रम,कवायत,डंबेल्स,लेझीम जे जे मला शक्य होतं ते ते केलं. लेझीम मुलाना मी म्युझिक वर शिकवलं. मुलं छान ताल धरू लागली. जि.प.प्रा.शा.तिसगाव कें पंढरपूर येथे गटसंमेलन होतं .अगदि दाळबट्टीचं जेवण.सांस्कृतिक कार्यक्रम हि बसवले होते. ग.शि.अ. पंस.जि.प. चे मान्यवर या कार्यक्रमाला निमंत्रित केले होते. त्यांचे स्वागत लेझीम नेच केले होते .खूप वाह वा इथेहि मिळवली. पण नाईलाज....बदलीचं वारं सुटलंच.

प्रशासकीय बदली झालीच अन् छोट्याशा बाभळीनं वेढलेल्या टुमदार शाळेत आले. तिथे पट फक्त 20. आतापर्यं मोठ्या शाळेत काम केलेलं ,मन काही लागेना, काम करायची सवय . मन शांत बसू देईना. पण जे शक्य ते केलच. पण पूढे.....मिचवल बदलीचं वारं अालं.आपल्या तालुक्यात यायचं म्हणून बदली करावी.अन् बदली झाली.

ती माझी शाळा म्हणजे बीट गारखेडा.केंद्र.कचनेर.जि.प.प्रा.शा.जोडवाडी.या शाळेत रूजु झाले. इथे आल्यावर हि बर्याच गौष्टीना तोंड द्यावं लागलं. इथे तर अगदी वर्गासमोर संडास करून जायचे. पण ती सुद्धा मुलांच्या मदतीने स्वच्छ करून दिवसभर चं कार्य करत होते. सतत होणारी घाण काढत गेले. एकटीच पालकांना बोलू लागले.वाईटपण ही घेऊ लागले.पण हँबरींग सोडली नाही. माझे मु.अ व एक सहकारी मैत्रीण यांची संच मान्यतेनुसार बदली झाली. आम्ही तीन लेडीज एक जेंन्ट्स .सात वर्ग चार शिक्षक. इथे मात्र शाळेचा पदभार वरिष्ठांच्या आदेशानुसार माझ्या कडे आला.आणि काम करण्याची संधी मिळाली. प्रगत महाराष्ट्राच्या शासन निर्णयाने सगळी कडे खळबळ सुरू झाली हौती. त्यावेळी नव्यानेच आदरणीय शि.वि.अ.ठाकूर साहेब गारखेडा बीटला रूजू झाले होते. तत्पुर्वी कचनेर केंद्राचे कें.प्र. आदरणीय खांडेभराड नाना यांनी कचनेर केंद्रातील शिक्षकांची जणू माळच गूंफलेली . एक ही मणी गळून पडणार नाही असा जिवापाड त्यांनी सांभाळला. आणि या धाग्याची गाठ मजबूत झाली ती या तीन ध्येय वेडे अधिकारी ज्याना मी स्वतः नाव दिलं होतं, त्रिदेव. 13 जून 2015 ला गारखेडा बीट ची पहिली कार्यशाळा झाली. आणि त्यात प्रगत महाराष्ट्र शासन निर्णय वाचून दाखवण्यात आला. या कार्यशाळेची सुरूवात गारखेडा केंद्राचे कें.प्र. आदरणीय बेंद्रे सर यानी एका गाण्याने सुरू वात केली.धीरे धीरे यहां का ..मौसम बदलने लगा है!

आणि खरंच सर्व शिक्षकांच्या शरीरात वारं भरल्यासारखं या गाण्याचा संचार ,प्रभाव प्रत्येकाच्या चेहर्यावर प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचा ठसा उमटून दिसू लागला. जणू सर्वानी त्या दिवशी एक शपथ घेतली असावी, प्रत्येक मूल शिकणारच!घडणारच!आणि खरंच छोट्या छोट्या उपक्रमानी गारखेडा नगरी दूमदूमू लागली. एकप्रकारे उपक्रमांची रेलचेल सूरु झाली. जो नं तो ...एकच ध्यास ,गुणवत्ता विकास!

चलो कुमठे.....

आदरणीय प्रतिभाताईंची प्रत्येक मूल शिकतं! ची उत्तुंग भरारी पाहण्यास कुमठे बीट गाठलं. तिथून कितीतरी उपक्रमांचा ज्ञानरचनावादीय भांडार सोबत घेऊन आलो. मग काय? सूरु झाली रंगरंगोटी. मूल शिकण्यासाठीची धडपड. आणि ती देखील शिगेला पौहचलीच.हे करत असताना माझ्या शाळेचा भौतिक विकास साधायचा म्हणून इंडोरन्स कंपनी ला विनवणी केली.त्यावेळि गारखेडा बीट मधील बहुतांशी शाळेंचं नवीन बांधकाम हि कंपनी करून देत होती.जौ पर्यंत हि कंपनी माझ्या शाळेचं बांधकाम घेत नाही तौ पर्यंत माझं काही केल्या मन लागेना.  संकष्ट चतूर्थीचा दिवस होता. त्या दिवशी या कंपनीचे बाॅस कचनेर केंद्रात शाळा बांधकाम पहायला येणार होते. मी कचनेर शाळेत जाऊन बसले. कचनेर शाळेचे आदरणीय हिलाल सर यांच्या मदतीने मी पुढाकार घेऊन त्यांच्याशी बोलले. विनवणी केली, केवळ मुलांच हित लक्षात आणून दिले. व माझी विनवणी  या कंपनीच्या बाॅसने जणू गणपती बप्पाच्या रूपात पूर्ण केली . मला खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी मी गावकर्यांची बैठक घेउन शाळेविषयी सांगीतले. त्यास सर्वांनी मान्यता देउन आनंद व्यक्त केला. मुले खुश झाली. बांधकाम सुरू झाले. मला देखील वर्गात ज्या सुविधा असायला पाहीजे त्या करून घेतल्या. मी एक स्त्री म्हणून कधी डगमगली नाही .उन्हाचा विचार न करता सुट्यात देखील 28 कि. मी. जाणे आणी 28 कि मी येणे. अशा चकरा मारून जे सी बी साठी विनंती करून शाळेच्या मागील जागा बर्यापैकी लेवल मधे आणून तो परिसर शाळेसाठी तयार केला. सारै काही नवीन झाले . शाळा नवीन नवरी गत सजली. आता नथ घालायची ,म्हणून झाडे लावली. जिथे जिथे काय चांगले करता येईल असा शाळेचा परिसर केला. स्वतः तिघींनी शाळा रंगवली. तिघींनी एकच ध्यास घेतला.गुणवत्ता विकास! ज्ञानरचनावाद,अनेक उपक्रमातून मुलांच्या गुणवत्तेसाठी झटलो अन् एकदिवस शाळा प्रगत झाली.  एक वर्ष सुविधा करत करत असतानाच....नवीन शाळा जी सर्व सुविधानी व गुणवत्तेनी ठासून भरली .मैदानी खेळ ,कवायत,डंबेल्स ,निशाण, लेझीम ,सांस्कृतिक कार्यक्रमानी शाळा दुमदूमू लागली .पण.... पून्हा बदलीचं वारं सुटलं....हे वारं इतकं भयानक होतं .माझ्यासाठी चक्रीवादळच. कारण खौ खो होता ना. पण काय सांगू....फूटबॉल केला हो माझा. खूप जोर्यात फेकली गेली .अन् चांगली ढौरकीन तांड्यावर येऊन आपटली. इतकी मोठी सातवी पर्यंतची शाळा सोडावी लागली आणि नशीबात पडला तांडा.पुन्हा काय??? चल मुसाफीर चल...

आता ढोरकीन तांड्याच्या प्रवासाला लागायचं होतं . शाळा द्विशिक्षकीच.तांडातर माहीत नाही . पण एकदा हजर तर हौऊया .मंगळवार होता.ढौरकीन केंद्राचा हाफ् डे.10-10-30 पर्यंत केंद्रावर आले . हजर झाले. आणि केंद्रावर माझे मु.अ आले. नमस्कार झाला. आणि माझं सवयीप्रमाणं प्रश्नांचा भडीमार सुरु झाला. जणू माझी फार जूनी ओळख.

सर तुम्ही इथे आलात म शाळेवर कोणय?

शाळा सुटली कि काय?

मुलं एकटीच असतील ,मारामारी करतील.

मॅडम ,तुम्ही आजच हजर झालात .किती विचार करताय. तुम्ही शाळेवर नाही आलात तरी चालेल, आता इकडून इकडेच घरी जा. तांडाय म्हणे तो तांडा .आपलाच कि. काही भिती नाही.

मी सरांकडे बघतच राहिले. असं कसं म्हणू शकता सर,घरी जा. मी सरांना म्हणले, नाही सर ,मी शाळेवर येणार .मला माझी शाळा बघायचीय. आणि मी एका सरांसोबत माझ्या तांड्यावर गेले. शाळा कुठेय? माझी नजर शोधू लागली.आजूबाजूला घरं. घर आणि शाळा सारखीच. माझी शाळा उतरत्या पत्र्याची, एकच वर्ग खोली.20 पट. त्यात 10 बेंच. एकाच वर्गखोलीत शाळा थाटलेली. बघून फार वाईट वाटले. विचार केला.काय पाप केलं मी असं कि माझ्या नशीबात हि शाळा पडली. मुलांकडे नजर फिरवली. बंजारा भाषेत त्यांचं बोलणं,माझ्याकडे बघणं . 10 वर्षात कधी मॅडम या शाळेत मुलांना दिसल्या नव्हत्या. म्हणून मुलं माझ्याकडे बघतच होती. मस्टरला सही केली .12–30 वाजले. मु.अ मुलाना म्हणाले शाळा सुटली रे जा आता घरी.मुलं काही बाहेर जाईना .मीच बाहेर आले अन् सगळी मुलं माझ्या भोवती ,हात धरून मॅडम आता तू येणार या शाळेत. रोज येशीन का? मी हो म्हणले. मुलं बाय करत घरी गेली मी ही निघाले.घरी आले. अन् खूप रडले. वाईट वाटत होते. जोडवाडी शाळेचा महल सोडून मी कुठे आले?देव पण किती परीक्षा घेतोय. नाईलाजाने दुसर्या दिवशी शाळेत आले. सराना वर्ग मागीतला. पहिली दुसरीचा वर्ग मिळाला .जो कधी शिकवला नव्हता .पण आता माझी कसोटी.पहिला प्रश्न मुलांना घेऊन कुठं बसावं? माझे मु.अ सहकारी अाल्या आल्या टेबल, खुर्ची ताब्यात घ्यायचे. हजेरी,गोषवारा भरून तिथंच बसायचे. कधी म्हणले मॅडम कुठे बसता? काय करायचं ,कसं करायचं ,एकच वर्गखोली. काही नाही. मीच मुलं बाहेर व्हरांड्यात घेऊन बसू लागले.त्यांच्यासोबत गौलाकार. मुलं माझ्यासाठी बाहेर खूर्ची आणू लागले.पण सवय नाही नं .मुलांमध्ये बसायची सवय. काही पालक,बायकाहि बघायचे व म्हणायचे मॅडम छान छान साडी नेसून औरंगाबाद हून येती अन् अशीच मुलांमध्ये खाली बसून जाती.रौजचं माझं काम करायचे, पण मी थोडी हतबलच झाली होती. कारण रोज सहकारी मु.अ शाळेत 10 नंतरच कधीही यायचे ,हजेरी घ्यायचे, गौषवारा भरायचे अन् निघून जायचे.

मित्रहो इथून पूढचा माझा प्रवास खडतरच. पण तो सांगावाच लागेल. कारण फिल्ड वर काम करत असताना प्रत्यक्ष अनुभव जे घेतो तो सहकार्याच्या सहवासातच. म्हणतात ना देव देवळात गेल्या शिवाय दिसत नाही.खरंय हो. महत्वाचं मला सांगायचं म्हणजे आपल्या शिक्षण श्रेत्रात 100% शिक्षकापैकी 10% शिक्षक वरिष्ठांनी पण सोडुन दिलेले असतात. माझ्या सहकार्याविषयी जे मी सांगणार आहे,ते मला सांगणं गरजेचं आहे. कारण मी फक्त वाचा फोडणारय.कारण माझी शाळा द्विशिक्षकी म्हणून मला काम करताना काय अडचणी अाल्यात?का आल्या? नेमक्या कोणत्या काणामुळे आल्या ,शाळेचं वातावरण कशामुळे कसं बदलतं? मूलांवर त्याचा परिणाम कसा होतो?परिणामी गुणवत्ता कशी खालावते?असं वातिवरण बर्याच शाळांमध्ये असतं पण कुणी बोलतं,कुणी बोलत नाही .त्याची कारणे अनेक असू शकतात .पण अन्याय का सहन करावा?

काही म्हणी प्रचलित आहेत. 'मुर्खाच्या नादी लागू नये', 'नंगे से खुदा डरे.'

ठिकय .काही प्रसंगी,काही ठिकाणी मला मान्यय. पण जिथे विद्यार्थ्यांच्या भावनैचा प्रश्न येतो, त्यांच्या हक्काचा अर्थात शिक्षणाचा प्रश्न यैतो.तिथे हे का सहन करावं.कुणी असा शिक्षक आपला दुश्मन नसतो,कुण्या एकावर हि टिका नाही. त्याला अपमानित करणे हा उद्देश पण नाही. पण एखादा असा शिक्षक सरकार्याची कुचंबना कशी करतो ? याबाबत माझ्यासोबत घडलेलं सांगत आहे.शक्यतो एका शिक्षकाच्या वर्तनाविषयी असं कोणी बोलत नाही ,पण मी माझ्या लेखनीतून हि वाचा फोडत आहे. काहींना माझ्या या वक्तव्या बद्दल आवडणार नाही पण मी सत्य डावलू हि शकणार नाही, त्याबद्दल क्षमस्व.पण सत्य जाणून घेताना त्रास आणि सांगणार्या विषयी राग,घृणा निर्माण होणारच.मला वाटतं हे सांगायला पण धाडस असावं लागतं. जे मी केलंय.

असेच माझे सहकारी शाळेत फक्त येणे जाणे,शाळेत उशीरा येणे,लगेच जाणे.असे नित्यनियमाने चालूच होते.त्यातल्या त्यात मुलांच्या गुणवत्तेचा तर प्रश्नच उरत नाही. वर्गात सर्वत्र पसारा. तांदळाचे पोते ,धान्य कुठल्या कुठं. जिथे पावसाच्या पाण्याची धार . पोषण आहाराचं तर न सांगीतलेलच बरं .तिथेच शेळ्या, कोंबड्या ,बाजूला कचरा,शाळेच्या बाथरूमचा वापर कोणीही करत,शाळैच्या मागे अगदि खिडकी लगत जिथे आतून टेबल मांडलेला ,त्याला लागूनच लोकं बाथरूमला जात.पाऊस आला कि मुले घरी. बौलू नये पण बोलणारच ! सरांच्या तोंडात बार असायचा मुलांसमोर खाणे,खिडकीतच थूंकणे, खिडकीच्या फटी थूंकीने लाल झालेल्या, सरांची पँट आर्धी सीट वर ,रोज हे चित्र कसं सहन करावं ? एकच खोली ती पण गळकी,उंदीर ,घुशीचं साम्राज्य. मातीच माती वर्गात .बाजूला खिचडी वाल्या मावशी.ज्या दारू पण पाडतात.आणि त्याच पातेल्यात खिचडी.हे असलं वातावरण आणि एकीकडे सहकारी मु.अ चा पळ.कशी असणार मुलांची गुणवत्ता. मी मात्र पछाडून गेलेली ,काही असो प्रथम मुलांची गूणवत्ता! आधी सर्व वर्ग आवरला. वर्ग स्वच्छता केली.

त्यात सराना वाटे हि कामाची बाई इथं का आली ?खूप प्रयत्नात होते ते माझी प्रतिनियुक्ती करण्यात.

एकीकडे सरांचे असे प्रयत्न अन् एकीकडे......

सरांना आल्या आल्या निघून जाण हे लोकं बघत होते. सारखे कें.प्र. ना फौन करू लागले .कें. प्र. पवार सर हि त्रस्त हौत होते. आणि मॅडम एकट्या चार वाजेपर्यंत शाळेत असतात.सकाळी पण वेळेवर येतात. एकदिवस मला कें.प्र. पवार सर हि म्हणले मॅडम तुमचा होकार असेल तर अंतर्गत एका शाळेवर तुम्हाला पाठवतो. इकडे आत मध्ये येण्यापेक्षा रोड वर च्या शाळेवर तुमची प्रतिनियूक्ती करतो. खरं तर त्यांचा उद्देश चांगला होता. मॅडम अॅक्टीव्ह आहेत. याना काम पाहीजे. पण सहकार्याचं असं वागणं यामुळे मॅडम ला च आपल्या शाळेवर घेऊया. म्हणजे या शाळेचा प्रश्न सुटेल. पण मी एकदा सर्व मुलांवर नजर टाकली. अन् विचार केला नाही .या मुलाना माझी गरजय .दुसर्यांच्या दारात रांगोळी काढण्यापेक्षा माझ्या दारात तोडकी मोडकी रांगोळी काढेन ,पण माझी शाळा सोडणार नाही.

लोकं विचार करू लागले. काही लोकं शाळेत येऊन मला विचारू लागले ,मॅडम सर कुठे गेले ?काय उत्तर देणार मी ? म लोकं कें .प्र .ना फोन करू लागले,सर शाळेत नाही कुठे गेले ?नंतर कें.प्र.मला. माझे उत्तर एकच मला माहीत नाही.

असेच एक दिवस माझे गाडी वाले सरांचा मला फोन आला मॅडम आज शाळेतून थोडं लवकर तीन साडे तीनला निघायला जमेल का? शाळेत तर मी एकटीच.शाळा सोडू कशी? तरी धाडस केला.थोडी स्वार्थी अन् हेवा केला.सर तर रोजच पळता मी अर्धा तास आधी गेले तर काय होणार? आणि खरंच शाळेतून निघाले. मुलं हि म्हणू लागली मॅडम तुम्हाला नंतर गाडी नाही मं तुम्ही जा नं .तुम्हि कधीच जात नाही. हे मुलाना हि कळत होते. मी निघाले.फाट्यावर गाडी आली ,मी गाडीत बसताच सराना म्हणले,सर मी निघतेय खरं पण शाळेत कुणी आलं तर? मनात पाल चुकलीच होती. सर हि म्हणले,मॅडम काही सांगता येत नाही पण बघा मं.असं बोलत असतानाच कें.प्र.चा फोन आला.मी घाबरले. मॅडम तुम्हि कुठे आहात? खोटं बौलून थोडी नं चालणार.मी म्हणले, सर मी निघाले.

काय मॅडम,शाळेची वैळ काय आहे. तुम्ही कसकाय जाऊ शकता? मला गावातून फोन आला,तुम्ही वेळेच्या आत शाळा बंद केल्याचा.व कुणीतरी तो व्हिडीऔ आपले ग.शि.अ. व सी .ई.ओ ना पाठवला. कोणतेही प्रश्न न मांडता मी ,सरांना म्हणले,सर मी शाळेत परत जाते. पण मला जाण्यासाठी वाहन नाही,हे कें.प्र ना माहीत होते .कारण मेन रोड पासून चार पाच कि मी माझा ढोरकीन तांडा. कें.प्र.च म्हणले ,मॅडम मी स्वतःच येतो व तुम्हाला गाडीवर घेऊन मी सूद्धा शाळेत येतो.मी व माझे कें.प्र. आम्ही शाळेत गेलो. ज्या व्यक्ती नै कें.प्र. ना फोन केला होता त्याना शाळेत बौलवून घेतले. एक दोघं हि त्यांच्यासोबत आले. दोन्ही बाजू मांडून झाल्या. इथे सूर एकच सर शाळेतून रोज पळून जाता. आमचं चुकलं अर्ध्यातासासाठी आम्ही महिला भगिनी ला त्रास दिला.त्याबद्दल त्यानी माझी माफी मागीतली. कारण मी देखील एकच प्रश्न केला , मी तर शाळेत परत आले. पण रोज सर निघून जाता त्यांच काय ? माझा हा प्रश्न रास्त वाटला. आणि त्या नंतर सरांना गावातील कोणी न कोणी रोज विचारना करू लागले. व एक दिवस 5 सप्टेंबरला सर शाळेत आलेच नाही. माझ्या गावकर्यानी परस्पर त्यांची तक्रार कें.प्र. कडे केली. मला त्यांचा फोन आला मॅडम सर शाळेत आहेत का? मी नाही म्हंटले. मी शिक्षक दिन देखील साजरा केला होता. कें.प्र. शाळेत आले.चार पाच गावकरी आले. सरांच्या गैरहजेरीचा पंचनामा करण्यात आला. मला घरी जायला खूप उशीर झाला.

पण जे होतं ते चांगल्यासाठी. जे माझ्यावर बितलं ते उलटच झालं. आणि इथे मला न्याय मिळाला.

दुसऱ्या दिवशी सर माझ्या आधी शाळेत. ते ही मुलाना शिकवताना दिसले. मला आश्चर्यच वाटले .पण माझ्या कामाला लागले. बघते तर थोड्यावेळात ग.शि. अ. व शि वि अ. शाळेत .माझं काम रोजच्या प्रमाणे मुलांमध्ये बसून चालूच होते. यात मानसिकतेचं खच्चीकरण कसं झालं ?बघा, अधिकारी कोणतीही चौकशी न करता, माझ्या सहकारी मु. अ ना पाठीशी घालताना मला जाणवलं ते असं..ग. शि.अ सराना म्हणतात,सर अर्ज लिहा...काल तुम्ही बँकेच्या कामासाठी गेले होते,अनावधनाने मॅडमला सांगायचे राहून गेले. मी जरा शॉकच झाले .सर आनंदाने अर्ज लिहू लागले. व म्हणले ,सुटलो रे बाबा एकदाचा. चला आता जंगी पार्टी देतो. चार दोन पैशासाठी काही वरिष्ठ मुलांच्या शिक्षणाचा,हिताचा विचार न करता अशा शिक्षकांना पाठीशी घालतात. अशा वरदहस्त असलेल्या अधिकार्यांमुळे हे 10% लोकं असें वागताय .आणि प्रामाणिकपणे काम करणार्याचं खच्चीकरण ! जाताना ग.शि.अ नी मला विचारलं,मॅडम तुम्हि एकट्या शाळा

सांभाळू शकता का? मी हो म्हणून गेले .कारण साहेबांचं पुढचं पाऊल काय असणार हे मला काय माहीत नं. पण मी हिमंत हारणार नाही, खचणार नाही. या मुलांसाठी जीवाचं रान करेन.

मुलांच्या शिक्षणाचा विचार करत ,गावातील एकेकांशी बोलून प्रत्येकांची मनं जिंकू लागली. कारण छोटं असो कि मोठं .गाव तिथे बारा भानगडी म्हणजे राजकारण असणारच! ते इथे हि माझ्या लक्षात आलं. असंच फाट्यावरून शाळेत येताना एक व्यक्ती मला बोलत बौलत यैत होती. पर्सनॅलीटी तर अशी जणू कुणी अधिकारीच असावे. त्यांची प्रश्न शाळेविषयीच.मी जरा घाबरू लागले.हे त्यांच्याहि लक्षात आलं आणि मला म्हणाले,घाबरू नका मु इथला रहिवाशी च.मला हि बरं वाटलं. बोलत बौलत शाळेत काका पण आले. बसले. शाळेची चौकशी करू लागले.कारण ते तिथे राहात नव्हते. फक्त शेती करत होते. तसे ते मला रोज यैता जाता,शाळेत हि बघत होतै. मॅडमचं काम चांगलं हे त्यांनी मला बोलूनही दाखवलं .

चार वाजता आम्ही सौबतच औरंगाबाद ला आलो.प्रवासात शाळेविषयीच्याच गप्पा.म्हणे माझी शेतीय.फाट्यावरच. दोन्ही मुलं फाॅरेनला .मला कसली कमी नाही. मी जरा बोलायला स्पष्टौक्तीच. काकांना पाहिले कि डोक्यात एकच किडा वळवळ करायचा .जागा मागणे.आज बिनधास्त माझा प्रस्ताव मांडला. हो म्हणतील नाहीतर नाही.काका शाळेसाठी जागा देता का? काका गालातल्या गालात हसले. अन् मला हिरवा कंदील दिसला. काका हळूच म्हणले विचार करून सांगतो. आता माझे पाय काही जमीनीवर राहीना. चार पाच पालक बोलवून हा किस्सा त्यांच्या कानावर टाकला. पालकहि हौ म्हंटले जर देत असतील जागा तर शाळा फाट्यावर बांधूया. आमची काहीच हरकत नाही. आपण काय बौलतो हे मूलं हळूच ऐकतात.फारसं त्याना कळत नाही पण आपली शाळा फाट्यावर बंधणार म्हणून मूलं आनंदाने नाचू लागली.

अद्यापपर्यंत माझ्या तांड्यावर शाळेची व्यवस्थापन समिती सूद्धा स्थापन झाली नव्हती .सहकारी मु.अ.देखील शाळेत 5 सप्टेंबर पासून अनाधिकृत गैरहजर. काय करावे? हा प्रश्न माझ्या समोर उभा.कारण शाळेविषयी मोठी पावलं उचलणं म्हणजे समिती ,बैठक आवश्यक. म्हणून मी शाळेची कामं थांबू नये म्हणून फेब्रुवारी मध्ये शालेय व्ययस्थापन समिती गठन केली.

दुसऱ्या दिवशी काका शाळेत आले. माझी तळमळ ते बघत होते. मी ही इतर पालक व समिती शाळेत बोलवून घेतली. सर्वानी काकांना विनवणी केली. काकांनी पण फक्त दोन गुंठे जमीन दान द्यायचे मान्य केले. आम्ही थोडै नाराज झालो. पण एकच वर्ग खोली पेक्षा दोन खौली जागा जरी मिळाली आणि तांड्यावरील या वातावरणापेक्षा फाट्यावर जरी शाळा बांधकाम झाले तर निदान शाळेचं वातावरण तरी तयार होईल.

असो, शेत पेरल्यामुळे काकांचं येणं जाणं चालूच होतं. अशीच पुन्हा एकदा काकांची भेट झाली. व मी पुन्हा आपलं बोलता बोलता ,काका दोन गुंठ्यात फारसं काही शाळेचं काम होणार नाही हो. जमत असेल तर आणखी थोडा विचार करा. मी हसता हसता बोलून गेले. काकाही हसलै अन् पुन्हा एक गुंठा जमीन वाढवली. अशी तीन गुंठे जमीन काकांनी दान द्यायचा निर्णय घेतला व लगेच शालेय व्ययस्थापन समितीचा ठराव हि घेतला. आनंदाचा निर्णय म्हणून चहा पाण्याचा कार्यक्रम केला. एकमेकाना गुलाल लावून काकांचे भरभरून

स्वागत केले. हौळीचा सण होता. मला शाळेत पाहून पालक म्हणू लागले ,मँडम तुम्ही आज शाळेत का आल्या?मी विचारले का? तर बायका, मुलं,पालक सगळेच म्हणू लागले,आज आमचे बंजारा लोकं होळी खेळतात. आम्हि नवर्याला काठीने मारतो. तुम्हाला पण बायका दारू पाऊन काठीने मारतील .मुलं हळूच म्हणाली मॅडम तुम्ही नं लगेच पैसे देऊन टाका म्हणजे तुम्हाला कोणी मारणार नाही .रंग लावणार नाही. यात विशेष सांगावं वाटतं मी देखील परदेशी राजपूत. हा सण मला हि चांगलाच माहीत.त्याना कशाला सांगू? मी कोण?आणि आमच्याकडे हि आम्ही हा सण थोडाफार असाच साजरा करतो. मी हसलै. सगळे म्हणू लागले म्हणे मॅडम सर तर तीन चार दिवस शाळेला सुट्टी देऊन टाकायचे. पण तुम्ही शाळेत आल्या .मी त्यांच्या या सणात,लोकनृत्यात थोडासा सहभाग नोंदवला .पाचशे रू ची ओवाळणी महिलांना दिली. सगळे खूप खूश झाले.व शाळेत येउन बसले. पारंपारीक सण याविषयी मुलांना सणांचे महत्व पटवून दिले.

आणखी एक आवर्जून सांगावेसे वाटते. आपल्या शाळेच्या परिसरात चालणारे उद्योग कोणते. तर मुलं सहज दारू बनते असं बोलून गेले. मुलं एकमेकांकडे पाहू लागली. दारूचं नाव घेतल्यावर मॅडम रागवतील. पण मी हसले. मी हसलेली पाहून मुलं हि हसू लागली. सागर हळूच म्हणतो, धीर्या तू आता मार खाणार. हे ऐकून सगळाच वर्ग हसू लागला. आणि मी तोच उपक्रम हाती घेतला. मु मुलाना समजून सांगीतले.बर्याच मुलांच्या घरात दारू पडते ,ती कशी बनवता हे त्याना माहीत आहे. जो तो म्हणू लागला मॅडम मी सांगतौ दारू कशी बनवता? मुलं खरंच छान सांगू लागली .मी छान ऐकून घेतलं .त्यांची ती बोली भाषा. पण प्रमाण भाषेत हे कसं मांडायचं ?तर... उद्या आपल्याला हा उपक्रम घ्यायचा.

सकाळी शाळेत आल्या आल्या मी खिचडी वाल्या मावशीला म्हणले, मावशी आज तुमच्याकडून दारू कशी बनवता, त्यासाठी काय काय सामग्री लागते ,हे शिकायचं आहे. मावशी जरा चपापल्या. त्या घाबरल्या व मला म्हणाल्या,मॅडम आज काय तांड्यावर तुम्हि पोलिस बौलवले की काय?मी हसले व हळूच म्हणले ,नाही हौ मावशी .हा आमचा आजचा उपक्रमय.मुलं आणि मी तुमच्याकडे येणार.शाळेलागूनच मावशीचं घर . मावशीला वाटलं ,हि मॅडम औरंगाबाद हून येती अन् दारू बघायची. असं कसं.मावशी विचार करतच होत्या ,ते मला जाणवलं ,मी त्याना विश्वासात घेतलं व दारू कशी बनवता? हे बघीतलच. नंतर प्रमाण भाषेत हे कसं बोलायचं? हे मी मुलाना सांगत गेले. एकीकडे कृती डोळ्यानी बघत असल्याने मुलाना माझी भाषा समजत होती. अशा काही उपक्रमातून मी बोलाना प्रमाण भाषेकडे वळवू लागले.काकांकडून लेखी स्वरूपात दानपत्र लिहून घेण्यासाठी काय काय करावे लागेल, हि प्रोसेस कशी असेल यासाठी मला माझे कें. प्र. पवार सर यांनी मोलाचे सहकार्य केलं. न्यायालयीन कामाची, पूर्ण जबाबदारी कें.प्र. नी घेतली. हि प्रोसेस कशु असते ?म्हणून आपले वेध परिवार सदस्य भरत काळे सरांनी देखील मला मार्गदर्शन केले. आता मार्च ,एप्रिल मध्ये मला बर्यापैकी वैळ असणार व हि प्रोसेस पूर्ण करून बांधकाम निधीसाठी प्रस्ताव ,काही मदत कुठून,कशी मिळेल याविषयी धडपड करूया.

पण कोरोना महामारी मुळे माझ्या या कामाला ब्रेक लागला. पण मध्ये मध्ये फोन वर contact चालूच होते. कारण काका खुश तरच शाळेचे काम ! म्हणून काकांशी गोड गोड बोलू लागले कारण पुन्हा मत

बदलायला काय वेळ लागतो? मानवजात नं शेवटी. म्हणजे मला वाटणारी भिती .पण काकांशी बोलताना तसे काही जाणवले नाही.

एकीकडे पाचवी वर्ग सुरू करायचा म्हणून ती हि माझी धडपड चालूच होती. लाॅकडाऊन च्या काळात फौन वर हा प्रस्ताव देखील जि.प. कडून मंजूर करून घेतला. इथे पुन्हा माझ्यावरील पालकांचा,गावकर्यांचा विश्वास व मुलांचाहि विश्वास दृढं झाला.

या लाॅकडाऊन च्या काळात मुलांचे शिक्षण सुरू राहावे म्हणून पालकांशी ,मुलांशी सतत फोन वर contact साधून अभ्यासगट तयार केला व त्यासाठी विषय मित्र देखील तयार झाले.

माझा हा प्रवास माझ्या आजपर्यंतच्या पूर्ण नौकरीतला आहे. जसजशी बदली झाली आणी जिथे गेले तिथली आधी घाणच काढावी लागली.जेव्हा चांगलं होत गेलं तेव्हा माझी बदली होत गेली. असं माझ्यासोबत का घडत गेलं कुणास ठाऊक?

पण कदाचित असली घाण काढण्यासाठीच ,आणि त्या शाळेची चांगली सूरुवात व्हावी या मुळेच माझ्या हातून देव हे करून घेत असेल . अशी माझ्या मनाची मी समजूत काढते अन् पुढचं पाऊल टाकत आहे. अगदी घरात जसं पदर खोचून काम केलं जातं अगदी तसंच मी शाळेचं काम करते कारण या शाळेतच तर मला दिवसभर राहावं लागतं ना.

हसऱ्या फुलांचा बाग जसा आनंदी

ही तशीच शाळा मुले इथे स्वच्छंदी !

खरंच मुलं शाळेत खेळताना ,बागडताना दिसली कि शिक्षकाचं हि मन प्रसन्न होतं. कुमठे बीट मधून आदरणीय प्रतिभाताईंकडून मिळालेली ज्ञानरचनावादी संकल्पना, गारखेडा बीट मधून मिळालेली ज्ञानरचनावादी शिदोरी,विविध शैक्षणिक साहित्य ,या अनुभवातून गारखेडा बीट मधून आदरणीय ठाकूर साहेबांच्या मार्गदर्शनाने ज्ञानरचनावादी उपक्रम गारखेडा बीट मध्ये कसे चालतात याचा स्टाॅल पुणे येथील बालेवाडी येथे शिक्षणाच्या वारीत मांडला गेला. व आदरणीय नंदकुमार साहेबांच्या हस्ते प्रमाणपत्र देखील मिळवले. आपल्या वेध समुहातून आंतरराष्ट्रीय शिक्षण विचारांनी मिळणारी ऊर्जा ,आव्हानं ,उपक्रमातील विविधता यामुळेच आज या गौरगरीब,तांडा ,वाडी, वस्ती तील मुलांना शिकवण्याचा आनंद मिळतोय. शाळेच्या प्रसन्न वातावरणातच ज्ञानाचे बाळकडू पाजले जातात असे नाही तर मनाची शुद्धी अधिक मोलाची . मुलांचे आरोग्य चांगले तरच ते उत्तम प्रकारचं शिक्षण घेऊ शकतात. आणि मी ते देणारचं! फक्त wait &watch .शाळेचं नवीन बांधकाम.व मुलांचा गुणवत्ता विकास..!

अलका झरवाल

इमेल :– jharwalalka09@gmail.com

# माझे जीवन गाणे



रोहिणी गायकवाड

आपण सहज म्हणतो जीवनगाणे गातच रहावे जीवनगाणे. असे आपण नेहमीच म्हणतो. पण खरंच इतके सोपे असते का प्रत्येकाचे जीवन गाणे. खरंतर आपलेही जीवन तरी आपल्याला कोणामुळे मिळतं? आपल्या आई-वडिलांमुळे. त्यांच्यामुळेच आपण या सुंदर जीवनातील सुंदर क्षणांचा अनुभव घेत असतो.

**आपण सहज म्हणतो जीवनगाणे गातच रहावे जीवनगाणे. असे आपण नेहमीच म्हणतो. पण खरंच इतके सोपे असते का प्रत्येकाचे जीवन गाणे. खरंतर आपलेही जीवन तरी आपल्याला कोणामुळे मिळतं? आपल्या आई–वडिलांमुळे. त्यांच्यामुळेच आपण या सुंदर जीवनातील सुंदर क्षणांचा अनुभव घेत असतो. प्रत्येक जण आपले जीवन गाणे आपापल्या परीने उत्तम प्रकारे करण्याचा प्रयत्न करत असतो.**

**मला आज लिहावसं वाटतंय माझं जीवन गाणं. खरंतर माझ्या बाबतीत कोणी असा विचारही केला नसेल की मी माझं जीवन गाणे इतक्या चांगल्या प्रकारे करू शकेल. कारण माझ्याकडे पाहून कोणी म्हणणार नाही की मी सामान्य जीवन जगत असेल. कारण मी आहेच सर्वांपेक्षा वेगळी.**

**1987 चे ते वर्ष. 1987 मधील तो जून महिना. आणि त्या जून महिन्यातील 9 तारीख. हीच ती तारीख, 9जून 1987. ज्या दिवशी मी कडू–गोड अनुभव सोबत घेऊन माझे जीवन गाणे गाण्यासाठी या जगात प्रकट झाले.**

**जवळ जवळ रोहिणी नक्षत्रात जन्म झाल्यामुळे माझं नाव रोहिणी असं माझ्या आईवडिलांनी ठेवलं. पण माझे जन्माच्या वेळी माझे वडील खूप आजारी होते. मला पाहून तर त्यांचा आजार आणखीनच वाढला कारण मी सर्वांपेक्षा वेगळी असल्यामुळे त्यांना खंत वाटली असावी. ते त्यावेळी शिवाजी विद्यालय बीड या शाळेत शिक्षक होते तर माझी आई घरीच असायची. शिवणकाम करायची. मला मोठा भाऊ पण आहे. त्याच्यात आणि माझ्यात बारा वर्षांचे अंतर आहे. त्यावेळी त्याचे शिक्षण सुरू होते.**

आता सुरू झालं माझं घडणं. मी लहान असताना माझ्या आईला आणि अण्णांना वाटायचं की हिला काहीच दिसणार नाही. मी काहीच करू शकणार नाही. आयुष्यभर आपल्यालाच तिला सांभाळावं लागेल. मला ऊन, उष्णता,गर्मी या गोष्टींचा खूप त्रास व्हायचा. माझी आई–अण्णा आणि भाऊ माझी खूप काळजी घ्यायचे.

मला योग्य वेळी माझ्या घरच्यांनी अंगणवाडीत व त्यानंतर सहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर शाळेत घातलं. आता सुरू झालं माझं शिकणं. घराजवळच असणाऱ्या विनायक विद्यालय या शाळेत माझा इयत्ता पहिलीत प्रवेश घेण्यात आला.

त्यावेळी मी माझ्या वर्गात खूप हुशार होते. मला चित्रकलेची फार आवड होती. मी एखादं चित्र काढले की माझ्या बाई मला ते चित्र सर्व वर्गातील बाईंना आणि सरांना दाखवून यायला सांगायच्या. खुप आनंद व्हायचा तेव्हा. तशीच अभ्यासातही माझी प्रगती खूप चांगली होती. हे सर्व पाहून मात्र माझ्या अण्णांचा माझ्या बाबतीतला गैरसमज दूर झाला आणि त्यांची खात्री पटली की माझी मुलगी आता काहीही करू शकेल आणि तेही माझ्यासाठी काही करायला तयार झाले. त्यांनी माझ्या डोळ्यांसाठी मला अनेक डॉक्टरांकडे दाखवले पण काहीही उपयोग नाही झाला. माझ्या डोळ्यांचा प्रॉब्लेम हा अनुवंशिक असल्याकारणाने त्यावर काहीही उपाय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



मी मात्र फॉरेनर लोकांसारखी दिसत असल्यामुळे अण्णांनी माझं लाडाच नाव जुली असं ठेवलं. घरी मला सर्वजण काहीच म्हणायचे.

मी चौथीपर्यंतचे शिक्षण विनायक विद्यालयात घेतलं. मी कधीही शाळा बुडवत नव्हते. मला ते कधीच आवडत नव्हतं.

शाळेत एकदा मधल्या सुट्टीत असंच बेंच  वरून उड्या मारत असताना मी खाली पडले आणि त्यावेळचे ते लाकडी बेंच त्यांना लावलेल्या लोखंडी पट्ट्या. तीच लोखंडी पट्टी माझ्या कपाळावर उजव्या बाजूला लागली आणि रक्त वाहू लागलं. मग पटकन माझ्या शाळेतील भारती सरांनी पटकन माझ्या जखमेवर रुमाल धरला. मला पाणी वगैरे दिलं. एका जागी बसवलं. घर जवळच होतं. कोणालातरी आईला घेऊन यायला सांगितलं. बघ आई आली आणि आईसोबत दवाखान्यात गेले. मग आम्ही पट्टी करून घरी परत आलो. जखमेला तीन टाके पडले होते. आज मला लागलं मग मी उद्या शाळेत जाणार नाही असे सर्वांना वाटले.

अण्णांनी ते बाई नाही सांगून ठेवलं की मी उद्या शाळेत येणार नाही. पण दुसऱ्या दिवशी सकाळी मी अण्णांना शाळेत जाऊ दिलं आणि त्यांच्या मागे मी पण माझ्या शाळेत गेले. मी शाळेत गेल्याबरोबर सर्व मुलांनी माझ्याभोवती एकच गलका केला. पहिला लागलं लागलं असं म्हणत. सर्वजण विचारू लागले काय झालं ? किती लागलं ? शाळेत कशाला आली ? पण सर्वांना माहीत होतं की काही होऊ देत मी काही शाळा बुडवणार नाही. माझ्या या गोष्टीचं माझ्या बाई आणि आई–वडिलांना खूप कौतुक वाटायचं. माझ्यातला हा जो गुण होता तो मला माझ्या अण्णांकडून मिळालेला होता.

एकदा आमच्या शाळेतल्या चौथीच्या शिष्यवृत्ती च्या क्लासमध्ये सरांनी आम्हाला पाढे पाठ करून यायला सांगितलं. त्यावेळी माझे तीनशे पर्यंत पाढे पाठ होते. पण एके दिवशी अचानक 29 चा पाढा म्हणताना माझी चूक झाली. त्या दिवशी जमले सरांनी माझ्या दोन्ही हातावर इतक्या जोरात छड्या मारल्या की माझे दोन्ही हात पूर्ण लाल झाले. मला त्रास होऊ लागला. हीच माझी त्या शाळेतील पहिली आणि शेवटची शिक्षा ठरली. कारण मी कधीही मार खाल्ला नव्हता.

मी चौथीपर्यंत 80% च्या पुढेच मार्क्स मिळवले होते.त्यामुळे त्यांना खात्री पटली होती की मी पुढेही अभ्यासात चांगली राहील म्हणून त्यांनी माझा पाचवीचा प्रवेश त्यांच्या शाळेत म्हणजेच श्री शिवाजी विद्यालय बीड येथे घेतला.

रोहिणी गायकवाड

जि.प.प्रा.शाळा पाथरवाला बु. कें–गुळज,

ता–गेवराई, जि–बीड

९४२३४६८२००

rohini143amol@gmail.com

# ॲक्सिडेंटल टिचर

अनिल पाटील



म्हणतात ना....जबाबदारी पडली की माणूस जबाबदार होतो.तसं गेल्या एक वर्षात माझ्या जुन्या सहकाऱ्यांशिवाय मी जबाबदारी पेलायला सुरुवात केली होती.स्वाभाविक पणे नवीन ही सहकारी मित्र मेहनती होते.पण गाडीवाट शाळा....तिथले गावकरी....पालकांच्या अपेक्षा.....शाळेतील उपक्रम या बाबींना  मी गेल्या आठ वर्षांपासून परिचित होतो.

**आय वाज एन ॲक्सिडेंटल टीचर....!!**

संयोजकांनी जिल्हापातळीवरील लेझीम स्पर्धेचा तिसरा क्रमांक अनाऊन्स केला....जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाडीवाट.....!!हातात ट्रॉफी घेतली.....समोर कॅमेरॅचे फ्लॅश चमकत होते......एकीकडे शाळेतील मुलांच्या आनंदाच्या किंकाळ्या व टाळ्यांचा कडकडाट ऐकू येत होता.दुसरीकडे हातातील ट्रॉफी ने मनगटातील ताकद आणि मनातील आत्मविश्वास आणखी वाढवला होता.सोबत वाढलेल्या जबाबदारीचीही जाणीव झाली होती.

जून 2013 पासून मी थोडा एकाकी पडलो होतो.....ज्यांच्या सोबत मी आठ वर्षांपासून काम करत होतो,त्या माझ्या सर्व सहकारी मित्रांच्या बदल्या झाल्या होत्या.त्यातही,ज्या माणसाने गाडीवाटची ही शाळा,गेल्या सोळा वर्षांपासून आपल्या प्रचंड मेहनतीने व घामाने एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवली होती.....त्या माझ्या मित्राची....माझ्या मार्गदर्शकाची....म्हणजेच दादासाहेब नवपुतेचेही बदली झाली होती. त्यामुळे अचानक वरची सगळी फळी बाद व्हावी....आणि संघाला विजयी करण्याची जबाबदारी माझ्यासारख्या नवोदित बॅट्समन वर पडावी,अशी माझी परिस्थिती झाली होती.

पण म्हणतात ना....जबाबदारी पडली की माणूस जबाबदार होतो.तसं गेल्या एक वर्षात माझ्या जुन्या सहकाऱ्यांशिवाय मी जबाबदारी पेलायला सुरुवात केली होती.स्वाभाविक पणे नवीन ही सहकारी मित्र मेहनती होते.पण गाडीवाट शाळा....तिथले गावकरी....पालकांच्या अपेक्षा.....शाळेतील उपक्रम या बाबींना  मी गेल्या आठ वर्षांपासून परिचित होतो.

**एक फेब्रुवारी दोन हजार सहा...!!**

माझ्या नोकरीचा आणि गाडीवाट शाळेतील,प्रथम नियुक्ती दिनांक.फार आनंदाने वगैरे जॉईन झालो असा काही भाग नव्हता.पण शाळा घरापासून जास्त दूर नव्हती आणि लावलेल्या फिल्डिंग नुसार ती भेटली होती....याचं थोडं फार समाधान मला मिळालं होतं.पण शाळाच एवढ्या डोंगरदऱ्यात होती की,तिथली बरीच पदे अशीही रिकामी राहायची.त्यामुळे मी जॉईन झालो,याचा माझ्यापेक्षा जास्त आंनद तेथील शिक्षकांना झाल्याचे मला जाणवले.विशेष आनंद या करता झाला नव्हता,कारण मी काही ठरवून शिक्षक झालेलो नव्हतो.ना तशी माझी इच्छा होती,ना तसं काही माझं ध्येय होतं.

शाळेय जीवनात थोडा हुशारच समजला गेलो होतो.कारण हुशारी ही मार्कांवरून मोजली जायची (जाते). त्यासाठी आवश्यक मार्क मी मिळवत होतो.अगदी पहिल्या तीन क्रमांकात मी असायचो.दहावीला तीन–चार टक्क्यावरून मेरिट गेलं होतं.पण हे सगळे मार्क मी बऱ्यापैकी पाठ करूनच मिळवले होते.संकल्पना समजून घेणे वगैरे असं काही त्यावेळी मला काही कोणी समजावलं नाही आणि मीही समजून घेतलं नाही.शिक्षकांनी ही घोकणे आणि ओकणे याच पद्धतींनी शिकवलं होतं.मी पाठ करत होतो आणि मार्क मिळत होते.....एवढं सहज सोपं घडत होतं सगळं...!!बारावीला काही माझ्या चुका आणि काहीसं दुर्दैव अशा दोन बाबींनी माझी हुशारी बाजूला पडली.तसेच फक्त पाठ करणं आणि मार्क मिळवणं हे तंत्र इथे फारसं उपयोगात आलं नाही.परिणामी इंजिनिअर किंवा डॉक्टरीकीकडे मी जाईल असं वाटणाऱ्या काही हितचिंतकांचा भ्रमनिरास,तर काहीं दिखाऊ हितचिंतकांना आनंदही झाला असावा.पण मला मात्र या दोन्हीपैकी काहीच झालं नाही.कारण मी खरंच काही ठरवलं नव्हतं.फक्त चांगले मार्क मिळवायचे एवढंच मला माहित होतं....जे काही मला मिळाले नाही..! मिळवलेल्या मार्कंवर मी डीएड ला प्रवेश घेतला.कारण दुसरीकडे मिळालेल्या मार्कांवरून फारसं काही हातात लागणार नव्हतं.

दोन वर्षात डीएड पूर्ण आणि झटपट नोकरी असा काहीसा त्यावेळी ट्रेंड चालू होता.म्हणून मी ही त्या ट्रेंडचा फायदा घेतला आणि डीएडला नोकरी मिळविण्या एवढे पुरेसे मार्क मिळवून गाडीवाटला जॉईन झालो.मला नोकरी लागली होती.त्यामुळे घरात आंनद झाला होताच.पण एवढा नाही...!!कारण मी यापेक्षा खूप काही जास्त पुढे जाऊ शकलो असतो.याची सल मनातल्या मनात त्यांना आजही वाटते.मला नोकरी ॲक्सिडेंटली लागली नव्हती.पण मी शिक्षक मात्र ॲक्सिडेंटली झालो होतो..!!

दहा ते चार ड्युटी करणे सुरू झाले होते. मी शाळेत जसा शिकलो,तसंच मी शिक्षक म्हणून शिकवायला सुरुवात केली होती.माझ्या डीएड चा त्यात कुठेही संबंध नव्हता.होता तो फक्त टाचण काढण्यापूरता.कारण टाचण काढणे आणि पारंपरिक मी जसा शिकलो होतो,तसं शिकवणे याऊपर मला काही जमतही नव्हतं.पण जे काही करायचो ते मात्र प्रामाणिकपणे करायचो.एवढं मात्र नक्की,त्यातून मला समाधान मात्र अजिबात मिळत नव्हतं.अधिकारीही आल्यावर टाचण बघायचे.टाचणी टोचल्यागत बोलायचे आणि निघून जायचे.इकडे मात्र जीवाला टोचणी लागायची.वर्गात एखादाच अधिकारी जायचा.महाजन साहेब...त्यावेळचे

शिक्षणविस्ताराधिकारी...हे त्याला अपवाद...!!बाकी सर्व एवढ्या दुरून फक्त टाचण बघायला येतात का काय,असा विचार काही वेळा मनात येऊन जायचा.मला टाचण लिहिताना फारच कंटाळा यायचा,ज्यानुसार मी कधीच काही शिकवत नव्हतो.त्यामुळे तो मला जरा निरर्थक प्रकार वाटायचा.टाइम टेबल,वार्षिक नियोजन,मासिक नियोजन हे प्रकार ही भिंतीवर टांगण्यापूरते मी वर्गात लावायचो.

शेवटी वरतून अधिकारी जशी मागणी करतात,तसे खाली शिक्षक वागतात.जशी मागणी... तसा पुरवठा..!त्यावेळी गुणवत्तेपेक्षा या निरर्थक गोष्टींना जास्त मागणी होती.

वडील औरंगाबाद मेडिकल कॉलेज ला नोकरीला होते.त्यामुळे गावाकडील कोणी पेशंट आले की वडील त्यांचे ऍडमिट करण्यापासून तर डिस्चार्ज होईपर्यंतचे सगळे सोपस्कार पार पाडायचे.जवळचे कुणी असले तर त्याला आमच्या घरून रोज डब्बा ही पुरवला जायचा.पेशंट चे पैसे संपले की तो बरा झाल्यानंतर वडील त्याला गाडी भाडे देऊन परत गावी पोहोचवण्याची जबाबदारीही पार पाडायचे.मला या सगळ्या गोष्टींचा फार राग यायचा.अभ्यासातही व्यत्यय यायचा.आठ दिवसाला एक तरी गावाकडचा पेशंट येणार आणि वडील त्याची सर्व जबाबदारी घेणार.चीड चीड व्हायची माझी.वडीलांनी अगदी हालाकीच्या परीस्थितीत शून्यातून विश्व निर्माण केलेलं.त्यामुळे ते नोकरीचं महत्व जाणून होते.त्यांचं एक वाक्य – "ज्या नोकरीच्या भरवश्यावर आपलं सगळं कुटुंब चालतं,आपल्या मुलांच्या तोंडात ताजी भाकर जाते,त्या नोकरीच्या कामात कधीही अप्रामाणिकपणा करायचा नाही"त्यांनी पूर्ण नोकरी या तत्त्वानुसार केली.त्यांचं हे वाक्य डोक्यात घालूनच मी नोकरी जॉईन केली होती.माझं मन जरी लागत नव्हतं, तरी मी कामासोबत कधीही प्रतारणा केली नाही.पण का कुणास ठाऊक, संपूर्ण एज्युकेशन सिस्टीम मधील काही निरर्थक गोष्टी मला खूप खटकायच्या.

जसजसे दिवस पुढे सरकत होते, मी गाडीवाटच्या शाळेत रमायला सुरुवात झाली होती.आमच्या सर्व सहकाऱ्यांमधे एक प्रकारची बॉँडिंग निर्माण झाली होती.आमचे विचार जुळायला सुरुवात झाली होती.

सदा सर्वदा शाळा एके शाळा हा एकच विषय आमच्या मधे सुरू असायचा.दादासाहेब नवपुते यांच्या नेतृत्वाखाली अनेक उपक्रम शाळेत घेतले जायचे.दादाच्या प्रत्येक हाकेला आम्ही "ओ" देत होतो.सगळे मिळून एकजुटीने काम करत होतो.शिक्षक म्हणून दिवसेंदिवस प्रगल्भ होत होतो.मीही आता शाळेत भाषण करायला....सूत्रसंचलन करायला सुरुवात केली होती.लेखन ही चालूच होते.गाडीवाटला असताना अनेक वर्तमानपत्रातून लेख ही छापून यायला सुरुवात झाली होती.काही काळाने मी सहकाऱ्यांचा आणि गावकाऱ्यांचाही लाडका झालो.शिवाय वयाने सगळ्यात लहानही होतो.गावकऱ्यांचा विश्वास जिंकण्यात वक्तृत्व आणि लेखन या दोन्ही गोष्टींचा मला खूप फायदा झाला.

अनाथांची माय...सिंधुताई सपकाळ हा मी लिहिलेला लेख लोकमतच्या मंथन पुरवणीत छापून आला.त्यानंतर राज्याच्या विविध भागातून मला अनेक पत्रे आली.जालन्याहून  आलेल्या शर्मा नामक व्यक्तीने

पत्रात लिहिले होते की, आपके लेख से मै इतना प्रभावीत हो चुकी हुं, की मै सिंधुताई के अनाथ आश्रम की एक लडकी को अपनी बहू बना ना चाहती हुं...!!लेखनातील खऱ्या शक्तीचा परिचय मला त्यावेळी आला. तुमचा एक लेख कुणाच्या विचारात आणि आयुष्यात काय बदल घडवून आणेल हे काहीच सांगता येत नाही.

आता नोकरीला चार–साडेचार वर्षे होऊन गेली होती.आम्ही सगळे सहकारीही मनाने व विचारांनी खूपच एकरूप झालो होतो.कुणी रजाही घ्यायचे नाही.एखाद्याने रजा घेतली,तर घरी त्याला आणि इकडे शाळेत आम्हालाही करमायचे नाही.आता मी वरच्या वर्गाला शिकवायला सुरुवात केली होती.विषय होता गणित.माझा शाळेत असल्यापासूनचा जीव की प्राण विषय.सुदैवाने मला लहानपणा पासून अगदी सुंदर,हसत– खेळत गणित विषय शिकविणारे शिक्षक मिळाले.त्यामुळे मला गणिताची भीती कधी वाटली नाही आणि माझ्या विद्यार्थ्यांपर्यंतही मी तिला कधी पोहचू दिले नाही.त्यामुळे मुले गणित एन्जॉय करू लागली होती आणि मी माझा जॉब....!!वर्षभरात आमच्या शाळेत सहल,दहीहंडी,गणपती या सारख्या सणांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रम,क्रीडास्पर्धा,वादविवाद स्पर्धा,व्याख्यानमाला,जनरल नॉलेज स्पर्धा यांची रेलचेल असायची.त्यामुळे शैक्षणिक वर्ष कसे निघून जायचे कळायचे सुद्धा नाही.माझ्या प्रत्येक सहकाऱ्यांत काहीतरी विशेष गुण,कौशल्य होते.त्या प्रत्येक मित्रांकडून मी खुप काही शिकत होतो.त्यात प्रामुख्याने बाबासाहेब जाधव,संगम जाधव,विठ्ठल सोनवणे,गणेश घुले या सर्वांचा माझ्या शिक्षक म्हणून घडण्यात फार मोलाचा वाटा आहे.दादासाहेब नवपुते तर गुरू स्थानी....!!!

एक टीम म्हणून आम्ही शाळेत काम करत होतो.जिल्हा परिषद शाळेत त्यावेळी रात्रीचे वार्षिक स्नेहसंमेलन घेण्याचे कोणाच्या मनात ही येत नव्हते.कारण लाईटचा अभाव आणि आयोजनासाठी येणारा प्रचंड खर्च.पण आम्ही सर्व सहकाऱ्यांनी स्वतःच्या खिशातून पैसे टाकले आणि रात्रीची गॅदरिंग अरेंज केली.सुत्रसंचलन मी आणि दादा नवपुते असं दोघांनी मिळून केलं.अशा प्रकारे संचलन करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता.गावकऱ्यांसाठीही हा पहिलाच अनुभव होता.विशेष म्हणजे हे माझ्या कल्पनेतून बाहेर आले होते.त्यामुळे नेमके काय होईल याचं मलाही टेन्शन होतं.पण पूर्ण संचलनात विनोदाचे हस्यतुषार एवढे उडत गेले की लोकांच्या पोटाला हसून हसून पीळ पडायची वेळ आली होती.तेव्हापासून मी जरा जास्तच हिरो बनलो गावात.पुढे पुढे तर लोक गॅदरिंग बघायला कमी आणि आमच्या दोघांचं संचलन बघायला पार आजूबाजूच्या गावातून यायला लागले.गाडीवाटने मला सूत्रसंचालक बनवलं.

एक दिवस अचानक एक नवीन व्यक्ती कचनेर केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून जॉईन झाल्याचे कळले.त्यात मला काही विशेष वाटलं नाही.कारण गाडीवाटच्या प्रवासात एवढं काम करूनही कोणताही अधिकारी आम्हाला शाबासकी देण्यासाठी कधी शाळेवर आलेला नव्हता.आम्ही तशी कधी अपेक्षाही केली नाही.त्यामुळे हा ही केंद्रप्रमुख टाचण आणि टपाल याशिवाय दुसरं नवीन काय करणार.... म्हणून मी दुर्लक्ष केलं.पण माणसाच्या नावात मात्र दम वाटला.... विष्णू खांडेभराड......!!हसत खेळत....नवनवीन प्रयोग करत दिवस पुढे सरकत

होते.शिकवण्यापेक्षा अशैक्षणिक कामे....टपाल,कधी कधी डोक्याला ताण देऊन जायचा.पण आम्ही होतोच सर्वजण अशा स्वभावाचे,की इंटरवल मध्ये तर आमचे हसून हसून पोट दुखायचे.गाडीवाटला मी जॉब एन्जॉय करायचं शिकलो.

आता शाळेचे नाव डोंगर–दऱ्या पार करून लोकांच्या कानावर आपटत होते.शाळेचा पटही वाढत चालला होता....आणि स्वाभाविकपणे शाळेतील पदेही.नवे सहकारीही आमच्यात लवकरच मिसळायला सुरवात झाली होती.एक दिवस केंद्रसम्मेलन असल्याची सूचना आली. निव्वळ टाईम पास म्हणजे केंद्रसम्मेलन, अशी आमची भावना सुरुवारीपासून होती.ती भावना घेऊनच आम्ही कार्यक्रमाला हजर राहिलो.नवीन केंद्रप्रमुख खांडेभराड पहिल्यांदाच नजरेस पडले.उंचपुरी शरीरयष्टी,दाट दाढी–मिश्याने व्यापलेला चेहरा,डोळ्यावर चष्मा,त्याच्या पलीकडील करारी नजर,चेहऱ्यावर आत्मविश्वास.नावाप्रमाणे गड्याच्या व्यक्तिमत्वात पण भारदस्तपणा होता.त्यांनी त्यांच्या कामाची दिशा आणि नियोजन त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट केली.सर्वजण त्यांच्या विचारांनी प्रभावित झाले.पण खरं तर त्यांच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर त्यांच्या बोलण्यातील सत्यता बाहेर येणार होती.पण टाचण आणि टपाल यापलीकडे खूप दिवसांनी कुणीतरी बोललं होतं.

बंदे मे फिलहाल तो दम नजर आ रहा था...!!उजाड आणि वैराण झालेल्या केंद्राला कुणीतरी तारणारा केंद्रप्रमुख आला,असा भाव त्यावेळी मानत येऊन गेला होता.सगळं काही सुरळीत चालू असतानाच मे 2013 मधे सर्व जुन्या सहकाऱ्यांच्या बदल्या झाल्या.मला अगदी एकाकी पडल्यासारखं झालं होतं.सात–आठ वर्ष सोबत काम केल्यामुळे आमचा एकमेकांत फारच जीव अडकला होता.मला तर फार मोठा धक्का बसला.त्यादिवशी रात्री घरी आल्यानंतर खूप रडलो.माझे जीवा–भावाचे मित्र,मला एकटं सोडून शाळा उघडल्याच्या पहिल्याच दिवसापासून दुसऱ्या शाळेवर निघून जाणार होते.त्यात दादासाहेब नवपुते या गाडीवाट शाळेच्या शिल्पकाराचा ही समावेश होता.शिक्षकाच्या बदल्यांचा का केल्या जातात..? हा एक प्रश्न त्या दिवशी रात्रभर मनात घोळत होता.

जून 2013.....

शाळेच्या पहिल्याच दिवशी खूप काही चुकल्यासारखं वाटत होतं.महत्वाचे तीन शिक्षक आज शाळेत दिसत नव्हते.माझ्यासमोर आता नवीन आवाहन उभे ठाकले होते.काही जुने सहकारी भोसले सर,घुले सर,गवळी सर,चव्हाण सर आणि भुसारी सर आणखी सोबतीला शाळेत होते.त्यांचा पाठिंबा मिळणार होताच.पण ज्यांनी या शाळेचा पाया रचला ते मात्र आता आमच्यात नव्हते.या सात वर्षात त्यांनी मला खूप काही शिकवून,घडवून,उभं करून शाळेचा निरोप घेतला होता...!! आता त्यांच्यासोबत पहिल्यापासून काम केलेले आम्ही दोघे तिघेच राहिलो होतो.

मी स्वत:च स्वत:ला शाळेच्या पहिल्याच दिवशी एक शब्द दिला–"शाळेतील एकही उपक्रम...एकही कार्यक्रम...ज्यातून मुलांना आनंद मिळत होता,शिकायला मिळत होते,तो मी असेपर्यंत बंद होऊ देणार नाही.....अगदी काहीही झालं तरी".ही माझी स्वत:च स्वत:शी केलेली कमिटमेंट होती.सगळ्यांच्या सहकार्याने शैक्षणिक वर्षाची सुरुवात एकदम छान झाली होती.शाळेतील सुरूवातीपासूनचा प्रत्येक उपक्रम आम्ही पुढे नेत होतो.क्रीडा स्पर्धा,गणपती उत्सव,अनेक सणवार,विविध स्पर्धा यात कुठेच आम्ही खंड पडू दिला नाही.त्यावर्षीची सहलही आम्ही शेगाव ला घेऊन गेलो.मुलीही सहलीत मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या.कारण 2013 मध्ये तानुरकर मॅडम या महिला शिक्षिका बदलीने गाडीवाटला हजर झाल्या.गाडीवाट शाळा स्थापन झाल्यापासून पन्नास वर्षात पहिल्यांदाच कोणी महिला शिक्षिका गाडीवाटला हजर झाल्या होत्या.त्यामुळे मुलींनाही त्यांच्या रूपाने एक चांगली मैत्रीण मिळाली होती.दुसरीकडे केंद्रप्रमुख खांडेभराड सर यांनी उजाड व उदासीन अशी प्रतिमा असलेल्या कचनेर केंद्राचे आपल्या मेहनतीने आणि कामाने नंदनवन करायला सुरुवात केली होती.सगळ्या शिक्षकांना विश्वासात घेऊन चांगल्या माणसांची एक मोट सरांनी बांधली होती.तत्कालीन गटशिक्षणाधिकारी आदरणीय पाटील मॅडम यांचे ही मोलाचे सहकार्य त्यावेळी कचनेर केंद्रला लाभले.केंद्रातील दोन शाळा आय.एस.ओ प्रमाणित होण्याच्या दृष्टीने मार्गक्रमण करता होत्या. खांडेभराड सर आता सर्वांची मने जिंकण्यात यशस्वी झाले होते.

आता ते सगळ्यांचे लाडके "नाना" झाले होते.

त्याच कालावधीत रमेश ठाकूर हे नाव कानावर पडायला सुरुवात झाली होती.आमचे नवीन शिक्षण विस्ताराधिकारी...!! नाव ऐकू येत होतं,पण प्रत्यक्ष व्यक्ती काही नजरेस पडत नव्हती....!!औरंगाबादला आंतरशालेय खो खो स्पर्धा आयोजित केल्या जाणार होत्या.स्पर्धेला आठच दिवस बाकी होते.स्पोर्ट्स पासून मी जरा दूरच होतो.सहसा मला त्यात कधी लक्ष द्यायची गरजच पडली नाही.त्यामुळे दुसऱ्या शाळेवर जाऊन प्रॅक्टिस बघितली.नियम समजावून घेतले.मुलांचा सराव चालू केला.आठ दिवसानंतर स्पर्धेत सहभागी झालो.स्पर्धा औरंगाबादच्या क्रीडा संकुल स्टेडीयम वर होत्या.मुलांना स्पर्धेचा अनुभव द्यायचा या एका उद्देशाने मी मुले स्पर्धेत उतरवली होती.सामना सुरू झाला.आमच्या विरुद्ध नामांकित शाळेचा संघ होता.विना चुरस आम्ही मोकळ्या फरकाने पराभूत झालो.समोरचा संघ जिंकण्याला डीजर्व करत होता.मुलांना त्यांच्याशी शेकहँड करून त्यांचे अभिनंदन करायला सांगितले.मुले नाराज होणे स्वाभाविक होते.

त्या दिवशीचा हरलेला सामना आम्हाला खूप काही शिकवून गेला.आठ दिवसाच्या सरावाने आम्ही सामना जिंकणे अशक्य होते.त्यातून एक गोष्ट आम्ही कायमची शिकलो–"यशाला शॉर्टकट नसतो...!! खोखो तील नाराजी दूर करण्यासाठी म्हणून मुलांना एका मॉल फिरवायला घेऊन गेलो.पण एन्ट्री पॉइंटलाच मुलांना अडवल्या गेले.काही मुलांना आत सोडले,तर काहींना बाहेरच उभे केले.गाडी पार्क करून आल्यानंतर मी बघितलं की काही मुले बाहेरच आहेत. त्यांना बाहेर उभे करण्याचे कारण विचारले तर,त्यांच्या पायात चपला

नसल्याने आत प्रवेश दिला नसल्याचे मला सांगण्यात आले.मी प्रचंड संतापलो.त्यांनी सांगितले की त्यांना चपला घालून यायला सांगा,आम्ही त्यांना आत घेतो. मुले केविलवाण्या नजरेने माझ्याकडे पाहत होती.मी त्यांना समजावून सांगितले की,त्यांच्याकडे चपला आहे आणि त्यांनी घातल्या नाही,असा प्रकार नाही.मुळात त्यांना चपलाच नाही.तरी ते ऐकायला तयार नव्हते.मॉल च्या मॅनेजरशी मला बोलायचे आहे ,मला फोन लावून देण्याचे मी त्यांना सांगितले.त्यांनी मॅनेजरला फोन लावला.डोक्यात प्रचंड संताप होता.पहिलेच वाक्य मी त्यांना बोललो "तुमचे मॉल फक्त श्रीमंत लोकांसाठी आहे का.? मुलांची परिस्थिती गरीब आहे.त्यांच्याकडे स्वतःच्या चपला नाही.चपला नाही म्हणून प्रवेश नाही,हे योग्य आहे का..?"खूप वेळ बोलणं झाल्यानंतर मॅनेजर ने मधे जायची परवानगी दिली.रात्रभर डोळ्यासमोर तोच प्रसंग येत होता.गरिबीच्या सगळ्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही,हे माझ्या चांगलंच लक्षात आलं होतं.

सव्वीस जानेवारी.... प्रजासत्ताक दिन....दोन महिन्यांवर येऊन ठेपला होता.सगळे उपक्रम विनाखंड चालू होते.सव्वीस जानेवारी म्हणजे लेझीम कवायत.....हे गाडीवाट शिवाय आजूबाजूच्याही गावांना माहीत होतं. ती गाडीवाटची मोठी परंपरा होती.पण आता काय करायचे...?जो व्यक्ती त्याच्या हलगीवर शाळेच्या लेझीम संघाला ठेका धरायला लावायचा,तो तर आता शाळेत नव्हता.दादासाहेब नवपुते....!!पण मी तर मुलांना शब्द देऊन बसलो होतो,की या वर्षीही सगळ्या उपक्रमांप्रमाणे लेझीम ही होणार.मुलांना थोडी शंका होती.कारण ना मला हलगी वाजवता येत होती,ना लेझीम कवायत बसवता येत होती. पण शब्द तर मी स्वतःचा स्वतःला दिलेला होता.मी निश्चय केला.हलगी वाजवायलाही शिकायचं आणि लेझीम कवायत ही बसवायची.लगेच दादाला फोन केला.मला हलगी शिकायची आहे.दादाने नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता.माझं हलगी शिकणं सुरू झालं.दादा रोज घरी यायचा....चाली,ठेके वाजवून दाखवायचा. सुरुवातीला तर वाटलं हे आपल्याच्यानं होऊच शकत नाही.पण लेकरांना दिलेला शब्द आठवायचा.मग दादा वाजवायचा आणि मी त्याचा व्हिडिओ करून नंतर बघत व ऐकत बसायचो.

आता घरीच हलगीचा सराव सुरू झाला होता.घरचे परेशान झाले.बायको रागवायला लागली.कॉलनी ने वेड्यात काढायला सुरुवात केली.कंटाळून बायको माहेरी निघून गेली.मीही जाऊ दिलं, कारण त्यावेळी मला बायको पेक्षा हलगी आवडायला लागली होती.सराव कुणाच्याही कानाची तमा न बाळगता सुरू होता.हाताला टेबल,वही,पुस्तक जे काही लागत होतं त्यावर मी हात मारून चालीचा सराव करायचो.आता मी बऱ्यापैकी च्या पुढे हलगी वाजवायला लागलो होतो.पंधरा दिवसांच्या सरावानंतर मी लेझीम कवायत ही बसवली.अगदी नवीन प्रकारे.झोपेतही मला माझी कवायत दिसायला लागली.भरपूर सराव ही झाला.

शेवटी सव्वीस जानेवारीचा दिवस उजाडला.ध्वजारोहण झाले.मैदानात पाचशे तरी लोक आलेले होते.भाषणे वगैरे झाल्यावर मुले कवायती साठी तयार झाली.मीही हलगी खांद्यावर घेऊन तयार झालो.हलगीवर पहिली काडी पडली आणि मुले लेझीम वर थिरकायला सुरुवात झाली.

मुले आणि मी ....बेभान झालो होतो.लोक डोळे वटारून लेझीम बघत होते.शेवटची काडी हलगीवर पडली आणि प्रचंड टाळ्यांचा कडकडाट झाला.गावकरी प्रचंड खुश झाले.दहा हजार रुपये बक्षीस म्हणून त्यांनी लेकरांना जमा करून दिले.मला ही प्रचंड आनंद झाला.कारण लेकरांना दिलेला अवघड शब्द मी आज पूर्ण केला होता.त्याच्या चार–पाच दिवसांनीच एक निरोप मिळाला.औरंगाबादला जिल्हास्तरीय लेझीम स्पर्धा आयोजित होणार आहे.लगेच संघाची नोंदणी केली.सात–आठ दिवस पुन्हा सरावाला मिळाले.त्याच वर्षी सचिन तेंडुलकरला भारतरत्न पुरस्कार मिळाला होता.

त्याला लेझीम मधून मानवंदना देण्याचे फॉर्मेशन मी कवायातीत टाकले.कुठलं तरी प्राईज आपण नक्की मारणार हा आत्मविश्वास एव्हाना मला आला होता.सगळे मुले टेम्पोत भरले.सोबतीला काही सहकारीही आले.भव्य मैदानात स्पर्धा आयोजित केल्या होत्या.सर्व मोठ मोठया नामांकित शाळेतील संघ.रंगीबेरंगी ड्रेसिंग.सोबतीला प्रचंड अनुभव.सुरवातीला मी थोडा घाबरलो.आमचे पोरं जिल्हा परिषदेच्या युनिफॉर्म मधे. फक्त ज्याला आम्ही सचिन बनवला होता,तो मात्र हेल्मेट,हॅन्डग्लोज,बॅट,पॅड....अगदी मैदानावर उतरण्याच्या तयारीत वाटणारा.पहिली काडी हलगीवर पडली आणि जे गाडीवावाटला झालं तेच इथेही.कवायतीचा शेवट तिरंगा फडकतो आणि राष्ट्रगीत सुरू होते असा होता.संपूर्ण मैदान उभे राहिले.राष्ट्रगीत संपले आणि पुन्हा प्रचंड टाळ्यांचा कडकडाट.सहभागी झालेल्या पुर्ण संघामध्ये,माझी शाळा ही एकमेव जिल्हापरिषदेची शाळा होती.

संयोजकांनी जिल्हा पातळीवरील लेझीम स्पर्धेचा तिसरा क्रमांक अनाऊन्स केला... जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाडीवाट...


अनिल साळूबा पाटील

जि.प.प्रा.शा.पवारवस्ती

बिट– गारखेडा नं–1.

औरंगाबाद

मो.9765684383










वेध